॥ श्रीः ॥

# मराठी भाषांतरासह महाभारत.

## वनपर्व

( अध्याय २०० )

काशीनाथ वामन लेले वाईकर

यांनीं

वाई येथें ' मोदवृत्त ' छापखान्यांत छापून ' आर्यधर्मदर्पण '

मासिकपुस्तकद्वारा प्रसिद्ध केलें.



शके १८२०

॥ श्रीः ॥

श्रीमहर्षिव्यासप्रणीतं

# श्री म हा भा र त म्।

## वनपर्व ।

ॐम् ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्। देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ जनमेजय उवाच ॥ एवं द्यूतजिताः पार्थाः कोपिताश्च दुरात्मभिः। धार्तराष्ट्रैः महामात्यैर्निकृत्या द्विजसत्तम १ श्राविताः परुषा वाचः सृजद्भिर्वैरमुत्तमम्। किमकुर्वत कौरव्या मम पूर्वपितामहाः २ कथं चैश्वर्यविभ्रष्टाः महसा दुःखमीयुषः। वने विजह्रिरे पार्थाः शक्रप्रतिमतेजसः ३ के वै तानन्ववर्तन्त प्रसमान्व्यसनमुत्तमम्। किमाचाराः किमाहाराः क च वासो महात्मनाम् ४ कथं च द्वादश समा वने तेषां महामुने। व्यतीयुर्ब्राह्मणश्रेष्ठ शूराणामरिघातिनाम् ५ कथं च राजपुत्री सा प्रवरा सर्व योषिताम्। पतिव्रता महाभागा द्रौपदी सत्यवादिनी ६ वनवा-

---

ॐम् ॥नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्। देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ जनमेजय प्रश्न करितोः—हे द्विजश्रेष्ठ, अमात्यांसहवर्तमान दुरात्म्या धृतराष्ट्रपुत्रांनीं याप्रमाणें कपटानें द्यूतामध्यें पांडवांना जिंकून कोपविले असतां १ आणि पराकाष्ठेचें वैर उत्पन्न करणाऱ्या त्या धृतराष्ट्रपुत्रांनीं त्यांना उद्देशून कठोर भाषणें केलीं असतां माझ्या पित्याचे पितामह जे कुरुकुलोत्पन्न पांडव त्यांनीं काय केलें ? २; इंद्रासमान तेजस्वी असलेले पांडव ऐश्वर्यापासून भ्रष्ट होऊन एकाएकीं दुःखयुक्त झाले असतां वनामध्यें कसे विहार करूं लागले ? ३; दुस्तर संकटांत सांपडलेल्या त्या पांडवांच्या मागोमाग कोण कोण गेले ? ते महात्मे पांडव ( वनामध्यें ) आचरण कसें ठेवीत असत ? आहार काय करीत असत ? आणि वस्त्र तरी कशाप्रकारचें परिधान करीत असत ? ४. हे द्विजश्रेष्ठ महामुने, त्या शत्रुघातक शूरांचीं वनामध्यें बारा वर्षे कशीं गेलीं ? ५; महाभाग्यवती, सत्यवचनी व पतिव्रता अशी जी सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ व दुःख भोगण्यास अयोग्य असलेली राजकन्या द्रौपदी तिनें भयंकर वनवास कसा भोगिला ?

समदुःखार्हा दारुणं प्रत्यपद्यत । एतदाचक्ष्व मे सर्वं विस्तरेण तपोधन ७ श्रोतुमिच्छामि चरितं भूरिद्रविणतेजसाम् । कथ्यमानं त्वया विप्र परं कौतूहलं हि मे ८ वैशम्पायन उवाच ॥ एवं द्यूतजिताः पार्थाः कोपिताश्च दुरात्मभिः । धार्तराष्ट्रैः सहामात्यैर्निर्ययुर्गजसाह्वयात् ९ वर्धमानपुरद्वारेणाभिनिष्क्रम्य पाण्डवाः । उदङ्मुखाः शस्त्रभृतः प्रययुः सह कृष्णया १० इन्द्रसेनादयश्चैव भृत्याः परिचतुर्दश । रथैरनुययुः शीघ्रैः स्त्रिय आदाय सर्वशः ११ व्रजतस्तान्विदित्वा तु पौराः शोकाभिपीडिताः । गर्हयन्तोऽसकृद्भीष्मविदुरद्रोणगौतमान् १२ ऊचुर्विगतसंत्रासाः समागम्य परस्परम् । पौरा ऊचुः ॥ नेदमस्ति कुलं सर्वं न वयं न च नो गृहाः १३ यत्र दुर्योधनः पापः सौबलेयेन पालितः । कर्णदुःशासनाभ्यां च राज्यमेतच्चिकीर्षति १४ न तत्कुलं न चाचारो न धर्मोऽर्थः कुतः सुखम् । यत्र पापसहायोऽयं पापो राज्यं चिकीर्षति १५ दुर्योधनो गुरुद्वेषी त्यक्ताचारसुहृज्जनः । अर्थलुब्धोऽभिमानी च नीचः प्रकृतिनिर्घृणः १६ नेयमस्ति मही कृत्स्ना यत्र

---

हें सर्व, हे तपोधन, मला आपण सविस्तर सांगा ६, ७. हे विप्र, महापराक्रमी व महातेजस्वी अशा त्या पांडवांचें चरित्र श्रवण करण्याची माझी इच्छा आहे आणि विशेषतः तें आपल्या मुखातून श्रवण करण्याविषयीं मला फारच उत्सुकता आहे ८. वैशंपायन सांगतात:—अमात्यांसहवर्तमान दुरात्म्या धृतराष्ट्रपुत्रांनीं ह्याप्रमाणें ( कपटानें ) पांडवांना द्यूतामध्यें जिंकून कोपविलें असतां ते हास्तिनपुरांतून बाहेर पडले ९ आणि वर्धमाननामक नगराकडील द्वारानें बाहेर पडल्यावर ते शस्त्रधारी पांडव उत्तराभिमुख होऊन द्रौपदीसहवर्तमान जाऊं लागले असतां १० सर्व स्त्रियांना बरोबर घेऊन इंद्रसेनप्रभृति चवदा सेवक शीघ्र जाणाऱ्या रथांत बसून त्यांच्या मागोमाग गेले ११. तेव्हां हे पांडव जात आहेत असें जाणून शोकानें सर्वस्वीं व्याकुळ झालेले हास्तिनपुरनिवासी प्रजाजन परस्पर एकत्र जमून यत्किंचित्ही भीति न बाळगितां भीष्म, विदुर, द्रोणाचार्य व गौतमकुलोत्पन्न कृपाचार्य ह्यांची निंदा करीत करीत म्हणाले "हें सर्वकुल, आम्ही आणि आमचीं घरेंदारें हें ( असून ) नसल्यासारखेंच आहे १२, १३. कारण, सुबलपुत्र शकुनि, कर्ण व दुःशासन हे ज्याचें रक्षण करीत आहेत तो पापी दुर्योधन ह्या ठिकाणीं हें राज्य करण्याची इच्छा करीत आहे १४. सारांश, दुष्टांच्या साहाय्यानें हा दुष्ट दुर्योधन ज्या ठिकाणीं राज्य करण्याची इच्छा करीत आहे त्या ठिकाणीं कुल, आचार, धर्म व अर्थ हें सर्व नसल्यासारखेंच आहे. तेव्हां सुख कोठून असणार? १५. गुरुद्वेषी, धनलोभी, गर्विष्ठ, नीच, आचार व सुहृद ह्यांची परवा न बाळगणारा आणि जातीचाच निर्दय असा हा दुर्योधन आहे १६. तस्मात्, ज्या ठिकाणीं दुर्योधन राजा आहे

दुर्योधनो नृपः । साधु गच्छामहे सर्वे यत्र गच्छन्ति पाण्डवाः १७ सानुक्रोशा महात्मानो विजितेन्द्रियशत्रवः । ह्रीमन्तः कीर्तिमन्तश्च धर्माचारपरायणाः १८ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वानुजग्मुस्ते पाण्डवांस्तान्समेत्य च । ऊचुः प्राञ्जलयः सर्वे तान्कुन्तीमाद्रिनन्दनान् १९ क्व गमिष्यथ भद्रं वस्त्यक्त्वास्मान्दुःखभागिनः । वयमप्यनुयास्यामो यत्र यूयं गमिष्यथ २० अधर्मेण जिताञ्छ्रुत्वा युष्मांस्त्यक्तघृणैः परैः । उद्विग्नाः स्मो भृशं सर्वे नास्मान्हातुमिहार्हथ २१ भक्तानुरक्तान्सुहृदः सदा प्रियहिते रतान् । कुराजाधिष्ठिते राज्ये न विनश्येम सर्वशः २२ श्रूयतां चाभिधास्यामो गुणदोषान्नरर्षभाः । शुभाशुभाधिवासेन संसर्गः कुरुते यथा २३ वस्त्रमापस्तिलान्भूमिं गन्धो वासयते यथा । पुष्पाणामधिवासेन तथा संसर्गजा गुणाः २४ मोहजालस्य योनिर्हि मूढैरेव समागमः । अहन्यहनि धर्मस्य योनिः साधुसमागमः २५ तस्मात्प्राज्ञैश्च वृद्धैश्च शुद्धभावैस्तपस्विभिः ।

---

त्या ठिकाणीं ही सर्व पृथ्वी व्यर्थ आहे. करितां, धर्म व आचार ह्यांविषयीं तत्पर, इंद्रियरूप शत्रूंना जिंकिलेले, कीर्तिमान् , विनयशील आणि दयालु असे महात्मे पांडव जिकडे जात आहेत तिकडे आपण सर्व खुशाल जाऊं" १७,१८. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें भाषण करून ते हास्तिनपुरनिवासी जन पांडवांच्या मागोमाग गेले आणि त्या कुंती व माद्री ह्यांच्या पुत्रांना गांठल्यावर ते सर्व हात जोडून त्यांना म्हणूं लागले १९ " अहो, तुमचें कल्याण असो. तुमच्या दुःखाचे भागीदार असलेल्या आह्मांला टाकून तुह्मी कोठें चालला ? जिकडे तुह्मी जाल तिकडे आह्मीही येतों २०. दयेचा त्याग केलेल्या शत्रूंनीं तुह्मांला अधर्मानें जिंकिल्याचें श्रवण केल्यापासून आह्मी सर्व उद्विग्न झालों आहों. तस्मात् , ह्या प्रसंगीं आमचा त्याग करणें तुह्मांला योग्य नाहीं २१. कारण, आह्मी सेवेविषयीं तत्पर, प्रेम करणारे, तुमच्यापासून कांहीं मिळण्याची अपेक्षा न ठेवितां तह्मांविषयीं चांगली बुद्धी ठेविणारे, तुमच्या प्रेमाला पात्र आणि तुमचें हित होण्याविषयीं तत्पर असे आहोंत. अहो, दुष्ट राजानें चालविलेल्या राज्यामध्ये राहून सर्वस्वीं नाश पावण्याची इच्छा आह्मी करावी कीं काय? २२. हे पुरुषश्रेष्ठ हो, शुभ आणि अशुभ ह्यांचें सांनिध्य झालें असतां त्या संसर्गापासून कोण कोणते गुणदोष पुरुषाचे ठिकाणीं उत्पन्न होतात हें आह्मी सांगतों तेवढें तुह्मी श्रवण करा २३. अहो, सांनिध्याच्या योगानें पुष्पांचा गंध ज्याप्रमाणें वस्त्र उदक, तिल व मृत्तिका ह्यांना सुवासित करितो त्याचप्रमाणें संसर्गजन्य धर्म पुरुषाचे ठिकाणीं येत असतात २४. मूढांशीं समागम करणें हें मोहजालाचें उत्पत्तिस्थान असून प्रतिदिवशीं साधुसमागम करणें हें धर्मा(च्या अभिवृद्धी ) चें कारण आहे २५. तस्मात् , प्राज्ञ

सद्भिश्च सह संसर्गः कार्यः शमपरायणैः २६ येषां त्रीण्यवदातानि विद्या योनिश्च कर्म च । तान्सेवेत्तैः समास्या हि शास्त्रेभ्योपि गरीयसी २७ निरारम्भा ह्यपि वयं पुण्यशीलेषु साधुषु । पुण्यमेवाप्नुयामेह पापं पापोपसेवनात् २८ असतां दर्शनात्स्पर्शात्संजल्पाच्च सहासनात् । धर्माचाराः प्रहीयन्ते सिध्यन्ति च न मानवाः २९ बुद्धिश्च हीयते पुंसां नीचैः सह समागमात् । मध्यमैर्मध्यतां याति श्रेष्ठतां याति चोत्तमैः ॥ अनीचैर्नाप्यविषयैर्नाधर्मिष्ठैर्विशेषतः ३० ये गुणाः कीर्तिता लोके धर्मकामार्थसंभवाः । लोकाचारेषु संभूता वेदोक्ताः शिष्टसंमताः ३१ ते युष्मासु समस्ताश्च व्यस्ताश्चैवेह सद्गुणाः । इच्छामो गुणवन्मध्ये वस्तुं श्रेयोभिकाङ्क्षिणः ३२ युधिष्ठिर उवाच ॥ धन्या वयं यदस्माकं स्नेहकारुण्ययन्त्रिताः । असतोपि गुणानाहुर्ब्राह्मणप्रमुखाः प्रजाः ३३ तदहं भ्रातृसहितः सर्वान्विज्ञापयामि वः ।

---

आणि ह्मणूनच वृद्ध, तपस्वी व शमाचेंच अवलंबन करून राहणारे असे जे शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेले सज्जन त्यांच्याशीं समागम करावा २६. विद्या, कुल व आचरण हीं तीन ज्यांचीं शुद्ध आहेत ( ह्मणजे संप्रदायशुद्ध विद्या, शुद्ध कुलांत जन्म आणि सदाचरण हीं तीन ज्यांचे ठिकाणीं आहेत ) त्याच्याशीं समागम करावा. कारण, त्यांच्याशीं असलेला समागम शास्त्रां(च्या केवल सेवना)पेक्षांही श्रेष्ठ आहे २७. पुण्यशील साधुपुरुषांचे संनिध आह्मी कांहीं एक कर्म न करितां जरी राहिलों तरी सुद्धां आह्मांला पुण्यच प्राप्त होईल आणि ( सत्कर्म केलें असतांही ) दुष्टांच्या सहवासामुळें आह्मांला पापच लागेल २८. दुष्टांचें दर्शन, स्पर्शन, संभाषण व सहासन ह्यांच्या योगानें धर्म व आचार ह्यांचीं हानि होते आणि ( ह्याप्रमाणें धर्माचार नष्ट झाल्यावर ) मानवांना ( चित्तशुद्धिरूप ) सिद्धि प्राप्त होत नाहीं २९. नीचांशीं समागम झाल्यापासून पुरुषांची बुद्धि भ्रष्ट होते, मध्यम लोकांच्या सहवासानें बुद्धिही मध्यमप्रकारची होते आणि उत्कृष्ट लोकांच्या समागमापासून पुरुषांची बुद्धिही उत्कृष्ट होते. करितां, विशेषेंकरून नीच, विषयलंपट आणि अधर्मनिष्ठ अशा पुरुषांशीं सहवास ठेवूं नये ३०. लोकरीतीला धरून असलेले आणि धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गांच्या उत्पत्तीला कारणीभूत असे जे गुण लोकामध्यें प्रसिद्ध आहेत तेच वेदोक्त आणि शिष्टजनसंमत गुण होत ३१. ते सर्व सद्गुण समुदायानें व भिन्न भिन्न असे ह्या जगतामध्यें तुमचे ठिकाणीं आहेत आणि कल्याणाची इच्छा करणाऱ्या आह्मांलाही गुणवान् पुरुषांमध्यें वास्तव्य करण्याची इच्छा आहे ३२. युधिष्ठिर ह्मणतोः—वात्सल्य व दया ह्यांनीं बद्ध झालेले ब्राह्मणप्रभृति प्रजाजन आमचे ठिकाणीं गुण नसतांनाहीं आहेत ह्मणून ह्मणत आहेत. तस्मात् , आह्मी धन्य आहों ३३. करितां, भ्रात्यांसहवर्तमान मी जी ह्या तुह्मा सर्वांची प्रार्थना करीत आहें ती आमचे

नान्यथा तद्धि कर्तव्यमस्मत्स्नेहानुकम्पया ३४ भीष्मः पितामहो राजा विदुरो जननी तथा। सुहृज्जनश्च प्रायो मे नगरे नागसाह्वये ३५ ते त्वस्मद्धितकामार्थं पालनीयाः प्रयत्नतः। युष्माभिः सहिताः सर्वे शोकसंतापविह्वलाः ३६ निवर्ततागता दूरं समागमनशापिताः। स्वजने न्यासभूते मे कार्या स्नेहान्विता मतिः ३७ एतद्धि मम कार्याणां परमं हृदि संस्थितम्। कृता तेन तु तुष्टिर्मे सत्कारश्च कृतो भवेत् ३८ वैशम्पायन उवाच ॥ तथानुमन्त्रितास्तेन धर्मराजेन ताः प्रजाः। चक्रुरार्तस्वरं घोरं हा राजन्निति संहताः ३९ गुणान्पार्थस्य संस्मृत्य दुःखार्ताः परमातुराः। अकामाः संन्यवर्तन्त समागम्याथ पाण्डवान् ४० निवृत्तेषु तु पौरेषु रथानास्थाय पाण्डवाः। आजग्मुर्जाह्नवीतीरे प्रमाणाख्यं महावटम् ४१ ते तं दिवसशेषेण वटं गत्वा तु पाण्डवाः। ऊषुस्तां रजनीं वीराः संस्पृश्य सलिलं शुचि ४२ उदकेनैव तां रात्रिमूषुस्ते नरपुंगवाः। अनुजग्मुश्च तत्रैतान्स्नेहात्केचिद्द्विजातयः ४३ साग्नयोऽनग्नयश्चैव सशिष्यगणबान्धवाः। स तैः परिवृतो राजा शुशुभे ब्रह्मवादिभिः ४४

---

ठिकाणीं तुमचें प्रेम व दया असल्यामुळें तुह्मी अमान्य करूं नका ३४. पितामह भीष्म, धृतराष्ट्र राजा, विदुर, माझी माता आणि सुहृज्जन हे सर्व प्रायः हास्तिनपुरांतच आहेत ३५ व तुमच्या प्रमाणेंच ते सर्व शोक आणि संताप ह्यांनीं व्याकुल झालेले आहेत. ह्यास्तव, आमच्या हिताची इच्छा धरून प्रयत्नपूर्वक तुह्मी त्यांचें परिपालन करा ३६ तुह्मी फारच दूर आलां; आतां परत जा. माझ्या बरोबर जर याल तर तुह्मांला शपथ आहे. ठेवीप्रमाणें हास्तिनपुरामध्यें असलेल्या माझ्या भीष्मप्रभृति स्वजनांचे ठिकाणीं तुह्मी सप्रेम बुद्धि ठेवीत जा ३७. सर्व कार्यांमध्यें हेंच कार्य माझ्या मनामध्यें फारच घोळत आहे आणि तें तुह्मी केलें असतां माझा संतोष व सत्कार केल्यासारिखें होणार आहे ३८. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या धर्मराजानें सांगितलें असतां ते एकत्र जुळलेले प्रजाजन "हे राजा" ह्मणून दीन वाणीनें भयंकर आक्रोश करूं लागले ३९ तदनंतर कुंतीपुत्र धर्मराजाचे गुण आठवून पराकाष्ठेचे आतुर व दुःखाकुल झालेले ते नगरवासी जन पांडवांची भेट घेऊन इच्छा नसतांनाही परत फिरले ४० आणि नगरवासी लोक परत फिरल्यावर ( धृतराष्ट्रानें पाठविलेल्या ) रथामध्यें बसून पांडव गंगातीरीं प्रमाणनामक मोठ्या वटवृक्षासमीप गेले ४१. सारांश, ( नगरवासी जन परत फिरल्यावर ) अवशिष्ट राहिलेल्या दिनकालामध्यें ते पांडव त्या वटासमीप गेले आणि तेथील शुद्ध गंगाजलाचें मार्जन करून त्या रात्रीं त्या वीरांनीं तेथेंच वास्तव्य केलें ४२. त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांनीं उदकावरच ती रात्र काढिली. त्या ठिकाणीं शिष्यगण आणि बांधव ह्यांसहवर्तमान कांहीं साग्निक व कांहीं अनग्निक ब्राह्मण प्रेमामुळें त्या पांडवांचे

तेषां प्रादुष्कृताग्नीनां मुहूर्ते रम्यदारुणे । ब्रह्मघोषपुरस्कारः संजल्पः समजायत ४५ राजानं तु कुरुश्रेष्ठं ते हंसमधुरस्वराः। आश्वासयन्तो विप्राऽय्याः क्षपां सर्वां व्यनोदयन्४६इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्यारण्यपर्वणि पौरप्रत्यागमने प्रथमोध्यायः ॥ १ ॥

वैशम्पायन उवाच ॥ प्रभातायां तु शर्वर्यां तेषामक्लिष्टकर्मणाम् । वनं यियामतां विप्रास्तस्थुर्भिक्षाभुजोग्रतः १ तानुवाच ततो राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः २ वयं हि हृतसर्वस्वा हृतराज्या हृतश्रियः । फलमूलामिषाहारा वनं गच्छाम दुःखिताः ३ वनं च दोषबहुलं बहुव्यालसरीसृपम् । परिक्लेशश्च वो मन्ये ध्रुवं तत्र भविष्यति ४ ब्राह्मणानां परिक्लेशो दैवतान्यपि सादयेत् । किं पुनर्मामितो विप्रा निवर्तध्वं यथेष्टतः ५ ब्राह्मणा ऊचुः॥ गतिर्या भवतां राजंस्तां वयं गन्तुमुद्यताः । नार्हस्यस्मान्परित्यक्तुं भक्तान्सद्धर्मदर्शिनः ६ अनुकम्पां हि भक्तेषु दैवता ह्यपि कुर्वते । विशेषतो ब्राह्मणेषु

---

मागोमाग गेले होते तेव्हां वेदाध्ययन करणाऱ्या त्या ब्राह्मणांनीं तो धर्मराजा परिवेष्टित होऊन शोभूं लागला ४३,४४. तदनंतर ( अग्निहोत्रादिकामुळें ) रमणीय आणि ( राक्षसादिकाच्या संचारामुळें ) भयंकर अशा वेळीं अग्नि प्रज्वलित करून बसलेल्या त्या ब्राह्मणाचें विशेषतः वेदाच्या आधारानें संभाषण सुरू झालें ४५ व हंसासारिख्या मधुर स्वरानें युक्त असलेल्या त्या ब्राह्मणांनीं कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराजाला धीर देत देत सर्व रात्र काढिली ४६. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गतवनपर्वांतील आरण्यपर्वांपैकीं पौरजनांच्या परत फिरण्याविषयीं पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

वैशंपायन सांगतातः—रात्र उजाडल्यानंतर ते पुण्यकर्म करणारे पांडव वनांत जाण्यास उद्युक्त झाले असतां त्यांच्या अग्रभागीं भिक्षेवर निर्वाह करणारे विप्र येऊन उभे राहिले १. तेव्हां कुंतीपुत्र युधिष्ठिरराजा त्यांना ह्मणाला २ “ ( हे विप्रहो ) आमचें धन, राज्य आणि ह्या उभयतांमुळें असलेली आमची शोभा ह्या सर्वांचा नाश झाला आहे आणि दुःखाकुल होऊन फळें, मुळें व मांस ह्यांवर उपजीविका करणारे आह्मी वनामध्यें जात आहोंत ३ आणि वन तर अनर्थांनीं भरलेलें आहे. कारण, नानाप्रकारचीं श्वापदें व सर्प त्या ठिकाणीं आहेत ह्यास्तव. वनामध्यें तुह्मांला निःसंशय क्लेश होतील असें मला वाटतें ४. शिवाय, ब्राह्मणांना क्लेश झाले असतां, देवतांचा मुद्धां नाश होईल; तेव्हां माझी कथा कशाला पाहिजे ? करितां, हे विप्रहो आपण येथून यथेष्ट परत जावें ५. ब्राह्मण ह्मणतातः—हे राजा, तुह्मी ज्या मार्गाचें अवलंबन कराल त्याचमार्गाचें अवलंबन करण्यास आह्मी उद्युक्त झालों आहोंत. करितां, सद्धर्मानें वागून तुझे ठिकाणीं अनुरक्त असलेल्या आमचा त्याग करणें तुला योग्य नाहीं ६. अरे, भक्तांचे ठिकाणीं देवता देखील दया करितात आणि सदाचरणाचें अवलंबन

सदाचारावलम्बिषु ७ युधिष्ठिर उवाच ॥ ममापि परमा भक्तिर्ब्राह्मणेषु सदा
द्विजाः । सहायविपरिभ्रंशस्त्वयं सादयतीव माम् ८ आहरेयुर्हि मे येपि
फलमूलमृगांस्तथा । त इमे शोकजैर्दुःखैर्भ्रातरो मे विमोहिताः ९ द्रौपद्या
विप्रकर्षेण राज्यापहरणेन च । दुःखार्दितानिमान्क्लेशैर्नाहं योक्तुमिहोत्सहे १०
ब्राह्मणा ऊचुः ॥ अस्मत्पोषणजा चिन्ता मा भूत्ते हृदि पार्थिव । स्वयमा-
हृत्य चान्नानि त्वानुयास्यामहे वयम् ११ अनुध्यानेन जप्येन विधास्यामः
शिवं तव । कथाभिश्चाभिरम्याभिः सह रंस्यामहे वयम् १२ युधिष्ठिर
उवाच ॥ एवमेतन्न संदेहो रमेहं सततं द्विजैः । न्यूनभावात्तु पश्यामि प्रत्या-
देशमिवात्मनः १३ कथं द्रक्ष्यामि वः सर्वान्स्वयमाहृत्य भोजिनः । मद्भक्त्या
क्लिश्यतोनर्हान्धिक्पापान्धृतराष्ट्रजान् १४ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा स
नृपः शोचन्निषसाद महीतले । तमध्यात्मरतो विद्वाञ्छौनको नाम वै द्विजः ॥
योगे सांख्ये च कुशलो राजानमिदमब्रवीत् १५ शोकस्थानसहस्राणि भय-

करून असणाऱ्या ब्राह्मणांचे ठिकाणीं तर विशेषें करून करितात ७. युधिष्ठिर म्हणतोः—
हे द्विजहो, ब्राह्मणांचे ठिकाणीं माझीही पराकाष्ठेची भक्ति आहे. परंतु, साहाय्य कर-
णारा कोणी नसल्यामुळें मी हताश झाल्यासारिखा झालों आहें ८. येऊनजाऊन जे
हे माझे भ्राते फळें, मुळें व मृग घेऊन येणार त्यांनाही शोकमूलक दुःखाच्या
योगानें कांहीं सुचेनासें झालें आहे ९. सारांश, द्रौपदीला ( केश धरून सभेमध्यें
दुःशासनानें ) ओढिल्यामुळें आणि राज्याचा अपहार झाल्यामुळें दुःखपीडित झालेल्या
ह्या भ्रात्यांना आणखी क्लेश देण्याची माझी इच्छा नाहीं १०. ब्राह्मण म्हणतातः—
हे राजा, आमच्या पोषणाविषयीं तुला मनामध्यें काळजी करण्याचें कारण नाहीं.
आम्ही स्वतः भक्ष्य आणून तुझ्या बरोबर येणार आहोत ११. इष्टचिंतन आणि
जपजाप्य ह्यांच्या योगानें आम्ही तुझें कल्याण करूं आणि सर्वप्रकारें रम्य अशा
कथांच्या योगानेंही आपण सर्व आनंदानें दिवस काढूं १२. युधिष्ठिर म्हणतोः—आपण
म्हणतां हें अगदी खरें आहे; ह्यांत मुळींच संदेह नाहीं. द्विजांसहवर्तमान रहाणें मला
नेहमी बरें वाटतें. परंतु, सांप्रत सर्वप्रकारची कमतरता असल्यामुळें ( द्विजांसहवर्तमान
रहाण्याची ) माझ्या मनाला लाज वाटत आहे १३. स्वतः अन्न संपादन करून उप-
जीविका करीत असतांना म्हणजे अर्थात् क्लेश भोगण्यास अपात्र असूनही माझेठि-
काणीं असलेल्या प्रेमामुळें क्लेश भोगीत असतांना तुम्हां सर्वांस माझ्यानें कसें पहावेल?
खरोखर धिक्कार असो ह्या पापी धृतराष्ट्रपुत्रांना ! १४. वैशंपायन सांगतात—असें
म्हणून तो धर्मराजा दुःख करीत करीत भूतलावर बसला तों इतक्यांत योगें आणि आत्मज्ञान

१ योगो ब्रह्मणि संसर्गो विशिष्टाया मनोगतेः । शुद्धात्मतत्त्वविज्ञानं सांख्यमित्यभिधीयते ॥

स्थानशतानि च । दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् १६ न हि ज्ञानविरुद्धेषु बहुदोषेषु कर्मसु। श्रेयोघातिषु सज्जन्ते बुद्धिमन्तो भवद्विधाः १७ अष्टाङ्गां बुद्धिमाहुर्यां सर्वाश्रेयोभिघातिनीम्। श्रुतिस्मृतिसमायुक्तां राजन्सा त्वय्यवस्थिता १८ अर्थकृच्छ्रेषु दुर्गेषु व्यापत्सु स्वजनस्य च। शारीरमानसैर्दुःखैर्न सीदन्ति भवद्विधाः १९ श्रूयतां चाभिधास्यामि जनकेन यथा पुरा। आत्मव्यवस्थानकरा गीताः श्लोका महात्मना २० मनोदेहसमुत्थाभ्यां दुःखाभ्यामर्दितं जगत्। तयोर्व्यासमासाभ्यां शमोपायमिमं शृणु २१ व्याधेरनिष्टसंस्पर्शाच्छ्रमादिष्टविवर्जनात्। दुःखं चतुर्भिः शारीरं कारणैः संप्रवर्तते २२ तदा तत्प्रतिकाराच्च सततं चाविचिन्तनात्। आधिव्याधिप्रशमनं क्रिया योगद्वयेन तु २३ मतिमन्तो ह्यतो वैद्याः शमं प्रागेव

---

ह्यांमध्यें निष्णात आणि वेदांतशास्त्राचे ठिकाणीं रत असलेले विद्वान् द्विज शौनक त्या धर्मराजाला म्हणाले १५ " शोकाचीं हजारों कारणें आणि भयाचीं शेकडों कारणें प्रत्येक दिवशीं मूढाला प्राप्त होत असतात. पंडिताला होत नाहींत १६. बहुदोषानीं युक्त अशीं जीं ज्ञानाला आणि म्हणूनच मोक्षाला विरुद्ध असलेलीं कर्में त्यांचे ठिकाणीं तुह्मासारिखे पुरुष आसक्त होऊन रहात नाहींत १७. श्रुतिस्मृतिविषयक प्रमाणांनीं दृढीकरण झालेली अशी जी सर्व प्रकारच्या अज्ञानाचा विघात करणारी अष्टांग बुद्धि[1] ती, हे राजा, तुझेठिकाणीं आहे १८. दुस्तर द्रव्यनाश होऊन स्वजनावर विपरीत आपत्ति आली असतां होणाऱ्या शारीरिक व मानसिक दुःखांच्या योगानें तुह्मांसारख्यांचा धीर सुटत नाहीं १९. असो. महात्म्या जनकानें जे मनस्थैर्य करणारे श्लोक पूर्वी पठन केलेले आहेत ते मी आता कथन करितों; तुह्मी श्रवण करा २०. मनापासून आणि शरीरापासून उत्पन्न झालेल्या ( मानसिक व शारीरिक ) दुःखांच्या योगानें जगत् पिडलें आहे. तस्मात्, हीं दोन्हीप्रकारचीं दुःखें नाहींशीं होण्याचा हा उपाय सविस्तर आणि संक्षिप्त रीतीनें तूं श्रवण कर २१. व्याधि, ( कंटक, सर्प वगैरे ) अनिष्ट गोष्टींची प्राप्ति, ( शरीर चालण्यास ) अवश्य असलेल्या ( अन्नपानादि ) पदार्थांचा अभाव आणि श्रम ह्या चार कारणांमुळें शारीरिक दुःख होतें २२ आणि (औषध, पादत्राण, अन्नपान व स्वास्थ्य ह्यांच्या योगानें ) व्याधिप्रभृतींचा प्रतीकार केल्यानें शारीरिक दुःख शमन होत असून ( मानसिक दुःखाला कारणीभूत होणारी जी गोष्ट तिकडे मनाचा ध्यास न लावितां दुसऱ्या एखाद्या रम्य विषयाच्या ) सतत चिंतनाकडे मन लाविलें असतां मानसिक दुःखाचाही उपशम होतो. सारांश, ह्या दोन उपायांच्या योगानें आधि व व्याधि ह्यांचें शमन होतें २३.

---

१ शुश्रूषा श्रवणं चैव ग्रहणं धारणं तथा । ऊहापोहोऽर्थविज्ञानं निश्चयश्चेति धीगुणाः ॥

कुर्वते । मानसस्य प्रियाख्यानैः संभोगोपनयैर्नृणाम् २४ मानसेन हि दुःखेन शरीरमुपतप्यते । अयःपिण्डेन तप्तेन कुम्भसंस्थमिवोदकम् २५ मानसं शमयेत्तस्माज्ज्ञानेनाग्निमिवाम्बुना । प्रशान्ते मानसे ह्यस्य शारीरमुपशाम्यति२६मनसो दुःखमूलं तु स्नेह इत्युपलभ्यते । स्नेहाच्च सज्जते जन्तुर्दुःखयोगमुपैतिच २७ स्नेहमूलानि दुःखानि स्नेहजानि भयानि च । शोक हर्षौ तथायासः सर्वं स्नेहात्प्रवर्तते २८ स्नेहाद्भावोनुरागश्च प्रजज्ञे विषये तथा । अश्रेयस्कावुभावेतौ पूर्वस्तत्र गुरुः स्मृतः २९ कोटराग्निर्यथाशेषं समूलं पादपं दहेत् । धर्मार्थौ तु तथाल्पोपि रागदोषो विनाशयेत् ३० विप्रयोगे न तु त्यागी दोषदर्शी समागमे । विरागं भजते जन्तुर्निर्वैरो निरव-

---

मानसिक दुःखामुळें शारीरिक दुःख होतें ) एतदर्थ बुद्धिमान् वैद्य शारीरिक व्याधीची चिकित्सा करण्यापूर्वी प्रिय कथा आणि भोग्यवस्तुसमर्पण ह्यांच्या योगानें मानसिक दुःख प्रथम नाहींसें करितात २४. कारण, तप्त झालेल्या लोखंडाच्या गोळ्यामुळें भांड्यांतील पाणी जसें तप्त होतें तसेंच ( अंतर्गत ) मानसिक दुःखाच्या योगानें शरीर संतप्त होतें २५. करितां, जलानें ज्याप्रमाणें अग्नि शमन करीत असतात त्याचप्रमाणें ज्ञानाच्या योगानें ( प्रथम ) मानसिक दुःखाचा प्रतीकार करावा. ह्मणजे मानसिक दुःख नाहींसें झालें असतां ( तज्जन्य ) शारीरिक दुःखही निवृत्त होतें २६. विषयवासना हें मनाच्या दुःखाचें मूळ असल्याचें प्रतीतीला येतें. कारण, वासनेमुळें प्राणी संसारामध्यें पडत असून दुःखी होत असतो २७. ( विषयाची प्राप्ति न झाली तर दुःख होत असते. ह्मणून ) दुखें वासनामूलक आहेत;( विषयाची प्राप्ति झाल्यावरही कांहीं अनिष्ट प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊन भय प्राप्त होतें. ह्मणून ) भयांचें मूळही वासनाच होय; ( दुःस्थिति आणि सुस्थिति वासनेमुळेंच प्राप्त होत असल्या कारणानें ) शोक व हर्ष ह्यांचें मूळही वासनाच आहे आणि ( इष्ट गोष्टीची प्राप्ति होऊन अनिष्ट प्रकारांची निवृत्ति व्हावी एतदर्थ इष्टप्राप्तीचीं साधनें संपादन करण्याकरितां व अनिष्टनिवृत्तीची कारणें वर्ज करण्याकरितां पडणारा ) आयासही वासनामूलकच आहे. सारांश, सर्व कांहीं वासनेपासूनच प्रवृत्त होत असते २८. वासनेमुळेंच विषयप्राप्तीविषयीं उत्कट इच्छा उत्पन्न होत असून ( तिचा विघात झाला असतां ) विषयाचे ठिकाणीं द्वेषही वासनेपासूनच होत असतो. राग आणि द्वेष हीं दोन्हीं कल्याणाला विघातकच आहेत. परंतु, ह्यापैकीं प्रथम ( ह्मणजे राग अथवा विषयौत्सुक्य ) तर कल्याणाला फारच विघातक होय ह्मणून ह्मटलें आहे २९. वृक्षाच्या ढोलीमध्यें उत्पन्न झालेला अल्पही अग्नि ज्याप्रमाणें मुळांसहवर्तमान वृक्षाला दग्ध करून टाकितो त्याचप्रमाणें अल्पही विषयौत्सुक्यरूप दोष धर्म आणि अर्थ ह्यांचा नाश करून टाकितो ३०. विषयवियोग

अहः ३१ तस्मात्स्नेहं न लिप्सेत मित्रेभ्यो धनसंचयात् । स्वशरीरसमुत्थं च ज्ञानेन विनिवर्तयेत् ३२ ज्ञानान्वितेषु युक्तेषु शास्त्रज्ञेषु कृतात्मसु । न तेषु सज्जते स्नेहः पद्मपत्रेष्विवोदकम् ३३ रागाभिभूतः पुरुषः कामेन परिकृष्यते । इच्छा संजायते तस्य ततस्तृष्णा विवर्धते ३४ तृष्णा हि सर्वपापिष्ठा नित्योद्वेगकरी स्मृता । अधर्मबहुला चैव घोरा पापानुबन्धिनी ३५ या दुस्त्यजा दुर्मतिभिर्या न जीर्यति जीर्यतः । योऽसौ प्राणान्तिको रोगस्तां तृष्णां त्यजतः सुखम् ३६ अनाद्यन्ता तु सा तृष्णा अन्तर्देहगता नृणाम् । विनाशयति भूतानि अयो निज इवानलः ३७ यथैधः स्वसमुत्थेन वह्निना नाशमृच्छति । तथाकृतात्मा लोभेन सहजेन विनश्यति ३८ राजतः सलि-

---

ज्याला झाला असेल तो पुरुष विषयत्याग केलेला नव्हे. परंतु, विषयप्राप्ति झाली असतां त्याचे ठिकाणीं जो दोषदृष्टि ठेवितो तोच विषयत्यागी होय;' विषयवैराग्यही त्यालाच होत असतें आणि ( विषयवैराग्य आल्यामुळें ) वैर आणि प्रतिबंध हीं त्याचे ठिकाणीं मुळींच राहत नाहींत ( सारांश, विषयांविषयीं मनामध्यें विरक्तता उत्पन्न झाल्यामुळें वैराचें मूळच नाहीसें होतें आणि विषयच मुख्यतः मोक्षाला प्रतिबंधक असल्यामुळें विषयवैराग्य उत्पन्न झालें असतां पुरुषाला मोक्षप्राप्ति होण्यास प्रतिबंध रहात नाहीं ) ३१. तस्मात्, मित्र आणि धनसंचय ह्यांची प्राप्ति झाली असतां त्याचे ठिकाणीं पुरुषानें प्रेम ठेवूं नये आणि स्वतःच्या शरीराविषयीं असलेलें प्रेमही ज्ञानानें निवृत्त करावें ३२. कमलपत्रांचे ठिकाणीं ज्याप्रमाणें उदक चिकटून रहात नाहीं त्याचप्रमाणें विवेकी, आत्मलाभाविषयीं उद्युक्त, शास्त्रज्ञ आणि चित्तशुद्धि झालेले असे जे पुरुष असतात त्यांचे ठिकाणीं कोणत्याही गोष्टीविषयीं आसक्ति रहात नाहीं ३३. मनोहर वस्तु दृष्टीं पडली असतां मनाला उल्हास वाटून पुरुषाला त्या वस्तूविषयीं इच्छा उत्पन्न होते. तदनंतर ती वस्तु प्राप्त झाली असतांही एकसारखा तिचा उपभोग घेण्याची हाव सुटते आणि वारंवार ती वस्तु प्राप्त होऊं लागली असतांही ( तृप्ति न होतां ) तद्विषयक वासना वृद्धिंगतच होऊं लागते ३४. ह्मणून तृष्णा ही सर्व अनर्थाचें अधिष्ठान, मनाला सर्वदां उद्विग्न करणारी, अधर्मानें भरलेली, भयंकर आणि पापाचा प्रवाह उत्पन्न करणारी ह्मटली आहे ३५. दुर्विचारी पुरुषांनीं जिचा त्याग करणें दुर्घट आहे ( वार्धक्यानें ) पुरुष जीर्ण होत चालला असतां जी कमी होत नाहीं आणि वास्तविक जो रोग प्राण असेपर्यंत राहणारा आहे त्या तृष्णेचा त्याग करणाऱ्यालाच सुख प्राप्त होतें ३६. स्वतःचे ठिकाणीं असलेला अग्नि ज्याप्रमाणें काष्ठाचा नाश करितो त्याचप्रमाणें आदि व अंत ह्यांनीं रहित अशी पुरुषाच्या मनामध्यें असलेली तृष्णा प्राण्यांचा नाश करिते ३७. सारांश, ज्याप्रमाणें स्वतःपासून उत्पन्न झालेल्या अग्नीच्या

लादग्नेश्चौरतः स्वजनादपि । भयमर्थवतां नित्यं मृत्योः प्राणभृतामिव ३९
यथा ह्यामिषमाकाशे पक्षिभिः श्वापदैर्भुवि । भक्ष्यते सलिले मत्स्यैस्तथा
सर्वत्र वित्तवान् ४० अर्थ एव हि केषांचिदनर्थं भजते नृणाम् । अर्थश्रे-
यसि चासक्तो न श्रेयो विन्दते नरः ४१ तस्मादर्थागमाः सर्वे मनोमोह-
विवर्धनाः ४२ कार्पण्यं दर्पमानौ च भयमुद्वेग एव च । अर्थजानि विदुः
प्राज्ञा दुःखान्येतानि देहिनाम् ४३ अर्थस्योत्पादने चैव पालने च तथा
क्षये । सहन्ति च महद्दुःखं घ्नन्ति चैवार्थकारणात् ४४ अर्था दुःखं परित्यक्तुं
पालिताश्चैव शत्रवः । दुःखेन चाधिगम्यन्ते तस्मान्नाशं न चिन्तयेत् ४५
असन्तोषपरा मूढाः सन्तोषं यान्ति पण्डिताः । अन्तो नास्ति पिपासायाः
सन्तोषः परमं सुखम् ४६ तस्मात्संतोषमेवेह परं पश्यन्ति पण्डिताः । अनित्यं
यौवनं रूपं जीवितं रत्नसंचयः ४७ ऐश्वर्यं प्रियसंवासो गृध्येत्तत्र न

---

योगानें काष्ठ नाश पावतें त्याचप्रमाणें मनोनिग्रह न केलेला पुरुष स्वाभाविक लोभाच्या योगानें नाश पावतो ३८. प्राणधारण करणाऱ्या जीवांना ज्याप्रमाणें मृत्यूपासून नित्य भय असतें त्याचप्रमाणें धनवान् पुरुषाला राजा, उदक अग्नि, चोर आणि स्वजन ह्यांपासून नित्य भय असतें ३९. आकाशामध्यें पक्षी, भूतलावर श्वापदें आणि उदकामध्यें मत्स्य ज्याप्रमाणें आमिषावर झडप घालीत असतात त्याचप्रमाणें द्रव्यवान् पुरुषाला लुटण्याकरितां सर्व ठिकाणीं लोक टपून बसलेले असतात ४०. कांहीं पुरुषांना द्रव्यच अनर्थकारक होत असतें आणि द्रव्यसाध्य पुण्यकर्म संपादन करण्याविषयीं आसक्त असलेल्या पुरुषाला सुख तर प्राप्त होतच नाहीं ४१. तस्मात्, द्रव्यप्राप्तीचे सर्वही उपाय मनाचा मोह वृद्धिंगत करणारे आहेत ४२. दैन्य, गर्व, अभिमान, भय व उद्वेग हीं दुःखें द्रव्यापासून प्राण्यांना होत असतात असें ज्ञानी लोकांचें ह्मणणें आहे ४३. द्रव्यसंपादन आणि द्रव्यरक्षण करण्याकरितां पुरुषांना मोठें दुःख सहन करावें लागत असून द्रव्यहानि झाली असतांही त्यांना पराकाष्ठेचें दुःख होत असतें व द्रव्याकरितां लोक परस्परांचा वधही करीत असतात ४४. साराश, त्याग करूं लागलों असता द्रव्य दुःखदायक होतें, रक्षण केलें असता आपलें शत्रु बनतें ( ह्मणजे त्यामुळेंच आपणाला शत्रु उत्पन्न होत असतात ) आणि द्रव्यसंपादनही दुःखानेंच होत असतें. तस्मात्, सर्वप्रकारें दुःखमय जें द्रव्य त्याची इच्छा करूं नये ४५. मूढ जन सर्वदां पराकाष्ठेचे असंतुष्ट असून ज्ञानी लोक संतोष पावत असतात. तात्पर्य, तृष्णेला अंत नसल्यामुळें संतोष हेंच उत्कृष्ट सुख आहे ४६ आणि ह्मणूनच ज्ञानी लोक संतोषच ह्या जगतामध्यें श्रेष्ठ समजत असतात. यौवन, सौंदर्य, जीवित, द्रव्यसंचय, वैभव आणि प्रियसमागम हें सर्व नश्वर असल्यामुळें विचारी पुरुषानें त्याविषयीं अभिलाष

पण्डितः । त्यजेत संचयांस्तस्मात्तज्जान्क्लेशान्सहेत च ४८ न हि संचय-
वान्कश्चिद्दृश्यते निरुपद्रवः । अतश्च धार्मिकैः पुम्भिरनीहार्थः प्रशस्यते ४९
धर्मार्थं यस्य वित्तेहा वरं तस्य निरीहता । प्रक्षालनाद्धि पङ्कस्य वरमस्प-
र्शनं नृणाम् ५० युधिष्ठिरैवं सर्वेषु न स्पृहां कर्तुमर्हसि । धर्मेण यदि ते कार्यं
विमुक्तेच्छो भवार्थतः ५१ युधिष्ठिर उवाच ॥ आत्मोपभोगलिप्सार्थं नेय-
मर्थेप्सुता मम । भरणार्थं तु विप्राणां ब्रह्मन्काङ्क्षे न लोभतः ५२ कथं
ह्यस्मद्विधो ब्रह्मन्वर्तमानो गृहाश्रमे । भरणं पालनं चापि न कुर्यादनुयायि-
नाम् ५३ संविभागो हि भूतानां सर्वेषामेव दृश्यते । तथैवापचमानेभ्यः प्रदेयं
गृहमेधिना ५४ तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता । सतामेतानि गेहेषु
नोच्छिद्यन्ते कदाचन । ५५ देयमार्तस्य शयनं स्थितश्रान्तस्य चासनम् ।
तृषितस्य च पानीयं क्षुधितस्य च भोजनम् ५६ चक्षुर्दद्यान्मनो दद्या-
द्वाचं दद्यात्सुभाषिणीम् । उत्थाय चासनं दद्यादेष धर्मः सनातनः ॥ प्रत्यु-

---

धरूं नये. कोणीही संचयी पुरुष उपद्रवरहित असल्याचें (कोठेंही) दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तस्मात्, संचयाचा त्याग करून त्यापासून होणारें दुःख सहन करावें. धार्मिक पुरुष यदृच्छेनें प्राप्त झालेलें द्रव्य प्रशस्त मानितात ह्याचें कारण तरी हेंच ४७,४८,४९.( आतां धर्माकरितां वित्तसंपादन करण्याची इच्छा धरण्यास काय प्रत्यवाय आहे ? ह्मणून विचारशील तर, हे युधिष्ठिरा, ) धर्मार्थ द्रव्यसंपादन करण्याची ज्याला इच्छा असेल त्याला द्रव्याविषयीं निरिच्छताच होणें बरें. कारण, चिखल( लावून घेऊन मग तो )धुवीत बसण्यापेक्षां त्याला स्पर्श न करणेंच लोकांना सुखकारक असतें ५०. ह्मणून, हे युधिष्ठिरा, तूं कशाविषयींच अभिलाष धरूं नकोस. तुला जर धर्म संपादन कर्तव्य असेल तर तूं प्रथम द्रव्याविषयीं निरिच्छ हो " ५१. युधिष्ठिर ह्मणतोः—हे ब्रह्मन्, विषयोपभोगाची इच्छा तृप्त करण्याकरितां हा मीं द्रव्याविषयीं अभिलाष धरिलेला नाहीं. विप्रांच्या पोषणाकरितां मी द्रव्याची इच्छा करीत आहें. लोभामुळें मला द्रव्याभिलाष उत्पन्न झालेला नाहीं ५२. हे ब्रह्मन्, आह्मांसारिख्या गृहस्थाश्रमामध्यें असणाऱ्या पुरुषाला अनुयायाचें पालनपोषण न करणें कसें बरें योग्य होईल ? ५३. गृहस्थाश्रमी पुरुषानें प्राणिमात्रांना अन्न देऊन ( यति, ब्रह्मचारी वगैरे ) पाकसिद्धि न करणाऱ्यांनाही अन्न द्यावें असें ( धर्मशास्त्रात सांगितल्याचें ) दृष्टी पडतें ५४. ( बसण्याकरितां ) चटाई, भूमि, उदक आणि चवथी मधुर वाणी ह्याचा तरी सज्जनांच्या घरीं कधींही अभाव होत नाहीं ५५. पीडिताला शय्या द्यावी, तिष्ठत राहिलेल्याला आणि त्याचप्रमाणें श्रांत झालेल्याला आसन अर्पण करावें, तृषार्ताला उदक आणून द्यावें व क्षुधिताला भोजन घालावें ५६. त्याचप्रमाणें येणाऱ्याकडे लक्ष्य असावें, त्याचें आदरातिथ्य

त्थायाभिगमनं कुर्यात्पूजयेन चार्चनम् ५७ अग्निहोत्रमनड्वांश्च ज्ञातयोतिथिबान्धवाः। पुत्रा दाराश्च भृत्याश्च निर्दहेयुरपूजिताः ५८ आत्मार्थं पाचयेन्नान्नं न वृथा घातयेत्पशून्। न च तत्स्वयमश्नीयाद्विधिवद्यन्न निर्वपेत् ५९ श्वभ्यश्च श्वपचेभ्यश्च वयोभ्यश्चावपेद्भुवि। वैश्वदेवं हि नामैतत्सायं प्रातश्च दीयते ६० विघसाशी भवेत्तस्मान्नित्यं चामृतभोजनः। विघसो भुक्तशेषं तु यज्ञशेषं तथामृतम् ६१ चक्षुर्दद्यान्मनो दद्याद्वाचं दद्याच्च सूनृताम्। अनुव्रजेदुपासीत स यज्ञः पञ्चदक्षिणः ६२ यो दद्यादपरिक्लिष्टमन्नमध्वनि वर्तते। श्रान्तायादृष्टपूर्वाय तस्य पुण्यफलं महत् ६३ एवं यो वर्तते वृत्तिं वर्तमानो गृहाश्रमे। तस्य धर्मं परं प्राहुः कथं वा विप्र मन्यसे ६४ शौनक उवाच॥ अहो बत महत्कष्टं विपरीतमिदं जगत्। येनापत्रपते साधुरसाधुस्तेन तुष्यति ६५ शिश्नोदरकृतेऽप्राज्ञः करोति विघसं बहु।

---

करण्याकडे मनाचें प्रवृत्ति असावी, त्याच्याशीं मधुर भाषण करावें आणि कोणी आलें असता उठून त्याला आसन द्यावें हा सनातन धर्म आहे. तस्मात्, अभ्युत्थानपूर्वक अतिथीला सामोरें जावें आणि त्याचें यथाविधि पूजन करावें ५७. अग्निहोत्र, वृषभ, ज्ञाति, अतिथि, बांधव, पुत्र, भार्या आणि सेवक हे हेळसांड केली असतां यजमानाला दग्ध करितात ( ह्यास्तव, त्यांचा मान राखावा ) ५८. स्वतःकरितां ह्मणून पाकसिद्धि करूं नये, ( यज्ञादिकांवांचून ) पशूंचा वध व्यर्थ करूं नये आणि विधिपूर्वक ( देवादिकांना ) जें अर्पण केलेलें नाहीं तें स्वतः भक्षण करूं नये ५९. श्वान, चांडाल व पक्षी ह्यांनाही भूमीवर अन्न टाकावें. कारण, सकाळसंध्याकाळ जें ह्याप्रमाणें अन्न दिलें जातें त्यालाच वैश्वदेव असें ह्मणतात ६०. करितां, पुरुषानें नित्य विघस आणि अमृत भक्षण करीत असावें. अतिथींनीं वगैरे भोजन केल्यावर अवशिष्ट राहिलेलें जें अन्न त्याला विघस ही संज्ञा आहे आणि अग्नीमध्यें ( देवादिकांना उद्देशून ) हवन केल्यानंतर अवशिष्ट राहिलेलें जें अन्न त्याला अमृत ही संज्ञा आहे ६१. येणाऱ्या अतिथीकडे दृष्टि असणें, त्याच्या आदराकडे मनाची प्रवृत्ति राहणें, त्याच्याशीं मधुर भाषण करणें, त्याला ( दोन पावलें ) पोंचविण्यास जाणें आणि त्याची सेवा करणें हा पांच दक्षिणांनीं युक्त असलेला यज्ञ होय ६२. पूर्वीं कधीं दृष्टीस न पडलेल्या श्रांत मार्गस्थाला जो कुरकुर न करितां अन्न घालितो त्याला मोठें पुण्य लागतें ६३. सारांश, गृहस्थाश्रमामध्यें असणारा जो पुरुष ह्याप्रमाणें वागतो त्याला उत्कृष्ट पुण्य लागतें. तस्मात्, हे विप्र, आपलें काय मत आहे ? ६४. शौनक ह्मणतातः— कायहो तरी हें आश्चर्य! हें जगत् कांहीं विपरीत आहे ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. कारण, जें करण्यास सज्जनाला लाज वाटतें त्याच्याच योगानें दुर्जनाला संतोष होतो ६५.

कर्ममयी च ते । तपसा सिद्धिमन्विच्छ द्विजानां भरणाय वै ८४ सिद्धा हि यद्यदिच्छन्ति कुर्वते तदनुग्रहात् । तस्मात्तपः समास्थाय कुरुष्वात्ममनोरथम् ८५ [ १३१ ]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यके पर्वण्यारण्यपर्वणि पाण्डवानां प्रव्रजनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥२॥

वैशम्पायन उवाच ॥ शौनकेनैवमुक्तस्तु कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । पुरोहितमुपागम्य भ्रातृभिः सहितोऽब्रवीत् १ युधिष्ठिर उवाच ॥ प्रस्थितं मानुयान्तीमे ब्राह्मणा वेदपारगाः । न चास्मि पोषणे शक्तो बहुदुःखसमन्वितः २ परित्यक्तुं न शक्नोऽस्मि दाने शक्तिश्च नास्ति मे । कथमत्र मया कार्यं भगवांस्तद्ब्रवीतु मे ३ वैशम्पायन उवाच ॥ मुहूर्तमिव स ध्यात्वा धर्मेणान्विष्य तां गतिम् । युधिष्ठिरमुवाचेदं धौम्यो धर्मभृतां वरः ४ धौम्य उवाच ॥ पुरा सृष्टानि भूतानि पीड्यन्ते क्षुधया भृशम् । ततोऽनुकम्पया तेषां सविता स्वपिता यथा ५ गत्वोत्तरायणं तेजो रसानुद्धृत्य रश्मिभिः । दक्षिणायनमावृत्तो महीं निविशते रविः ६ क्षेत्रभूते ततस्तस्मिन्नोषधीरोषधीपतिः ।

---

झाले असल्यामुळें ) पितृविषयक, मातृविषयक आणि कर्मविषयक सिद्धि तुला प्राप्त झालेलीच आहे. तस्मात्, द्विजपोषणाकरिता (अवश्यक असलेली) सिद्धि तूं तपश्चर्येनें प्राप्त करून घे ८४. साराश, तपाच्या प्रभावामुळें सिद्ध झालेले पुरुष जें जें इच्छितात तें तें शेवटास नेतात. ह्याकरितां, तूंही तपाचें अवलंबन करून आपला मनोरथ शेवटास ने ८५. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील आरण्यकपर्वापैकीं पांडवांच्या गमनाविषयीं दुसरा अध्याय समाप्त झाला॥२॥

वैशंपायन सांगतातः—शौनकमुनींनीं ह्याप्रमाणें सांगितलें असतां कुंतीपुत्र युधिष्ठिर भ्रात्यांसहवर्तमान पुरोहितांकडे जाऊन ह्मणाला १ " (भगवन्) हे वेदपारंगत ब्राह्मण वनांत निघालेल्या माझ्या मागोमाग येत आहेत आणि मीतर अनेक दुःखांनीं युक्त झालों असल्यामुळें ( सांप्रत ) ह्यांचें पोषण करण्यास समर्थ नाहीं २. सारांश, ह्यांचा त्यागही माझ्यानें करवत नाहीं आणि दानसामर्थ्यही माझ्याजवळ उरलें नाहीं. तेव्हां ह्या प्रसंगीं मीं कसें करावें ह्याची भगवानांनीं मला आज्ञा करावी " ३. वैशंपायन सांगतातः—( ह्याप्रमाणें प्रश्न झाल्यानंतर ) धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या पुरोहित धौम्य मुनींनीं क्षणभर विचार केला आणि योगरूप धर्मानें तो उपाय जाणून त्यांनीं युधिष्ठिराला असें प्रत्युत्तर दिलें ४. धौम्य सांगतातः—उत्पन्न केलेले प्राणी क्षुधेनें पीडित होतील ह्मणून त्यांची दया आल्यामुळें ब्रह्मदेवानें सूर्याकडे जाऊन पूर्वीच व्यवस्था करून ठेविलेली आहे ५. उत्तरमार्गाला जाऊन सूर्य आपल्या किरणांच्या योगानें सर्व प्राणी आणि ओषधिरस ह्यांतील वीर्य आकर्षण करून घेतो आणि दक्षिणमार्गाकडे परत फिरून तो तें वीर्य (पर्जन्यकाळ प्राप्त झाला असतां) पृथ्वीशीं संयुक्त करितो ६

दिवस्तेजः समुद्धृत्य जनयामास वारिणा ७ निषिक्तश्चन्द्रतेजोभिः स्वयोनौ
निर्गते रविः । ओषध्यः षड्रसा मेध्यास्तदन्नं प्राणिनां भुवि ८ एवं भानु-
मयं ह्यन्नं भूतानां प्राणधारणम् । पितैष सर्वभूतानां तस्मात्तं शरणं व्रज ९
राजानो हि महात्मानो योनिकर्मविशोधिताः । उद्धरन्ति प्रजाः सर्वास्तप
आस्थाय पुष्कलम् १० भीमेन कार्तवीर्येण वैन्येन नहुषेण च । तपोयो-
गसमाधिस्थैरुद्धृता ह्यापदः प्रजाः ११ तथा त्वमपि धर्मात्मन्कर्मणा च
विशोधितः । तप आस्थाय धर्मेण द्विजातीन्भर भारत १२ जनमेजय
उवाच ॥ कथं कुरूणामृषभः स तु राजा युधिष्ठिरः । विप्रार्थमाराधित-
वान्सूर्यमद्भुतदर्शनम् १३ वैशम्पायन उवाच ॥ शृणुष्वावहितो राजञ्छु-
चिर्भूत्वा समाहितः । क्षणं च कुरु राजेन्द्र संप्रवक्ष्याम्यशेषतः १४ धौम्येन
तु यथापूर्वं पार्थाय सुमहात्मने । नामाष्टशतमाख्यातं तच्छृणुष्व महामते १५
धौम्य उवाच ॥ सूर्योऽर्यमा भगस्त्वष्टा पूषार्कः सविता रविः । गभस्तिमा-

---

आणि ह्याप्रमाणें तें वीर्य क्षेत्रामध्यें मिसळलें असतां ओषधिपति चंद्र मेघरूप बनलेलें अंत-
रिक्षांतील सूर्यतेज घेऊन उदकाच्या योगानें ओषधि उत्पन्न करितो ७. सारांश, अंकुरादि-
रूपानें बीज भूमींतून बाहेर आलें असतां चंद्ररश्मींनीं संयुक्त झालेला सूर्यच सहा रसांनीं युक्त
अशा पवित्र ओषधि बनतो आणि त्या ओषधींपासून प्राण्यांनीं खाण्याला योग्य असें धान्य
पृथ्वीवर उत्पन्न होतें ८. तात्पर्य, ह्याप्रमाणें हें सूर्यरूप अन्नच प्राण्यांचे प्राण धारण करणारें
आहे आणि ह्मणूनच हा सूर्य सर्व प्राण्यांचा पिता आहे. तस्मात्, तूं त्याला शरण जा ९.
बीज आणि संस्कार ह्यांनीं शुद्ध असलेले महात्मे राजे पुष्कळ तप करून सर्व प्रजा-
जनांचा ( संकटापासून ) उद्धार करीत असतात १०. तप, योग आणि समाधि
ह्यांविषयीं तत्पर राहूनच भीम, कार्तवीर्य, वेनपुत्र पृथु आणि नहुष ह्या राजांनीं आपल्या
प्रजाजनांचा संकटापासून उद्धार केला ११. तस्मात्, हे भरतकुलोत्पन्ना धर्मात्म्या युधि-
ष्ठिरा, बीज आणि संस्कार ह्यांनीं शुद्ध असलेला असा तूंही त्याचप्रमाणें तपाचें अव-
लंबन करून धर्माच्या योगानें द्विजाचें पोषण कर १२. जनमेजय प्रश्न करितोः—
( हे वैशंपायनमुने ) कुरुवंशजांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या युधिष्ठिरराजानें विप्रांकरितां
अद्भुत स्वरूपानें युक्त असलेल्या सूर्याचें आराधन कसें केलें ? ( तें आपण मला
सांगा ) १३. वैशंपायन ह्मणतातः—हे राजा, शुचिर्भूत होऊन स्वस्थांतःकरणानें तूं
श्रवण कर आणि, हे नृपश्रेष्ठा, ( श्रवण करण्याविषयीं उतावीळ न होतां ) जरा
धीर धर. ह्मणजे मी सर्व कांहीं संपूर्णपणें कथन करणार आहें १४. हे महाबुद्धिमान्
जनमेजय राजा, अत्यंत उदार मनानें युक्त असलेल्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला धौम्यमु-
नींनी पूर्वी जीं सूर्याचीं अष्टोत्तरशत नामें सांगितलीं तीं तूं श्रवण कर १५. धौम्य

ऽजः कालो मृत्युर्धाता प्रभाकरः १६ पृथिव्यापश्च तेजश्च खं वायुश्च
परायणम् । सोमो बृहस्पतिः शुक्रो बुधोऽङ्गारक एव च १७ इन्द्रो विव-
स्वान्दीप्तांशुः शुचिः शौरिः शनैश्चरः । ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च स्कन्दो वैश्र-
वणो यमः १८ वैद्युतो जाठरश्चाग्निरैन्धनस्तेजसां पतिः । धर्मध्वजो वेद-
कर्ता वेदाङ्गो वेदवाहनः १९ कृतं त्रेता द्वापरश्च कलिः सर्वमलाश्रयः
कला काष्ठा मुहूर्ताश्च क्षपा यामस्तथा क्षणः २० संवत्सरकरोऽश्वत्थः काल-
चक्रो विभावसुः । पुरुषः शाश्वतो योगी व्यक्ताव्यक्तः सनातनः २१ काला-
ध्यक्षः प्रजाध्यक्षो विश्वकर्मा तमोनुदः । वरुणः सागरोंऽशश्च जीमूतो
जीवनोऽरिहा २२ भूताश्रयो भूतपतिः सर्वलोकनमस्कृतः । स्रष्टा संवर्तको
वह्निः सर्वस्यादिरलोलुपः २३ अनन्तः कपिलो भानुः कामदः सर्वतो-
मुखः । जयो विशालो वरदः सर्वधातुनिषेचिता २४ मनः सुपर्णो भूतादिः
शीघ्रगः प्राणधारणः । धन्वन्तरिर्धूमकेतुरादिदेवोऽदितेः सुतः २५ द्वादशा-
त्मारविन्दाक्षः पिता माता पितामहः । स्वर्गद्वारं प्रजाद्वारं मोक्षद्वारं त्रिवि-
ष्टपम् २६ देहकर्ता प्रशान्तात्मा विश्वात्मा विश्वतोमुखः । चराचरात्मा
सूक्ष्मात्मा मैत्रेयः करुणान्वितः २७ एतद्वै कीर्तनीयस्य सूर्यस्यामिततेजसः ।
नामाष्टशतकं चेदं प्रोक्तमेतत्स्वयंभुवा २८ सुरगणपितृयक्षसेवितं ह्यसुरनि-

शाचरसिद्धवन्दितम् ।—सूर्य, अर्यमा, भग, त्वष्टा, पूषा, अर्क, सविता, रवि, गभस्तिमान्, अज,
काल, मृत्यु, धाता, प्रभाकर १६, पृथ्वी, आप, तेज, आकाश, वायु, परायण, सोम,
बृहस्पति, शुक्र, बुध, अंगारक ( २९ ) १७, इंद्र, विवस्वान्, दीप्तांशु, शुचि, शौरि,
शनैश्चर, ब्रह्मा, विष्णु, रुद्र, स्कंद, वरुण, यम १८, वैद्युत अग्नि, जाठर अग्नि,
ऐंधन अग्नि, तेजसां पति, धर्मध्वज, वेदकर्ता, वेदांग, वेदवाहन १९, कृत, त्रेता,
द्वापर, सर्वमलाश्रय कलि, कला ( ५० ), काष्ठा, मुहूर्त, क्षपा, याम, क्षण २०,
संवत्सरकर अश्वत्थ, कालचक्र असा विभावसु, पुरुष, शाश्वत, योगी, व्यक्ताव्यक्त,
सनातन २१, कालाध्यक्ष, प्रजाध्यक्ष, विश्वकर्मा, तमोनुद, वरुण, सागर, अंश, जीमूत,
जीवन, अरिहा २२, भूताश्रय, भूतपति, सर्वलोकनमस्कृत ( ७५ ), स्रष्टा, संवर्तक
वन्हि, सर्वादि, अलोलुप २३, अनंत, कपिल, भानु, कामद, सर्वतोमुख, जय, विशाल,
वरद, सर्वधातुनिषेचिता २४, मन:सुपर्ण, भूतादि, शीघ्रग, प्राणधारक, धन्वंतरि,
धूमकेतु, अदितिसुत आदिदेव २५, द्वादशात्मा, अरविंदाक्ष, मातापितर आणि
पितामह, स्वर्गद्वार प्रजाद्वार, मोक्षद्वार त्रिविष्टप ( १०० ) २६, देहकर्ता, प्रशां-
तात्मा, विश्वात्मा, विश्वतोमुख, चराचरात्मा, सूक्ष्मात्मा, मैत्रेय आणि करुणा-
न्वित ( १०८ ) २७ अशीं—हीं स्तुति करण्यास योग्य आणि अपरिमित तेजस्वी

शाचरसिद्धवन्दितम् । वरकनकहुताशनप्रभं प्रणिपतितोस्मि हिताय भास्क-
रम् २९ सूर्योदये यः सुसमाहितः पठेत्स पुत्रदारान्धनरत्नसंचयान् । लभेत
जातिस्मरतां नरः सदा धृतिं च मेधां च स विन्दते पुमान् ३० इमं स्तवं
देववरस्य मानवः प्रकीर्तयेच्छुचिसुमनाः समाहितः । विमुच्यते शोकद-
वाग्निसागराल्लभेत कामान्मनसा यथेप्सितान् ३१ वैशम्पायन उवाच ॥
एवमुक्तस्तु धौम्येन तत्कालसदृशं वचः । विप्रत्यागसमाधिस्थः संयतात्मा
दृढव्रतः ३२ धर्मराजो विशुद्धात्मा तप आतिष्ठदुत्तमम् । पुष्पोपहारैर्बलि-
भिरर्चयित्वा दिवाकरम् ३३ सोवगाह्य जलं राजा देवस्याभिमुखोभवत् ।
योगमास्थाय धर्मात्मा वायुभक्षो जितेन्द्रियः ३४ गाङ्गेयं वार्युपस्पृश्य
प्राणायामेन तस्थिवान् । शुचिः प्रयतवाग्भूत्वा स्तोत्रमारब्धवांस्ततः ३५
युधिष्ठिर उवाच ॥ त्वं भानो जगतश्चक्षुस्त्वमात्मा सर्वदेहिनाम् । त्वं योनिः
सर्वभूतानां त्वमाचारः क्रियावताम् ३६ त्वं गतिः सर्वसांख्यानां योगिनां

---

असा जो सूर्य त्याचीं—अष्टोत्तरशत नामें ब्रह्मदेवानें सांगितलीं आहेत २८. तस्मात्, देवगण, पितर आणि यक्ष ज्याची सेवा करीत असतात व दैत्य, निशाचर आणि सिद्ध ज्याला वंदन करीत असतात असा जो—उत्कृष्ट सुवर्ण आणि अग्नि ह्यांप्रमाणें तेजस्वी असलेला—सूर्य त्याला हिताकरितां मी हा प्रणिपात करितों २९. अंतः-करण चागलें स्वस्थ करून सूर्योदयसमयीं जो पुरुष हें नामाष्टोत्तरशत सर्वदां पठन करीत असतो त्या पुरुषाला पुत्र, भार्या, धन व रत्नें ह्यांचे निधि, धैर्य, धारणाशक्ति आणि पूर्वजन्माची स्मृति हीं प्राप्त होतात ३०. शुद्ध आणि उत्तम अंतःकरणानें युक्त असलेला जो पुरुष लक्ष्यपूर्वक देवाधिदेव सूर्याचें हें स्तोत्र पठण करितो तो शोकरूप दावानलानें युक्त असलेल्या प्रपंचरूप सागरांतून मुक्त होतो आणि त्यानें मनामध्यें इच्छिलेले हेतु सिद्धीस जातात ३१. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें धौम्य मुनींनी त्या समयाला उचित असा उपदेश केल्यावर विप्रांना देण्याला अन्न प्राप्त होण्याकरितां नियम आणि दृढ व्रत ह्यांचें अवलंबन करून तो जितेंद्रिय ३२ व शुद्धांतःकरणानें युक्त असलेला धर्मराज पुष्पोपचार आणि नैवेद्य ह्यांच्या योगानें सूर्याचें पूजन करून उत्कृष्ट तपश्चर्या करूं लागला ३३. प्रथमतः स्नान करून तो धर्मराजा सूर्याभिमुख होऊन बसला आणि नंतर वायु भक्षण करून राहणाऱ्या त्या जितेंद्रिय व धर्मात्म्या युधिष्ठिरानें एकाग्र अंतःकरण करून ३४ गंगोदकप्रवेशपूर्वक प्राणायाम केला आणि ह्याप्रमाणें शुचि होऊन व वाणीचें संयमन करून ( जप केल्या ) नंतर त्यानें स्तोत्राला आरंभ केला ३५. युधिष्ठिर स्तुति करितोः—हे सूर्या, तूं जगताची दृष्टि असून सर्व प्राण्यांचा आत्माही तूंच आहेस. आणि त्याचप्रमाणें सर्व भूतांचें उत्पत्तिस्थान

त्वं परायणम् । अनावृतार्गलद्वारं त्वं गतिस्त्वं मुमुक्षताम् ३७ त्वया संधार्यते लोकस्त्वया लोकः प्रकाश्यते । त्वया पवित्रीक्रियते निर्व्याजं पाल्यते त्वया ३८ त्वामुपस्थाय काले तु ब्राह्मणा वेदपारगाः । स्वशाखाविहितैर्मन्त्रैरर्चन्त्यृषिगणार्चितम् ३९ तव दिव्यं रथं यान्तमनुयान्ति वरार्थिनः । सिद्धचारणगन्धर्वा यक्षगुह्यकपन्नगाः ४० त्रयस्त्रिंशच्च वै देवास्तथा वैमानिका गणाः । सोपेन्द्राः समहेन्द्राश्च त्वामिष्ट्वा सिद्धिमागताः ४१ उपयान्त्यर्चयित्वा तु त्वां वै प्राप्तमनोरथाः । दिव्यमन्दारमालाभिस्तूर्णं विद्याधरोत्तमाः ४२ गुह्याः पितृगणाः सप्त ये दिव्या ये च मानुषाः । ते पूजयित्वा त्वामेव गच्छन्त्याशु प्रधानताम् ४३ वसवो मरुतो रुद्रा ये च साध्या मरीचिपाः । वालखिल्यादयः सिद्धाः श्रेष्ठत्वं प्राणिनां गताः ४४ सब्रह्मकेषु लोकेषु सप्तस्वप्यखिलेषु च । न तद्भूतमहं मन्ये यदर्कादतिरिच्यते ४५ सन्ति चान्यानि सत्त्वानि वीर्यवन्ति महान्ति च । न तु तेषां तथा दीप्तिः

व लयस्थान तूंच असून कर्मनिष्ठ लोकाचा आधारही तूंच आहेस ३६. सर्व ज्ञाननिष्ठ पुरुषांची गति तूंच असून द्वार फळकें ( ह्मणजे दाराच्या फळ्या ) आणि अर्गल ( ह्मणजे अडसर ) एतद्विरहित असलेलें योगी जनांचें मुक्तिद्वार आणि सर्वोत्कृष्ट आश्रयस्थान तूंच आहेस व त्याचप्रमाणें मुमुक्षूंना प्राप्त होणारें मोक्षपदही तूंच आहेस ३७. हें जगत् ( आकर्षणशक्तीनें ) तूंच धारण करीत असून ह्याला प्रकाशितही तूंच करीत आहेस आणि त्याचप्रमाणें प्रत्युपकाराची इच्छा न धरितां तूंच ह्या जगताचें परिपालन करीत असून तुझ्याच योगानें हें पवित्र होत आहे ३८. वेदपारंगत ब्राह्मण स्वशाखाविहित मंत्रांच्या योगानें योग्य कालीं उपस्थानपूर्वक ऋषिगणपूजित असलेल्या तुझेंच अर्चन करीत असतात ३९. दिव्य रथावर आरूढ होऊन तूं जाऊं लागलास ह्मणजे वर प्राप्त होण्याची इच्छा धरून सिद्ध, चारण, गंधर्व, यक्ष, गुह्यक आणि पन्नग तुझ्या मागोमाग जात असतात ४०. ( अष्टवसु, एकादशरुद्र, द्वादशादित्य, प्रजापति आणि वषटकार हे ) तेहेतीस देव आणि श्रीविष्णु व महेंद्र ह्यासहवर्तमान असलेले इतरही विमानसंचारी देवगण ह्यांना तुझेंच पूजन करून सिद्धि प्राप्त झाली आहे ४१. श्रेष्ठ श्रेष्ठ विद्याधर तुझ्याच समीप येत असतात आणि दिव्य मंदारमालांनीं तुझें अर्चन करून ते कृतार्थ होतात ४२. गुह्य आणि दिव्य व मानुष असे जे सात[1] पितृगण तेही तुझेंच पूजन करून सत्वर श्रेष्ठ होतात ४३. वसु, मरुद्गण, रुद्र, साध्य, मरीचिप आणि वालखिल्यप्रभृति सिद्ध हे तुझेंच पूजन करून प्राण्यांमध्यें श्रेष्ठत्व पावले आहेत ४४. ब्रह्मलोकासहवर्तमान संपूर्ण सातही लोकांमध्यें सूर्यापेक्षां श्रेष्ठ असें कोणतेंही भूत आहेसें

1 सोमसद, अग्निष्वात्त, बर्हिष, सोमप, हविर्भुज, आज्यप आणि सुकाली.

प्रभावो वा यथा तव ४६ ज्योतींषि त्वयि सर्वाणि त्वं सर्वज्योतिषां पतिः। त्वयि सत्यं च सत्त्वं च सर्वे भावाश्च सात्त्विकाः ४७ त्वत्तेजसा कृतं चक्रं सुनाभं विश्वकर्मणा । देवारीणां मदो येन नाशितः शार्ङ्गधन्वना ४८ त्वमादायांशुभिस्तेजो निदाघे सर्वदेहिनाम् । सर्वौषधिरसानां च पुनर्वर्षासु मुञ्चसि ४९ तपन्त्यन्ये दहन्त्यन्ये गर्जन्त्यन्ये तथा घनाः । विद्योतन्ते प्रवर्षन्ति तव प्रावृषि रश्मयः ५० न तथा सुखयत्यग्निर्न प्रावारा न कम्बलाः। शीतवातार्दितं लोकं यथा तव मरीचयः ५१ त्रयोदशद्वीपवतीं गोभिर्भासयसे महीम् । त्रयाणामपि लोकानां हितायैकः प्रवर्तसे ५२ तव यद्युदयो न स्यादन्धं जगदिदं भवेत् । न च धर्मार्थकामेषु प्रवर्तेरन्मनीषिणः ५३ आधानपशुबन्धेष्टिमन्त्रयज्ञतपः क्रियाः । त्वत्प्रसादादवाप्यन्ते ब्रह्मक्षत्रविशां गणैः ५४ यदहो ब्रह्मणः प्रोक्तं सहस्रयुगसंमितम् । तस्य त्वमादिरन्तश्च कालज्ञैः परिकीर्तितः ५५ मनूनां मनुपुत्राणां जगतो मान-

---

मला वाटत नाहीं ४५. वीर्यवान् अशीं इतर मोठींमोठीं भूतें आहेत; परंतु, ह्यांचें तेज अथवा प्रभाव तुझ्याप्रमाणें नाहीं ४६. सर्व ज्योति तुझ्यावर अवलंबून असून तूं सर्व जोतिर्गणांचा अधिपति आहेस आणि सत्य, सत्त्व व (धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य इत्यादि) सर्व सात्त्विक भाव तुझ्यावरच अवलंबून आहेत ४७. शार्ङ्ग धनुष्य धारण करणाऱ्या श्रीविष्णूनें ज्याच्या योगानें देवशत्रु दैत्यांचा मद नाहींसा केला तें सुदर्शन चक्रही विश्वकर्म्यानें तुझ्याच तेजाचें केलें आहे ४८. सर्व प्राणी आणि सर्व ओषधींचे रस ह्यांचें वीर्य उष्णकालामध्यें तूं आपल्या किरणांच्या योगानें आकर्षण करून घेत असून पर्जन्यकालीं पुनरपि तूंच तें परत टाकीत असतोस ४९. तुझेच कांहीं किरण प्रकाश व दाह उत्पन्न करीत असून मेघरूपानें गर्जना करणारेही तुझेच किरण आहेत आणि पर्जन्यकालीं विद्युल्लतेच्या रूपानें तुझेच किरण चमकत असून पर्जन्यरूपानें वृष्टिही तुझेच किरण करीत असतात ५०. शैत्य आणि वायु ह्यांनीं पीडित झालेल्या लोकांना तुझ्या किरणांपासून जसें सुख होतें तसें अग्नि, कार्पासवस्त्रें आणि ऊर्णावस्त्रें ह्यांच्या योगानें होत नाहीं ५१. त्रयोदश द्वीपांनीं युक्त असलेली पृथ्वी किरणांच्या योगानें तूंच प्रकाशित करीत असून त्रैलोक्याच्याही हिताकरितां एक तूंच प्रवृत्त होत असतोस ५२. तुझा उदय जर न होईल तर हें सर्व जगत् अंध होऊन धर्म, अर्थ आणि काम ह्यांचे ठिकाणीं ज्ञानी लोकांची प्रवृत्ति होणार नाहीं ५३. आधान, पशुबंध, इष्टि, मंत्र, यज्ञ व तपश्चर्या हीं तुझ्याच प्रसादामुळें ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य ह्या जातींच्या हातून शेवटास जात असतात ५४. सहस्रयुगपरिमित असा जो ब्रह्मदेवाचा दिवस उक्त आहे त्याचा प्रारंभ व शेवट तूंच म्हणून कालवेत्त्यांनीं सांगितलें आहे ५५. मनु, मनुपुत्र, सर्व मनांनीं

वस्य च । मन्वन्तराणां सर्वेषामीश्वराणां त्वमीश्वरः ५६ संहारकाले संप्राप्ते तव क्रोधविनिःसृतः । संवर्तकाग्निस्त्रैलोक्यं भस्मीकृत्वावतिष्ठते ५७ त्वद्दीधितिसमुत्पन्ना नानावर्णा महाघनाः । सैरावताः साशनयः कुर्वन्त्याभूतसंप्लवम् ५८ कृत्वा द्वादशधात्मानं द्वादशादित्यतां गतः । संहृत्यैकार्णवं सर्वं त्वं शोषयसि रश्मिभिः ५९ त्वामिन्द्रमाहुस्त्वं रुद्रस्त्वं विष्णुस्त्वं प्रजापतिः । त्वमग्निस्त्वं मनः सूक्ष्मं प्रभुस्त्वं ब्रह्म शाश्वतम् ६० त्वं हंसः सविता भानुरंशुमाली वृषाकपिः । विवस्वान्मिहिरः पूषा मित्रो धर्मस्तथैव च ६१ सहस्ररश्मिरादित्यस्तपनस्त्वं गवांपतिः । मार्तण्डोऽर्को रविः सूर्यः शरण्यो दिनकृत्तथा ६२ दिवाकरः सप्तसप्तिर्धामकेशी विरोचनः । आशुगामी तमोघ्नश्च हरिताश्वश्च कीर्त्यसे ६३ सप्तम्यामथ वा षष्ठ्यां भक्त्या पूजां करोति यः । अनिर्विण्णोऽनहंकारी तं लक्ष्मीर्भजते नरम् ६४ न तेषामापदः सन्ति नाधयो व्याधयस्तथा । ये तवानन्यमनसः कुर्वन्त्यर्चनवन्दनम् ६५ सर्वरोगैर्विरहिताः सर्वपापविवर्जिताः । त्वद्भावभक्ताः सुखिनो भवन्ति चिरजीविनः ६६ त्वं ममाप्यन्नकामस्य सर्वातिथ्यं चिकीर्षतः ।

---

भरलेलें जगत् आणि सर्व मन्वंतरें ह्याच्या अधिपतींचाही अधिपति तूं आहेस ५६. संहारकाल प्राप्त झाला असतां तुझ्या क्रोधापासून निघालेला संवर्तकसंज्ञक अग्नि त्रैलोक्याचें भस्म करून रहात असतो ५७ आणि नंतर तुझ्याच किरणांपासून उत्पन्न झालेले व अनेक वर्णांनीं युक्त असलेले प्रचंड मेघ ऐरावत आणि विद्युल्लता ह्यांसहवर्तमान ( वृष्टि करून ) सर्व जगत् जलमय करीत असतात ५८. तूंच आपल्या स्वरूपाचे बारा विभाग करून द्वादशादित्य होत असतोस आणि सर्वांचा संहार करून आपल्या किरणांच्या योगानें सर्व जलप्रलय तूंच शोषून टाकीत असतोस ५९. इंद्र तुलाच ह्मणत असून रुद्र, विष्णु, ब्रह्मदेव, अग्नि, सूक्ष्म मन, प्रभु, शाश्वत ब्रह्म ६०, हंस, सविता, भानु, अंशुमाली, वृषाकपि, विवस्वान्, मिहिर, पूषा, मित्र, धर्म ६१, सहस्ररश्मि, आदित्य तपन, गोपति, मार्तंड, अर्क, रवि, सूर्य, शरण्य, दिनकृत् ६२, दिवाकर, सप्तसप्ति, धामकेशी, विरोचन, आशुगामी, तमोघ्न व हरिताश्व तुलाच ह्मणत असतात ६३. सप्तमी अथवा षष्ठी ह्या दिवशीं जो निरभिमानी पुरुष न कंटाळतां भक्तीनें तुझें पूजन करितो त्या पुरुषाचें अवलंबन करून लक्ष्मी रहाते ६४. जे दुसरीकडे मन न लावितां तुझें अर्चन व पूजन करितात त्यांना आपत्ति, आधि आणि व्याधि प्राप्त होत नाहींत ६५. तूंच सर्वत्र आहेस अशी आदरपूर्वक भावना धरून असलेले लोक सर्व रोग आणि सर्व पापें ह्यांनीं रहित होऊन चिरकाल सुखानें रहातात ६६. हे अन्नाधिपते, श्रद्धापूर्वक सर्वांचें आतिथ्य करण्याकरितां अन्नाची इच्छा करणाऱ्या मलाही अन्न देणें तुला

अन्नमन्नपते दातुमभितः श्रद्धयार्हसि ६७ ये च तेनुचराः सर्वे पादोपान्तं
समाश्रिताः । माठरारुणदण्डाद्यास्तान्वन्देहं सनिक्षुभान् ६८ क्षुभया
सहिता मैत्री याश्चान्या भूतमातरः। ताश्च सर्वा नमस्यामि पान्तु मां शर-
णागतम् ६९ वैशम्पायन उवाच ॥ एवं स्तुतो महाराज भास्करो लोक-
भावनः। ततो दिवाकरः प्रीतो दर्शयामास पाण्डवम् ॥ दीप्यमानः स्ववपुषा
ज्वलन्निव हुताशनः ७० विवस्वानुवाच ॥ यत्तेभिलषितं किंचित्तत्त्वं सर्व-
मवाप्स्यसि । अहमन्नं प्रदास्यामि सप्त पञ्च च ते समाः ७१ गृह्णीष्व पिठरं
ताम्रं मया दत्तं नराधिप । यावद्वर्त्स्यति पाञ्चाली पात्रेणानेन सुव्रत ७२
फलमूलामिषं शाकं संस्कृतं यन्महानसे । चतुर्विधं तदन्नाद्यमक्षय्यं ते
भविष्यति ७३ इतश्चतुर्दशे वर्षे भूयो राज्यमवाप्स्यसि । वैशम्पायन उवाच॥
एवमुक्त्वा तु भगवांस्तत्रैवान्तरधीयत ७४ इमं स्तवं प्रयतमनाः समा-
धिना पठेदिहान्योपि वरं समर्थयन् । तत्तस्य दद्याच्च रविर्मनीषितं तदा-
प्नुयाद्यद्यपि तत्सुदुर्लभम् ७५ यश्चेदं धारयेन्नित्यं शृणुयाद्वाप्यभीक्ष्णशः ।

---

योग्य आहे ६७. माठर, अरुण, दंड इत्यादि जे सर्व सेवक तुझ्या पादसांनिध्याचा
आश्रय करून रहातात त्यांना निक्षुभेसहवर्तमान मी वंदन करितों ६८ आणि त्याच-
प्रमाणें क्षुभा, मैत्री व इतरही ज्या दुसऱ्या भूतमाता त्या सर्वांना मी नमस्कार करीत
आहें. म्हणून, त्यांनीही मज शरणागताचें रक्षण करावें ६९ वैशंपायन सांगतातः—
हे महाराज जनमेजया, याप्रमाणें जगत्पालक भास्कराचें युधिष्ठिरानें स्तवन केलें असतां
स्वतःच्या कांतीनें प्रज्वलित अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेल्या त्या प्रभाकरानें प्रसन्न
होऊन त्याला दर्शन दिलें ७०. सूर्य म्हणतोः—( हे युधिष्ठिरा ) जी कांहीं तुझी
इच्छा असेल ती सर्व शेवटास जाईल. कारण, मी तुला बारा वर्षेपर्यंत अन्न देईन ७१.
हे राजा, हें मी दिलेलें ताम्रमय परिवेषणपात्र तूं घे; म्हणजे, हे सदाचरणसंपन्न युधि-
ष्ठिरा, जोंपर्यंत पांचालकन्या द्रौपदी या पात्रानें ( वाढीत ) राहील ७२ तोंपर्यंत फळ,
मूळ, मांस व शाक असें जें कांहीं चारिप्रकारचें अन्न तुझ्या पाकगृहांत केलेलें
असेल तें अक्षय्य होईल ७३ आणि आजपासून चवदावे वर्षी तुला राज्य प्राप्त
होईल. वैशंपायन सांगतातः— याप्रमाणें धर्मराजाला सांगून भगवान् सूर्य
त्याचठिकाणीं अंतर्धान पावला ७४. शुद्धांतःकरणानें युक्त असा इतरही जो
पुरुष वरप्राप्तीची इच्छा धरून लक्ष्यपूर्वक या जगतामध्यें हें स्तोत्र पठण करील
त्याचाही मनोरथ सूर्य परिपूर्ण करील. सारांश, पठण करणाऱ्या पुरुषाचा मनोरथ अत्यंत
दुर्लभ जरी असला तरी तो त्याचा सिद्धीस जाईल ७५. त्याचप्रमाणें पुरुष अथवा स्त्रिया
यांपैकीं जो कोणी मर्त्यजन हें स्तोत्र नित्य पठण करील किंवा वारंवार श्रवण करील

पुत्रार्थी लभते पुत्रं धनार्थी लभते धनम् ७६ विद्यार्थी लभते विद्यां पुरुषांप्यथवा स्त्रियः । उभे सन्ध्ये पठेन्नित्यं नारी वा पुरुषो यदि ७७ आपदं प्राप्य मुच्येत बद्धो मुच्येत बन्धनात् । एतद्ब्रह्मा ददौ पूर्वं शक्राय सुमहात्मने ७८ शक्राच्च नारदः प्राप्तो धौम्यस्तु तदनन्तरम् । धौम्याद्युधिष्ठिरः प्राप्य सर्वान्कामानवाप्तवान् ७९ संग्रामे च जयेन्नित्यं विपुलं चाप्नुयाद्वसु । मुच्यते सर्वपापेभ्यः सूर्यलोकं स गच्छति ८० वैशम्पायन उवाच ॥ लब्ध्वा वरं तु कौन्तेयो जलादुत्तीर्य धर्मवित् । जग्राह पादौ धौम्यस्य भ्रातृंश्च परिषस्वजे ८१ द्रौपद्या सह संगम्य वन्द्यमानस्तया प्रभुः । महानसे तदानीं तु साधयामास पाण्डवः ८२ संस्कृतं प्रसवं याति स्वल्पमन्नं चतुर्विधम् । अक्षय्यं वर्धते चान्नं तेन भोजयते द्विजान् ८३ भुक्तवत्सु च विप्रेषु भोजयित्वानुजानपि । शेषं विघसमंज्ञं तु पश्चाद्भुङ्क्ते युधिष्ठिरः ८४ युधिष्ठिरं भोजयित्वा शेषमश्नाति पार्षती । द्रौपद्यां भुज्यमानायां तदन्नं क्षयमेति च ८५ एवं दिवाकरात्प्राप्य दिवाकरसमप्रभः ।

---

तो पुत्रेच्छु असल्यास त्याला पुत्र प्राप्त होईल, धनेच्छु असल्यास त्याला धनलाभ होईल आणि ज्ञानेच्छु असल्यास त्याला ज्ञान प्राप्त होईल ७६,७७. संकटांत सापडलेला अथवा बद्ध झालेला पुरुष अथवा स्त्री जर सकाळसंध्याकाळ नित्य हें स्तोत्र पठण करील तर संकटापासून अथवा बंधापासून मुक्त होईल. अत्यंत उदार बुद्धीनें युक्त असलेल्या इंद्राला ब्रह्मदेवानें प्रथम हें स्तोत्र कथन केलें ७८; इंद्रापासून नारदमुनींना प्राप्त झालें; नंतर त्याच्यापासून धौम्यमुनींना तें लब्ध झालें आणि धौम्यमुनींपासून तें युधिष्ठिराला प्राप्त झालें असता ( त्याच्या जपानें ) त्याचे सर्व मनोरथ सिद्धीस गेले७९. हें स्तोत्र पठन करणारा पुरुष संग्रामामध्यें सर्वदां विजयी होतो, विपुल द्रव्य त्याला प्राप्त होतें आणि सर्व पापांपासून मुक्त होऊन तो ( शेवटीं ) सूर्यलोकीं गमन करितो८०. वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें वरप्राप्ति झाल्यानंतर धर्मवेत्ता कुंतीपुत्र युधिष्ठिर उदकांतून बाहेर आला आणि धौम्यमुनींचे पाय धरून आपल्या भ्रात्यांना कडकडून भेटला ८१ आणि तदनंतर द्रौपदीची भेट झाल्यावर तीं वंदन करीत असतांना तो पांडुपुत्र युधिष्ठिर पाकशालेमध्यें गेला ८२. त्या पाकशालेंत( ती सूर्यदत्त स्थाली नेल्यापासून ) तेथें तयार केलेलें चारीप्रकारचें अन्न अल्प जरी असलें तरी तें अन्न दुसरें भक्ष्य आपोआप उत्पन्न करूं लागल्यामुळें अक्षय्य वृद्धिंगत होऊं लागलें आणि त्या अन्नाच्या योगानें तो धर्मराज द्विजांना भोजन घालूं लागला ८३. ब्राह्मणांनीं भोजन केल्यावर कनिष्ठ भ्रात्यांना भोजन घालून नंतर शेष राहिलेलें विघससंज्ञक अन्न युधिष्ठिर भक्षण करीत असे ८४; युधिष्ठिराला वाढून द्रौपदी भोजन करीत असे आणि द्रौपदी भोजन करूं

कामान्मनोभिलषितान्ब्राह्मणेभ्यो ददौ प्रभुः८६पुरोहितपुरोगाश्च तिथिनक्ष-
त्रपर्वसु। यज्ञियार्थाः प्रवर्तन्ते विधिमन्त्रप्रमाणतः ८७ ततः कृतस्वस्त्ययना
धौम्येन सह पाण्डवाः। द्विजसङ्घैः परिवृताः प्रययुः काम्यकं वनम् ८८[२१९]
इति०मारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि काम्यकवनप्रवेशे तृतीयोऽध्यायः ॥ ३॥
वैशम्पायन उवाच ॥ वनं प्रविष्टेष्वथ पाण्डवेषु प्रज्ञाचक्षुस्तप्यमानो-
ऽम्बिकेयः। धर्मात्मानं विदुरमगाधबुद्धिं सुखासीनो वाक्यमुवाच राजन् १
धृतराष्ट्र उवाच ॥ प्रज्ञा च ते भार्गवस्येव शुद्धा धर्मं च त्वं परमं वेत्थ
सूक्ष्मम्। समश्च त्वं संमतः कौरवाणां पथ्यं चैषां मम चैव ब्रवीहि २ एवं
गते विदुर यदद्य कार्यं पौराश्चेमे कथमस्मान्भजेरन्। ते चाप्यस्मान्नो-
द्धरेयुः समूलांस्तत्त्वं ब्रूयाः साधु कार्याणि वेत्सि ३ विदुर उवाच ॥ त्रिव-
र्गोऽयं धर्ममूलो नरेन्द्र राज्यं चेदं धर्ममूलं वदन्ति। धर्मे राजन्वर्तमानः
स्वशक्त्या पुत्रान्सर्वान्पाहि पाण्डोः सुतांश्च ४ स वै धर्मो विप्रलब्धः सभायां

---

लागली ह्मणजे ( सूर्यानें दिलेल्या स्थालींतील ) तें अन्न संपूं लागे ८५. तेजानें
सूर्यसमान असलेल्या प्रभु धर्मराजाला ह्याप्रमाणें सूर्यापासून स्थाली प्राप्त झाल्यानंतर
तो ब्राह्मणांचे इष्ट मनोरथ पूर्ण करूं लागला ८६. तदनंतर पुरोहितप्रभृति विप्रांची यज्ञ-
संबंधी कर्मे तिथिपर्व व नक्षत्रपर्व ह्या दिवशीं सूत्र आणि श्रुति ह्यांना अनुसरून होऊं
लागलीं ८७. असो. ( सूर्यापासून स्थाली प्राप्त झाल्या ) नंतर द्विजगणांनीं परिवेष्टित
असलेले पांडव धौम्यमुनींसहवर्तमान काम्यकवनामध्यें गेले ८८. ह्याप्रमाणें० आरण्यक-
पर्वापैकीं पांडवांनीं काम्यकवनांत प्रवेश केल्याविषयीं तिसरा अध्याय समाप्त झाला ॥३॥
वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, पांडुपुत्र वनांत गेले असतां स्वस्थ बस-
लेला अंबिकापुत्र अंध धृतराष्ट्र चिंताक्रांत होऊन महाबुद्धिमान् धर्मात्म्या विदुराला
ह्मणाला १ " तुझी बुद्धि शुक्राचार्यांप्रमाणें शुद्ध आहे, पराकाष्ठेचा सूक्ष्म धर्म तूं
जाणीत आहेस आणि पांडव व माझे पुत्र ह्या उभयतांशींही तूं पक्षपात न धरितां
वागणारा ह्मणून अभिमत आहेस. करितां, ह्या पांडवांना आणि मला काय हितकारक
असेल तें सांग २. हे विदुरा, असा प्रकार झाला असतां ह्या प्रसंगीं काय केलें पाहिजे !
नगरवासी जन आमचें कसें अवलंबन करून राहतील ! आणि काय केलें असतां ते
पांडव आमचा समूळ उच्छेद करणार नाहींत ! तें तूं सांग. कारण, कार्यें कशीं करून
घ्यावीं हें तूं चांगलें जाणीत आहेस ३. विदुर ह्मणतोः—हे राजा, धर्म, अर्थ आणि
काम ह्या त्रिवर्गाला धर्मच मूळ असून ह्या राज्यालाही धर्मच मूळ आहे असें ह्मणतात.
तस्मात् , हे राजा, तूं आपल्या शक्तीप्रमाणें धर्मानें वागून आपल्या सर्व पुत्रांचें व
पांडुपुत्रांचें परिपालन कर ४. ( अरे, राज्याला आधारभूत जो धर्म ) त्याची सभेमध्यें

पापात्मभिः सौबलेयप्रधानैः । आहूय कुन्तीसुतमक्षवत्यां पराजैषीत्सत्य-
सन्धं सुतस्ते ५ एतस्य ते दुष्प्रणीतस्य राजञ्छेषस्याहं परिपश्याम्युपायम् ।
यथा पुत्रस्तव कौरव्य पापान्मुक्तो लोके प्रतितिष्ठेत साधु ६ तद्वै सर्वं
पाण्डुपुत्रा लभन्तां यत्तद्राजन्नभिसृष्टं त्वयासीत् । एष धर्मः परमो यत्स्व-
केन राजा तुष्येन्न परस्वेषु गृध्येत् ७ यशो न नश्येज्ज्ञातिभेदश्च न स्याद्धर्मो
न स्यान्नैव चैवं कृते त्वाम् । एतत्कार्यं तव सर्वप्रधानं तेषां तुष्टिः शकुने-
श्चावमानः ८ एवं शेषं यदि पुत्रेषु ते स्यादेतद्राजंस्त्वरमाणः कुरुष्व । तथै-
तदेवं न करोषि राजन्ध्रुवं कुरूणां भविता विनाशः ९ न हि क्रुद्धो भीम-
सेनोऽर्जुनो वा शेषं कुर्याच्छात्रवाणामनीके । येषां योद्धा सव्यसाची कृतास्त्रो
धनुर्येषां गाण्डिवं लोकसारम् १० येषां भीमो बाहुशाली च योद्धा तेषां
लोके किं नु न प्राप्यमस्ति । उक्तं पूर्वं जातमात्रे सुते ते मया यत्ते हित-
मासीत्तदानीम् ११ पुत्रं त्यजेममहितं कुलस्य हितं परं न च तत्त्वं चकर्थ ।

---

सुबलपुत्र शकुनिप्रभृति दुष्टांनीं वंचना केली. कारण, सत्यवचनी कुंतीपुत्र युधिष्ठिराला द्यूतक्रीडेमध्यें आव्हान करून तुझ्या पुत्रानें पराजित केलें ५. हे राजा, ह्या तुझ्या दुराचरणाच्या प्रतीकाराचा उपाय मला दिसत आहे व तो उपाय योजिला असतां, हे कुरुकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, तुझा पुत्र दुर्योधन पापापासून मुक्त होऊन लोकांमध्येंही चांगल्या रीतीनें योग्यतेला चढणार आहे ६. हे राजा, ( पूर्वी द्रौपदीला वर देतांना ) तूं जें पांडवांना दिलें होतेस तें सर्व त्यांना प्राप्त व्हावें. कारण, हे भूपाला, परधना-विषयीं अभिलाष न धरितां राजानें स्वकीय धनावर संतुष्ट असावें हा सर्वो-त्कृष्ट धर्म होय ७. असें केल्यानें कीर्ति नाहींशी होणार नाहीं; ज्ञातिभेद होण्याचा प्रसंग येणार नाहीं व धर्माचाही तुझे ठिकाणीं अभाव होणार नाहीं. तेव्हां त्या पांड-वांचा संतोष आणि शकुनीचा अवमान हें तुझें सर्वांमध्यें श्रेष्ठ कर्तव्य आहे ८. हे राजा, तुझ्या पुत्रांचें भाग्य जर कांहीं अवशिष्ट राहिलें असेल तर विलंब न करितां ह्याप्रमाणें हें मीं सांगितलेलें कृत्य तूं अवश्य कर. हे राजा, जर माझ्या सांगण्याप्रमाणें तूं हें न करिशील तर निःसंशय कौरवांचा नाश होईल ९. हे, (विदुरा,) भीमसेन अथवा अर्जुन क्रुद्ध झाला ह्मणजे शत्रुसैन्यांतील कांहींएक अवशिष्ट ठेवणार नाहीं. अरे, अस्त्रविद्य-मध्यें निपुण असलेला सव्यसाची अर्जुन ज्यांचा योद्धा आहे, जगताचें सार असें गांडीव धनुष्य ज्यांच्या हातीं आहे १० आणि महापराक्रमी भीमसेनही ज्यांचा योद्धा आहे त्यांना पृथ्वीमध्यें काय बरें प्राप्त होण्यास अशक्य आहे? अरे, तुझा पुत्र दुर्योधन उत्पन्न होतांक्षणीं जी गोष्ट तुझ्या हिताची होती ती मीं त्याचवेळीं " कुलाला अहि-तकारक असलेल्या ह्या पुत्राचा त्याग कर " ह्मणून तुला सांगितली होती ११. परंतु,

इदं च राजन्हितमुक्तं न चेत्त्वमेवं कर्ता परितप्तासि पश्चात् १२ यद्येतदेवमनुमन्ता
देवमनुमन्ता सुतस्ते संश्रीयमाणः पाण्डवैरेकराज्यम् । तापो न ते भविता
प्रीतियोगात्त्वं चेन्निगृह्णीष्व सुतं सुखाय १३ दुर्योधनं त्वहितं वै निगृह्य पाण्डोः
पुत्रं प्रकुरुष्वाधिपत्ये । अजातशत्रुर्हि विमुक्तरागो धर्मेणमां पृथिवीं शास्तु
राजन् १४ ततो राजन्पार्थिवाः सर्व एव वैश्या इवास्मानुपतिष्ठन्तु सद्यः।
दुर्योधनः शकुनिः सूतपुत्रः प्रीत्या राजन्पाण्डुपुत्रान्भजन्तु १५ दुःशासनो
याचतु भीमसेनं सभामध्ये द्रुपदस्यात्मजां च । युधिष्ठिरं त्वं परिसान्त्वयस्व
राज्ये चैनं स्थापयस्वाभिपूज्य १६ त्वया पृष्टः किमहमन्यद्वदेयमेतत्कृत्वा कृत-
कृत्योऽसि राजन् १७ धृतराष्ट्र उवाच ॥ श्रुतं वाक्यं विदुर यत्त्वं सभायामिह
प्रोक्तं पाण्डवान्प्राप्य मां च । हितं तेषामहितं मामकानामेतत्सर्वं मम नावैति
चेतः १८ इदं त्विदानीं कुत एव निश्चितं तेषामर्थे पाण्डवानां यदात्थ ।
तेनाद्य मन्ये नासि हितो ममेति कथं हि पुत्रं पाण्डवार्थे त्यजेयम् १९
असंशयं तेऽपि ममैव पुत्रा दुर्योधनस्तु मम देहात्प्रसूतः । स्वं वै देहं परहे-

---

ती सर्वोत्कृष्ट हितकारक गोष्ट. तूं केली नाहींस. तस्मात् , हे राजा, सांप्रत जें हें मी तुझ्या हिताचें सांगितलें आहे त्याप्रमाणें तूं जर न करिशील तर मागून पश्चात्ताप पावशील १२. ह्मनव, पांडवांसहवर्तमान आनंदानें एकत्र राज्य करण्याला जर तुझ्या पुत्राची अनुमति असेल तर पुत्रप्रेमामुळें तुला ताप होणार नाहीं. ह्याप्रमाणें करण्यास जर त्याचें अनुमोदन नसेल तर सुख प्राप्त होण्याकरितां तूं आपल्या पुत्राचा बंदोबस्त करून टाक १३. हे राजा, अहित करणाऱ्या दुर्योधनाचा निग्रह करून पांडुपुत्राला राज्याचा अधिपति कर आणि त्या निर्लोभ व अजातशत्रु युधिष्ठिराला धर्मानें ह्या पृथ्वीचें राज्य करूं दे १४. तात्पर्य, हे राजा, वैश्यांप्रमाणें सर्व भूपति आमच्याकडे तत्क्षणीं येवोत; हे भूपते, दुर्योधन, शकुनि आणि सूतपुत्र कर्ण हे पांडवांची सेवा करोत १५ आणि दुःशासन भर सभेमध्यें द्रुपदकन्येची व भीमसेनाची क्षमा मागो. सारांश, तूं युधिष्ठिराचें सांत्वन कर आणि राज्याचे ठिकाणीं आदरपूर्वक त्याची स्थापना कर १६. हे राजा, तूं प्रश्न केल्यानंतर मी आणखी दुसरें तें काय सांगणार ! हें तुझ्या हातून झालें ह्मणजे तूं कृतकृत्य होशील १७. धृतराष्ट्र ह्मणतो:—हे विदुरा, पांडवांसंबंधानें आणि माझ्यासंबंधानें तूं जें येथें सभेमध्यें भाषण केलेस तें मी श्रवण केलें. तें त्या पांडवांना हितकारक आणि माझ्या पुत्रांना अहितकारक आहे. करितां, ह्यांतलें कांहींच स्वीकारणें माझ्या मनाला नीट दिसत नाहीं १८. अरे, हें जें तूं भाषण केलेंस त्यावरून तूं केवळ पांडवांकरितां सांप्रत येथें प्राप्त झाला आहेस हें निश्चितच आहे आणि ह्मणूनच तूं माझा हितकर्ता नाहींस असें मला वाटत आहे.

तोऽस्त्यजेति को नु ब्रूयात्समतामन्ववेक्ष्य २० स मां जिह्मं विदुर सर्वं ब्रवीषि मानं च तेऽहमधिकं धारयामि । यथेच्छकं गच्छ वा तिष्ठ वा त्वं सुसान्त्व्यमानाप्यसती स्त्री जहाति २१ वैशम्पायन उवाच ॥ एतावदुक्त्वा धृतराष्ट्रोऽन्वपद्यदन्तर्वेश्म सहसोत्थाय राजन् । नेदमस्तीत्यथ विदुरो भाषमाणः संप्राद्रवद्यत्र पार्था बभूवुः २२[२४१]इति० शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि विदुरवाक्यप्रत्याख्याने चतुर्थोऽध्यायः॥ ४॥

वैशम्पायन उवाच ॥ पाण्डवास्तु वने वासमुद्दिश्य भरतर्षभाः । प्रययुर्जाह्नवीकूलात्कुरुक्षेत्रं सहानुगाः १ सरस्वतीदृषद्वत्योर्यमुनां च निषेव्य ते । ययुर्वनेनैव वनं सततं पश्चिमां दिशम् २ ततः सरस्वतीकूले समेषु मरुधन्वसु । काम्यकं नाम ददृशुर्वनं मुनिजनप्रियम् ३ तत्र ते न्यवसन्वीरा वने बहुमृगद्विजे । अन्वास्यमाना मुनिभिः सान्त्व्यमानाश्च भारत ४ विदुरस्त्वपि पाण्डूनां सदा दर्शनलालसः । जगामैकरथेनैव काम्यकं वनमृ-

---

अरे, पांडवांकरितां मीं पुत्राचा त्याग कसा बरें करावा ? १९. तेही माझेच पुत्र आहेत ह्याविषयीं संशय नाहीं; परंतु, दुर्योधन तर माझ्या देहापासून उत्पन्न झाला आहे. तेव्हां " दुसऱ्याकरितां आपल्या देहाचा त्याग कर " असें निष्पक्षपातपणाचा विचार करून कोण बरें सांगण्यास प्रवृत्त होईल ? २०. हे विदुरा, ( पांडवांच्याच हिताविषयीं तत्पर असलेला ) तो तूं मला सर्व कपटानें सांगत आहेस आणि मी तर मनामध्यें आजपर्यंत तुला मोठा मान देत आलों आहें. करितां, तूं इच्छेस येईल तर येथें रहा अथवा चालता हो. कारण, चांगल्या प्रकारें सांत्वन करूं लागलें असताही दुराचारिणी स्त्री भर्त्याला सोडून जातच असते २१. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, एवढें बोलून धृतराष्ट्र एकदम उठून वरांत चालता झाला. तेव्हां, विदुरही " हें कांहीं नव्हें " असें ह्मणत ह्मणत जिकडे कुंतीपुत्र पांडव होते तिकडे गेला २२. ह्याप्रमाणें० आरण्यकपर्वांपैकीं विदुराचा उपदेश मोडून काढण्याविषयीं चौथा अध्याय समाप्त झाला॥४॥

वैशंपायन सांगतातः—भरतवंशजश्रेष्ठ पांडव वनामध्यें वास्तव्य करण्याच्या उद्देशानें जान्हवीतीरापासून अनुयायांसहवर्तमान कुरुक्षेत्रामध्यें गेले १. सरस्वती, दृषद्वती आणि यमुना ह्यांचें उदक सेवन करून ते पांडव ह्या वनांतून त्या वनांत अशा रीतीनें एकसारखे पश्चिम दिशेकडे चालले २. तेव्हां, जातां जातां सरस्वतीचे तीरीं सपाट अशा निर्जल व जांगल प्रदेशामध्यें मुनिजनांना प्रिय असें काम्यकनामक वन त्यांनीं अवलोकन केलें ३. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, बहुत मृग आणि पक्षी ह्यांनीं युक्त असलेल्या त्या काम्यक वनामध्येंच ते वीर पांडव वास्तव्य करूं लागले. ते त्या वनामध्यें असतांना मुनि त्यांचे सन्निध असत आणि त्यांचें सांत्वन करीत ४. असो,

च्छिमत् ५ ततो गत्वा विदुरः काननं तच्छीघ्रैरश्वैर्वाहिना स्यन्दनेन । ददृ-
र्शासीनं धर्मात्मानं विविक्ते सार्धं द्रौपद्या भ्रातृभिर्ब्राह्मणैश्च ६ ततोपश्य-
द्विदुरं तूर्णमाराद्भ्यायान्तं सत्यसन्धः स राजा । अथाब्रवीद्भ्रातरं भीम-
सेनं किं नु क्षत्ता वक्ष्यति नः समेत्य ७ कच्चिन्नायं वचनात्सौबलस्य समा-
ह्वाता देवनायोपयातः। कच्चित्क्षुद्रः शकुनिर्नायुधानि जेष्यत्यस्मान्पुनरेवा-
क्षवत्याम् ८ समाहूतः केनचिदाद्रवेति नाहं शक्तो भीमसेनापयातुम् ।
गाण्डीवे च संशयिते कथं नु राज्यप्राप्तिः संशयिता भवेन्नः ९ वैशम्पायन
उवाच ॥ तत उत्थाय विदुरं पाण्डवेयाः प्रत्यगृह्णन्नृपते सर्व एव । तैः
सत्कृतः स च तानाजमीढो यथोचितं पाण्डुपुत्रान्समेयात् १० समाश्वस्तं
विदुरं ते नरर्षभास्ततोपृच्छन्नागमनाय हेतुम् । स चापि तेभ्यो विस्तरतः
शशंस यथावृत्तो धृतराष्ट्रोम्बिकेयः ११ विदुर उवाच ॥ अवोचन्मां धृत-
राष्ट्रोनुगुप्तमजातशत्रो परिगृह्याभिपूज्य । एवं गते समतामभ्युपेत्य पथ्यं तेषां

---

( धृतराष्ट्र राजाच्या घरांतून बाहेर पडल्या ) नंतर पांडवांची भेट घेण्याविषयीं सर्वदां उत्सुक असलेला विदुर केवळ एकच रथ बरोबर घेऊन समृद्ध अशा काम्यक वना-
मध्यें निघाला ५. शीघ्रगामी अश्वांच्या योगानें वाहून नेणाऱ्या रथावर आरूढ होऊन विदुर त्या काम्यक वनांत गेला असतां भ्रात, ब्राह्मण आणि द्रौपदी ह्यांसहवर्तमान धर्मात्मा युधिष्ठिर एकीकडे बसल्याचें त्यानें अवलोकन केलें ६. तदनंतर विदुर त्वरेनें समीप येत आहे असें अवलोकन करून तो सत्यप्रतिज्ञ धर्मराजा भ्रात्या भीमसेनाला ह्मणाला " आपणाकडे येऊन हा विदुर काय सांगणार आहे बरें ! ७. अरे, हा समीप आलेला विदुर सुबलपुत्र शकुनीच्या मागण्यावरून द्यूताकरितां मला आव्हान तर करणार नाहीं ना ! अरे, क्षुद्र शकुनि पुनरपि द्यूतक्रीडेमध्यें आयुधें पणाला लावून तर आपणाला जिंकण्याचें इच्छीत नसेल ना ! ८. हे भीमसेना, " ये " ह्मणून कोणीही जरी आव्हान केलें तरी मला मागें सरतां येणार नाहीं. तेव्हां; गांडीव पणाला लाविल्यावर आपणांला राज्यप्राप्ति कोठून होणार ! अर्थात् तीही संशयितच होणार हें उघड आहे " ९. वैशंपायन सांगतात:—हे जनमेजय राजा, ( इतकें परस्परांचें बोलणें होत आहे तोंच समीप आलेल्या ) विदुराला ते पांडव सर्वही तेथून उठून सामोरे गेले आणि त्यांनी सत्कार केल्यानंतर त्या विदुरानें त्या पांडुपुत्रांची यथा-
योग्य रीतीनें भेट घेतली १०. नंतर विदुर स्वस्थ बसल्यावर त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांनीं त्याला आगमनाचें कारण विचारिलें; तेव्हां, अंबिकापुत्र धृतराष्ट्र जसा त्याच्याशीं वागला तसें त्या विदुरानेंही त्यांना सविस्तर कथन केलें ११. विदुर ह्मणतो:—हे अजातशत्रो युधिष्ठिरा, धृतराष्ट्रराजानें सत्कारपूर्वक माझी एकांतीं भेट घेतली आणि " असा

मम चैव ब्रवीहि १२ मयाप्युक्तं यत्क्षमं कौरवाणां हितं पथ्यं धृतराष्ट्रस्य चैव। तद्वै तस्मै न रुचामभ्युपैति ततश्चाहं क्षममन्यन्न मन्ये १३ परं श्रेयः पाण्डवेया मयोक्तं न मे तच्च श्रुतवानाम्बिकेयः । यथातुरस्येव हि पथ्यमन्नं न रोचतेस्मास्य तदुच्यमानम् १४ न श्रेयसे नीयतेजातशत्रो स्त्री श्रोत्रियस्येव गृहे प्रदुष्टा। ध्रुवं न रोचेद्भरतर्षभस्य पतिः कुमार्या इव षष्टिवर्षः १५ ध्रुवं विनाशो नृप कौरवाणां न वै श्रेयो धृतराष्ट्रः परैति। यथा च पर्णे पुष्करस्यावसिक्तं जलं न तिष्ठेत्पथ्यमुक्तं तथास्मिन् १६ ततः क्रुद्धो धृतराष्ट्रोब्रवीन्मां यस्मिञ्छ्रद्धा भारत तत्र याहि । नाहं भूयः कामये त्वां सहायं महीमिमां पालयितुं पुरं वा १७ सोहं त्यक्तो धृतराष्ट्रेण राज्ञा प्रशासितुं त्वामुपयातो नरेन्द्र। तद्वै सर्वं यन्मयोक्तं सभायां तद्धार्यतां यत्प्रवक्ष्यामि भूयः १८ क्लेशैस्तीव्रैर्युज्यमानः सपत्नैः क्षमां कुर्वन्कालमुपा-

---

प्रकार झाला असतां आतां त्या पांडवांना व मला काय हितकारक होईल तें तूं निष्पक्षपात बुद्धीनें सांग " असें तो मला ह्मणाला १२. तेव्हां, धृतराष्ट्र आणि इतरही कुरुवंशज ( ह्मणजे अर्थात् तुह्मी ) ह्यांना जें हितकारक व पथ्यकारक होतें तें मींही सांगितलें. परंतु, तें त्याला रुचत नाहीं आणि मला तर ( शमावांचून ) दुसरें कांहीं योग्य वाटत नाहीं १३. हे पांडव हो, मीं सर्वोत्कृष्ट हिताची गोष्ट सांगितली; परंतु, अंबिकापुत्र धृतराष्ट्रानें तें माझें ह्मणणें ऐकिलें नाहीं. अरे, पथ्यकारक अन्न ज्याप्रमाणें रोगपीडित मनुष्याला रुचत नाहीं त्याचप्रमाणें तें माझें ह्मणणें त्याला रुचलें नाहीं १४. हे अजातशत्रो युधिष्ठिरा, ब्राह्मणाच्या गृहामध्यें ज्याप्रमाणें दूषित झालेल्या स्त्रीला घेतां येत नाहीं त्याचप्रमाणें धृतराष्ट्राला कल्याणाकडे नेतां येत नाहीं. सारांश, कन्येला ज्याप्रमाणें साठ वर्षांचा वृद्ध पति रुचत नाहीं त्याचप्रमाणें भरतवंशजश्रेष्ठ धृतराष्ट्राला चांगला उपदेश निःसंशय रुचणार नाहीं १५. हे राजा, ज्याअर्थी धृतराष्ट्र कल्याणाचा विचार करीत नाहीं त्याअर्थी कौरवांचा नाश होणार हें निश्चित आहे. अरे, ज्याप्रमाणें कमलपत्रावर सिंचन केलेलें उदक ठरत नाहीं त्याचप्रमाणें पथ्यकारक उपदेश ह्या धृतराष्ट्राचे ठिकाणीं ठरत नाहीं १६. ( मीं चांगलें हितकारक भाषण केल्या ) नंतर हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, धृतराष्ट्र क्रुद्ध होऊन मला ह्मणाला " तुझ्या इच्छेस येईल तिकडे तूं चालता हो; साहाय्यकर्ता ह्मणून पृथ्वीचें अथवा ह्या नगराचें रक्षण करण्याकरितां तुझा स्वीकार करण्याची आतां मला इच्छा नाहीं १७. तेव्हां, हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, धृतराष्ट्र राजानें त्याग केल्यावर हा मी तुझ्याकडे आलों आहें. करितां, सभेमध्यें मीं जें सांगितलें व सांप्रतही पुनरपि जें मी सांगत आहें तें तूं सर्व लक्ष्यांत ठेव १८. शत्रु दुःसह क्लेश देऊं लागले असतांही जो ते सहन करून योग्य काळाची प्रतीक्षा करीत

मते यः । संवर्धयंस्तोकमिवाग्निमात्मवान्स वै भुङ्क्ते पृथिवीमेक एव १९
यस्याविभक्तं वसु राजन्सहायैस्तस्य दुःखेप्यंशभाजः सहायाः । सहायाना-
मेष संग्रहणेभ्युपायः सहायाप्तौ पृथिवीप्राप्तिमाहुः २० सत्यं श्रेष्ठं पाण्डव
विप्रलापं तुल्यं चान्नं सह भोज्यं सहायैः । आत्मा चैषामग्रतो न
स्म पूज्य एवंवृत्तिर्वर्धते भूमिपालः २१ युधिष्ठिर उवाच ॥ एवं करि-
ष्यामि यथा ब्रवीषि परां बुद्धिमुपगम्याप्रमत्तः । यच्चाप्यन्यद्देशकालोपपन्नं
तद्वै वाच्यं तत्करिष्यामि कृत्स्नम् २२ [ २६६ ] इति श्रीमहाभारते०
वैयासिक्यामारण्यपर्वण्यारण्यकपर्वणि विदुरनिर्वासे पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥
वैशम्पायन उवाच ॥ गते तु विदुरे राजन्नाश्रमं पाण्डवान्प्रति । धृत-
राष्ट्रो महाप्राज्ञः पर्यतप्यत भारत १ विदुरस्य प्रभावं च सन्धिविग्रहका-
रितम् । विवृद्धिं च परां मत्वा पाण्डवानां भविष्यति २ स सभाद्वारमा-
गम्य विदुरस्मारमोहितः । समक्षं पार्थिवेन्द्राणां पपाताविष्टचेतनः ३ स

---

असतां तो जितेंद्रिय पुरुष अल्प अग्नीप्रमाणें वृद्धिंगत होऊन एकटाच सर्व पृथ्वीचा उपभोग घेतो १९. हे राजा, साहाय्यकर्त्यां पुरुषांना जो आपल्या वैभवाचा स्वतःप्रमाणें साधारणपणें उपभोग घेऊन देतो त्याला दुःख प्राप्त झालें असतांही ते साहाय्यकर्ते दुःखाचे वाटेकरी होतात. तस्मात् (संपादन केलेल्या वैभवाचा उपभोग स्वतः प्रमाणेंच साहाय्यकर्त्यां पुरुषांना घेऊं देणें) हा सहाय प्राप्त करून घेण्याचा उपाय आहे आणि साहाय्यकर्ते मिळाले असतां पृथ्वी मिळाली असें लोकांचें ह्मणणें आहे २०. हे पांडुपुत्रा, व्यर्थ शब्द ज्यांत नाहींत असें श्रेष्ठ सत्य भाषण, आपणांला साहाय्य करणाऱ्याबरोबर सारख्याच अन्नाचें एकत्र सेवन आणि ह्या साहाय्यकर्त्यांसमक्ष आत्मस्तुतीचा अभाव ह्याप्रकारें ज्या भूपतीचें वर्तन असतें त्याचा अभ्युदय होतो २१. युधिष्ठिर ह्मणतोः— मोठा विचार करून ज्याप्रमाणें आपण मला उपदेश करीत आहांत त्याचप्रमाणें मी लक्ष्यपूर्वक वागेन. ह्याशिवाय देश आणि काल ह्यांना अनुरूप असें आणखीही जें कांहीं सांगण्यासारिखें असेल तें आपण सांगावें; ह्मणजे मी तें सर्व करीन २२. ह्याप्रमाणें ०आरण्यकपर्वांपैकीं धृतराष्ट्रानें विदुराला हाकून दिल्याविषयीं पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजय राजा, विदुर पांडवांकडे आश्रमामध्यें गेल्यानंतर महाबुद्धिमान् धृतराष्ट्र राजाला पश्चात्ताप झाला १ आणि संधि, विग्रह वगैरे राजनीतिविषयक ज्ञानाच्या योगानें विदुराचे ठिकाणीं आलेलें सामर्थ्य आणि पुढें पांडवांचा होणारा पराकाष्ठेचा भाग्योदय हीं मनांत आणून २ तो धृतराष्ट्र पुनरपि सभेच्या द्वाराशीं आला आणि विदुराच्या ह्मणण्याचें स्मरण झाल्यामुळें मोहित झालेला तो राजा तेथें जमलेल्या श्रेष्ठ श्रेष्ठ राजांचे समक्ष मूर्छा येऊन पडला ३.

तु लब्ध्वा पुनः संज्ञां समुत्थाय महीतलात् । समीपोपस्थितं राजा सञ्जयं वाक्यमब्रवीत् ४ भ्राता मम सुहृच्चैव साक्षाद्धर्म इवापरः । तस्य स्मृत्वाद्य सुभृशं हृदयं दीर्यतीव मे ५ तमानयस्व धर्मज्ञं मम भ्रातरमाशु वै । इति ब्रुवन्स नृपतिः कृपणं पर्यदेवयत् ६ पश्चात्तापाभिसंतप्तो विदुरस्मारमोहितः । भ्रातृस्नेहादिदं राजा सञ्जयं वाक्यमब्रवीत् ७ गच्छ सञ्जय जानीहि भ्रातरं विदुरं मम । यदि जीवति रोषेण मया पापेन निर्धुतः ८ न हि तेन मम भ्रात्रा सुसूक्ष्ममपि किंचन । व्यलीकं कृतपूर्वं वै प्राज्ञेनामितबुद्धिना ९ स व्यलीकं परं प्राप्तो मत्तः परमबुद्धिमान् । त्यक्ष्यामि जीवितं प्राज्ञ तं गच्छानय सञ्जय १० तस्य तद्वचनं श्रुत्वा राज्ञस्तमनुमान्य च । सञ्जयो बाढमित्युक्त्वा प्राद्रवत्काम्यकं प्रति ११ सोऽचिरेण समासाद्य तद्वनं यत्र पाण्डवाः । रौरवाजिनसंवीतं ददर्शाथ युधिष्ठिरम् १२ विदुरेण सहासीनं ब्राह्मणैश्च सहस्रशः । भ्रातृभिश्चाभिसंगुप्तं देवैरिव पुरन्दरम् १३ युधिष्ठिरमुपागम्य पूजयामास सञ्जयः । भीमार्जुनयमाश्चापि तद्युक्तं प्रतिपेदिरे १४ राज्ञा

---

तदनंतर पुनरपि सावध होऊन तो धृतराष्ट्र भूपति भूतलावरून उठला आणि समीप असलेल्या संजयाला ह्मणाला ४ " साक्षात् दुसरा मूर्तिमान् धर्मच की काय असा जो माझा भ्राता व सुहृद विदुर त्याच्या स्मरणामुळें आज माझें हृदय एकसारखें जसें कांहीं विदीर्ण होत आहे ५. करितां, त्या माझ्या धर्मवेत्त्या भ्रात्याला तूं सत्वर इकडे आण. " असें बोलत बोलत तो धृतराष्ट्र राजा अगदीं दीन स्वरानें शोक करूं लागला ६ आणि विदुराचें स्मरण झाल्यामुळें कांहीं सुचेनासें होऊन पश्चात्तापानें अतिशय संतप्त झालेला तो धृतराष्ट्रराजा बंधुप्रेमामुळें संजयाला पुनरपि ह्मणाला ७. " हे संजया, जा आणि मी दुष्टानें क्रोधपूर्वक घरांतून हाकून लाविलेल्या त्या विदुरानें प्राण तरी ठेविले आहेत किंवा नाहींत हें कळण्याकरितां तूं त्या माझ्या विदुर भ्रात्याचा शोध लाव ८. त्या माझ्या अत्यंत विवेकी बुद्धिमान् भ्रात्यानें आजपर्यंत अणुरेणु इतकेंही मला दुःख दिलें नाहीं ९. परंतु, त्या महाबुद्धिमान् भ्रात्याला माझ्या हातून मात्र पराकाष्ठेचें दुःख प्राप्त झालें आहे. करितां, हे विचारी संजया, तूं जा आणि त्याला घेऊन ये; नाहींतर मी प्राणांचा त्याग करीन " १०. ह्याप्रमाणें त्या धृतराष्ट्रराजाचें भाषण श्रवण करून संजयानें त्याला अनुमति दिली आणि " ठीक आहे " असें ह्मणून तो काम्यक वनाकडे निघाला ११. तदनंतर जेथें पांडव होते त्या वनामध्यें थोडक्याच वेळांत तो गेला. तेव्हां, रुरुसंज्ञक मृगाचें चर्म परिधान केलेला युधिष्ठिर त्याच्या दृष्टीं पडला १२. देवांनीं रक्षण केलेल्या इंद्राप्रमाणें भ्रात्यांनीं ज्यानें सर्व बाजूंनीं रक्षण केलें आहे आणि विदुर व हजारों ब्राह्मण ह्यांसहवर्तमान जो बसलेला आहे १३ त्या

पृष्टः स कुशलं सुखासीनश्च सञ्जयः । शशंसागमने हेतुमिदं चैवाब्रवीद्वचः १५ सञ्जय उवाच ॥ राजा स्मरति ते क्षत्तर्धृतराष्ट्रोम्बिकासुतः । तं पश्य गत्वा त्वं क्षिप्रं संजीवय च पार्थिवम् १६ सोनुमान्य नरश्रेष्ठान्पाण्डवान्कुरुनन्दनान् । नियोगाद्राजसिंहस्य गन्तुमर्हसि सत्तम १७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्तु विदुरो धीमान्स्वजनवत्सलः । युधिष्ठिरस्यानुमते पुनरायाद्गजाह्वयम् १८ तमब्रवीन्महातेजा धृतराष्ट्रोम्बिकासुतः । दिष्ट्या प्राप्तोसि धर्मज्ञ दिष्ट्या स्मरसि मेनघ १९ अद्य चाहं दिवा रात्रौ त्वत्कृते भरतर्षभ । प्रजागरं प्रपश्यामि विचित्रं देहमात्मनः २० सोङ्कमानीय विदुरं मूर्धन्याघ्राय चैव ह । क्षम्यतामिति चोवाच यदुक्तोसि मयानघ २१ विदुर उवाच ॥ क्षान्तमेव मया राजन्गुरुर्मे परमो भवान् । एषोहमागतः शीघ्रं त्वद्दर्शनपरायणः २२ भवन्ति हि नरव्याघ्र पुरुषा धर्मचेतसः । दीनाभि-

---

युधिष्ठिरासमीप जाऊन संजयानें त्याला प्रणाम केला. तेव्हां भीम, अर्जुन आणि नकुलसहदेव ह्यांनीही योग्यतेप्रमाणें जें कांहीं (त्याचें आदरातिथ्य) कर्तव्य होतें तें केलें १४. नंतर स्वस्थ बसल्यावर धर्मराजानें त्याला कुशलप्रश्न केला असतां आगमनाचें कारण निवेदन करून त्यानें असेंही तेथें भाषण केलें १५. संजय ह्मणतो:—हे विदुरा, अंबिकापुत्र धृतराष्ट्र राजाला (एकसारखें) आपलें स्मरण होत आहे. करितां, सत्वर जाऊन आपण त्याची भेट घ्यावी आणि त्या राजाला जीवदान द्यावें १६. साराश, हे सज्जनश्रेष्ठ, आपण पुरुषश्रेष्ठ कुरुनंदन पांडवाची अनुमति घेऊन नृपश्रेष्ठ धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें तिकडे चलावें १७. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें संजयानें विनंति केल्यावर स्वजनप्रिय असलेला तो विवेकी विदुर युधिष्ठिराच्या संमतीनें पुनरपि हास्तिनपुरास परत आला १८. तेव्हां; महातेजस्वी अंबिकापुत्र धृतराष्ट्र त्याला ह्मणाला "हे धर्मवेत्त्या, येथें आलास ही फार चांगली गोष्ट झाली आणि, हे निष्पापा, मला स्मरत आहेस हेंही माझें मोठें भाग्यच समजलें पाहिजे १९. हे भरतवंशश्रेष्ठा, आज तुझ्याकरितां मला अहोरात्र जागरण झालें असून ( तूं नसल्यामुळें ) स्वतःचा देहही मला विचित्रच दिसूं लागला आहे " २०. असें सांगून त्या धृतराष्ट्रानें विदुराला अंकावर बसविलें आणि ( प्रेमानें ) त्याचें मस्तक हुंगून " हे निष्पापा, मी जें तुला बोललों त्याची क्षमा कर " असेंही तो त्याला ह्मणाला २१. विदुर ह्मणतो ( हें काय ! ) हे राजा, मला वडील काय ते मुख्य आपणच आहांत; तेव्हां आपल्या ह्मणण्याची मीं क्षमा केलेलीच आहे आणि आपल्या भेटीविषयीं उत्सुक होऊन हा मीं सत्वर आपणांकडे आलों आहें २२. हे पुरुषश्रेष्ठा ( धृतराष्ट्रराजा, आपल्या पुत्राविषयीं द्वेषबुद्धि मनांत धरून मी पांडवांचा पक्ष घेतों असें आपण समजूं नका. परंतु, हे ) राजा,

पातिनो राजन्नात्र कार्या विचारणा २३ पाण्डोः सुता यादृशा मे तादृशा-
स्तव भारत । दीना इतीव मे बुद्धिरभिपन्नाद्य तान्प्रति २४ वैशम्पायन
उवाच ॥ अन्योन्यमनुनीयैवं भ्रातरौ द्वौ महाद्युती । विदुरो धृतराष्ट्रश्च लेभाते
परमां मुदम् २५[२८८]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासि-
क्यामारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि विदुरप्रत्यागमनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा च विदुरं प्राप्तं राज्ञा च परिसान्त्वितम् ।
धृतराष्ट्रात्मजो राजा पर्यतप्यत दुर्मतिः १ स सौबलं समानाय्य कर्णदुःशा-
सनौ तथा । अब्रवीद्वचनं राजा प्रविश्याबुद्धिजं तमः २ एष प्रत्यागतो
मन्त्री धृतराष्ट्रस्य धीमतः । विदुरः पाण्डुपुत्राणां सुहृद्विद्वान्हिते रतः ३
यावदस्य पुनर्बुद्धिं विदुरो नापकर्षति । पाण्डवानयने तावन्मन्त्रयध्वं हितं
मम ४ अथ पश्याम्यहं पार्थान्प्राप्तानिह कथंचन । पुनः शोषं गमिष्यामि
निरम्बुर्निरवग्रहः ५ विषमुद्बन्धनं चैव शस्त्रमग्निप्रवेशनम् । करिष्ये न हि
तानृद्धान्पुनर्द्रष्टुमिहोत्सहे ६ शकुनिरुवाच ॥ किं बालिशमतिं राजन्नास्थि-

---

धर्मबुद्धि पुरुष दीनांचे पक्षपाती असावयाचेच. तेव्हां, ( मी पांडवांचा पक्षपाती आहें ) ह्याविषयीं आपणाला मुळींच शंका घेण्याचें कारण नाहीं २३. हे भरतकुलोत्पन्ना, जसे मला पांडूचे पुत्र तसेच आपले. परंतु, पांडव दीन आहेत म्हणून आज माझ्या मनाचा ओढा त्यांच्याकडे आहे २४. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें परस्परांचें सान्त्वन करून ते महातेजस्वी उभयतां भ्राते विदुर व धृतराष्ट्र पराकाष्ठेचे आनंदित झाले २५ ह्याप्रमाणें० आरण्यकपर्वांपैकीं विदुराच्या पुनरागमनाविषयीं सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

वैशंपायन सांगतातः—विदुर आला व त्याचें धृतराष्ट्रराजानें सान्त्वन केलें असें ऐकून धृतराष्ट्रपुत्र दुष्टबुद्धि दुर्योधनराजाला फारच वाईट वाटलें १. तेव्हां अज्ञानजन्य मोहानें ग्रस्त होऊन त्या राजानें सुबलपुत्र शकुनि, कर्ण व दुःशासन ह्यांना समीप आणविलें आणि नंतर तो त्यांना म्हणाला २ " बुद्धिमान् धृतराष्ट्राचा हा मंत्री विदुर पुनरपि परत आला आहे. हा पांडुपुत्रांचा सुहृद असून त्यांच्या हिताविषयीं तत्पर आहे आणि मोठा राजनीतिज्ञही आहे ३. तस्मात् , पांडवांना परत आणण्याविषयीं जोंपर्यंत ह्या धृतराष्ट्राच्या मनात विदुरानें भरवून दिलें नाहीं तोंपर्यंत तुम्ही काय तो माझ्या हिताचा विचार करा ४. अहो, कोणत्याही रीतीनें येथें कुंतीपुत्र पांडव आल्याचें मर माझ्या दृष्टी पडलें तर मला जरी अन्नोदक घेण्यास कोणाचा प्रतिबंध नाहीं तरी उदकाचें सुद्धां सेवन न करितां मी आपला देह शुष्क करून टाकीन ५. किंवा विष-प्राशन करणें, गळफास लावून घेणें, शस्त्रानें आपला शेवट करून घेणें अथवा अग्नीमध्यें प्रवेश करणें ह्यांपैकीं कशाचें तरी मी अवलंबन करून प्राण देईन. कारण, ह्या

तांसि विशांपते । गतास्ते समयं कृत्वा नैतदेवं भविष्यति ७ सत्यवाक्ये
स्थिताः सर्वे पाण्डवा भरतर्षभ। पितुस्ते वचनं तात न ग्रहीष्यन्ति कर्हि-
चित् ८ अथवा ते ग्रहीष्यन्ति पुनरेष्यन्ति वा पुरम् । निरस्य समयं सर्वे
पणोस्माकं भविष्यति ९ सर्वे भवामो मध्यस्था राज्ञश्छन्दानुवर्तिनः। छिद्रं
बहु प्रपश्यन्तः पाण्डवानां सुसंवृताः १० दुःशासन उवाच ॥ एवमेतन्म-
हाप्राज्ञ यथा वदसि मातुल। नित्यं हि मे कथयतस्तव बुद्धिर्हि रोचते ११
कर्ण उवाच ॥ काममीक्षामहे सर्वे दुर्योधन तवेप्सितम्। एकमत्यं हि नो
राजन्सर्वेषामेव लक्षये १२ नागमिष्यन्ति ते धीरा अकृत्वा कालसंविदम्।
आगमिष्यन्ति चेन्मोहात्पुनर्द्यूतेन तान्जय १३ वैशम्पायन उवाच ॥ एव-
मुक्तस्तु कर्णेन राजा दुर्योधनस्तदा । नातिहृष्टमनाः क्षिप्रमभवत्स परा-
ङ्मुखः १४ उपलभ्य ततः कर्णो विवृत्य नयने शुभे । रोषाद्दुःशासनं चैव
सौबलं च तमेव च १५ उवाच परमक्रुद्ध उद्यम्यात्मानमात्मना । अथो

पांडवांना पुनरपि ह्या जगतामध्यें वैभवसंपन्न झालेलें अवलोकन करण्याची माझी
इच्छा नाहीं ६. शकुनि ह्मणतोः—हे प्रजाधिपते दुर्योधनराजा, तूं बाळिशमतीचा
कशाकरितां अवलंब केला आहेस ? अरे, ते पांडव प्रतिज्ञा करून गेले आहेत. तेव्हां
( ते परत येतील ) अशी गोष्ट घडणार नाहीं ७. हा भरतवंशजश्रेष्ठा दुर्योधना, ते सर्व
पांडव सत्यवचनाचें अवलंबन करून राहणारे आहेत. करितां, ते तुझ्या पित्याच्या वच-
नाचा कधींही स्वीकार करणार नाहींत ८ आणि कदाचित् प्रतिज्ञेची पर्वा न करितां तुझ्या
पित्याची आज्ञा मान्य करून जर ते फिरून हास्तिनपुराप्रत येतील तर पुनरपि आपण
द्यूतामध्यें ( पूर्वीप्रमाणें ) पण लावूं ९. तूर्त पांडवांचें मोठें छिद्र कोठें आहे हें चांगलें
सुरक्षितपणानें अवलोकन करीत करीत आपण सर्व धृतराष्ट्रराजाच्या मनाप्रमाणें
वागून कोणताच पक्ष न घेता मध्यस्थ होऊं १०. दुःशासन ह्मणतोः—हे महाबुद्धि-
मान् मातुला, तुझ्या ह्मणण्याप्रमाणेंच हें आहे. अरे, तूं कांहीं सांगावयाला लागलास
ह्मणजे तुझी बुद्धि मला नेहमीं रुचत असते ११. कर्ण ह्मणतोः—हे दुर्योधना, आह्मी
सर्व मनापासून तुझा मनोरथ कसा शेवटास जाईल इकडे लक्ष्य लावून बसलों आहोंत
आणि ( शकुनीनें जें सांगितलें त्याविषयीं ) आह्मा सर्वांचें मत एकच आहे असें मला
दिसतें १२. कालाच्या संबंधानें प्रतिज्ञा शेवटास नेल्यावाचून ते विचारी पांडव परत
येणार नाहींत आणि मोहामुळें जर ते परत येतील तर पुनरपि द्यूताच्या योगानें तूं
त्यांचा पराजय कर १३. वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें कर्णानें सांगितलें असतां
मनामध्यें विशेष आनंदित न झालेल्या दुर्योधनराजानें त्याच्याकडे लागेच पाठ केली १४.
तेव्हां, त्याचा आशय जाणून कर्णानें आपले भव्य डोळे वटारिले आणि अत्यंत क्रुद्ध

मम मतं यत्तु तन्निबोधत भूमिपाः १६ प्रियं सर्वे करिष्यामो राज्ञः किंकरपाणयः । न चास्य शक्नुमः स्थातुं प्रिये सर्वे ह्यतन्द्रिताः १७ वयं तु शस्त्राण्यादाय रथानास्थाय दंशिताः । गच्छामः सहिता हन्तुं पाण्डवान्वनगोचरान् १८ तेषु सर्वेषु शान्तेषु गतेष्वविदितां गतिम् । निर्विवादा भविष्यन्ति धार्तराष्ट्रास्तथा वयम् १९ यावदेव परिद्यूना यावच्छोकपरायणाः। यावन्मित्रविहीनाश्च तावच्छक्या मतं मम २० तस्य तद्वचनं श्रुत्वा पूजयन्तः पुनः पुनः । बाढमित्येव ते सर्वे प्रत्यूचुः सूतजं तदा २१ एवमुक्त्वा सुसंरब्धा रथैः सर्वे पृथक्पृथक् । निर्ययुः पाण्डवान्हन्तुं सहिताः कृतनिश्चयाः २२ तान्प्रस्थितान्परिज्ञाय कृष्णद्वैपायनः प्रभुः । आजगाम विशुद्धात्मा दृष्ट्वा दिव्येन चक्षुषा २३ प्रतिषिध्याथ तान्सर्वान्भगवाँल्लोकपूजितः । प्रज्ञाचक्षुषमासीनमुवाचाभ्येत्य सत्वरम् २४[३१२] इति श्रीमहा-

---

होऊन व बुद्धिपूर्वक नीट विचार करून रागारागानें दुःशासन, सुबलपुत्र शकुनि आणि तो दुर्योधन ह्यांना उद्देशून तो ह्मणाला, " हे भूपाल हो, आतां माझें काय मत आहे हें तुह्मी ऐका १५, १६. आपण सर्वजण सेवकांप्रमाणें हात जोडून दुर्योधन राजाचें प्रिय करूं; परंतु, ह्याचा मनोरथ सिद्धीस नेण्याविषयीं आपण अगदीं सावधपणानें वागत असूनही ( हा धृतराष्ट्र आड येत असल्यामुळें ) आपणांला ह्या दुर्योधनाचा मनोरथ सिद्धीस नेतां येत नाहीं १७. करितां, ( धृतराष्ट्राच्या अनुज्ञेची वाट न पाहतां ) आपण शस्त्रें घेऊन आणि कवचें चढवून रथावर आरूढ होऊं आणि वनामध्यें वास्तव्य करीत असलेल्या पांडवांचा वध करण्याकरितां एकत्र जुळून जाऊं १८. ते सर्व पांडव मरण पावून त्यांचें स्मरणही कोणाला होईनासें झालें ह्मणजे धृतराष्ट्रपुत्र व त्याचप्रमाणें आह्मी निर्विवाद ( सुखी ) होऊं १९. अहो, जोंपर्यंत पांडव अत्यंत दीन व शोकाकुल असून मित्ररहित आहेत तोंपर्यंतच ते पराजित होण्यास शक्य आहेत असें माझें मत आहे " २०. ह्याप्रमाणें कर्णाचें तें भाषण श्रवण करून ते सर्व राजे वारंवार त्याची प्रशंसा करूं लागले आणि " ठीक आहे " ह्मणून त्या सर्वांनीं त्या सूतपुत्र कर्णाला प्रत्युत्तर दिलें २१. माराज, " हा बेत ठीक आहे " असें अत्यंत क्रुद्ध झालेल्या सर्व राजांनीं वेगळें वेगळें सांगितलें आणि एकत्र मिळून कर्णाच्या ह्मणण्याप्रमाणें करण्याचा निश्चय झालेले ते सर्व राजे रथांवर आरूढ होऊन पांडवांचा वध करण्याकरितां तेथून निघाले २२. तेव्हां, ते सर्व निघाले आहेत असें समजल्यावर शुद्ध मनानें युक्त असलेले समर्थ कृष्णद्वैपायनमुनि दिव्य दृष्टीनें त्यांचा मनोरथ जाणून तेथें आले २३. तदनंतर त्या सर्वांचाही जाण्याविषयीं निषेध करून ते लोकमान्य भगवान् व्यासमुनि स्वस्थानीं बसलेल्या धृतराष्ट्राकडे सत्वर गेले आणि त्याला उपदेश करूं लागले २४.

भारते०मारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि व्यासागमने सप्तमोध्यायः ॥ ७ ॥

व्यास उवाच ॥ धृतराष्ट्र महाप्राज्ञ निबोध वचनं मम । वक्ष्यामि त्वां कौरवाणां सर्वेषां हितमुत्तमम् १ न मे प्रियं महाबाहो यद्गताः पाण्डवा वनम् । निकृत्या निकृताश्चैव दुर्योधनपुरोगमैः २ ते स्मरन्तः परिक्लेशान्वर्षे पूर्णे त्रयोदशे । विमोक्ष्यन्ति विषं क्रुद्धाः कौरवेयेषु भारत ३ तदयं किं नु पापात्मा तव पुत्रः सुमन्दधीः । पाण्डवान्नित्यसंक्रुद्धो राज्यहेतोर्जिघांसति ४ वार्यतां साध्वयं मूढः शमं गच्छतु ते सुतः । वनस्थांस्तानयं हन्तुमिच्छन्प्राणान्विमोक्ष्यति ५ यथा हि विदुरः प्राज्ञो यथा भीष्मो यथा वयम् । यथा कृपश्च द्रोणश्च तथा साधुर्भवानपि ६ विग्रहो हि महाप्राज्ञ स्वजनेन विगर्हितः । अधर्म्यमयशस्यं च मा राजन्प्रतिपद्यथाः ७ समीक्षा यादृशी ह्यस्य पाण्डवान्प्रति भारत । उपेक्ष्यमाणा सा राजन्महान्तमनयं स्पृशेत् ८ अथवायं सुमन्दात्मा वनं गच्छतु ते सुतः । पाण्डवैः सहितो राजन्नेक एवासहायवान् ९ ततः संसर्गजः स्नेहः पुत्रस्य तव

---

ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत-लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरण्यकपर्वांपैकीं महामुनिव्यासाच्या आगमनाविषयीं सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

व्यास ह्मणतातः—हे महाबुद्धिमान् धृतराष्ट्रा, माझ्या सांगण्याकडे लक्ष्य दे; अरे, सर्व कौरवांच्या उत्कृष्ट हिताची गोष्ट मी तुला सांगत आहें १. हे महापराक्रमी धृतराष्ट्रा, दुर्योधनप्रभृतींनीं कपटानें जिंकिल्यामुळें पांडव वनांत गेले हें मला प्रिय नाहीं २. कारण, हे भरतकुलोत्पन्ना, प्राप्त झालेले दुःसह क्लेश स्मरत असलेले ते क्रुद्ध पांडव तेरावें वर्ष संपूर्ण झाल्यावर कौरवांचे ठिकाणीं क्रोधरूप विषाचा मोक्ष करितील ३. तस्मात्, दुष्ट अंतःकरणानें युक्त असलेला हा तुझा अत्यंत मूढमति पुत्र दुर्योधन सर्वदां अतिशय क्रुद्ध होऊन राज्याकरितां पांडवांचा वध करण्याची कां ह्मणून इच्छा करीत असतो ? ४. अरे, ह्या मूढाचें चांगलें निवारण करा. ह्या तुझ्या पुत्राला शमाचें अवलंबन करूं दे. कारण, वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या पांडवांचा वध करण्याची इच्छा धरून हा आपल्या प्राणांना मात्र मुकेल ५. विवेकी विदुर, भीष्म, आह्मी, कृप व द्रोण ह्यांप्रमाणें तूं ही सज्जन आहेस ६. सारांश, हे महाज्ञानवान् धृतराष्ट्रा, स्वजनांशीं कलह ( सर्वांनीं ) निंद्य मानिलेला आहे. ह्यास्तव, हे राजा, धर्माला विरुद्ध आणि अपकीर्ति करणारें हें कृत्य तूं करूं नकोस ७. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रराजा, पांडवांविषयीं ह्या दुर्योधनाच्या मनांत जो विचार आहे त्याच्याकडे जर दुर्लक्ष केलें तर त्याच्यापासून मोठा अनर्थ गुदरेल ८. ह्याला वनांत पाठविण्याचा जर तुझा विचारच असेल तर ह्या तुझ्या अत्यंत मंदमति पुत्राला साहाय्यकर्ता कोणी बरोबर न घेतां केवळ

पाण्डवैः । यदि स्यात्कृतकार्योद्य भवेस्त्वं मनुजेश्वर १० अथवा जायमानस्य यच्छीलमनुजायते । श्रूयते तन्महाराज नामृतस्यापसर्पति ११ कथं वा मन्यते भीष्मो द्रोणोथ विदुरोपि वा । भवान्वात्रक्षमं कार्यं पुरा वोर्थो निवर्तते १२ [ ३२४ ] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि व्यासवाक्येष्टमोध्यायः ॥ ८ ॥

धृतराष्ट्र उवाच ॥ भगवन्नाहमप्येतद्रोचये द्यूतसंभवम् । मन्ये तद्विधिनाकृष्य कारितोस्मीति वै मुने १ नैतद्रोचयते भीष्मो न द्रोणो विदुरो न च । गान्धारी नेच्छति द्यूतं तत्र मोहात्प्रवर्तितम् २ परित्यक्तुं न शक्नोमि दुर्योधनमचेतनम् । पुत्रस्नेहेन भगवञ्जानन्नपि प्रियव्रत ३ व्यास उवाच ॥ वैचित्रवीर्य नृपते सत्यमाह यथा भवान् । दृढं विद्मः परं पुत्रं परं पुत्रान्न विद्यते ४ इन्द्रोप्यश्रुनिपातेन सुरभ्या प्रतिबोधितः । अन्यैः समृद्धैरप्यर्थैर्न सुतान्मन्यते परम् ५ अत्र ते वर्तयिष्यामि महदाख्यानमुत्तमम् । सुरभ्याश्चैव संवादमिन्द्रस्य च विशांपते ६ त्रिविष्टपगता राजन्सुरभी प्रारुदत्किल ।

---

एकट्यालाच पांडवांसहवर्तमान वनांत जाऊं दे ९. ह्मणजे वनांत गेल्यानंतर संसर्गानें तुझ्या पुत्राचा जर पांडवांशीं स्नेह जडला तर, हे राजा, आज तूं कृतकृत्य होशील १०. अथवा ( तुझ्या पुत्राचा पांडवांशीं स्नेह जडणें अशक्यच आहे. कारण), हे महाराजा, जन्माला येतांना जो पुरुषाचा स्वभाव बनून जातो तो मृत झाल्यावांचून जात नाहीं असें श्रुत आहे ११. असो, भीष्म, द्रोणाचार्य व विदुर ह्यांच्या मनांतून काय आहे आणि तुझाही मनोरथ काय आहे ( तें एकदा कळूं दे ). अरे, ह्या प्रसंगीं जें कांहीं करणें योग्य असेल तें प्रथम करा. नाहीं तर ( स्वतःचें कल्याण करण्याचाही ) तुमचा हेतु सफल होणार नाहीं १२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरण्यकपर्वापैकीं व्यासांच्या उपदेशाविषयीं आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

धृतराष्ट्र ह्मणतोः—भगवन्, द्यूतामुळें हें ( पांडवांचें वनांत जाणें ) मलाही संमत नाहीं. परंतु, हे मुने, दैव ओढवल्यामुळें माझ्या हातून ही गोष्ट घडली असें मला वाटतें १. भीष्म, द्रोणाचार्य, विदुर व गांधारी ह्यांना द्यूत संमत नाहीं. परंतु, मोहामुळें मीं तें प्रवृत्त केलें २. हे प्रियव्रत भगवन्, मी सर्व जाणीत असूनही पुत्रवात्सल्यामुळें मूढ दुर्योधनाचा माझ्यानें त्याग होत नाहीं ३. व्यास ह्मणतातः—हे विचित्रवीर्यपुत्रा धृतराष्ट्रराजा, तुझें ह्मणणें खरें आहे. पुत्र सर्वांत जास्त आहे असें आह्मीही निःसंशय समजत आहोंत. पुत्राहून प्रिय असें कांहीं एक नाहीं ४. अश्रुपाताच्या योगानें इंद्रालाही सुरभीनें बोध केला. तेव्हांपासून इतर कितीही वस्तूंची जरी समृद्धि असली तरी त्यालाही पुत्रापेक्षां अधिक असें कांहींच वाटत नाहीं ५. हे प्रजाधिपते,

गवां माता पुरा तात तामिन्द्रोन्वकृपायत ७ इन्द्र उवाच ॥ किमिदं रोदिषि शुभे कच्चित्क्षेमं दिवौकसाम् । मनुष्येष्वथ नागेषु नैतदल्पं भविष्यति ८ सुरभिरुवाच ॥ विनिपातो न ते कश्चिद्दृश्यते त्रिदशाधिप । अहं तु पुत्रं शोचामि तेन रोदिमि कौशिक ९ पश्यैनं कर्षकं क्षुद्रं दुर्बलं मम पुत्रकम् । प्रतोदेनाभिनिघ्नन्तं लाङ्गलेन च पीडितम् १० निषीदमानं सोत्कण्ठं वध्यमानं सुराधिप । कृपाविष्टास्मि देवेन्द्र मनश्चोद्विजते मम ११ एकस्तत्र बलोपेतो धुरमुद्वहतेधिकाम् । अपरोऽप्यबलप्राणः कृशो धमनिसन्ततः । कृच्छ्रादुद्वहते भारं तं वै शोचामि वासव १२ वध्यमानः प्रतोदेन तुद्यमानः पुनः पुनः । नैव शक्नोति तं भारमुद्वोढुं पश्य वासव १३ ततोहं तस्य शोकार्ता विरोमि भृशदुःखिता । अश्रूण्यावर्तयन्ती च नेत्राभ्यां करुणायती १४ शक्र उवाच ॥ तव पुत्रसहस्रेषु पीड्यमानेषु शोभने । किं कृपायितमस्त्यत्र पुत्र एकत्र हन्यति १५ सुरभिरुवाच ॥ यदि पुत्रसहस्राणि सर्वत्र समतैव मे । दीनस्य

---

इंद्रसुरभिसंवादरूप एक मोठें उत्कृष्ट आख्यान ह्याविषयीं मी तुला कथन करितों ६. बा धृतराष्ट्रराजा, स्वर्गामध्यें असलेली गोमाता सुरभि रोदन करूं लागली असतां तिची इंद्राला दया आली ही गोष्ट इतिहासामध्यें प्रसिद्ध आहे ७. इंद्र ह्मणतोः—हे शुभे, तूं कां असें रोदन करीत आहेस? ह्या तुझ्या रोदनाचें कारण कांहीं सामान्य नसेल. तस्मात्, देव, मनुष्य आणि नाग ह्यांचें कुशल आहे ना? ८. सुरभि ह्मणतेः—हे स्वर्गाधिपते, तुला कांहीं संकट आल्याचें दिसत नाहीं. परंतु, हे कौशिका, पुत्राकरितां मला वाईट वाटत आहे आणि ह्मणूनच मी रोदन करीत आहें ९. हे देवाधिपते, नांगर ओढून ओढून थकल्यामुळें मोठ्या उत्सुकतेनें वसू पाहणाऱ्या ह्या माझ्या अशक्त पुत्राला एक क्षुद्र शेतकरी कसा असुडानें मारीत असून अरांनीं टोंचीत आहे तो तूं पहा १०. हे देवराजा, ह्या पुत्राची मला दया आल्यामुळें माझें मन उद्विग्न होत आहे. हे इंद्रा, ह्या शेतामध्यें एक बैल बलाढ्य असल्यामुळें मोठें जूं ओढीत आहे आणि दुसरा अशक्त, कृश व सर्वांगावर शिरा दिसत असलेला असून त्यालाही मोठ्या संकटानें जूं ओढावें लागत आहे व ह्मणूनच त्याच्याकरितां मला वाईट वाटत आहे ११, १२. हे इंद्रा, काठ्यांचा मार व अरांची टोंचणी हीं एकसारखीं ज्याच्यावर चालली आहेत तो माझा अशक्त पुत्र तें ( नांगराचें ) वजन ओढण्यास समर्थ नाहीं हें तूं पहा १३. असो. ह्याकरितां, ह्याची दया येऊन अत्यंत दुःख झाल्यामुळें मी शोकाकुल होऊन रोदन करीत आहें आणि ह्यामुळें माझ्या नेत्रांतून अश्रु येत आहेत १४. इंद्र ह्मणतोः— हे कल्याणि, तुझ्या हजारों पुत्रांना पीडा होत असते; तेव्हां एकेठिकाणीं एका पुत्राला मार बसत असतांना तुला दया येण्याचें कारण काय? १५. सुरभि ह्मणतेः—हजारों

तु सुतः शक्र पुत्रस्याभ्यधिका कृपा १६ व्यास उवाच ॥ तदिन्द्रः सुरभीवाक्यं निशम्य भृशविस्मितः । जीवितेनापि कौरव्य मेनेऽभ्यधिकमात्मजम् १७ प्रववर्ष च तत्रैव सहसा तोयमुल्बणम् । कर्षकस्याचरन्विघ्नं भगवान्पाकशासनः १८ तद्यथा सुरभिः प्राह समवेतास्तु ते तथा । सुतेषु राजन्सर्वेषु हीनेष्वभ्यधिका कृपा १९ यादृशो मे सुतः पाण्डुस्तादृशो मेऽसि पुत्रक । विदुरश्च महाप्राज्ञः स्नेहादेतद्ब्रवीम्यहम् २० चिराय तव पुत्राणां शतमेकश्च भारत । पाण्डोः पञ्चैव लक्ष्यन्ते तेऽपि मन्दाः सुदुःखिताः २१ कथं जीवेयुरत्यन्तं कथं वर्धेयुरित्यपि । इति दीनेषु पार्थेषु मनो मे परितप्यते २२ यदि पार्थिव कौरव्याञ्जीवमानानिहेच्छसि । दुर्योधनस्तव सुतः शमं गच्छतु पाण्डवैः २३ [३४७] इति० मारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि सुरभ्युपाख्याने नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

धृतराष्ट्र उवाच ॥ एवमेतन्महाप्राज्ञ यथा वदसि नो मुने । अहं चैव विजानामि सर्वे चेमे नराधिपाः १ भवांश्च मन्यते साधु यत्कुरूणां महोदयम् । तदेव विदुरोऽप्याह भीष्मो द्रोणश्च मां मुने २ यदि त्वहमनुग्राह्यः

---

पुत्र जरी असले तरी सर्वांचे ठिकाणीं माझी समदृष्टिच आहे; परंतु, हे इंद्रा, दीन असलेल्या पुत्राची इतरांपेक्षां मला दया अधिक येत आहे १६. व्यास सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, तें सुरभीचें भाषण श्रवण करून इंद्र अतिशय विस्मित झाला आणि जीवितापेक्षाही पुत्र अधिक अमल्याविषयीं त्याची खात्री झाली १७ व नंतर शेतकऱ्याला विघ्न आणण्याकरितां भगवान् इंद्रानें त्याच शेतामध्यें मोठी जलवृष्टि केली १८. सारांश, तुलाही बहुत पुत्र आहेत. परंतु, हे राजा, सुरभीच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व पुत्रांमध्यें जे दीन असतील त्यांच्यावर अधिक दया असणें योग्य आहे १९. माझा पुत्र पांडु जसा मला प्रिय होता आणि महाविवेकी विदुर जसा प्रिय आहे तसाच, हे पुत्रा, तूं मला प्रिय आहेस आणि ह्मणूनच प्रेमामुळें मी हें तुला फारवेळ सांगत आहें. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, तुला एकशें एक पुत्र असून पांडूचे पांचच दिसत आहेत व ते तुझ्या पुत्राप्रमाणें कपट करण्यांत प्रवीण नसूनही अतिशय दुःखित झाले आहेत ? २०,२१. वास्तव, ह्यांचें जीवन कसें होईल ? व ह्यांचें वर्धन कसें होईल ? अशी त्या दीन कुंतीपुत्रांविषयीं माझ्या मनाला अत्यंत काळजी लागलेली आहे २२. तेव्हां, हे भूपाला, कौरव इहलोकीं जिवंत असावेत अशी जर तुझी इच्छा असेल तर तुझ्या दुर्योधन पुत्रानें पांडवांशीं शम करावा २३. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील आरण्यकपर्वापैकीं सुरभीच्या उपाख्यानाविषयीं नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥

धृतराष्ट्र ह्मणतोः—हे महाज्ञानवान् मुने, आपण ह्मणतां हें अगदीं खरें आहे व मलाही तें समजत असून हे सर्व राजेही जाणीत आहेत १. कौरवांचा अभ्युदय होण्याचें

कौरव्येषु दया यदि । अनुशाधि दुरात्मानं पुत्रं दुर्योधनं मम ३ व्यास उवाच ॥ अयमायाति वै राजन्मैत्रेयो भगवानृषिः । अन्विष्य पाण्डवान्भ्रातॄनिहैवास्मद्दिदृक्षया ४ एष दुर्योधनं पुत्रं तव राजन्महानृषिः । अनुशास्ता यथान्यायं शमायास्य कुलस्य च ५ ब्रूयाद्यदेष कौरव्य तत्कार्यमविशङ्कया । अक्रियायां तु कार्यस्य पुत्रं ते शप्स्यते रुषा ६ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा ययौ व्यासो मैत्रेयः प्रत्यदृश्यत । पूजया प्रतिजग्राह सपुत्रस्तं नराधिपः ७ अर्घाद्याभिः क्रियाभिर्वै विश्रान्तं मुनिसत्तमम् । प्रश्रयेणाब्रवीद्राजा धृतराष्ट्रोम्बिकासुतः ८ सुखेनागमनं कच्चिद्भगवन्कुरुजाङ्गलान् । कच्चित्कुशलिनो वीरा भ्रातरः पञ्च पाण्डवाः ९ समये स्थातुमिच्छन्ति कच्चिच्च भरतर्षभाः । कच्चित्कुरूणां सौभ्रात्रमव्युच्छिन्नं भविष्यति १० मैत्रेय उवाच ॥ तीर्थयात्रामनुक्रामन्प्राप्तोस्मि कुरुजाङ्गलान् । यदृच्छया धर्मराजं दृष्टवान्काम्यके वने ११ तं जटाजिनसंवीतं तपोवननिवासिनम् । समाजग्मुर्महात्मानं द्रष्टुं मुनिगणाः प्रभो १२ तत्राश्रौषं

---

जें उत्कृष्ट साधन आपणांला वाटत आहे तेंच मला विदुरानें सांगितलें असून, हे मुने, भीष्म व द्रोणाचार्य ह्यांनींही मला तेंच कथन केलें आहे २. करितां, मी जर आपल्या अनुग्रहाला योग्य असेन आणि कुरुवंशजाची जर आपणांला दया येत असेल तर माझ्या दुरात्म्या दुर्योधन पुत्राला आपण उपदेश करा ३. व्यास ह्मणतातः—हे राजा, पांच भ्राते जे पांडव त्यांची भेट घेऊन हा भगवान् मैत्रेय ऋषि आमची भेट घेण्याकरितां इकडेच येत आहे ४. तेव्हां ह्या तुझ्या कुलामध्यें शांति रहावी एतदर्थ हा महर्षि तुझ्या दुर्योधननामक पुत्राला यथायोग्य उपदेश करील ५. हे कुरुकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, हा जें सांगेल तें तुह्मी निःशंकपणें करा. ह्यानें सांगितलेलें कर्तव्य जर न होईल तर क्रोधानें हा तुझ्या पुत्राला शाप देईल ६. वैशंपायन सांगतातः—इतकें बोलून व्यासमुनि गेले असतां मैत्रेय दृष्टीं पडले. तेव्हां पुत्रांसहवर्तमान धृतराष्ट्रराजानें त्यांचें पूजनपूर्वक स्वागत केलें ७ व पूजाप्रभृति सत्कारांनीं ह्याप्रमाणें त्या मुनिश्रेष्ठ मैत्रेयांचे श्रम परिहार झाल्यावर अंबिकापुत्र धृतराष्ट्रराजा नम्रपणानें त्यांना प्रश्न करूं लागला ८ "हे भगवन्, कुरुजांगलदेशाप्रत आपलें आगमन सुखानें झालें असून ते पांचही भ्राते वीर पांडुपुत्र कुशल आहेत नां?९.त्याचप्रमाणें ते भरतवंशजश्रेष्ठ पांडव प्रतिज्ञेप्रमाणें वागण्यास सिद्ध असून पुढें सर्व कुरुवंशजांचें परस्परबंधुप्रेम अविच्छिन्न राहील नां?" १०. मैत्रेय सांगतातः—*तीर्थयात्रा करितां करितां मी कुरुजांगल* देशाप्रत आलों. तेव्हां येतांना काम्यकवनामध्यें धर्मराजाची सहज भेट झाली ११. हे प्रभो धृतराष्ट्रा, जटा धारण करून अजिनें परिधान करीत असलेला तो धर्मराज

महाराज पुत्राणां तव विभ्रमम् । अनयं द्यूतरूपेण महाभयमुपस्थितम् १३
ततोऽहं त्वामनुप्राप्तः कौरवाणामवेक्षया । सदा ह्यभ्यधिकः स्नेहः प्रीतिश्च
त्वयि मे प्रभो १४ नैतदौपयिकं राजंस्त्वयि भीष्मे च जीवति । यदन्यो-
न्येन ते पुत्रा विरोध्यन्ते कथंचन् १५ मेढीभूतः स्वयं राजन्निग्रहप्रग्रहे
भवान् । किमर्थमनयं घोरमुत्पद्यन्तमुपेक्षसे १६ दस्यूनामिव यद्वृत्तं सभायां
कुरुनन्दन । तेन न भ्राजसे राजंस्तापसानां समागमे १७ वैशम्पायन
उवाच ॥ ततो व्यावृत्य राजानं दुर्योधनममर्षणम् । उवाच श्लक्ष्णया वाचा
मैत्रेयो भगवानृषिः १८ मैत्रेय उवाच ॥ दुर्योधन महाबाहो निबोध वद-
तांवर । वचनं मे महाभाग ब्रुवतो यद्धितं तव १९ मा द्रुहः पाण्डवान्रा-
जन्कुरुष्व प्रियमात्मनः । पाण्डवानां कुरूणां च लोकस्य च नरर्षभ २०
ते हि सर्वे नरव्याघ्राः शूरा विक्रान्तयोधिनः । सर्वे नागायुतप्राणा वज्र-
संहनना दृढाः २१ सत्यव्रतधराः सर्वे सर्वे पुरुषमानिनः । हन्तारो देवश-

---

तपोवनामध्यें वास्तव्य करीत आहे आणि त्या महात्म्याचें दर्शन घेण्याकरितां अनेक मुनिगण त्याच्याकडे आले आहेत १२. हे महाराज, त्या ठिकाणीं तुझ्या पुत्राचा भ्रम आणि त्यामुळें द्यूतरूपानें उपस्थित झालेला महाभयंकर अनर्थ मीं श्रवण केला १३ आणि कौरवांकडे माझें लक्ष्य असल्यामुळें मी तेथून तुझ्याकडे आलों. कारण, हे प्रभो, तुझ्या ठिकाणीं माझी प्रीति व स्नेहबुद्धि सर्वदां अधिक आहे १४. हे राजा, तूं व भीष्म जिवंत असतांना तुझे पुत्र (व पांडुपुत्र) परस्परांशीं हवे तसे विरोधबुद्धीनें वागतात हें योग्य नव्हें १५. हे भूपाला, निग्रह व अनुग्रह करण्याविषयीं तूं स्वतः ( खळ्यांतील ) तिवडच्या-प्रमाणें ह्या कौरवांतील मुख्य असून उद्भवत असलेल्या ह्या घोर अनर्थाची कशाकरितां उपेक्षा करीत आहेस ? १६. हे कुरुनंदना, ( द्यूताच्या मिषानें सर्वस्वापहार करून पांडवांना घालवून देणें हें ) जें वर्तन भरसभेमध्यें तुह्मीं केलें तें शुद्ध चोरांच्या वर्तनाप्रमाणें झालें आहे आणि त्यामुळें तापसांचा समागम झाला असतां तुझें तेज पडेनासें झालें आहे १७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें धृतराष्ट्रराजाला सांगितल्यावर तें सहन न करणाऱ्या दुर्योधनाकडे वळून भगवान् मैत्रेय ऋषि स्पष्ट शब्दांनीं त्याला ह्मणाले १८ " हे महापराक्रमी, वक्त्यांमध्यें श्रेष्ठ व महाप्रभावी दुर्योधना, तुझ्या हिताचें जें भाषण मी करीत आहें तें तूं श्रवण कर १९. हे राजा, पांडवांशीं द्रोह करूं नकोस. हे पुरुषश्रेष्ठा, तूं स्वतः, पांडव, कौरव, आणि प्रजाजन ह्यांना जें प्रिय असेल तें तूं कर २०. ते सर्व पुरुषश्रेष्ठ शूर असून सर्वही पराक्रम दर्शवून युद्ध करणारे आहेत आणि त्याचप्रमाणें सर्वांना दहा दहा हजार हत्तींचें सामर्थ्य असून वज्रदेही असल्यामुळें ते सर्वच अवध्य आहेत २१. सत्य हें व्रत सर्वच धारण करीत असून उंचीच्या मानानें

नृणां रक्षसां कामरूपिणाम् २२ हिडिम्बबकमुख्यानां किर्मीरस्य च रक्षसः २३ इतः प्रद्रवतां रात्रौ यः स तेषां महात्मनाम् । आवृत्य मार्गं रौद्रात्मा तस्थौ गिरिरिवाचलः २४ तं भीमः समरश्लाघी बलेन बलिनांवरः । जघान पशुमारेण व्याघ्रः क्षुद्रमृगं यथा २५ पश्य दिग्विजये राजन्यथा भीमेन पातितः । जरासन्धो महेष्वासो नागायुतबलो युधि २६ संबन्धी वासुदेवश्च श्यालाः सर्वे च पार्षताः । कस्तान्युधि समासीत जरामरणवाऩरः २७ तस्य ते शम एवास्तु पाण्डवैर्भरतर्षभ । कुरु मे वचनं राजन्मा मन्युवशमन्वगाः २८ वैशम्पायन उवाच ॥ एवं तु ब्रुवतस्तस्य मैत्रेयस्य विशांपते । ऊरुं गजकराकारं करेणाभिजघान सः २९ दुर्योधनः स्मितं कृत्वा चरणेनोल्लिखन्महीम् । न किंचिदुक्त्वा दुर्मेधास्तस्थौ किंचिदवाङ्मुखः ३० तमशुश्रूषमाणं तु विलिखन्तं वसुन्धराम् । दृष्ट्वा दुर्योधनं राजन्मैत्रेयं कोप आविशत् ३१ स कोपवशमापन्नो मैत्रेयो मुनिसत्तमः । विधिना संप्रणुदितः शापायास्य मनो दधे ३२ ततः स वार्युपस्पृश्य कोपसंरक्तलोचनः ।

---

पुरुषभर असलेले ते सर्वही यथेष्टरूप धारण करणारे जे देवशत्रु हिडिंबबकप्रभृति राक्षस त्यांचा व किर्मीरनामक राक्षसाचा वध करणारे आहेत २२,२३. ते महात्मे पांडव येथून निघून जाऊं लागले असतां भयकर स्वरूपानें युक्त असलेला आणि पर्वतप्रमाणें अचल असलेला किर्मीर राक्षस रात्रीं त्यांचा मार्ग अडवून उभा राहिला होता २४. परंतु, व्याघ्र ज्याप्रमाणें क्षुद्र मृगाचा वध करितो त्याप्रमाणें बलवानांमध्यें श्रेष्ठ आणि युद्धप्रिय अशा भीमसेनानें शस्त्रावांचून स्वसामर्थ्यानेंच त्याचा वध केला २५. हे राजा, दहा हजार हत्तींचें ज्याला बळ होतें त्या महाधनुर्धारी जरासंधाला मल्लयुद्धामध्यें दिग्विजयप्रसंगीं भीमसेनानें ठार केला हें तूं लक्ष्यांत आण २६. अरे, वासुदेव ज्यांचा संबंधी असून सर्व पृषतवंशज ज्यांचे श्यालक आहेत त्यांच्याबरोबर युद्धामध्यें कोण बरें जरा व मरण ह्यांनीं युक्त असलेला पुरुष समागम करील ? २७. तस्मात , हे भरतवंशजश्रेष्ठा दुर्योधना, ( सर्वप्रकारें दुर्बल असलेला ) तो तूं पांडवांशीं सलोख्यानेंच आस. हे राजा, क्रोधवश न होतां तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वाग २८. वैशंपायन सांगतातः— हे प्रजाधिपते जनमेजया, ह्याप्रमाणें ते मैत्रेयमुनि उपदेश करीत असतांना दुर्योधनानें आपल्या गजशुंडाकृति मांडीवर थाप मारिली २९ आणि कांहींएक उत्तर न करितां हास्यपूर्वक भूमीवर पायानें रेघोट्या काढीत काढीत तो दुर्मति दुर्योधन किंचित् अधोमुख होऊन बसला ३०. तेव्हां, हे जनमेजयराजा, उपदेशाकडे लक्ष्य न देतां भूमीवर रेघोट्या काढीत बसलेल्या त्या दुर्योधनाला अवलोकन करून मैत्रेयमुनींना कोप आला ३१. इतकेंच नव्हे परंतु, कोपाविष्ट झालेल्या मुनिश्रेष्ठ मैत्रेयांनी दुर्योधनाच्या

मैत्रेयो धार्तराष्ट्रं तमशपद्दुष्टचेतसम् ३३ यस्मात्त्वं मामनादृत्य नेमां वाचं चिकीर्षसि । तस्मादस्याभिमानस्य सद्यः फलमवाप्नुहि ३४ त्वदभिद्रोहसंयुक्तं युद्धमुत्पत्स्यते महत् । तत्र भीमो गदाघातैस्तवोरुं भेत्स्यते बली ३५ इत्येवमुक्ते वचने धृतराष्ट्रो महीपतिः । प्रसादयामास मुनिं नैतदेवं भविष्यति ३६ मैत्रेय उवाच ॥ शमं यास्यति चेत्पुत्रस्तव राजन्यदा तदा । शापो न भविता तात विपरीते भविष्यति ३७ वैशम्पायन उवाच ॥ विलक्षयंस्तु राजेन्द्रो दुर्योधनपिता तदा । मैत्रेयं प्राह किर्मीरः कथं भीमेन पातितः ३८ मैत्रेय उवाच ॥ नाहं वक्ष्यामि ते भूयो न ते शुश्रूषते सुतः । एष ते विदुरः सर्वमाख्यास्यति गते मयि ३९ इत्येवमुक्त्वा मैत्रेयः प्रातिष्ठत यथागतम् । किर्मीरवधसंविग्नो बहिर्दुर्योधनो ययौ ४० [ ३८७ ] इति

---

दुर्दैवानें प्रेरणा झाल्यामुळें त्यांनीं त्याला शाप देण्याचें मनामध्यें आणिलें ३२ आणि क्रोधानें आरक्तनेत्र झालेल्या त्या मैत्रेयमुनींनीं तदनंतर उदकस्पर्श करून त्या दुर्मति धृतराष्ट्रपुत्राला शाप दिला कीं ३३ " ज्याअर्थी तूं माझा अनादर करून ह्या माझ्या सांगण्याप्रमाणें वागण्यास इच्छीत नाहींस त्याअर्थी ह्या तुझ्या अभिमानाचें फल तुला सत्वरच प्राप्त होईल ३४. अरे, तुझ्या बंधुद्रोहामुळें मोठें युद्ध उपस्थित होईल आणि त्या युद्धामध्यें बलाढ्य भीमसेन गदाप्रहारांनीं तुझी मांडी फोडून टाकील " ३५. ह्याप्रमाणें मैत्रेयमुनींनीं शाप दिला असतां " असें होऊं नये " म्हणून धृतराष्ट्र भूपति त्या मुनींचें सांत्वन करूं लागला. तेव्हां ३६ मैत्रेय मुनि म्हणालेः—बा धृतराष्ट्रराजा, तुझा पुत्र जर शमाचें अवलंबन करील तर ( युद्ध उपस्थित होण्याचा व त्या युद्धांत भीमसेनाच्या हातून गदाप्रहार होण्याचा संभवच नसल्यामुळें ) शाप लागणार नाहीं. परंतु, शमाचें अवलंबन न करितां हा जर विरुद्ध अशा वैराचें अवलंबन करील तर हा शाप खरा होईल ३७. वैशंपायन सांगतातः—ह्यानंतर भीमसेनाचें सामर्थ्य किति आहे हें राक्षसाच्या सामर्थ्यावरून ताडण्याकरितां दुर्योधनाचा पिता नृपश्रेष्ठ धृतराष्ट्र " भीमसेनानें किर्मीराचा वध कसा केला ? " म्हणून मैत्रेयमुनींना विचारूं लागला. परंतु, ३८ मैत्रेय म्हणालेः—मी आणखी तुला कांहीं एक सांगणार नाहीं. कारण, ह्या तुझ्या पुत्राला ऐकण्याची इच्छा नाहीं. ( किर्मीरवधसंबंधीं वृत्तांत श्रवण करण्याची तुझी इच्छाच असेल तर ) मी गेल्यावर हा विदुर तुला सर्व कांहीं सांगेल ३९. ह्याप्रमाणें धृतराष्ट्राला सांगून मैत्रेयमुनि आल्या मार्गानें निघून गेले आणि ( भीमसेनानें किर्मीर राक्षसाचा वध करून कीर्ति संपादन केल्याची दुःखदायक हकीगत सविस्तर श्रवण करण्याचा तरी प्रसंग आपणांवर न यावा म्हणून ) किर्मीरवधाविषयीं उद्विग्न झालेला दुर्योधनही बाहेर निघून गेला ४०. ह्याप्रमाणें ०श्रीमहाभार-

श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वण्यारण्यके पर्वणि मैत्रेयवाक्ये दशमोऽध्यायः ॥ १० ॥ समाप्तं चारण्यपर्व ॥

अथ किर्मीरवधपर्व । धृतराष्ट्र उवाच॥ किर्मीरस्य वधं क्षत्तः श्रोतुमिच्छामि कथ्यताम् । रक्षसा भीमसेनस्य कथमासीत्समागमः १ विदुर उवाच ॥ शृणु भीमस्य कर्मेदमतिमानुषकर्मणः । श्रुतपूर्वं मया तेषां कथान्तेषु पुनः पुनः २ इतः प्रयाता राजेन्द्र पाण्डवा द्यूतनिर्जिताः । जग्मुस्त्रिभिरहोरात्रैः काम्यकं नाम तद्वनम् ३ रात्रौ निशीथे स्वाभीले गतेर्धसमये नृप । प्रचारे पुरुषादानां रक्षसां घोरकर्मणाम ४ तद्वनं तापसा नित्यं गोपाश्च वनचारिणः । दूरात्परिहरन्ति स्म पुरुषादभयात्किल ५ तेषां प्रविशतां तत्र मार्गमावृत्य भारत । दीप्ताक्षं भीषणं रक्षः सोल्मुकं प्रत्यपद्यत ६ बाहू महान्तौ कृत्वा च तथास्यं च भयानकम् । स्थितमावृत्य पन्थानं येन यान्ति कुरूद्वहाः ७ स्पष्टाष्टदंष्ट्रं ताम्राक्षं प्रदीप्तोर्ध्वशिरोरुहम् । सार्करश्मितडिच्चक्रं सबलाकमिवाम्बुदम् ८ सृजन्तं राक्षसीं मायां महानादनिना-

---

तांतर्गत वनपर्वांतील आरण्यकपर्वांपैकीं मैत्रेयमुनींचा दुर्योधनाला शाप झाल्याविषयीं दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥ ह्या ठिकाणीं आरण्यपर्वही समाप्त झालें ॥

येथून किर्मीरवधविषयक पर्वाला आरंभ झाला. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे विदुरा, किर्मीरवध श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हा, त्या राक्षसाशीं भीमसेनाचा युद्धप्रसंग कसा झाला हें तूं कथन कर १. विदुर ह्मणतोः—अमानुष कर्म करणाऱ्या भीमसेनाचें हें कर्म तूं श्रवण कर. त्या पांडवांच्या गोष्टी चालल्या असतां ( येथें येण्याचे ) पूर्वी मीं हें वारंवार श्रवण केलें आहे २. हे नृपश्रेष्ठा, द्यूतामध्यें पराजित झालेले पांडव येथून निघाल्यावर तीन अहोरात्रांनीं त्या काम्यकनामक वनामध्यें गेले ३. तेव्हां, हे राजा, रात्रीची वेळ होती; इतकेंच नव्हे परंतु, अर्धा भाग उलटून जाऊन घोरकर्मी मनुष्यभक्षक राक्षसांचा संचार सुरू झाला आहे अशा भयंकर मध्यरात्रीचा तो समय होता ४. अरे, वनामध्यें संचार करणारे गोपाल आणि तपस्वी जन राक्षसांच्या भयानें कधींही त्या वनासमीप देखील जात नसत असें ह्मणतात ५. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, ते पांडव त्या वनामध्यें प्रविष्ट होऊं लागले असतां प्रज्वलित नेत्रांनीं युक्त असलेला व हातांत अग्नि घेतलेला भयंकर राक्षस मार्ग अडवून धरून तेथें आला ६. सारांश, ते कुरुवंशजश्रेष्ठ पांडव ज्या मार्गानें जात होते तो मार्ग हात लांब करून व भयंकर मुख पसरून त्यानें अडवून धरिला ७. त्या राक्षसाच्या आठीं दाढा स्पष्ट दिसत होत्या, नेत्र आरक्तवर्ण होते आणि मस्तकावरील केंस देदीप्यमान् असून उभे होते; ह्यामुळें सूर्यकिरणांसहवर्तमान विद्युन्मंडलाप्रमाणें अथवा बलाक-

दितम् । मुञ्चन्तं विपुलान्नादान्सतोयामिव तोयदम् ९ तस्य नादेन संत्रस्ताः
पक्षिणः सर्वतो दिशम् । विमुक्तनादाः संपेतुः स्थलजा जलजैः सह १०
संप्रद्रुतमृगद्वीपिमहिषर्क्षसमाकुलम् । तद्वनं तस्य नादेन संप्रस्थितमिवाभ-
वत् ११ तस्योरुवाताभिहतास्ताम्रपल्लवबाहवः । विदूरजाताश्च लताः समा-
श्लिष्यन्ति पादपान् १२ तस्मिन्क्षणेथ प्रववौ मारुतो भृशदारुणः । रजसा संवृतं
तेन नष्टज्योतिरभून्नभः १३ पञ्चानां पाण्डुपुत्राणामविज्ञातो महारिपुः । पञ्चा-
नामिन्द्रियार्थानां शोकावेश इवातुलः १४ स दृष्ट्वा पाण्डवान्दूरात्कृष्णाजि-
नसमावृतान् । आवृणोत्तद्वनद्वारं मैनाक इव पर्वतः १५ तं समासाद्य वित्रस्ता
कृष्णा कमललोचना । अदृष्टपूर्वं संत्रासात्न्यमीलयत लोचने १६ दुःशा-
सनकरोत्सृष्टविप्रकीर्णशिरोरुहा । पञ्चपर्वतमध्यस्था नदीवाकुलतां गता १७
मोमुह्यमानां तां तत्र जगृहुः पञ्च पाण्डवाः । इन्द्रियाणि प्रसक्तानि विष-
येषु यथा रतिम् १८ अथ तां राक्षसीं मायामुत्थितां घोरदर्शनाम् । रक्षो-

---

पक्ष्यासहवर्तमान मेघाप्रमाणें तो राक्षस दिसत होता ८. त्याचप्रमाणें तो किर्मीर दैत्य राक्षसी माया उत्पन्न करीत होता आणि गजासारखी त्याची गर्जना असल्यामुळें सजल मेघाप्रमाणें त्याचा प्रचंड ध्वनि होत होता ९. त्याच्या गर्जनेनें भयभीत झालेले जलचर व स्थलचर पक्षी ओरडत ओरडत चोंहोंकडे चालले १०. मृग, व्याघ्र, गवे आणि अस्वलें ह्यांनीं गजबजलेलें तें वन त्या राक्षसाच्या गर्जनेनें त्यांतील सदहू मृगादि पशु इकडे तिकडे धावाधांव करूं लागल्यामुळें चालूं लागल्यासारखें भासूं लागलें ११. चालतां चालतां त्या राक्षसाचे मांड्याच्या वाऱ्याचा तडाखा बसलेल्या अशा दूरदूरच्याही लता आरक्तपल्लवरूप बाहूंनीं वृक्षरूप पतींना मिठ्या मारूं लागल्या १२. त्यावेळीं वारा अतिशयच प्रचंड सुटल्यामुळें आकाश रजःकणांनीं व्याप्त झालें आणि त्यांतील तारका दिसेनाशा झाल्या १३. शब्दादि पांच विषयांना न समजतांही ज्याप्रमाणें ( विषयासक्तीमुळें ) परिणामीं पराकाष्ठेचा शोक प्राप्त होत असतो त्याचप्रमाणें पांडुपुत्राच्या पूर्वीं मुळींच समजण्यांत न येता एकाएकीं तो महारिपु प्राप्त झाला होता १४ व कृष्णाजिनें परिधान केलेल्या पांडवांना दुरूनच अवलोकन करून मैनाक पर्वतचकीं काय असा तो किर्मीर राक्षस त्या वनाचा मार्ग व्याप्त करून राहिला होता १५. असो. पूर्वीं कधींहीं अवलोकन न केलेल्या अशा त्या राक्षसासमीप आल्यावर कमलनयना द्रौपदी भयभीत झाली व भीतीमुळें तिनें डोळे मिटले १६ आणि दुःशासनाच्या हातानं सुटलेले व म्हणूनच उडालेले असे जिचे केंस होते ती व्याकुल झालेली द्रौपदी पांच पर्वतांमध्यें सांपडलेली नदीच की काय अशी शोभूं लागली १७. तेव्हां आसक्त झालेलीं इंद्रियें ज्याप्रमाणें विषयांचे ठिकाणीं प्रीति धारण करीत असतात त्याचप्रमाणें

त्रैर्विविधैर्मन्त्रैर्धौम्यः सम्यक्प्रयोजितैः ॥ पश्यतां पाण्डुपुत्राणां नाशयामास वीर्यवान् १९ स नष्टमायोतिबलः क्रोधविस्फारितेक्षणः । काममूर्तिधरः क्रूरः कालकल्पो व्यदृश्यत २० तमुवाच ततो राजा दीर्घप्रज्ञो युधिष्ठिरः। को भवान्कस्य वा किं ते क्रियतां कार्यमुच्यताम् २१ प्रत्युवाचाथ तद्रक्षो धर्मराजं युधिष्ठिरम् । अहं बकस्य वै भ्राता किर्मीर इति विश्रुतः २२ वनेऽस्मिन्काम्यके शून्ये निवसामि गतज्वरः । युधि निर्जित्य पुरुषानाहारं नित्यमाचरन् २३ के यूयमभिसंप्राप्ता भक्ष्यभूता ममान्तिकम् । युधि निर्जित्य वः सर्वान्भक्षयिष्ये गतज्वरः २४ वैशम्पायन उवाच ॥ युधिष्ठिरस्तु तच्छ्रुत्वा वचस्तस्य दुरात्मनः । आचचक्षे ततः सर्वं गोत्रनामादि भारत २५ युधिष्ठिर उवाच ॥ पाण्डवो धर्मराजोहं यदि ते श्रोत्रमागतः । सहितो भ्रातृभिः सर्वैर्भीमसेनार्जुनादिभिः . २६ हृतराज्यो वने वासं वस्तुं कृतमतिस्ततः । वनमभ्यागतो घोरमिदं तव परिग्रहम् २७ विदुर उवाच ॥ किर्मीरस्त्वब्रवीदेनं दिष्ट्या दैवेरिदं मम । उपपादितमद्येह चिरकालान्मनोगतम् २८

---

मूर्छित होत असलेल्या त्या द्रौपदीला पांच पांडवांनीं त्या वनामध्यें धारण केलें १८. तदनंतर दिसण्यांतही भयंकर असलेली ती राक्षसी माया उत्पन्न झाली असतां सामर्थ्यवान् धौम्य मुनींनीं पांडुपुत्रांच्या समक्षच अनेकप्रकारच्या रक्षोघ्न (ह्मणजे राक्षसनाशक) मंत्रांची यथाविधि योजना करून तिचा नाश केला १९ व ह्याप्रमाणें मायेचा नाश झाल्यावर तो यथेष्ट रूप धारण करणारा अतिबलाढ्य क्रूर राक्षस क्रोधानें डोळे वटारून पाहूं लागला असतां साक्षात् कालासारिखा दिसूं लागला २०. तेव्हां " तूं कोण ? कोणाचा ? तुझें काय कार्य कर्तव्य आहे ? तें सांग " ह्मणून महाबुद्धिमान् युधिष्ठिरराजानें त्याला प्रश्न केला असतां २१ त्या राक्षसानें धर्मराज युधिष्ठिराला उत्तर दिलें " किर्मीर ह्मणून प्रसिद्ध असलेला मी बकासुराचा भ्राता २२ युद्धामध्यें मनुष्यांना जिंकून नित्य त्यांच्यावर उपजीविका करीत असतों व ह्या निर्जन काम्यकवनामध्यें निर्भयपणें वास्तव्य करीत असतों २३. अरे, माझें भक्ष्य होऊन तुह्मी कोण माझ्या समीप आला आहांत तें सांगा. ह्मणजे युद्धामध्यें तुह्मा सर्वांना जिंकून मी तुह्मांला निःशंकपणें भक्षण करीन २४. वैशंपायन सांगतातः— हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या दुरात्म्याचें तें भाषण श्रवण करून युधिष्ठिरानें त्याला आपलें गोत्र, नांव वगैरे सर्व सांगून टाकिलें २५. युधिष्ठिर ह्मणतोः— कदाचित् तुझ्या ऐकण्यांत असल्यास भीमसेन, अर्जुन इत्यादि सर्व भ्रात्यांसहवर्तमान मी पांडुपुत्र धर्मराज आहें २६. ( द्यूतामध्यें ) राज्य गेल्यामुळें ( ठरल्याप्रमाणें ) वनांत वास्तव्य करण्याचा माझा विचार झालेला आहे आणि ह्मणून तुझ्या ताब्यांत असलेल्या ह्या घोरवनामध्यें मी प्राप्त झालों आहें २७. विदुर ह्मणतोः—( हे धृतराष्ट्रराजा,

भीमसेनवधार्थं हि नित्यमभ्युद्यतायुधः। चरामि पृथिवीं कृत्स्नां नैनं चासादयाम्यहम् २९ सोयमासादितो दिष्ट्या भ्रातृहा काङ्क्षितश्चिरम्। अनेन हि मम भ्राता बको विनिहतः प्रियः ३० वैत्रकीयवने राजन्ब्राह्मणच्छद्मरूपिणा। विद्याबलमुपाश्रित्य न ह्यस्त्यस्यौरसं बलम् ३१ हिडिम्बश्च सखा मह्यं दयितो वनगोचरः। हतो दुरात्मनानेन स्वसा चास्य हृता पुरा ३२ सोयमभ्यागतो मूढो ममेदं गहनं वनम्। प्रचारसमयेस्माकमर्धरात्रे स्थिते समे ३३ अद्यास्य पातयिष्यामि तद्वैरं चिरसंभृतम्। तर्पयिष्यामि च बकं रुधिरेणास्य भूरिणा ३४ अद्याहमनृणो भूत्वा भ्रातुः सख्युस्तथैव च। शान्तिं लब्धास्मि परमां हत्वा राक्षसकण्टकम् ३५ यदि तेन पुरा मुक्तो भीमसेनो बकेन वै। अद्यैनं भक्षयिष्यामि पश्यतस्ते युधिष्ठिर ३६ एनं हि विपुलप्राणमद्य हत्वा वृकोदरम्। संभक्ष्य जरयिष्यामि यथागस्त्यो महासुरम् ३७ एवमुक्तस्तु धर्मात्मा सत्यसन्धो युधिष्ठिरः। नैतदस्तीति संक्रुद्धो भर्त्सया-

---

ह्याप्रमाणें धर्मराजानें सांगितलें असतां ) किर्मीर त्याला ह्मणाला " पुष्कळ काळ लोटल्यावर ( कां होईना परंतु ) देवांनीं आज ह्या वनामध्यें माझा मनोरथ सिद्धीस नेण्याचा प्रसंग आणिला हें मोठें भाग्यच समजलें पाहिजे २८. अरे, भीमसेनाचा वध करण्याकरितां शस्त्र उपसून मी नित्य ह्या संपूर्ण पृथ्वीवर संचार करीत असतों; तथापि, तो मला सांपडत नाहीं २९ आणि पुष्कळ काळ लोटेपर्यंत ज्याची मीं मार्गप्रतीक्षा केली तो हा माझ्या भ्रात्याचा घात करणारा भीमसेन सुदैवानें (आपोआप) प्राप्त झाला आहे ३०. हे राजा, ह्याला स्वतःचें बल मुळींच नाहीं. कपटानें ब्राह्मणरूप धारण करून विद्येच्या बळानें ह्यानें माझ्या प्रिय भ्रात्या बकासुराचा वैत्रकीयवनामध्यें( एकचक्रानगरींत, वध केला ३१ व त्याचप्रमाणें वनामध्यें वास्तव्य करणारा जो माझा प्रिय सखा हिडिंब त्याचाही ह्या दुरात्म्यानें पूर्वी वध करून त्याची भगिनी हरण केली ३२. तो हा मूढ बरोबर मध्यरात्र होऊन आमच्या संचाराचा समय झाला असतांना ह्या माझ्या गहन वनामध्यें प्राप्त झाला आहे ३३. करितां, फारवेळ मनांत राहून गेलेल्या त्या वैराची आज ह्याला फेड करून ह्याच्या विपुल रक्तानें बकासुराचें तर्पण करून टाकीन ३४. सारांश, ह्या राक्षसकंटकाचा वध करून मी आज भ्रात्याच्या व मित्राच्या ऋणांतून मुक्त झालों असतां माझ्या मनाची पराकाष्ठेची शांति होईल ३५. पूर्वी बकासुराच्या हातून जरी हा सुटला आहे तरी, हे युधिष्ठिरा, आज तुझ्या देखत देखत मी ह्याला भक्षण करून टाकीन ३६. अरे अगस्त्यानें ज्याप्रमाणें महादैत्य वातापि भक्षण करून जिरवून टाकिला त्याचप्रमाणें ह्या महाबलाढ्य भीमसेनाला मारून व भक्षण करून मी जिरवून टाकीन " ३७. ह्याप्रमाणें किर्मीर राक्षसानें भाषण केल्यावर

मास राक्षसम् ३८ ततो भीमो महाबाहुरारुज्य तरसा द्रुमम्। दशव्याम-
मथोद्विद्धं निष्पत्रमकरोत्तदा ३९ चकार सज्यं गाण्डीवं वज्रनिष्पेषगौर-
वम् । निमेषान्तरमात्रेण तथैव विजयोर्जुनः ४० निवार्य भीमो जिष्णुं तं
तद्रक्षो मेघनिःस्वनम्।अभिद्रुत्याब्रवीद्वाक्यं तिष्ठ तिष्ठेति भारत४१इत्युक्त्वै-
नमभिक्रुद्धः कक्षामुत्पीड्य पाण्डवः । निष्पिष्य पाणिना पाणिं संदष्टौष्ठ-
पुटो बली ४२ तमभ्यधावद्वेगेन भीमो वृक्षायुधस्तदा ४३ यमदण्डप्रती-
काशं ततस्तं तस्य मर्धनि । पातयामास वेगेन कुलिशं मघवानिव ४४
असंभ्रान्तं तु तद्रक्षः समरे प्रत्यदृश्यत। चिक्षेप चोल्मुकं दीप्तमशनिं ज्वलि-
तामिव ४५ तदुदस्तमलातं तु भीमः प्रहरतां वरः । पदा सव्येन चिक्षेप
तद्रक्षः पुनराव्रजत् ४६ किर्मीरश्चापि सहसा वृक्षमुत्पाट्य पाण्डवम् ।
दण्डपाणिरिव क्रुद्धः समरे प्रत्यधावत ४७ तद्वृक्षयुद्धमभवन्महीरुहविना-
शनम् । वालिसुग्रीवयोर्भ्रात्रोर्यथा स्त्रीकाङ्क्षिणोः पुरा ४८ शीर्षयोः पतिता

---

सत्यवचनी धर्मात्मा युधिष्ठिर " हें होणें संभवनीय नाहीं " असें ह्मणाला आणि क्रोधयुक्त होऊन त्या राक्षसाची निर्भर्त्सना करूं लागला ३८. तदनंतर महापराक्रमी भीमसेनानें दहा पुरुषांच्या वेगेंत मावणारा एक वृक्ष वेगानें हालवून उपटला आणि पानें खुडून तयार केला ३९. तेव्हां विजयी अर्जुनानेंही एका निमिषामध्येंच ( वज्रानें चूर्ण होऊन जाणाऱ्या ) पर्वताप्रमाणें जड असलेलें गांडीव धनुष्य सज्य केलें ४०. परंतु, हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, त्या अर्जुनाला मागें सारून भीमसेन एकटाच त्या मेघाप्रमाणें गर्जना करणाऱ्या राक्षसाच्या अंगावर धांवून गेला आणि " थांब थांब " असें त्याला ह्मणाला ४१ आणि नंतर ह्याप्रमाणें त्याला बोलून अतिशय क्रुद्ध झालेल्या त्या पांडुपुत्र भीमसेनानें परिधानवस्त्र दृढ केलें आणि हातावर हात चोळून तो त्याच्या-वर दांतओंठ खाऊं लागला ४२. तदनंतर वृक्षरूप आयुधानें युक्त असलेला तो भीम-सेन त्याच्या अंगावर धांवून गेला ४३ आणि इंद्र वज्रपातच करीत आहे कीं काय अशा रीतीनें त्या भीमसेनानें यमदंडासमान असलेल्या त्या वृक्षाचा त्या राक्षसाच्या मस्तकीं प्रहार केला ४४. तथापि तो राक्षस समरांगणामध्यें घाबरून गेल्याचें दिसलें नाहीं; इतकेंच नव्हे. परंतु, प्रज्वलित विद्युल्लतेप्रमाणें पेटविलेली चूड त्यानें भीमसेना-वर फेंकली ४५. तेव्हां प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या भीमसेनानें ती टाकलेली चूड पुनरपि आपल्या डाव्या पायानें उलथून दिली असतां ती पुनः त्या राक्षसाकडे गेली ४६. तदनंतर किर्मीर राक्षसानेंही एकदम एक वृक्ष उपटला आणि दंडपाणी यमच कीं काय अशा रीतीनें तो क्रुद्ध झालेला राक्षस तो वृक्ष हातांत घेऊन समरांगणामध्यें पांडुपुत्र भीमसेनाच्या अंगावर धांवला ४७. तेव्हां, पूर्वी स्त्रीची इच्छा

वृक्षा विभिदुर्नैकधा तयोः । यथैवोत्पलमालानि मत्तयोर्द्विपयोस्तथा ४९
मुञ्जवज्जर्जरीभूता बहवस्तत्र पादपाः । चीराणीव व्युदस्तानि रेजुस्तत्र महा-
वने ५० तद्वृक्षयुद्धमभवन्मुहूर्तं भरतर्षभ । राक्षसानां च मुख्यस्य नराणा-
मुत्तमस्य च ५१ ततः शिलां समुत्क्षिप्य भीमस्य युधि तिष्ठतः । प्राहिणो-
द्राक्षसः क्रुद्धो भीमश्च न चचाल ह ५२ तं शिलाताडनजडं पर्यधावत
राक्षसः । बाहुविक्षिप्तकिरणः स्वर्भानुरिव भास्करम् ५३ तावन्योन्यं समा-
श्लिष्य प्रकर्षन्तौ परस्परम् । उभावपि चकाशेते प्रवृद्धौ वृषभाविव ५४
तयोरासीत्सुतुमुलः संप्रहारः सुदारुणः । नखदंष्ट्रायुधवतोर्व्याघ्रयोरिव
दृप्तयोः ५५ दुर्योधननिकाराच्च बाहुवीर्याच्च दर्पितः । कृष्णाकटाक्षदृष्टश्च
व्यवर्धत वृकोदरः ५६ अभिपद्य च बाहुभ्यां प्रत्यगृह्णादमर्षितः । मातङ्ग-
मिव मातङ्गः प्रभिन्नकरटामुखम् ५७ स चाप्येनं ततो रक्षः प्रतिजग्राह

---

करणाऱ्या वालिसुग्रीवनामक उभयतां भ्रात्यांमध्यें झालेल्या वृक्षयुद्धाप्रमाणें त्या उभयतांत वृक्षयुद्ध सुरू झालें आणि त्यामुळें त्या वनांतील वृक्ष नाहींसे होऊं लागले ४८. मत्त गजांच्या गंडस्थलांवर पडणारे कमलसमूहच कीं काय अशा रीतीनें त्या उभयतांच्या मस्तकांवर पडत असलेल्या वृक्षांचे अनेक प्रकारें तुकडे तुकडे होऊन गेले ४९. ( ह्याप्रमाणें त्यांचें वृक्षयुद्ध चाललें असतां ) तेथील असंख्य वृक्षांच्या मोळ्याप्रमाणें चिरफळ्या चिरफळ्या होऊन गेल्या आणि तशी अवस्था झालेले ते वृक्ष अस्ताव्यस्त पडलेल्या वल्कलांप्रमाणें त्या महावनामध्यें दिसूं लागले ५०. हे भरतवंशजश्रेष्ठा धृतराष्ट्रा, राक्षसश्रेष्ठ किर्मीर आणि नरोत्तम भीमसेन ह्यांचें तें वृक्षयुद्ध एक मुहूर्तभर चाललें होतें ५१. तदनंतर क्रुद्ध झालेल्या किर्मीर राक्षसानें एक शिळा उचलली आणि समरांगणामध्यें उभा असलेल्या भीमसेनाच्या अंगावर फेंकली; परंतु, त्या शिलाप्रहारानें तो भीमसेन घाब-रला नाहीं ५२. तेव्हां, सूर्याकडे धावून जाणाऱ्या राहूप्रमाणें तो किर्मीरराक्षस शिला-प्रहारानें सुस्त झालेल्या त्या भीमसेनाच्या अंगावर, बाहूंनीं सूर्यकिरणांचा निरोध करून, धांवला ५३. तेव्हां, एकमेकांना भिडून परस्परांना ओढीत असलेले ते उभयतां भीमकिर्मीर झुंजत असलेल्या मोठ्या वृषभांप्रमाणें शोभूं लागले ५४ आणि नखें व दाढा ह्या आयुधांनीं युक्त असलेले मत्त व्याघ्रांचें ज्यांप्रमाणें युद्ध चालतें त्याप्रमाणें त्या उभय-तांमध्यें मोठें भयंकर तुमुल युद्ध झालें ५५. बाहुवीर्यामुळें वेगुमान असलेल्या भीमसेनाचा दुर्योधनानें ( नुकताच कपटानें ) पराभव केला असून इतक्यांत द्रौपदीचीही कटाक्षदृष्टि त्याच्यावर गेल्याकारणानें त्याला क्रोध चढला ५६ आणि गंडस्थलांतून मदस्राव होत असलेल्या मत्त गजांच्या अंगावर धांवून जाणारा दुसरा मत्त गजच कीं काय अशा रीतीनें त्या राक्षसाच्या अंगावर धांवून जाऊन त्या क्रुद्ध झालेल्या भीमसेनानें आपल्या बाहूंनीं

वीर्यवान् । तमाक्षिपद्भीमसेनो बलेन बलिनांवरः ५८ तयोर्भुजविनिष्पेषा-
दुभयोर्बलिनोस्तदा । शब्दः समभवद्घोरो वेणुस्फोटसमो युधि ५९ अथै-
नमाक्षिप्य बलाद्गृह्य मध्यं वृकोदरः । धूनयामास वेगेन वायुश्चण्ड इव
द्रुमम् ६० स भीमेन परामृष्टो दुर्बलो बलिना रणे । व्यस्पन्दत यथाप्राणं
विचकर्ष च पाण्डवम् ६१ तत एनं परिश्रान्तमुपलक्ष्य वृकोदरः । योक्त्र-
यामास बाहुभ्यां पशुं रशनया यथा ६२ विनदन्तं महानादं भिन्नभेरीस्वनं
बली । भ्रामयामास सुचिरं विस्फुरन्तमचेतसम् ६३ तं विषीदन्तमाज्ञाय
राक्षसं पाण्डुनन्दनः । प्रगृह्य तरसा दोर्भ्यां पशुमारममारयत् ६४ आक्रम्य
च कटीदेशे जानुना राक्षसाधमम् । पीडयामास पाणिभ्यां तस्य कण्ठं
वृकोदरः ६५ अथ जर्जरसर्वाङ्गं व्याविद्धनयनाम्बरम् । भूतले भ्रामया-
मास वाक्यं चेदमुवाच ह ६६ हिडिम्बबकयोः पाप न त्वमश्रुप्रमार्जनम् ।
करिष्यसि गतश्चासि यमस्य सदनं प्रति ६७ इत्येवमुक्त्वा पुरुषप्रवीरस्तं

---

त्याला अवळून धरिलें ५७ असतां त्या वीर्यवान् राक्षसानेंही त्याला धरिलें. तेव्हां, बलवानां-
मध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या भीमसेनानें त्या राक्षसाला स्वसामर्थ्यानें फेंकून दिलें ५८. युद्धा-
मध्यें त्या उभयतां बलाढ्य योद्ध्यांच्या बाहूंचे संघर्षणापासून कळक मोडल्याप्रमाणें
भयंकर ध्वनि होऊं लागला ५९. तदनंतर भीमसेनानें त्याला फेंकून दिलें आणि प्रचंड
वायु ज्याप्रमाणें वृक्ष हालवितो त्याप्रमाणें बलात्कारानें त्याला धरून वेगानें हाल-
विलें ६०. त्या दुर्बल राक्षसाला बलाढ्य भीमसेनानें समरांगणामध्यें ह्याप्रमाणें धरिलें
असतां तो किंचित् कंपित झाला आणि आपल्या सामर्थ्याप्रमाणें पांडुपुत्र भीमसेनाला
ओढूं लागला ६१. तदनंतर, हा श्रांत झाला आहे असें भीमसेनाच्या लक्ष्यांत आलें
आणि रज्जूच्या योगानें ज्याप्रमाणें यज्ञिय पशु जखडून टाकितात त्याप्रमाणें आपल्या
बाहूंनी त्यानें त्याला अवळून टाकिलें ६२. तेव्हां मोठी गर्जना करणाऱ्या त्या राक्षसाचा ध्वनि
तडकलेल्या दुंदुभीप्रमाणें होऊं लागला असता व तो बेशुद्ध होऊन तडफडूं लागला असतां
बलाढ्य भीमसेनानें त्याला पुष्कळ वेळपर्यंत फिरविलें ६३. तदनंतर, तो राक्षस श्रांत होत
चालला आहे असें अवलोकन करून भीमसेनानें आपल्या बाहूंनीं त्याला वेगानें धरिलें आणि
त्याला यज्ञिय पशूप्रमाणें मारण्यास आरंभ केला ६४. सारांश, त्या राक्षसाधमाच्या
कमरेवर गुडघा देऊन भीमसेनानें हातांनीं त्याचा गळा दाबला ६५ आणि नंतर
ज्याचें सर्वांग अगदीं जर्जर झालेलें आहे व ज्याचें वस्त्र आणि नेत्र हीं फाटून गेलीं
आहेत त्या किर्मीर राक्षसाला भूतलावर गरगर फिरवून भीमसेन त्याला म्हणाला ६६ "हे
पाप्या, अरे तूं आतां यमसदनाला चाललास. आतां हिडिंब आणि बक ह्यांचें अश्रुप्र-
मार्जन तुला करितां येणार नाहीं" ६७. (हे राजा) कोपानें अंतःकरण ज्यास झालेल्या

राक्षसं क्रोधपरीतचेताः । विस्रस्तवस्त्राभरणं स्फुरन्तमुद्भ्रान्तचित्तं व्यसुमुत्ससर्ज ६८ तस्मिन्हते तोयदतुल्यरूपे कृष्णां पुरस्कृत्य नरेन्द्रपुत्राः । भीमं प्रशस्याथ गुणैरनेकैर्हृष्टास्ततो द्वैतवनाय जग्मुः ६९ विदुर उवाच ॥ एवं विनिहतः सङ्ख्ये किर्मीरो मनुजाधिप । भीमेन वचनात्तस्य धर्मराजस्य कौरव ७० ततो निष्कण्टकं कृत्वा वनं तदपराजितः । द्रौपद्या सह धर्मज्ञो वसतिं तामुवास ह ७१ समाश्वास्य च ते सर्वे द्रौपदीं भरतर्षभाः । प्रहृष्टमनसः प्रीत्या प्रशशंसुर्वृकोदरम् ७२ भीमबाहुबलात्पिष्टे विनष्टे राक्षसे ततः । विविशुस्ते वनं वीराः क्षेमं निहतकण्टकम् ७३ स मया गच्छता मार्गे विनिकीर्णो भयावहः । वने महति दुष्टात्मा दृष्टो भीमबलाद्धतः ७४ तत्राश्रौषमहं चैतत्कर्म भीमस्य भारत । ब्राह्मणानां कथयतां ये तत्रासन्समागताः ७५ वैशम्पायन उवाच ॥ एवं विनिहतं सङ्ख्ये किर्मीरं रक्षसां वरम् । श्रुत्वा ध्यानपरो राजा निशश्वासार्तवत्तदा ७६ [४६३] इति ०मारण्यपर्वणि किर्मी-

---

पुरुषश्रेष्ठ भीमसेनानें ह्याप्रमाणें त्या राक्षसाला सांगितलें आणि वस्त्रें व भूषणें विगलित होऊन मूर्छित झालेल्या व तडफडत असलेल्या त्या राक्षसाला गतप्राण झाल्यावर सोडून दिलें ६८. असो. ह्याप्रमाणें त्या मेघतुल्य राक्षसाचा वध झाला असतां राजपुत्र पांडवांनीं अनेक गुणांबद्दल भीमसेनाची प्रशंसा केली आणि ते आनंदित झालेले पांडव द्रौपदीला बरोबर घेऊन द्वैतवनामध्यें गेले ६९. विदुर ह्मणतोः—हे कुरुकुलोत्पन्ना धृतराष्ट्रराजा, ह्याप्रमाणें धर्मराजाच्या आज्ञेवरून भीमसेनानें समरांगणामध्यें किर्मीराचा वध केला ७०. ह्या रीतीनें ( भीमसेनाच्या योगानें ) तें वन निष्कंटक करून कधींही पराजय न पावलेला धर्मवेत्ता युधिष्ठिर द्रौपदीसह तेथें वास्तव्य करूं लागला ७१. राक्षसाचा वध झाल्यावर त्या सर्व भरतवंशजश्रेष्ठ पांडवांनीं द्रौपदीला धीर दिला आणि मनामध्यें आनंदित होऊन प्रेमपूर्वक त्यांनीं भीमसेनाची प्रशंसा केली ७२ आणि भीमसेनाच्या बाहुबलानें चुराडा होऊन त्या राक्षसाचा नायनाट झाल्यामुळें सुखावह व निष्कंटक झालेल्या त्या वनांत ते वीर प्रविष्ट झाले ७३. असो. मार्गानें जातां जातां भीमसेनाच्या बलामुळें वध पावून महावनामध्यें पडलेल्या त्या दुरात्म्या भयंकर राक्षसाला मीं अवलोकन केलें ७४ आणि, हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, त्या वनामध्यें जे ब्राह्मण आले होते ते कथन करीत असतांना भीमाचें हें कर्म मी त्या ठिकाणीं श्रवण केलें ७५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें राक्षसांमध्यें श्रेष्ठ असलेल्या किर्मीराचा वध भीमसेनानें समरांगणांत केल्याचें श्रवण केल्यावर धृतराष्ट्रराजा चिंताक्रांत झाला आणि दुःखपीडित मनुष्याप्रमाणें सुस्कारे टाकूं लागला ७६. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षश्लोकात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील किर्मीरवधपर्वसंबंधी विदुराच्या भाषणाविषयीं

रवधपर्वणि विदुरवाक्य एकादशोऽध्यायः॥ ११ ॥ समाप्तं च किर्मीरवधपर्व॥

अथार्जुनाभिगमनपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ भोजाः प्रव्रजिताञ्छ्रुत्वा वृष्णयश्चान्धकैः सह । पाण्डवान्दुःखसंतप्तान्समाजग्मुर्महावने १ पाञ्चालस्य च दायादो धृष्टकेतुश्च चेदिपः । केकयाश्च महावीर्या भ्रातरो लोकविश्रुताः २ वने द्रष्टुं ययुः पार्थान्क्रोधामर्षसमन्विताः । गर्हयन्तो धार्तराष्ट्रान्किं कुर्म इति चाब्रुवन् ३ वासुदेवं पुरस्कृत्य सर्वे ते क्षत्रियर्षभाः । परिवार्योपविविशुर्धर्मराजं युधिष्ठिरम् ॥ अभिवाद्य कुरुश्रेष्ठं विषण्णः केशवोऽब्रवीत् ४ वासुदेव उवाच ॥ दुर्योधनस्य कर्णस्य शकुनेश्च दुरात्मनः । दुःशासनचतुर्थानां भूमिः पास्यति शोणितम् ५ एतान्निहत्य समरे ये च तस्य पदानुगाः । तांश्च सर्वान्विनिर्जित्य सहितान्सनराधिपान् ६ ततः सर्वेऽभिषिञ्चामो धर्मराजं युधिष्ठिरम् । निकृत्योपचरन्वध्य एष धर्मः सनातनः ७ वैशम्पायन उवाच ॥ पार्थानामभिषङ्गेण तथा क्रुद्धं जनार्दनम् । अर्जुनः शमयामास दिधक्षन्तमिव प्रजाः ८ संक्रुद्धं केशवं दृष्ट्वा पूर्वदेहेषु फाल्गुनः । कीर्तयामास कर्माणि सत्यकी-

---

अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥ ह्या ठिकाणीं किर्मीरवधविषयक पर्वही संपूर्ण झालें ॥

वैशंपायन सांगतातः— पांडव दुःखाकुल होऊन चालते झाले असें ऐकून भोज, अंधक आणि वृष्णि हे महावनामध्यें त्यांच्याकडे गेले १. पांचालराजपुत्र, धृष्टकेतु, चेदिदेशाधिपति आणि जगत्प्रसिद्ध महावीर्यवान् भ्राते केकय २ क्रुद्ध झाले; धृतराष्ट्रपुत्रांचें तें कृत्य त्यांना सहन न होऊन तेही कुंतीपुत्र पांडवांना भेटण्याकरितां वनामध्यें गेले आणि जातांना "ह्यांचें काय करूं रे" असें बोलत बोलत धृतराष्ट्रपुत्रांची निर्भर्त्सना करूं लागले ३. वनामध्यें गेल्यानंतर श्रीकृष्णांना पुढें करून ते सर्व क्षत्रियश्रेष्ठ धर्मराज युधिष्ठिराला परिवेष्टित करून बसले. तेव्हां खिन्न झालेले श्रीकृष्ण कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराजाला ह्मणाले ४ "दुर्योधन, कर्ण, दुरात्मा शकुनि आणि चवथा दुःशासन ह्या चौघांचें रक्त भूमि प्राशन करील ५. ह्या चौघांचा समरांगणामध्यें वध करून आणि त्या दुर्योधनाचे जे कोणी साहाय्यकर्ते असतील त्याही सर्वांना सैन्यासहवर्तमान आणि इतर प्रतिपक्षी राजांसहवर्तमान पराजित करून ६ नंतर धर्मराज युधिष्ठिराला आपण सर्व राज्याभिषेक करूं. कारण, कपटानें वर्तन करणारा वध्य हा सनातन धर्म आहे" ७. वैशंपायन सांगतातः— कुंतीपुत्र पांडवांना दुःख झाल्यामुळें प्रजा दग्ध करण्यास उद्युक्त झाल्याप्रमाणें क्रुद्ध झालेल्या श्रीकृष्णांचें अर्जुनानें सांत्वन केलें ८. सारांश, श्रीकृष्ण क्रुद्ध झाल्याचें अर्जुनानें अवलोकन केलें आणि सत्यकीर्ति, महात्मे, प्राणिमात्रांचे शरीरामध्यें वास्तव्य करणारे, अतर्क्य, त्रिकालाबाधित, अपरिमिततेजोरूप, ब्रह्मदेवाचे अधिपति आणि अविच्छिन्न ज्ञानानें

र्तेर्महात्मनः ९ पुरुषस्याप्रमेयस्य सत्यस्यामिततेजसः । प्रजापतिपतेर्विष्णो-र्लोकनाथस्य धीमतः १० अर्जुन उवाच ॥ दश वर्षसहस्राणि यत्रसायंगृहो मुनिः । व्यचरस्त्वं पुरा कृष्ण पर्वते गन्धमादने ११ दश वर्षसहस्राणि दश वर्षशतानि च । पुष्करेष्ववसः कृष्ण त्वमपो भक्षयन्पुरा १२ ऊर्ध्व-बाहुर्विशालायां बदर्यां मधुसूदन । अतिष्ठ एकपादेन वायुभक्षः शतं समाः १३ अवकृष्टोत्तरासङ्गः कृशो धमनिसन्ततः । आसीः कृष्ण सरस्वत्यां सत्रे द्वादशवार्षिके १४ प्रभासमप्यथासाद्य तीर्थं पुण्यजनोचितम् । तथा कृष्ण महातेजा दिव्यं वर्षसहस्रकम् १५ अतिष्ठस्त्वं यथैकेन पादेन नियमस्थितः । लोकप्रवृत्तिहेतोस्त्वमिति व्यासो ममाब्रवीत् १६ क्षेत्रज्ञः सर्वभूतानामादिरन्तश्च केशव । निधानं तपसां कृष्ण यज्ञस्त्वं च सना-तनः १७ निहत्य नरकं भौममाहृत्य मणिकुण्डले । प्रथमोत्पादितं कृष्ण मेध्यमश्वमवासृजः १८ कृत्वा तत्कर्म लोकानामृषभः सर्वलोकजित् । अवधीस्त्वं रणे सर्वान्समेतान्दैत्यदानवान् १९ ततः सर्वेश्वरत्वं च संप्रदाय

---

युक्त असे जे श्रीकृष्ण त्यांनीं पूर्वावतारांमध्यें केलेल्या कर्मांची तो प्रशंसा करूं लागला ९,१०. अर्जुन ह्मणतोः— हे कृष्णा, संचार करितां करितां ज्या ठिकाणीं सायंकाळ होईल त्या ठिकाणीं गृह मानून वास्तव्य करणें अशा रीतीनें नारायणसंज्ञक मुनिस्वरूपानें पूर्वी गंधमादनपर्वतावर दहा हजार वर्षें तूं संचार केला आहेस ११. त्याचप्रमाणें, हे कृष्णा, पुष्करांमध्यें जलप्राशन करून तूं पूर्वी अकरा हजार वर्षें वास्तव्य केलें आहेस १२.हे मधुसूदना, विशालसंज्ञक बदरिकाश्रमामध्यें हात वर करून, एका पायावर उभा राहून व वायुभक्षण करून शंभर वर्षें पर्यंत तूं तपश्चर्या केली आहेस १३. हे कृष्णा, उत्तरीय वस्त्राचा त्याग केलेला, कृश व ( मांस क्षीण झाल्यामुळें ) शिरांनीं सर्वांग व्याप्त झालेला असा होऊन सरस्वतीचे तीरीं तूं द्वादशवार्षिक सत्र केलें आहेस १४. हे महातेजस्वी कृष्णा, तपश्चर्येकडे लोकांची प्रवृत्ति व्हावी एतदर्थ पुण्यवान् लोकांना उचित अशा प्रभासतीर्थी तूं गेलास आणि एक हजार दिव्य वर्षें होईपर्यंत तूं व्रतस्थ राहून व एका पायावर उभा राहून तपश्चर्या केलीस असें व्यासांनीं मला सांगितलें आहे १५,१६. हे केशवा, प्राणिमात्रांचा आत्मा तूंच असून त्याचा उत्पादक व संहा-रकही तूंच आहेस. हे कृष्णा, तपांचा आश्रय तूंच असून यज्ञ व सनातन परमात्माही तूंच आहेस १७. हे कृष्णा, सृष्टीचे आरंभीं उत्पन्न झालेल्या भूमिपुत्र नरकासुराचा वध करून आणि त्याच्यापासून रत्नकुंडलें हरण करून ( अश्वमेधाकरितां ) तूं पवित्र अश्वाचा उत्सर्ग केलास १८ आणि तें अश्वोत्सर्गरूप कर्म तूं केल्यावर संग्रामामध्यें जुळून आलेल्या सर्व दैत्यदानवांचा तूंच वध केलास. कारण, सर्व लोकांना जिंकणारा तूंच असून

शचीपतेः। मानुषेषु महाबाहो प्रादुर्भूतोसि केशव २० स त्वं नारायणो भूत्वा हरिरासीः परन्तप। ब्रह्मा सोमश्च सूर्यश्च धर्मो धाता यमोनलः २१ वायुर्वैश्रवणो रुद्रः कालः खं पृथिवी दिशः। अजश्चराचरगुरुः स्रष्टा त्वं पुरुषोत्तम २२ परायणं देवमूर्धा क्रतुभिर्मधुसूदन। अयजो भूरितेजा वै कृष्ण चैत्ररथे वने २३ शतं शतसहस्राणि सुवर्णस्य जनार्दन। एकैकस्मिंस्तदा यज्ञे परिपूर्णानि दत्तवान् २४ अदितेरपि पुत्रत्वमेत्य यादवनन्दन। त्वं विष्णुरिति विख्यात इन्द्रादवरजो विभुः २५ शिशुर्भूत्वा दिवं खं च पृथिवीं च परन्तप। त्रिभिर्विक्रमणैः कृष्ण क्रान्तवानसि तेजसा २६ संप्राप्य दिवमाकाशमादित्यसदने स्थितः। अत्यरोचश्च भूतात्मन्भास्करं स्वेन तेजसा २७ प्रादुर्भावसहस्रेषु तेषु तेषु त्वया विभो। अधर्मरुचयः कृष्ण निहताः शतशोसुराः २८ सादिता मौरवाः पाशा निसुन्दनरकौ हतौ। कृतः क्षेमः पुनः पन्थाः पुरं प्राग्ज्योतिषं प्रति २९ जारूथ्यामाहुतिः क्राथः शिशुपालो जनैः सह। जरासन्धश्च शैब्यश्च शतधन्वा च निर्जितः ३०

---

सर्व लोकांमध्यें श्रेष्ठही तूंच आहस १९. असो. हे केशवा, नरकासुराचा वध केल्यानंतर तूं शचीपति इंद्राला सर्व देवांचें आधिपत्य दिलेस आणि हे महापराक्रमी कृष्णा, तदनंतर तूं मनुष्यामध्यें अवतीर्ण झालास २०. हे शत्रुतापना, नारायण मुनि होऊन श्रीहरिही तूंच होतास. ब्रह्मा, चंद्र, सूर्य, धर्म, धाता, यम, अग्नि २१, वायु, कुबेर, रुद्र, काळ, आकाश, पृथ्वी व दिशा ही सर्व तूंच असून, हे पुरुषोत्तमा, जन्ममरणरहित असा चराचरविश्वाचा अधिपति व जगत्स्रष्टाही तूंच आहेस २२. हे मधुसूदना, क्रतूंच्या योगानें प्राप्त होणारें सर्वोत्कृष्ट स्थान तूंच आहस; तथापि (यज्ञयागांचे ठिकाणीं लोकाची प्रवृत्ति होण्याकरिता) हे महातेजस्वी कृष्णा, तूं चैत्ररथवनामध्यें क्रतूंनीं यजन केलेस २३ व हे जनार्दना, त्या एकेक क्रतूमध्यें तूं त्यावेळीं तब्बल कोट कोट मोहरा द्विजाना दिल्यास २४. हे यादवनंदना, सर्वव्यापी उपेंद्र तूंच आहेस आणि अदितीचे ठिकाणीं पुत्ररूपानें अवतीर्ण होऊन तूंच विष्णु या संज्ञेनें विख्यात झाला आहेस २५. हे शत्रुतापना कृष्णा, वामनरूपानें अवतीर्ण होऊन आपल्या तेजाच्या योगानें स्वर्ग, अंतरिक्ष आणि पृथ्वी हे तिन्ही लोक तीन पावलांनीं तूंच व्याप्त केलेस २६. हे भूतात्म्या, सूर्याच्या रथावर आरूढ होऊन आणि स्वर्ग व आकाश व्याप्त करून स्वताच्या तेजानें तूं सूर्याचें अतिक्रमण केलें आहेस २७. हे सर्वव्यापि कृष्णा, हजारों अवतार धारण करून त्या त्या अवतारांमध्यें शेकडों अधर्मनिष्ठ दैत्यांचा तूं वध केला आहेस २८. यांतीचे पाश तोडून निसुंद आणि नरक यांचा तूं वध केलास आणि प्राग्ज्योतिषनामक नगराचा मार्ग तूं पुनरपि निर्भय करून टाकिलास २९. जारूथ्या-

तथा पर्जन्यघोषेण रथेनादित्यवर्चसा। अवाप्सीर्महिषीं भोज्यां रणे निर्जित्य रुक्मिणम् ३१ इन्द्रद्युम्नो हतः कोपाद्यवनश्च कसेरुमान् । हतः सौभपतिः शाल्वस्त्वया सौभं च पातितम् ३२ एवमेते युधि हता भूयश्चान्याञ्छृणुष्व ह ३३ इरावत्यां हतो भोजः कार्तवीर्यसमो युधि । गोपतिस्तालकेतुश्च त्वया विनिहतावुभौ ३४ तां च भोगवतीं पुण्यामृषिकान्तां जनार्दन । द्वारकामात्मसात्कृत्वा समुद्रं गमयिष्यसि ३५ न क्रोधो न च मात्सर्यं नानृतं मधुसूदन । त्वयि तिष्ठति दाशार्ह न नृशंस्यं कुतोऽनृजुः ३६ आसीनं चैत्यमध्ये त्वां दीप्यमानं स्वतेजसा । आगम्य ऋषयः सर्वेऽयाचन्ताभयमच्युत ३७ युगान्ते सर्वभूतानि संक्षिप्य मधुसूदन । आत्मनैवात्मसात्कृत्वा जगदासीः परन्तप ३८ युगादौ तव वार्ष्णेय नाभिपद्मादजायत । ब्रह्मा चराचरगुरुर्यस्येदं सकलं जगत् ३९ तं हन्तुमुद्यतौ घोरौ दानवौ मधुकैटभौ । तयोर्व्यतिक्रमं दृष्ट्वा क्रुद्धस्य भवतो हरेः ॥ ललाटाज्जातवाञ्छंभुः शूलपाणिस्त्रिलो-

---

नगरीमध्यें आहृति, क्राथ, स्वजनांमहवर्तमान शिशुपाल, जरासंध, शैब्य आणि शतधन्वा ह्यांचा तूं पराभव केलास ३०. त्याचप्रमाणें सूर्यसमान तेजस्वी आणि मेघाप्रमाणें गंभीर ध्वनि करणाऱ्या रथाच्या योगानें रुक्मीचा संग्राममध्यें पराजय करून भोजवंशज भार्या तूं प्राप्त करून घेतलीस ३१. क्रोधामुळें तूं इंद्रद्युम्न, कसेरुमान् यवन आणि सौभनगराधिपति शाल्वराजा ह्याचा वध करून सौभसंज्ञक ( गगनविहारी ) नगराचाही तूंच नाश केलास ३२. सारांश, ह्याप्रमाणें युद्धामध्यें तूं ह्या राजांचा वध केलास. आतां इतरही ज्या राजांचा तूं वध केला आहेस ते श्रवण कर ३३. कार्तवीर्यसमान पराक्रमी भोजराजाचा तूं इरावतीनदीचे तीरीं युद्धामध्यें वध केलास; गोपति आणि तालकेतु ह्या उभयतांचा वध करून ३४ पवित्र, भोग्य वस्तूंनीं युक्त आणि ऋषींना प्रिय अशी द्वारकानगरी तूं जिंकिली आहेस आणि, हे जनार्दना, ती तूं समुद्रामध्यें बुडविणार आहेस ३५. हे दशार्हकुलोत्पन्ना मधुसूदना क्रोध, मात्सर्य, अनृत आणि दुष्टपणा हीं तुझे ठिकाणीं वसत नाहींत; तेव्हां तूं कुटिल कोठून असणार ? ३६. हे अच्युता, स्वतांच्या तेजानें देदीप्यमान असा तूं वेदीमध्यें बसला असतांना सर्व ऋषींनीं तुजकडे येऊन अभय मागितलें ३७. हे शत्रुतापना मधुसूदना, तूं स्वतांच पूर्वी संहारकालीं सर्व भूतांचा संहार केला असल्यामुळें ह्मणजे आपले ठिकाणीं त्यांना लय केला असल्यामुळें हें सर्व जगत् तुझ्याच स्वरूपानें स्थित होतें ३८. हे वृष्णिकुलोत्पन्ना, ज्याच्यापासून हें संपूर्ण जगत् उत्पन्न झालें आहे तो स्थावरजंगमात्मकविश्वाधिपति ब्रह्मदेवही सृष्टीचे आरंभीं तुझ्याच नाभिकमलांतून उत्पन्न झाला आहे ३९. मधुकैटभनामक घोर दैत्य त्या ब्रह्मदेवाचा वध करण्यास उद्युक्त झाले असतां त्यांचें तें औद्धत्य

चनः ४० इत्थं तावपि देवेशौ त्वच्छरीरसमुद्भवौ । त्वन्नियोगकरावेता-
विति मे नारदोऽब्रवीत् ४१ तथा नारायण पुरा क्रतुभिर्भूरिदक्षिणैः। इष्ट-
वांस्त्वं महासत्रं कृष्ण चैत्ररथे वने ४२ नैवं पूर्वे नापरे वा करिष्यन्ति
कृतानि वा। यानि कर्माणि देव त्वं बाल एव महाबलः ४३ कृतवान्पु-
ण्डरीकाक्ष बलदेवसहायवान्। कैलासभवने चापि ब्राह्मणैर्न्यवसः सह ४४
वैशम्पायन उवाच॥ एवमुक्त्वा महात्मानमात्मा कृष्णस्य पाण्डवः। तूष्णी-
मासीत्ततः पार्थमित्युवाच जनार्दनः ४५ ममैव त्वं तवैवाहं ये मदीयास्त-
वैव ते। यस्त्वां द्वेष्टि स मां द्वेष्टि यस्त्वामनु स मामनु ४६ नरस्त्वमसि
दुर्धर्ष हरिर्नारायणो ह्यहम्। काले लोकमिमं प्राप्तौ नरनारायणावृषी ४७
अनन्यः पार्थ मत्तस्त्वं त्वत्तश्चाहं तथैव च। नावयोरन्तरं शक्यं वेदितुं भर-
तर्षभ ४८ वैशम्पायन उवाच॥ एवमुक्ते तु वचने केशवेन महात्मना।
तस्मिन्वीरसमावाये संरब्धेष्वथ राजसु ४९ धृष्टद्युम्नमुखैर्वीरैर्भ्रातृभिः

---

अवलोकन करून क्रुद्ध झालेल्या तुज श्रीहरीच्या ललाटापासून शूलपाणि त्रिलोचन शंभु उत्पन्न झाला ४०. सारांश, ह्याप्रमाणें ते देवाधिपति ब्रह्ममहेश्वरही तुझ्याच शरीरापासून उत्पन्न झाले आहेत आणि तुझी आज्ञा मानणारे आहेत असें नारदांनीं मला सांगितलें आहे ४१. हे नारायणा कृष्णा, पूर्वी विपुल दक्षिणांनीं संपन्न असलेल्या क्रतूंनीं युक्त असें मोठें सत्र तूं चैत्ररथ वनामध्यें केलेंस ४२. हे कमलनयना देवा, तूं स्वतः महाबलाढ्य असून बलदेव तुझा साथीदार आहे. ह्यामुळें तूं बाल असतांनाच जीं कृत्यें केलींस तीं तुझ्यापूर्वी होऊन गेलेल्या पुरुषांच्या हातून झालीं नाहींत आणि तुझ्यानंतर होणाऱ्याही पुरुषांच्या हातून होणार नाहींत. असो. ब्राह्मणांसहवर्तमान तूं कैलासस्थानामध्येंही वास्तव्य केलें आहेस" ४३,४४. वैशंपायन सांगतातः—कृष्णाचा आत्मा जो पांडुपुत्र अर्जुन तो ह्याप्रमाणें त्या महात्म्याची प्रशंसा करून स्वस्थ बसला असतां श्रीकृष्ण त्याला ह्मणाले ४५ "अरे, तूं माझाच असून मीही तुझाच आहें; जे माझे ते तुझेच आहेत; जो तुझा द्वेषी आहे तो माझाही द्वेषी आहे आणि जो तुझा अनुयायी आहे तो माझाही आहे ४६. हे अजिंक्य अर्जुना, तूं नर असून मी श्रीहरि नारायण आहें. आपण उभयतां नरनारायणऋषि ह्या कालीं ह्या भूतलावर प्राप्त झालों आहोंत ४७. तस्मात्, हे भरतवंशजश्रेष्ठा कुंतीपुत्रा, तूं माझ्याहून अन्य नसून मीही तुझ्याहून अन्य नाहीं आणि आपणां उभयतांमध्यें भेद दृष्टोत्पत्तीस येणें शक्य नाहीं" ४८. वैशंपायन सांगतातः—त्या वीर पुरुषांच्या समुदायामध्यें अर्थात् क्षुब्ध झालेल्या भूपालांमध्यें महात्म्या श्रीकृष्णांनीं ह्याप्रमाणें भाषण केलें असतां ४९ धृष्टद्युम्नप्रभृति वीर भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेली पंचालराजकन्या द्रौपदी

परिवारिता । पाञ्चाली पुण्डरीकाक्षमासीनं भ्रातृभिः सह ५० अभिगम्या-
ब्रवीत्क्रुद्धा शरण्यं शरणैषिणी ५१ द्रौपद्युवाच ॥ पूर्वे प्रजाभिसर्गे त्वामा-
हुरेकं प्रजापतिम् । स्रष्टारं सर्वलोकानामसितो देवलोऽब्रवीत् ५२ विष्णु-
स्त्वमसि दुर्धर्ष त्वं यज्ञो मधुसूदन । यष्टा त्वमसि यष्टव्यो जामदग्न्यो यथा-
ब्रवीत् ५३ ऋषयस्त्वां क्षमामाहुः सत्यं च पुरुषोत्तम । सत्याद्यज्ञोऽसि संभूतः
कश्यपस्त्वां यथाब्रवीत् ५४ साध्यानामपि देवानां शिवानामीश्वरेश्वर ।
भूतभावन भूतेश यथा त्वां नारदोऽब्रवीत् ५५ ब्रह्मशंकरशक्राद्यैर्देववृन्दैः
पुनः पुनः । क्रीडसे त्वं नरव्याघ्र बालः क्रीडनकैरिव ५६ द्यौश्च ते शिरसा
व्याप्ता पद्भ्यां च पृथिवी प्रभो । जठरं त इमे लोकाः पुरुषासि सनातनः ५७
विद्यातपोभितप्तानां तपसा भावितात्मनाम् । आत्मदर्शनतृप्तानामृषीणामसि
सत्तमः ५८ राजर्षीणां पुण्यकृतामाहवेष्वनिवर्तिनाम् । सर्वधर्मोपपन्नानां त्वं
गतिः पुरुषर्षभ ॥ त्वं प्रभुस्त्वं विभुश्च त्वं भूतात्मा त्वं विचेष्टसे ५९ लोक-

---

क्रुद्ध होऊन भ्रात्या पांडवांसहवर्तमान बसलेल्या कमलनयन श्रीकृष्णासमीप गेली आणि शरण जाण्यास योग्य असलेल्या त्या श्रीकृष्णाला ती शरणार्थिनी द्रौपदी बोलूं लागली ५०,५१. द्रौपदी ह्मणते:—सृष्टीचे पूर्वी तुझ्यावाचून दुसरें कोणीही नव्हतें आणि सर्व लोकांचा उत्पादक आणि ह्मणूनच प्रजाधिपति तूंच ह्मणून असित देवल मुनींनीं सांगितलें आहे. ५२. हे अजिंक्य मधुसूदना, विष्णु, यज्ञ, यजन करणारा आणि ज्याला उद्देशून यज्ञ करीत असतात तोही तूंच ह्मणून जामदग्न्य मुनींनीं सांगितलें आहे ५३. हे पुरुषोत्तमा, ऋषि तुलाच सत्य ( ह्मणजे पृथ्वी, अप, तेज, वायु आणि आकाश ) ह्मणत असून क्षमाही तुलाच ह्मणत असतात आणि त्या सत्यापासून उत्पन्न झालेला यज्ञही तूंच आहेस ह्मणून कश्यपमुनींनीं सांगितलें आहे ५४. हे देवाधिदेवा, तूं साध्यसंज्ञक आणि शिवसंज्ञक देवगण ह्यांचा अधिपति असून भूतांचा उत्पादक आणि नियंताही तूंच आहेस ह्मणून नारदमुनींनीं सांगितलें आहे ५५. हे पुरुषश्रेष्ठा, ज्याप्रमाणें क्रीडासाधनाच्या योगानें बालक क्रीडा करीत असतो त्याचप्रमाणें ब्रह्मा, शंकर, इंद्र इत्यादि देवगणांच्या योगानें तूं वारंवार क्रीडा करीत असतोस ५६. हे प्रभो, तुझ्या मस्तकानें स्वर्ग व पायानीं पृथ्वी व्याप्त झाली असून हे लोक तुझ्या उदरस्थानीं आहेत. कारण, तूं सनातन पुरुष आहेस ५७. वेदाध्ययनविषयक ब्रह्मचारिधर्म, वेदविहितकर्मानुष्ठानविषयक गृहस्थधर्म आणि कृच्छ्रचांद्रायणादितपोविषयक वानप्रस्थधर्म ह्यांच्या योगानें चित्तशुद्धि झालेले आणि ह्मणूनच आत्मज्ञानानें तृप्त झालेले जे ऋषि त्यांना प्राप्त होणारें त्रिकालाबाधित ब्रह्मही तूंच आहेस ५८. हे पुरुषश्रेष्ठा, संग्रामामध्यें पराङ्मुख न होणारे असे जे सर्वधर्मसंपन्न

पालाश्च लोकाश्च नक्षत्राणि दिशो दश । नभश्चन्द्रश्च सूर्यश्च त्वयि सर्वं
प्रतिष्ठितम् ६० मर्त्यता चैव भूतानाममरत्वं दिवौकसाम् । त्वयि सर्वं महा-
बाहो लोककार्यं प्रतिष्ठितम् ६१ सा तेऽहं दुःखमाख्यास्ये प्रणयान्मधुसूदन।
ईशस्त्वं सर्वभूतानां ये दिव्या ये च मानुषाः ६२ कथं नु भार्या पार्थानां
तव कृष्ण सखी विभो । धृष्टद्युम्नस्य भगिनी सभां कृष्येत मादृशी ६३
स्त्रीधर्मिणी वेपमाना शोणितेन समुक्षिता । एकवस्त्रा विकृष्टास्मि दुःखिता
कुरुसंसदि ६४ राज्ञां मध्ये सभायां तु रजसातिपरिप्लुता । दृष्ट्वा च
मां धार्तराष्ट्राः प्राहसन्पापचेतसः ६५ दासीभावेन मां भोक्तुमीषुस्ते
मधुसूदन । जीवत्सु पाण्डुपुत्रेषु पाञ्चालेषु च वृष्णिषु ६६ नन्वहं कृष्ण
भीष्मस्य धृतराष्ट्रस्य चोभयोः । स्नुषा भवामि धर्मेण साहं दासीकृता
बलात् ६७ गर्हये पाण्डवांस्त्वेव युधिश्रेष्ठान्महाबलान् । यत्क्लिश्यमानां
प्रेक्षन्ते धर्मपत्नीं यशस्विनीम् ६८ धिग्बलं भीमसेनस्य धिक्पार्थस्य च

---

पुण्यवान् राजर्षि त्याना प्राप्त होणारें स्थान तूंच असून जीवरूपानें कर्मे करणाराही सर्वनि-
यंता व सर्वव्यापी असा तूंच आहेस ५९. लोकपाल, लोक, नक्षत्रें, दश दिशा, आकाश,
चंद्र आणि सूर्य ह्या सर्वांना आधार तूंच आहेस ६०. साराश, मर्त्यलोकीं राहणाऱ्या
प्राण्यांचा संसार आणि दिव्य ज्ञानी सात्विक जनाना प्राप्त होणारी मुक्ति हीं तुझ्यावरच
अवलंबून असून जगतातील सर्व प्रकारचें कृत्य तुझ्यावरच अवलबून आहे ६१. हे
मधुसूदना, स्वर्गलोक आणि मनुष्यलोक ह्यांमध्यें राहणारे जे प्राणी आहेत त्यांचा
स्वामी तूं असल्यामुळें मी आपलें दुःख विश्वासानें तुला निवेदन करीत आहें ६२. हे
प्रभो श्रीकृष्णा, पांडवाची भार्या, तुझी मैत्रीण आणि धृष्टद्युम्नाची भगिनी अशा ह्या
मजसारख्या स्त्रीला सभेमध्यें दुमन्यानीं ओढून आणणें योग्य आहे काय ? ६३.
मी रजस्वला असल्यामुळें शोणितानें लिप्त आणि एकवस्त्रा होतें आणि तशा अवस्थे-
मध्यें मी दुःखित होऊन थरथर कापत असतांनाही कौरवांनीं सभेंत मला ओढून नेलें ६४.
इतकेंच नव्हे परंतु, रजानें अतिशय भरलेली अशी मी त्या राजसभेमध्यें असतांना दुष्टबुद्धि
धृतराष्ट्रपुत्र मला पाहून हंसूं लागले ६५. हे मधुसूदना, पाडुपुत्र, पंचाल आणि वृष्णि
हे सर्व जिवंत असताना दासी ह्या नात्यानें माझा उपभोग घेण्याचें त्या पापबुद्धि
धृतराष्ट्रपुत्रांनीं मनामध्यें आणिलें ६६. हे कृष्णा, भीष्म आणि धृतराष्ट्र ह्या उभय-
ताची मी धर्मदृष्टचा स्नुषा आहें. तथापि त्या मला धृतराष्ट्रपुत्रानी बलात्कारानें दासी
करून टाकिलें ६७. संग्राम करण्यामध्यें प्रवीण असलेले महाबलाढ्य पांडवच ज्याअर्थी
आपली यशस्कारक धर्मपत्नी क्लेश भोगीत असतांना पाहत होते त्याअर्थी तेच दोषी
आहेत असें मला वाटतें ६८. हे जनार्दना, यःकश्चित् नीचांनीं मला दुःख दिलें असतां

गाण्डिवम् । यौ मां विप्रकृतां क्षुद्रैर्मर्षयेतां जनार्दन ६९ शाश्वतोयं धर्मपथः सद्भिराचरितः सदा । यद्भार्यां परिरक्षन्ति भर्तारोल्पबला अपि ७० भार्यायां रक्ष्यमाणायां प्रजा भवति रक्षिता । प्रजायां रक्ष्यमाणायामात्मा भवति रक्षितः ७१ आत्मा हि जायते तस्यां तस्माज्जाया भवत्युत । भर्ता च भार्यया रक्ष्यः कथं जायान्ममोदरे ७२ नन्विमे शरणं प्राप्तं न त्यजन्ति कदाचन । ते मां शरणमापन्नां नान्वपद्यन्त पाण्डवाः ७३ पञ्चभिः पतिभिर्जाताः कुमारा मे महौजसः । एतेषामप्यवेक्षार्थं त्रातव्यास्मि जनार्दन ७४ प्रतिविन्ध्यो युधिष्ठिरात्सुतसोमो वृकोदरात् । अर्जुनाच्छ्रुतकीर्तिस्तु शतानीकस्तु नाकुलिः ७५ कनिष्ठाच्छ्रुतकर्मा च सर्वे सत्यपराक्रमाः । प्रद्युम्नो यादृशः कृष्ण तादृशास्ते महारथाः ७६ नन्विमे धनुषि श्रेष्ठा अजेया युधि शात्रवैः । किमर्थं धार्तराष्ट्राणां सहन्ते दुर्बलीयसाम् ७७ अधर्मेण हृतं राज्यं सर्वे दासाः कृतास्तथा । सभायां परिक्लिष्टाहमेकवस्त्रा रजस्वला ७८

---

जे खुशाल सहन करितात त्या भीमार्जुनांच्या सामर्थ्याला व गांडीव धनुष्याला धिक्कार असो ६९. अहो, भर्ते अशक्त जरी असले तरी भार्येचें रक्षण करितात हा सनातन धर्ममार्ग असून सज्जन सर्वदा ह्याच मार्गाचें अवलंबन करीत असतात ७०. कारण, भार्येचें रक्षण होऊं लागलें असतां प्रजेचें संरक्षण होतें आणि प्रजेचें संरक्षण होऊं लागलें असतां आपलें संरक्षण होतें ७१. भार्येचे ठिकाणीं पतीचा आत्माच पुत्ररूपानें उत्पन्न होत असतो ह्मणून ती जाया ह्या संज्ञेला प्राप्त होते आणि " हा माझे पोटीं कसा जन्मास येईल " ह्या चिंतेनें भार्येलाही भर्त्याचें रक्षण करणें अवश्य असतें ७२. खरोखर हे पांडव शरणागताचा कधींही त्याग करीत नाहींत; परंतु, मी शरण आलें असतांना त्यांनीं माझ्यावर दया केली नाहीं ७३. हे जनार्दना, पांच पतींपासून माझे ठिकाणीं महातेजस्वी पुत्र उत्पन्न झाले आहेत. तेव्हां, ह्यांचें परिपालन करण्याकरितां तरी माझें संरक्षण होणें अवश्य आहे ७४. युधिष्ठिरापासून झालेला प्रतिविंध्य, भीमसेनापासून उत्पन्न झालेला सुतसोम, अर्जुनापासून प्राप्त झालेला श्रुतकीर्ति, नकुलापासून जन्मलेला शतानीक ७५ आणि पांडवांमध्यें जो कनिष्ठ त्या सहदेवापासून माझे उदरीं आलेला श्रुतकर्मा हे सर्व अमोघपराक्रमी असून, हे कृष्णा, तुझ्या प्रद्युम्नाप्रमाणें ते महारथी आहेत ७६. खरोखर धनुर्विद्येंत हे पांडव अत्यंत निपुण असल्यामुळें समरांगणामध्यें शत्रूंना अजिंक्य आहेत. तेव्हां ह्यांच्यापेक्षां बलानें फारच कमी असलेल्या धृतराष्ट्रपुत्राचा ( असह्य अपराध ) ह्यांनीं कां बरें सहन करावा ? ७७. हे मधुसूदना, भीमार्जुन अथवा तूं ह्यांवांचून इतराला ज्याची प्रत्यंचाही चढवितां येणें शक्य नाहीं तें गांडीव धनुष्य विद्यमान असतांना कौरवांनीं अधर्मानें राज्याचा अपहार करून ह्या

नाधिज्यमपि यच्छक्यं कर्तुमन्येन गाण्डिवम् । अन्यत्रार्जुनभीमाभ्यां त्वया वा मधुसूदन ७९ धिग्बलं भीमसेनस्य धिक्पार्थस्य च पौरुषम् । यत्र दुर्योधनः कृष्ण मुहूर्तमपि जीवति ८० कालः सृजति भूतानि कालः संहरते प्रजाः । तत्कालेन कृतं मन्ये न तु पौरुषवर्धनम् ८१ य एतानाक्षिपद्राष्ट्रात्सह मात्राविहिंसकान् । अधीयानान्पुरा बालान्व्रतस्थान्मधुसूदन ८२ भोजने भीमसेनस्य पापः प्राक्षेपयद्विषम् ।कालकूटं नवं तीक्ष्णं संभृतं लोमहर्षणम् ८३ तज्जीर्णमविकारेण सहान्नेन जनार्दन । सशेषत्वान्महाबाहो भीमस्य पुरुषोत्तम ८४ प्रमाणकोट्यां विश्वस्तं तथा सुप्तं वृकोदरम् । बद्ध्वैनं कृष्ण गङ्गायां प्रक्षिप्य पुरमाव्रजत् ८५ यदा विबुद्धः कौन्तेयस्तदा संछिद्य बन्धनम् । उदतिष्ठन्महाबाहुर्भीमसेनो महाबलः ८६ आशीविषैः कृष्णसर्पैर्भीमसेनमदंशयत् । सर्वेष्ववाङ्गदेशेषु न ममार च शत्रुहा ८७ प्रतिबुद्धस्तु कौन्तेयः सर्वान्सर्पानपोथयत् । सारथिं चास्य दयितमपहस्तेन जघ्निवान्८८

---

सर्वांना दास केलें आणि रजस्वला व म्हणूनच एकवस्त्रा असतांनाही मला सभेमध्यें ओढून आणिलें. ( तेव्हां, ह्यापेक्षां अधिक शोचनीय गोष्ट ती कोणती उरली ! ) ७८,७९. हे कृष्णा, ( असला दुःसह अपराध करून ) दुर्योधन मुहूर्तमात्रही जिवंत रहाणें योग्य नाहीं. तस्मात् , भीमसेनाच्या बलाला आणि अर्जुनाच्या सामर्थ्याला धिक्कार असो ८०. अथवा ह्यांच्या पौरुषाची तरी निर्भर्त्सना कशाला करावी ? कारण, भूतांचा उत्पादक व संहारक कालच असल्यामुळें सर्व कांहीं कालाच्या योगानेंच घडत असतें असें मला वाटतें ८१. हे मधुसूदना, बाल्यावस्थेमध्यें ब्रह्मचर्य व्रत धारण करून अध्ययन करीत असलेल्या ह्या निरुपद्रवी पांडवांना पूर्वी मातेसहवर्तमान दुर्योधनानें राष्ट्रांतून घालवून दिलें ८२. स्पर्श होताक्षणीं शरीरावर रोमांच उठविणारें असें नवें आणि जलाल कालकूट विष पापी दुर्योधनानें तयार करून भीमसेनाच्या अन्नामध्यें घातलें ८३. परंतु, हे महापराक्रमी पुरुषश्रेष्ठ जनार्दना, भीमसेनाचें आयुष्य अवशिष्ट असल्यामुळें विकार न होतां तें विष अन्नाबरोबर जिरून गेलें ८४. हे कृष्णा, गंगातीरीं प्रमाणकोटिसंज्ञक प्रदेशामध्यें भीमसेन निःशंकपणें निद्रिस्थ असतांना दुर्योधनानें त्याला बांधिलें आणि गंगेमध्यें फेंकून देऊन तो दुर्योधन आपल्या नगराला परत आला ८५. नंतर, जेव्हां तो महापराक्रमी व महाबलाढ्य कुंतीपुत्र भीमसेन जागा झाला तेव्हां बंधनें तोडून टाकून उठला८६. ( दुर्योधनाच्या कृत्यामुळें सविष दंष्ट्रांनीं युक्त असलेल्या कृष्णसर्पांनीं भीमसेनाच्या सर्व अवयवांचे ठिकाणीं दंश केला; परंतु, तो शत्रुघ्न मरण पावला नाहीं८७. असो. जागा झाल्यानंतर त्या कुंतीपुत्र भीमसेनानें सर्व सर्प फेंकून दिले आणि त्या दुर्योधनाच्या सारथ्यालाही केवळ हस्तस्पर्शानेंच वध करून टाकिला ८८. त्याच-

पुनः सुप्तानुपाधाक्षीद्बालकान्वारणावते। शयानानार्यया सार्धं को नु तत्कर्तुमर्हति ८९ यत्रार्या रुदती भीता पाण्डवानिदमब्रवीत्। महद्व्यसनमापन्ना शिखिना परिवारिता ९० हा हतास्मि कुतो न्वद्य भवेच्छान्तिरिहानलात्। अनाथा विनशिष्यामि बालकैः पुत्रकैः सह ९१ तत्र भीमो महाबाहुर्वायुवेगपराक्रमः। आर्यामाश्वासयामास भ्रातॄंश्चापि वृकोदरः ९२ वैनतेयो यथा पक्षी गरुत्मान्पततांवरः। तथैवाभिपतिष्यामि भयं वो नेह विद्यते ९३ आर्यामङ्केन वामेन राजानं दक्षिणेन च। अंसयोश्च यमौ कृत्वा पृष्ठे बीभत्सुमेव च ९४ सहसोत्पत्य वेगेन सर्वानादाय वीर्यवान्। भ्रातॄनार्यां च बलवान्मोक्षयामास पावकात् ९५ ते रात्रौ प्रस्थिताः सर्वे सह मात्रा यशस्विनः। अभ्यगच्छन्महारण्यं हिडिम्बवनमन्तिकात् ९६ श्रान्ताः प्रसुप्तास्तत्रेमे मात्रा सह सुदुःखिताः। सुप्तांश्चैनानभ्यगच्छद्धिडिम्बा नाम राक्षसी ९७ सा दृष्ट्वा पाण्डवांस्तत्र सुप्तान्मात्रा सह क्षितौ।

---

प्रमाणें साध्वी कुंतीसहवर्तमान वारणावत नगरामध्यें त्या बालकांना नेऊन पुनरपि ते निद्रिस्थ असतांना दुर्योधनानें त्यांना दग्ध करून टाकण्याचें मनामध्यें योजिलें. खरोखर, कोणी तरी असें करील काय? ८९. तेव्हां, अग्नीनें वेरून टाकिलेली आणि ह्मणूनच मोठ्या संकटांत सांपडलेली साध्वी कुंती भेदरून जाऊन रोदन करीत करीत " अरे! फुटलें माझें कपाळ! आज आतां ह्या अग्नीपासून आमची सुटका कोठून होणार? अरेरे! ह्या अल्पवयी पुत्रांसह माझा आतां नाश होणार!" असें पांडवांना ह्मणाली ९०.९१. तेव्हां वायूप्रमाणें वेगवान् व पराक्रमी असलेल्या महासामर्थ्यवान् भीमसेनानें मातेला आणि भ्रात्यांनाही धीर देऊन सांगितलें ९२ कीं " विनतापुत्र पक्षिश्रेष्ठ गरुडपक्ष्याप्रमाणें मी ( तुह्मांला घेऊन ) उड्डाण करीन. ह्या ठिकाणीं ( अग्नीपासून ) तुह्माला भय नाहीं " ९३. असें सांगून त्यानें मातेला डाव्या कडेवर व धर्मराजाला उजव्या कडेवर घेतलें आणि उभयतां नकुलसहदेवांना खांद्यावर घेऊन अर्जुनाला त्यानें पाठीवर घेतलें ९४ व ह्याप्रमाणें सामर्थ्यवान् भीमसेनानें ह्या सर्वांना घेऊन वेगानें एकदम उड्डाण केलें आणि अशाप्रकारें भ्राते व माता ह्यांची त्या बलाढ्य भीमसेनानें अग्नीपासून सुटका केली ९५. असो, ( लाक्षागृहांतून निघून ) ते सर्व यशस्वी पांडव मातेसहवर्तमान रात्रीं निघाले असता मोठ्या अरण्यामध्यें हिडिंबवनासमीप आले ९६ आणि मातेसहवर्तमान अतिशय दुःखित व श्रांत झालेले हे पांडव त्या ठिकाणीं निद्रिस्थ झाले तों हिडिंबानामक राक्षसी ह्या निद्रस्थ असलेल्या पांडवांसमीप आली ९७. तेथें मातेसहवर्तमान भूतलावर निद्रिस्थ असलेल्या पांडवांनां अवलोकन केल्यानंतर मदनानें तिचें अंतःकरण व्याकुळ

हृच्छयेनाभिभूतात्मा भीमसेनमकामयत् ९८ भीमस्य पादौ कृत्वा तु स्व उत्सङ्गे ततोबला । पर्यमर्दत संहृष्टा कल्याणी मृदुपाणिना ९९ ताम-बुध्यदमेयात्मा बलवान्सत्यविक्रमः । पर्यपृच्छत तां भीमः किमिहेच्छस्य-निन्दिते १०० एवमुक्त्वा तु भीमेन राक्षसी कामरूपिणी । भीमसेनं महात्मानमाह चैवमनिन्दिता १ पलायध्वमितः क्षिप्रं मम भ्रातैष वीर्यवान्। आगमिष्यति वो हन्तुं तस्माद्गच्छत मा चिरम् २ अथ भीमोऽभ्युवाचैनां साभिमानमिदं वचः । नोद्विजेयमहं तस्मान्निहनिष्येहमागतम् ३ तयोः श्रुत्वा तु संजल्पमागच्छद्राक्षसाधमः । भीमरूपो महानादान्विसृजन्भीमद-र्शनः ४ राक्षस उवाच ॥ केन सार्धं कथयसि आनयैनं ममान्तिकम् । हिडिम्बे भक्षयिष्यामो न चिरं कर्तुमर्हसि ५ सा कृपासंगृहीतेन हृदयेन मनस्विनी । नैवमैच्छत्तदाख्यातुमनुक्रोशादनिन्दिता ६ स नादान्विनद-न्घोरान्राक्षसः पुरुषादकः । अभ्यद्रवत वेगेन भीमसेनं तदा किल ७ तम-भिद्रुत्य संक्रुद्धो वेगेन महता बली । अगृह्णात्पाणिना पाणिं भीमसेनस्य

होऊन भीमसेनाची तिला इच्छा झाली९८. तदनंतर ती आनंदित झालेली भाग्यवती स्त्री आपल्या अंकावर भीमसेनाचे पाय ठेवून कोमल हातानें ते चेपूं लागली असतां ९९ मनानें अतिशय उदार आणि अमोघपराक्रमी अशा बलाढ्य भीमसेनानें तिचा मनो-रथ जाणून "हे सुंदरि, येथें तुझ्या मनामध्यें काय आहे?" ह्मणून तिला प्रश्न केला १००. तेव्हां ह्याप्रमाणें भीमसेनानें प्रश्न केला असतां यथेष्ट रूप धारण करणारी ती सुंदरी राक्षसी महात्म्या भीमसेनाला ह्मणाली १ "येथून सत्वर पलायन करा. हा माझा बलाढ्य भ्राता तुमचा वध करण्याकरितां इतक्यांत येईल. तस्मात्, विलंब न करितां तुह्मी चालते व्हा" २. ह्यावर भीमसेन अभिमानपूर्वक तिला ह्मणाला "मी भीत नाहीं; तो आल्यावर मी त्याचा वध करीन ३. इतक्यात त्या उभयतांचें भाषण श्रवण करून दिसण्यांत व आकृतीनेंही भयंकर असलेला तो अधम राक्षस मोठमोठ्या आरोळ्या ठोकीत ठोकीत तेथें आला ४. (आणि आल्यानंतर तो) राक्षस ह्मणालाः— हिडिंबे, तूं कोणाबरोबर बोलत आहेस त्याला माझ्या समीप घेऊन ये. ह्मणजे सत्वर आपण भक्षण करूं. (आटप!) आतां विलंब करूं नकोस ५. (ह्याप्रमाणें राक्षसानें तिला सांगितलें. तथापि) त्या विचारी राक्षसीचें अंतःकरण कृपाविष्ट होऊन (भीमसे-नाची) तिला दया आली व ह्यामुळें त्या सुंदरीला उत्तर द्यावेंसें वाटेना ६. तेव्हां, असें सांगतात कीं, तो मनुष्यभक्षक राक्षस भयंकर गर्जना करीत करीत वेगावेगानें भीमसे-नावर धावून गेला ७. सारांश, अत्यंत क्रुद्ध झालेला तो बलाढ्य राक्षस मोठ्या वेगानें त्या भीमसेनाच्या अंगावर धांवून गेला आणि आपल्या हातानें त्यानें भीमसेनाचा

राक्षसः ८ इन्द्राशनिसमस्पर्शं वज्रसंहननं दृढम् । संहृत्य भीमसेनाय
व्याक्षिपत्सहसा करम् ९ गृहीतं पाणिना पाणिं भीमसेनस्य रक्षसा ।
नामृष्यत महाबाहुस्तत्राक्रुध्यद्वृकोदरः १० तदासीत्तुमुलं युद्धं भीमसेनहि-
डिम्बयोः । सर्वास्त्रविदुषोर्घोरं वृत्रवासवयोरिव ११ विक्रीड्य सुचिरं
भीमो राक्षसेन सहानघ । निजघान महावीर्यस्तं तदा निर्बलं बली १२ हत्वा
हिडिम्बं भीमोथ प्रस्थितो भ्रातृभिः सह । हिडिम्बामग्रतः कृत्वा यस्यां
जातो घटोत्कचः १३ ततः संप्राद्रवन्सर्वे सह मात्रा परन्तपाः । एकचक्रा-
मभिमुखाः संवृता ब्राह्मणव्रजैः १४ प्रस्थाने व्यास एषां च मन्त्री प्रिय-
हिते रतः । ततोगच्छन्नेकचक्रां पाण्डवाः संशितव्रताः १५ तत्राप्यासाद-
यामासुर्बकं नाम महाबलम् । पुरुषादं प्रतिभयं हिडिम्बेनैव संमितम् १६
तं चापि विनिहत्योग्रं भीमः प्रहरतांवरः । सहितो भ्रातृभिः सर्वैर्द्रुपदस्य
पुरं ययौ १७ लब्धाहमपि तत्रैव वसता सव्यसाचिना । यथा त्वया जिता
कृष्ण रुक्मिणी भीष्मकात्मजा १८ एवं सुयुद्धे पार्थेन जिताहं मधुसूदन

हात धरिला ८. ( इतकेंच नव्हे परंतु, ) ज्याचा स्पर्शही विद्युल्लतेप्रमाणें आहे अशा आपल्या वज्रासारिख्या कठीण हाताची मूठ वळून त्यानें एकाएकीं भीमसेनावर उगा-रिली ९. परंतु, राक्षसानें हात धरिल्याचें सहन न होऊन महापराक्रमी भीमसेन क्रुद्ध झाला १० . तेव्हां सर्व अस्त्रांमध्यें प्रवीण असलेल्या इंद्रवृत्रासुरांप्रमाणें भीमसेन आणि हिडिंब ह्यांचें भयंकर तुमुल युद्ध झालें ११ व, हे निष्पापा कृष्णा, राक्षसाबरोबर बराचवेळ क्रीडा करून महावीर्यवान् बलाढ्य भीमसेनानें त्या दुर्बलाचा वध केला १२. ह्याप्रमाणें हिडिंब राक्षसाचा वध केल्यावर हिडिंबेला पुढें करून भीमसेन भ्रात्यांसहवर्तमान तेथून निघाला आणि नंतर भीमसेनापासून हिडिंबेचे ठिकाणीं घटोत्कच हा पुत्र झाला १३. असो. शत्रूंना ताप देणारे ते सर्व पांडव मातेसहवर्तमान त्या हिडिंबवनांतून निघाले आणि जातां जातां विप्रसमुदायांनीं परिवेष्टित झाले असतां एकचक्रानगरीचे संमुख होऊन तिकडे चालले १४. तेव्हां एकचक्रानगरीप्रत प्रयाण करण्याविषयीं ह्यांना व्यासानीं आज्ञा केली. कारण, ते मुनि ह्यांचें उत्कृष्ट हित करण्याविषयीं तत्पर असतात. व्यासमुनींची आज्ञा झाल्या-नंतर निर्मळ आचरण करणारे पांडव एकचक्रानगरीमध्यें गेले १५ तों तेथेंही बकनामक महाबलाढ्य राक्षसाशीं त्यांची गांठ पडली. तो मनुष्यभक्षक राक्षस भयंकर असून शरीरानें हिडिंबराक्षसाप्रमाणेंच होता १६. परंतु, प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेला भीमसेन त्याही घोर राक्षसाचा वध करून सर्व भ्रात्यांसहवर्तमान द्रुपदराजाच्या नगरामध्यें गेला १७ आणि, हे कृष्णा, भीष्मकराजाची कन्या रुक्मिणी ज्याप्रमाणें तूं जिंकिलीस त्याप्रमाणें मलाही अर्जुनानें तेथेंच वास्तव्य करीत असतांना प्राप्त करून घेतलें १८. सारांश, हे

स्वयंवरे महत्कर्म कृत्वा न सुकरं परैः १९ एवं क्लेशैः सुबहुभिः क्लिश्यमाना सुदुःखिता । निवसाम्यार्यया हीना कृष्ण धौम्यपुरःसरा १२० त इमे सिंहविक्रान्ता वीर्येणाभ्यधिकाः परैः । निहीनैः परिक्लिश्यन्तीं समुपेक्षन्ति मां कथम् २१ एतादृशानि दुःखानि सहन्ती दुर्बलीयसाम् । दीर्घकालं प्रदीप्तास्मि पापानां पापकर्मणाम् २२ कुले महति जातास्मि दिव्येन विधिना किल । पाण्डवानां प्रिया भार्या स्नुषा पाण्डोर्महात्मनः २३ कचग्रहमनुप्राप्ता सास्मि कृष्ण वरा सती । पञ्चानां पाण्डुपुत्राणां प्रेक्षतां मधुसूदन २४ इत्युक्त्वा प्रारुदत्कृष्णा मुखं प्रच्छाद्य पाणिना । पद्मकोशप्रकाशेन मृदुना मृदुभाषिणी २५ स्तनावपतितौ पीनौ सुजातौ शुभलक्षणौ । अभ्यवर्षत पाञ्चाली दुःखजैरश्रुबिन्दुभिः २६ चक्षुषी परिमार्जन्ती निःश्वसन्ती पुनः पुनः । बाष्पपूर्णेन कण्ठेन क्रुद्धा वचनमब्रवीत् २७ नैव मे पतयः सन्ति न पुत्रा न च बान्धवाः । न भ्रातरो न च पिता नैव त्वं

---

मधुसूदना, इतरांना दुर्घट असें महत् कृत्य करून स्वयंवरसमयीं मोठ्या युद्धामध्यें अर्जुनानें ह्याप्रमाणें मला जिंकिलें १९. परंतु, सांप्रत, हे कृष्णा, मी ह्याप्रकारें असंख्य क्लेश भोगीत असून अतिशय दुःखित झालें आहें आणि सासूचा वियोग झाल्यामुळें आतां धौम्यमुनिच मला पुढें होऊन सांगणारे आहेत १२०. तात्पर्य, ( हे कृष्णा, ) सिंहासारिखे पराक्रमी आणि शत्रूंपेक्षां सामर्थ्यानें फारच अधिक असलेले ते हेच पांडव—मला नीच शत्रु पराकाष्ठेचे क्लेश देत असतांना—माझी कशाकरितां उपेक्षा करीत आहेत ? २१. पांडवांपेक्षां बलानें फारच कमी असे जे दुष्ट व दुराचरणी धृतराष्ट्रपुत्र त्यांनीं दिलेलीं ह्याप्रकारचीं दुःखें मी भोगीत असल्यामुळें फार वेळ पासून माझ्या अंगांचा भडका होऊन राहिला आहे २२. खरोखर दैविक प्रकारानें मी मोठ्या कुलामध्यें जन्मास आलें असून पांडवांची प्रिय भार्या आणि महात्म्या पांडूची स्नुषा आहें २३. परंतु, हे मधुसूदना कृष्णा, ह्याप्रमाणें सर्व प्रकारें मी श्रेष्ठ असतांना पांची पांडुपुत्रांसमक्ष दुःशासनानें मला केश धरून ओढिलें २४. ह्याप्रमाणें श्रीकृष्णांना सांगितल्यानंतर ती मृदु भाषण करणारी द्रौपदी कमलकोशाप्रमाणें तेजस्वी असलेल्या कोमल हातानें आपलें मुख आच्छादित करून रोदन करूं लागली २५. ती पांचाली आपल्या उन्नत, पुष्ट, परस्परसंलग्न आणि शुभ लक्षणांनी युक्त अशा स्तनांवर दुःखजन्य अश्रुबिंदूंची वृष्टि करूं लागली २६ व डोळे पुशीत पुशीत आणि वारंवार दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत ती क्रुद्ध झालेली द्रौपदी अश्रूंनीं कंठ दाटला असतांना म्हणाली २७ " हे मधुसूदना, नीचांनीं मला गांजिलें असतांना तुम्ही—अंतःकरणामध्यें त्याबद्दल यत्किंचित्‌ही वाईट वाटत नाहीं असें दर्शवून—माझी उपेक्षा करीत आहांत.

मधुसूदन २८ ये मां विप्रकृतां क्षुद्रैरुपेक्षध्वं विशोकवत् । न च मे शाम्यते दुःखं कर्णो यत्प्राहसत्तदा २९ चतुर्भिः कारणैः कृष्ण त्वया रक्ष्यास्मि नित्यशः। संबन्धाद्गौरवात्सख्यात्प्रभुत्वेनैव केशव १३० वैशम्पायन उवाच ॥ अथ तामब्रवीत्कृष्णस्तस्मिन्वीरसमागमे ३१ वासुदेव उवाच ॥ रोदिष्यन्ति स्त्रियो ह्येवं येषां क्रुद्धासि भाविनि । बीभत्सुशरसंछन्नाञ्छोणितौघपरिप्लुतान् ३२ निहतान्वल्लभान्वीक्ष्य शयानान्वसुधातले । यत्समर्थं पाण्डवानां तत्करिष्यामि मा शुचः ३३ सत्यं ते प्रतिजानामि राज्ञां राज्ञी भविष्यसि । पतेद्द्यौर्हिमवाञ्छीर्येत्पृथिवी शकलीभवेत् ३४ शुष्येत्तोयनिधिः कृष्णे न मे मोघं वचो भवेत् । तच्छ्रुत्वा द्रौपदीवाक्यं प्रतिवाक्यं तथाच्युतात् ३५ साचीकृतमवैक्षत्सा पाञ्चाली मध्यमं पतिम् । आबभाषे महाराज द्रौपदीमर्जुनस्तदा ३६ मा रोदीः शुभताम्राक्षि यथाह मधुसूदनः । तथा तद्भविता देवि नान्यथा वरवर्णिनि ३७ धृष्टद्युम्न उवाच ॥ अहं द्रोणं हनि-

---

तस्मात्, पति, पुत्र, बांधव, भ्राते, पिता आणि तूं हे माझे कोणी नाहींतच असें मला वाटतें. अरे, त्यावेळीं कर्ण माझ्याकडे पाहून हंसला हें दुःख माझ्या मनातून नाहीसें होत नाहीं २८,२९. हे कृष्णा, चार कारणामुळें तुला माझें सर्वदा रक्षण करणें अवश्य आहे. कारण, हे केशवा, तुझ्या आतेभावाची भार्या असल्यामुळें मी तुझी संबंधी आहें. साक्षात् अग्नीपासून उत्पन्न झाल्यें असल्यामुळें मी इतर स्त्रियापेक्षा अधिक आहे. अनन्यभावें तुझें चिंतन करीत असल्यामुळें मी तुझी भक्त आहें आणि तूं पांडवांचा प्रभु आहेस" १३०. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें द्रौपदीनें भाषण केलें असतां त्या वीरसमुदायांमध्यें श्रीकृष्ण तिला ह्मणाले ३१ "हे उदार द्रौपदि, ज्यांच्यावर तूं क्रुद्ध झाली आहेस त्यांच्या स्त्रिया—अर्जुनाच्या बाणानीं छिन्नभिन्न होऊन रक्तप्रवाहानीं परिप्लुत झालेल्या व वध पावून भूतलावर पडलेल्या आपल्या पतींना अवलोकन करून—ह्याप्रमाणें रोदन करितील. पांडवांचें जें हित होणें माझ्या हातून शक्य असेल तें मी करीन; तूं शोक करूं नकोस ३२,३३. पांडव पृथ्वीचे राजे होऊन तूं राजपत्नी होशील हें मी तुला प्रतिज्ञेनें सत्य सांगतों. हे द्रौपदि, नक्षत्रमंडल गळून पडेल; हिमालय पर्वताच्या ठिकऱ्या उडतील; पृथ्वी विदीर्ण होऊन जाईल अथवा सागरही शुष्क होईल; परंतु, माझी प्रतिज्ञा व्यर्थ होणार नाहीं." ह्याप्रमाणें श्रीकृष्णानीं भाषण केलें असतां, पांचालीनें अर्जुनाकडे वाकड्या नजरेनें पाहिलें; तेव्हां, हे महाराजा, द्रौपदीचें भाषण आणि श्रीकृष्णांपासून तिला मिळालेलें प्रत्युत्तर श्रवण करून अर्जुन द्रौपदीला ह्मणाला ३४,३५,३६ "हे शुभरक्तनयने, रोदन करूं नकोस. हे देवि, मधुसूदनानें जें सांगितलें तेंच सत्य होईल; हे सुंदरि, तें अन्यथा होणार नाहीं" ३७. धृष्टद्युम्न

ष्यामि शिखण्डी तु पितामहम् । दुर्योधनं भीमसेनः कर्णं हन्ता धनञ्जयः ३८ रामकृष्णौ व्यपाश्रित्य अजेयाः स्म रणे स्वसः । अपि वृत्रहणा युद्धे किं पुनर्धृतराष्ट्रजैः ३९ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्तेभिमुखा वीरा वासुदेवमुपस्थिताः । तेषां मध्ये महाबाहुः केशवो वाक्यमब्रवीत् १४० [ ६०३ ]
इति ०मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्रौपद्याश्वासने द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

वासुदेव उवाच ॥ नैतत्कृच्छ्रमनुप्राप्तो भवान्स्याद्वसुधाधिप । यद्यहं द्वारकायां स्यां राजन्संनिहितः पुरा १ आगच्छेयमहं द्यूतमनाहूतोपि कौरवैः । आम्बिकेयेन दुर्धर्ष राज्ञा दुर्योधनेन च २ वारयेयमहं द्यूतं बहून्दोषान्प्रदर्शयन् । भीष्मद्रोणौ समानाय्य कृपं बाह्लीकमेव च ३ वैचित्रवीर्यं राजानमलं द्यूतेन कौरव । पुत्राणां तव राजेन्द्र त्वन्निमित्तमिति प्रभो ४ तत्राचक्षमहं दोषान्यैर्भवान्व्यतिरोपितः । वीरसेनसुतो येन्तु राज्यात्प्रभ्रंशितः पुरा ५ अतर्कितविनाशश्च देवनेन विशांपते । सातत्यं च प्रसङ्गस्य वर्णयेयं यथात-

---

म्हणतो:—मी द्रोणाचा वध करीन, शिखंडी भीष्माला मारील, भीमसेन दुर्योधनाला यमसदनीं पाठवील आणि अर्जुन कर्णाचें पारिपत्य करील ३८. हे भगिनि, बलराम व कृष्ण ह्यांचा आम्हांला आश्रय असल्यामुळें समरांगणामध्यें होणाऱ्या युद्धांत वृत्रघातक इंद्रालाही आम्ही अजिंक्य आहोत; मग ह्या धृतराष्ट्रपुत्रांना अजिंक्य आहोंत ह्याची शंका कशाला पाहिजे ! ३९. वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें धृष्टद्युम्नानें आपल्या भगिनीला सांगितल्यानंतर तेथें असलेले वीर संमुख होऊन श्रीकृष्णासमीप गेले. असतां ते महापराक्रमी श्रीकृष्ण त्याच्यामध्यें भाषण करूं लागले १४०. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं द्रौपदीला आश्वासन दिल्याविषयीं बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥

श्रीकृष्ण म्हणतात:—हे भूपते धर्मराजा, मी जर द्वारकेमध्यें पूर्वी सन्निध असतों तर तुला हे संकट प्राप्त झालें नसतें १. हे अजिंक्य युधिष्ठिरा, आंबिकापुत्र धृतराष्ट्र, राजा दुर्योधन इत्यादि कौरवांनीं जरी मला द्यूतार्थ आव्हान केलें नसतें तरी मी तेथें आलों असतों आणि अनेक दोष दर्शवून द्यूत होऊं दिलें नसतें २. हे प्रभो धर्मराजा, भीष्म द्रोण, कृप, बाल्हीक आणि विचित्रवीर्यपुत्र राजा धृतराष्ट्र ह्यांना मी एकत्र जमविलें असतें आणि " हे नृपश्रेष्ठा कुरुकुलोत्पन्न धृतराष्ट्रा, तुझ्या पुत्रांचें द्यूत पुरे " म्हणून त्याला सांगितलें असतें ३,४. सारांश, ज्याच्या योगानें तूं सर्वस्वापासून च्युत झालास आणि ज्याच्यामुळें पूर्वी वीरसेन पुत्र राजा नल राज्यापासून भ्रष्ट झाला त्या अक्षांनीं द्यूत करण्याविषयीं मी अनेक दोष दर्शविले असते आणि " एकदां द्यूतप्रसंग सुरू झाला म्हणजे तो सर्वस्वाचा नाश होईपर्यंत सतत सुरू राहून कोणाच्या तरी नाशाला एकाएकीं कारणीभूत होतो " इत्यादि प्रकारानें मी द्यूतक्रीडेच्या दोषांचें हुबेहुब वर्णन करून,

थम् ६ स्त्रियोक्षा मृगया पानमेतत्कामसमुत्थितम्। दुःखं चतुष्टयं प्रोक्तं यैर्नरो
भ्रश्यते श्रियः ७ तत्र सर्वत्र वक्तव्यं मन्यन्ते शास्त्रकोविदाः । विशेषतश्च
वक्तव्यं द्यूते पश्यन्ति तद्विदः ८ एकाहाद्द्रव्यनाशोत्र ध्रुवं व्यसनमेव च। अभु-
क्तनाशश्चार्थानां वाक्पारुष्यं च केवलम् ९ एतच्चान्यच्च कौरव्य प्रसङ्गिकटु-
कोदयम्। द्यूते ब्रूयां महाबाहो समासाद्याम्बिकासुतम् १० एवमुक्तो यदि मया
गृह्णीयाद्वचनं मम। अनामयं स्याद्धर्मश्च कुरूणां कुरुवर्धन ११ न चेत्स मम
राजेन्द्र गृह्णीयान्मधुरं वचः। पथ्यं च भरतश्रेष्ठ निगृह्णीयां बलेन तम् १२
अथैनमपनीतेन सुहृदो नाम दुर्हृदः। सभासदोनुवर्तेरंस्तांश्च हन्यां दुरोदरान् १३
असान्निध्यं तु कौरव्य ममानर्तेष्वभूत्तदा। येनेदं व्यसनं प्राप्ता भवन्तो द्यूत-
कारितम् १४ सोहमेत्य कुरुश्रेष्ठ द्वारकां पाण्डुनन्दन। अश्रौषं त्वां व्यस-
निनं युयुधानाद्यथायथम् १५ श्रुत्वैव चाहं राजेन्द्र परमोद्विग्नमानसः।
तूर्णमभ्यागतोस्मि त्वां द्रष्टुकामो विशांपते १६ अहो कृच्छ्रमनुप्राप्ताः सर्वे

---

हे प्रजाधिपते धर्मराजा, तो प्रसंग टळला असता ५,६. स्त्रिया, द्यूत, मृगया आणि मद्यपान हीं चार लोलुपतेमुळें उत्पन्न होणारीं दुःखें ह्मणून ह्मटलें आहे. कारण, ह्यांच्या योगानें संपत्तीपासून पुरुष ( सत्वर ) भ्रष्ट होतो ७. हीं चारही कृत्यें नीतिशास्त्रनिपुणलोक निंद्य मानीत असतात आणि विशेषतः द्यूत तर द्यूतवेत्तेही लोक सर्वांत निंद्य समजत असतात ८. कारण, ह्या द्यूतामध्यें एक दिवसांत संपत्तीचा नाश होऊन कोणाला तरी निःसंशय संकट प्राप्त होत असतें आणि उपभोग घेतल्यावाचून भोग्य वस्तूंचा नाश होऊन केवळ निष्ठुर शब्द मात्र अवशिष्ट रहात असतात ९. हे महापराक्रमी कुरुकुलोत्पन्ना धर्मराजा, प्रसंगीं कटु लागणारें (परंतु, परिणामीं हितावह होणारें) हें अशाप्रकारचें व दुसरेंही पुष्कळ भाषण मी अंबिकापुत्र धृतराष्ट्रासमीप जाऊन केलें असतें १०. हे कुरुकुलवर्धना धर्मराजा, ह्याप्रमाणें मी धृतराष्ट्राला सांगितल्यावर त्यानें जर माझें सांगणें मान्य केलें असतें तर संकट टळून धर्मही कायम राहिला असता ११. हे राजाधिराज भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, माझें मधुर व हितकारक भाषण जर त्यानें मान्य केलें नसतें तर मी आपल्या सामर्थ्यानें त्याचा निग्रह केला असता १२ आणि नांवानें सुहृद् परंतु, वस्तुतः दुष्ट बुद्धीनें युक्त अशा ज्या सभासदांनीं त्याचें अनुकरण केलें असतें त्यांचा आणि त्या द्यूत करणाऱ्यांचाही मी वध केला असता १३. परंतु, हे कुरुकुलोत्पन्ना धर्मराजा, आनर्त देशामध्यें मी त्या प्रसंगीं जवळ नव्हतों ह्मणून तुह्मांला हें द्यूतमूलक संकट प्राप्त झालें १४. हे कुरुवंशजश्रेष्ठा पाण्डुनंदना, मी बाहेरून द्वारकेस आल्यानंतर तूं संकटात सापडल्याचें इत्थंभूत वर्तमान सात्यकीपासून श्रवण केलें १५. हे राजाधिराज, ही गोष्ट श्रवण करितांक्षणीं माझें मन पराकाष्ठेचें उद्विग्न

स्म भरतर्षभ। योहं त्वां व्यसने मग्नं पश्यामि सह सोदरैः १७[६२०]इति०
मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि वासुदेववाक्ये त्रयोदशोध्यायः॥ १३ ॥

युधिष्ठिर उवाच ॥ असान्निध्यं कथं कृष्ण तवासीद्वृष्णिनन्दन। क्व चासीद्विप्रवासस्ते किं चाकार्षीः प्रवासतः १ कृष्ण उवाच ॥ शाल्वस्य नगरं सौभं गतोहं भरतर्षभ। निहन्तुं कौरवश्रेष्ठ तत्र मे शृणु कारणम् २ महातेजा महाबाहुर्यः स राजा महायशाः। दमघोषात्मजो वीरः शिशुपालो मया हतः ३ यज्ञे ते भरतश्रेष्ठ राजसूयेर्हणां प्रति। स रोषवशमापन्नो नामृष्यत दुरात्मवान् ४ श्रुत्वा तं निहतं शाल्वस्तीव्ररोषसमन्वितः। उपायाद्द्वारकां शून्यामिहस्थे मयि भारत ५ स तत्र योधितो राजन्कुमारैर्वृष्णिपुङ्गवैः। आगतः कामगं सौभमारुह्यैव नृशंसवत् ६ ततो वृष्णिप्रवीरांस्तान्बालान्हत्वा बहूंस्तदा। पुरोद्यानानि सर्वाणि भेदयामास दुर्मतिः ७ उक्तवांश्च महाबाहो क्वासौ वृष्णिकुलाधमः। वासुदेवः स मन्दात्मा वसु-

---

झालें आणि हे प्रजाधिपते, तुम्ही भेट घेण्याकरिता मी सत्वर तुझ्यासमीप आलों १६ व भ्रात्यांसहवर्तमान तू संकटात सांपडल्याचें हें आतां माझ्या दृष्टीं पडत आहे. हे भरतवंशजश्रेष्ठा, अरे, तुम्ही सर्वजण कसेरे संकटांत सांपडलां! १७. ह्याप्रमाणें० अर्जुनाभिगमनपर्वापैकीं श्रीकृष्णांच्या संभाषणाविषयीं तेरावा अध्याय समाप्त झाला ॥१३॥

युधिष्ठिर प्रश्न करितोः—हे वृष्णिनंदना श्रीकृष्णा, तूं कोणत्या कारणामळें संनिध नव्हतास? कोणीकडे तुझा प्रवास झाला होता? आणि प्रवासामध्यें तूं काय केलेंस? (हें मला कथन कर) १. श्रीकृष्ण सांगतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, शाल्वराजाच्या सौभनामक नगरामध्यें मी त्याचा वध करण्याकरितां गेलों होतों हे कौरवश्रेष्ठा, मी कां गेलों होतों, ह्याचें कारण मी सांगतों तें श्रवण कर २. हे भरतवंशजश्रेष्ठा, महातेजस्वी, महापराक्रमी आणि महा कीर्तिमान् अशा दमघोषपुत्र वीर शिशुपालाचा जो तुझ्या राजसूययज्ञामध्यें मी अग्रपूजेचे प्रसंगीं वध केला तो त्या दुरात्म्या शाल्वराजाला सहन न झाल्यामुळें तो क्रोधाधीन झाला ३,४. हे भरतकुलोत्पन्ना, त्या शिशुपालाचा वध झाल्याचें श्रवण करून शाल्वराजाला प्रचंड कोप आला आणि तो तत्क्षणीं द्वारकेवर गेला. तेव्हा मी इकडे असल्यामुळें द्वारका शून्य झालेली होती ५. तथापि हे राजा, वृष्णिवंशजश्रेष्ठ कुमारांनीं त्या ठिकाणीं त्याच्याशीं युद्ध केलें; परंतु, तो दुष्टाप्रमाणें नगरीला पीडा देऊन पुनरपि यथेष्ट गमन करणाऱ्या आपल्या (गगनविहारी) नगराप्रत परत आला ६. प्रथम द्वारकेसमीप गेल्यानंतर तेथें असलेल्या त्या वृष्णिवंशजश्रेष्ठ पुष्कळच बालकांचा वध करून त्या दुष्टबुद्धि शाल्वराजानें नगरासमीप असलेल्या सर्व बागांचाही विध्वंस केला ७. इतकेंच नव्हे परंतु, हे महापराक्रमी धर्मराजा, " अरे, तो वृष्णिकुलाधम कोठें आहे ! अरे, तो वसुदेवाचा पुत्र मूढ वासुदेव

देवसुतो गतः ८ तस्य युद्धार्थिनो दर्पं युद्धे नाशयितास्म्यहम् । आनर्ताः सत्यमाख्यात तत्र गन्तास्मि यत्र सः ९ तं हत्वा विनिवर्तिष्ये कंसकेशिनिषूदनम् । अहत्वा न निवर्तिष्ये सत्येनायुधमालभे १० क्वासौ क्वासाविति पुनस्तत्र तत्र प्रधावति । मया किल रणे योद्धुं काङ्क्षमाणः स सौभराट् ११ अद्य तं पापकर्माणं क्षुद्रं विश्वासघातिनम् । शिशुपालवधामर्षाद्गमयिष्ये यमक्षयम् १२ मम पापस्वभावेन भ्राता येन निपातितः । शिशुपालो महीपालस्तं वधिष्ये महीतले १३ भ्राता बालश्च राजा च न च सङ्ग्राममूर्धनि । प्रमत्तश्च हतो वीरस्तं हनिष्ये जनार्दनम् १४ एवमादि महाराज विलप्य दिवमास्थितः । कामगेन स सौभेन क्षिप्त्वा मां कुरुनन्दन १५ तमश्रौषमहं गत्वा यथावृत्तः स दुर्मतिः । मयि कौरव्य दुष्टात्मा मार्तिकावतको नृपः १६ ततोहमपि कौरव्य रोषव्याकुलमानसः । निश्चित्य मनसा

---

कोणीकडे गेला आहे ? ( हें मला सांगा ) त्या युद्धेच्छु वासुदेवाचा गर्व आज मी युद्धामध्यें नाहींसा करून टाकणार आहें. करितां, हे आनर्तदेशनिवासी जनहो ! मला काय तें खरें सांगा; ह्मणजे जिकडे तो असेल तिकडे मी जाईन आणि कंस व केशी ह्यांचा वध करणाऱ्या त्या वासुदेवाला मारून परत फिरेन. अरे, मी त्याचा वध न करितां परत फिरणार नाहीं हें आयुधाची शपथ वाहून तुह्माला सत्य सांगतों " असेंही तो ह्मणाला ८, ९, १०. ( हे महाराजा, ) असें सांगतात कीं, संग्रामामध्यें माझ्याशीं युद्ध करण्याची इच्छा धरणारा तो सौभराज " हा कोठें आहे ! हा कोठें आहे ? " असें विचारीत विचारीत इकडे तिकडे धांवाधांव करूं लागला आणि ह्मणाला ११ " अरे, शिशुपालाचा वध मला सहन होत नसल्यामुळें आजच्या आज मी त्या पापकर्मी, विश्वासघातकी व नीच वसुदेवाला यमसदनीं पाठवून देतों १२. अरे, स्वभावाचा दुष्ट असलेल्या ज्या वासुदेवानें माझ्या भ्रांति शिशुपाल भ्रात्याचा वध केला त्याचा मी भूतलावर वध करीन १३. अरे, शिशुपाल हा वासुदेवाचा प्रत्यक्ष बंधु, त्याच्यापेक्षां लहान, राजा व गैरसावध असताना त्या वीराचा ज्यानें वध केला आणि तोही संग्राममध्यें न करितां सभेसारख्या ठिकाणीं केला त्या ( भ्रातृघातकी, बालघातकी, नृपघातकी आणि शस्त्ररहित पुरुषाचा रणभूमीवांचून शस्त्रानें घात करणाऱ्या ) जनार्दनाचा मी वध करीन " १४. हे महाराज कुरुनंदना, हीं व अशाच प्रकारची बडबड करून त्यानें माझी निर्भर्त्सना केली आणि इच्छेप्रमाणें संचार करणाऱ्या आपल्या सौभनामक नगरामध्यें बसून तो अंतरिक्ष मार्गानें चालता झाला १५. हे कुरुकुलोत्पन्ना धर्मराजा, मार्तिकावतक ह्या नावाच्या देशामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या दुष्टबुद्धि दुरात्म्या शाल्वराजानें मला अनुलक्षून कसें वर्तन केलें हें मीं द्वारकेस गेल्यावर ऐकिलें १६. तेव्हां,

राजन्वधायास्य मनो दधे १७ आनर्तेषु विमर्दं च क्षेपं चात्मनि कौरव । प्रवृद्धमवलेपं च तस्य दुष्कृतकर्मणः १८ ततः सौभवधायाहं प्रतस्थे पृथिवीपते । स मया सागरावर्ते दृष्ट आसीत्परीप्सता १९ ततः प्रध्माप्य जलजं पाञ्चजन्यमहं नृप । आहूय शाल्वं समरे युद्धाय समवस्थितः २० तन्मुहूर्तमभूद्युद्धं तत्र मे दानवैः सह । वशीभूताश्च मे सर्वे भूतले च निपातिताः २१ एतत्कार्यं महाबाहो येनाहं नागमं तदा । श्रुत्वैव हास्तिनपुरं द्यूतं चाविनयोत्थितम् ॥ द्रुतमागतवान्युष्मान्द्रष्टुकामः सुदुःखितान् २२ [ ६४२ ]इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने चतुर्दशोध्यायः ॥ १४॥

युधिष्ठिर उवाच ॥ वासुदेव महाबाहो विस्तरेण महामते । सौभस्य वधमाचक्ष्व न हि तृप्यामि कथ्यतः १ वासुदेव उवाच ॥ हतं श्रुत्वा महाबाहो मया श्रौतश्रवं नृप । उपायाद्भरतश्रेष्ठ शाल्वो द्वारवतीं पुरीम् २ अरुन्धत्तां सुदुष्टात्मा सर्वतः पाण्डुनन्दन । शाल्वो वैहायसं चापि तत्पुरं

---

हे कुरुकुलोत्पन्ना, माझेंही अंतःकरण रोषानें अगदीं व्याप्त झालें आणि, हे राजा, मनानें निश्चय करून मीं त्याचा वध करण्याचें योजिलें १७. हे कुरुवंशज धर्मराजा, आनर्त देशामध्यें केलेला विध्वंस, माझी केलेली निंदा आणि त्याचप्रमाणें त्या दुराचारी शाल्वराजाचा वृद्धिंगत झालेला गर्व हीं लक्ष्यांत आणिलीं १८ आणि नंतर, हे पृथ्वीपते, मी त्या सौभपतीचा वध करण्याकरितां निघालों तों हुडकतां हुडकतां सागरद्वीपामध्यें तो माझ्या दृष्टीं पडला १९. तेव्हां, हे राजा, मीं आपला पांचजन्य शंख फुंकला आणि शाल्वराजाला आव्हान करून युद्ध करण्याकरितां मी समरांगणामध्यें उभा राहिलों २०, त्या ठिकाणीं एक मुहूर्त पर्यंत दानवांशीं माझें युद्ध झालें आणि त्या युद्धांत मीं सर्वांना जिंकून भूतलावर पाडिलें २१. हे महापराक्रमी धर्मराजा, हें कार्य मला कर्तव्य होतें आणि ह्मणूनच अन्यायानें द्यूत उपस्थित होतांक्षणीं तें मला समजलें नाहीं व त्या प्रसंगीं माझें येणें झालें नाहीं. आतां आज तें ऐकतांक्षणीं अत्यंत दुःखित झालेल्या तुह्मांला भेटण्याकरितां मी आलों आहें २२. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं सौभवधोपाख्यानसंबंधीं चौदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

युधिष्ठिर प्रश्न करितोः—हे महापराक्रमी वासुदेवा, तुझ्या संक्षिप्त सांगण्यानें माझी तृप्ति होत नाहीं. करितां, हे महामते, सौभनगराधिपति शाल्वराजाचा वध तूं मला सविस्तर कथन कर १. श्रीकृष्ण सांगतातः— हे भरतवंशजश्रेष्ठा महापराक्रमी धर्मराजा, श्रुतश्रवेचा पुत्र जो शिशुपाल त्याचा मीं वध केल्याचें श्रवण करितांक्षणीं शाल्वराजा द्वारवती नगरीवर चालून गेला २. समीप गेल्यानंतर हे पांडुपुत्रा युधिष्ठिरा, त्या अत्यंत दुरात्म्या शाल्वराजानें द्वारवती नगरीला वेढा दिला आणि आपण

व्यूह्य धिष्ठितः ३ तत्रस्थोथ महीपालो योधयामास तां पुरीम् । अभिसारेण सर्वेण तत्र युद्धमवर्तत ४ पुरी समन्ताद्विहिता सपताका सतोरणा । सचक्रा सहुडा चैव सयन्त्रखनका तथा ५ सोपशल्यप्रतोलीका साट्टाट्टालकगोपुरा । सचक्रग्रहणी चैव सोल्कालातावपोथिका ६ सोष्ट्रिका भरतश्रेष्ठ सभेरीपणवानका । सतोमराङ्कुशा राजन्सशतघ्नीकलाङ्गला ७ सभुशुण्ड्यश्मगुडका सायुधा सपरश्वधा । लोहचर्मवती चापि साग्निः सगुडशृङ्गिका ८ शास्त्रदृष्टेन विधिना संयुक्ता भरतर्षभ । रथैरनेकैर्विविधैर्गदसाम्बोद्धवादिभिः ९ पुरुषैः कुरुशार्दूल समर्थैः प्रतिवारणे । अतिख्यातकुलैर्वीरैर्दृष्टवीर्यैश्च संयुगे १० मध्यमेन च गुल्मेन रक्षिभिः सा सुरक्षिता । उत्क्षिप्तगुल्मैश्च तथा हयैश्च सपताकिभिः ११ आघोषितं च नगरे न पातव्या सुरेति वै । प्रमादं परिरक्षद्भिरुग्रसेनोद्धवादिभिः १२

---

स्वतः त्या आपल्या गगनविहारी साभसंज्ञक नगरामध्यें व्यवस्थेनें सैन्यरचना करून राहिला. ३. नंतर, आपल्या नगरांत बसून तो भूपति त्या द्वारवती नगरीशीं युद्ध करूं लागला; तेव्हां, संपूर्ण आयुधांसहवर्तमान त्या ठिकाणीं युद्ध सुरू झालें ४. द्वारवतीनगरी सर्व बाजूंनीं ध्वज आणि दरवाजे ह्यानी युक्त आहे. हिच्या सर्व बाजूंना बुरूज आहेत आणि सर्व ठिकाणीं सैन्य, तोफा व खंदक खणणारे लोक ठेविलेले आहेत ५. तशींच मोठीं मोठीं मैदानें व रस्ते तिच्या भोंवतालीं असून अन्नांनीं भरलेले वाडे आणि गोपुरें ह्यानींही ती युक्त असते. तसेंच त्या नगरीच्या भोंवतीं मोरचे बांधिलेले असून तोफेचे व तोफाचे गोळे व लोखंडीबाण ह्यांचाही निःपात करणाऱ्या मंत्रमय शक्तींनीं ती नगरी युक्त असते ६. हे भरतवंशजश्रेष्ठा, मद्याचीं पिपें, नौबदी, डंके व मृदंग ह्यानीं ती नगरी युक्त असून, हे राजा, तोमर, अंकुश, तोफा, व नागर ह्या आयुधानींही ती संपन्न असते ७. भुशुंडी, पाषाणगोलक, फरश, ढाली, दारू, गोळा, नळ्या आणि इतर आयुधें ह्यांनी ती नगरी युक्त असून ८ हे भरतवंशजश्रेष्ठा, युद्धशास्त्रांत सांगितलेल्या प्रकारानें गद, सांब, उद्धव इत्यादि रथी पुरुषानीं ती संयुक्त असते ९. हे कुरुवंशजश्रेष्ठा, हे रथी पुरुष शूर, शत्रूंचें निवारण करण्यास समर्थ, अत्यंत प्रख्यात कुलांत जन्मलेले आणि युद्धामध्यें पराक्रम दृष्टोत्पत्तीस आलेले असे आहेत १०. त्या नगरीच्या मध्यभागीं एक उंच बुरूज असून त्या बुरजानें ह्मणजे अर्थात् तेथें असलेल्या रक्षकांच्या योगानें तिचें संरक्षण होत असतें आणि त्याचप्रमाणें इकडे तिकडे फिरत असलेल्या सेना आणि निशाणासहवर्तमान घोडे ह्यांनींहीं ती नगरी सुरक्षित असते ११. असो. ( शाल्वराजा चाल करून आल्यानंतर ) कोणीं बेफाम राहूं नये एतदर्थ उग्रसेन, उद्धव इत्यादिकांनी " कोणीही मद्यपान करूं नये " अशी नगरामध्यें दौंडी दिली १२.

प्रमत्तेष्वभिघातं हि कुर्याच्छाल्वो नराधिपः । इति कृत्वा प्रमत्तास्ते सर्वे वृष्ण्यन्धकाः स्थिताः १३ आनर्ताश्च तथा सर्वे नटनर्तकगायनाः । बहिर्निर्वासिताः क्षिप्रं रक्षद्भिर्वित्तसंचयम् १४ संक्रमा भेदिताः सर्वे नावश्च प्रतिषेधिताः । परिखाश्चापि कौरव्य कीलैः सुनिचिताः कृताः १५ उदपानाः कुरुश्रेष्ठ तथैवाप्यम्बरीषकाः । समन्तात्क्रोशमात्रं च कारिता विषमा च भूः १६ प्रकृत्या विषमं दुर्गं प्रकृत्या च सुरक्षितम् । प्रकृत्या चायुधोपेतं विशेषेण तदानघ १७ सुरक्षितं सुगुप्तं च सर्वायुधसमन्वितम् । तत्पुरं भरतश्रेष्ठ यथेन्द्रभवनं तथा १८ न चामुद्रोऽभिनिर्याति न चामुद्रः प्रवेश्यते । वृष्ण्यन्धकपुरे राजंस्तदा सौभसमागमे १९ अनुरथ्यासु सर्वासु चत्वरेषु च कौरव । बलं बभूव राजेन्द्र प्रभूतगजवाजिमत् २० दत्तवेतनभक्तं च दत्तायुधपरिच्छदम् । कृतोपधानं च तदा बलमासीन्महाभुज २१

---

आपण गैरसावध असतांना शाल्वराजा हल्ला करील असें समजून ते सर्व वृष्णि, अंधक १३ आणि इतरही द्वारकावासी लोक सावधपणानें राहिले व वित्तसंचयाचें रक्षण व्हावें एतदर्थ नाचणारे, गाणारे व नट ह्या सर्वांना त्यांनीं लगेंच बाहेर घालवून दिलें १४. हे कुरुकुलोत्पन्ना, नद्यांचे बांध त्यांनीं सर्व फोडून टाकिले, नावा बंद केल्या आणि नगरीभोवतीं असलेले खंदक काट्यांनीं भरून काढिले १५. हे कुरुवंशजश्रेष्ठा, विहिरी आणि भट्ट्या ह्यांचीही त्यांनीं तशीच व्यवस्था लाविली आणि आसपास एक कोसपर्यंत असलेल्या प्रदेशांतील भूमि त्यांनीं ( कंटकादिकांच्या योगानें ) वरून जाण्यास कठीण करून टाकिली १६. हे निष्पापा भरतश्रेष्ठा, आंत प्रवेश करण्यास विकट आणि म्हणूनच शत्रूंना दुर्गम असें तें नगर साहजिकच असल्यामुळें आपोआपच जरी तें सुरक्षित होतें आणि आयुधांनीं भरलेलें असें मूळचेंच जरी तें होतें तरी त्या वेळीं तें इंद्रभवनाप्रमाणें विशेषतः सुरक्षित आणि सर्व प्रकारच्या आयुधांनीं परिपूर्ण झालेलें होतें व आंतील बातमी बाहेर न जाण्याविषयीं विशेष काळजी घेतलेली होती १७,१८. हे राजा, शाल्वराजाशीं प्रसंग येऊन पडला असतां वृष्णि व अंधक ह्यांच्या त्या नगरामध्यें खुणेवांचून कोणाचा प्रवेशही होत नव्हता व खुणेवांचून कोणाला त्यांतून बाहेरही जातां येत नव्हते १९. हे कुरुकुलोत्पन्ना नृपश्रेष्ठा, चौकांतूनच नव्हे परंतु मोठ्या रस्त्याला लागून असलेल्या लहान लहान रस्त्यांतूनही असंख्य अश्व व गज ह्यांनीं युक्त असलेलें सैन्य त्या नगरामध्यें सिद्ध राहिलें होतें २०. हे महापराक्रमी राजा, त्या वेळीं सैन्याचा पगार, शेरशिधा, आयुधें व वस्त्रप्रावरण ह्यांपैकीं यत्किंचितही देण्याचें शिलक राहिलें नसून विशेष देणग्याही सैन्याला त्या वेळीं मिळाल्या २१. सोन्यारुप्यांवांचून

न कुप्यवेतनी कश्चिन्न चातिक्रान्तवेतनी । नानुग्रहभृतः कश्चिन्न चादृष्टपराक्रमः २२ एवं सुविहिता राजन्द्वारका भूरिदक्षिणा । आहुकेन सुगुप्ता च राज्ञा राजीवलोचन २३ [६६५] इति० वैयासिक्यामारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

वासुदेव उवाच । तां तूपयातो राजेन्द्र शाल्वः सौभपतिस्तदा । प्रभूतनरनागेन बलेनोपाविवेश ह १ समे निविष्टा सा सेना प्रभूतसलिलाशये । चतुरङ्गबलोपेता शाल्वराजाभिपालिता २ वर्जयित्वा श्मशानानि देवतायतनानि च । वल्मीकांश्चैत्यवृक्षांश्च तन्निविष्टमभूद्बलम् ३ अनीकानां विभागेन पन्थानः संवृताभवन् । प्रवणाय च नैवासञ्छाल्वस्य शिबिरे नृप ४ सर्वायुधसमोपेतं सर्वशस्त्रविशारदम् । रथनागाश्वकलिलं पदातिध्वजसंकुलम् ५ तुष्टपुष्टबलोपेतं वीरलक्षणलक्षितम् । विचित्रध्वजसंनाहं विचित्ररथकार्मुकम् ६ संनिवेश्य च कौरव्य द्वारकायां नरर्षभ ।

---

इतर नाणें पगारादाखल कोणालाही मिळालें नव्हतें, कोणाचाही पगार राहिलेला नव्हता, शौर्य पाहून आयत्यावेळेस सैन्यांत भरती केलेला असा कोणीही नव्हता आणि पराक्रम दृष्टोत्पत्तीस न आलेला असाही कोणी त्या सैन्यांत नव्हता २२. सारांश, हे कमलनयना धर्मराजा, ह्याप्रमाणें अनेक उदार पुरुषांनीं युक्त असलेल्या त्या द्वारकेमध्यें उत्तम प्रकारची व्यवस्था लाविलेली असून उग्रसेन राजानें तिचें रक्षण केलेलें होतें २३. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥ १५ ॥

श्रीकृष्ण ह्मणतातः—त्या द्वारवती नगरीसमीप सौभपति शाल्वराजा गेला आणि, हे नृपश्रेष्ठा, असंख्य अश्व व गज ह्यांनीं युक्त असलेल्या सैन्यासहवर्तमान त्यानें तेथें तळ दिला १. शाल्वराजा जिचें सर्वप्रकारें रक्षण करीत आहे अशी ती सेना ( रथ, गज, अश्व आणि पदाति अशा ) चतुरंग बलानें युक्त होती, उदकाची समृद्धि ज्या ठिकाणीं आहे अशा सपाट प्रदेशावर तिचा तळ पडलेला होता २ आणि श्मशानें, देवालयें, वारुळें व चैत्यवृक्ष वर्ज करून ती सेना उतरलेली होती ३. ठिकठिकाणीं वेगवेगळ्या प्रकारच्या सैन्याचा तळ पडला असल्यामुळें मोठमोठे सर्व मार्ग बंद झाले होते आणि, हे राजा, शाल्वाच्या शिबिरामध्यें गुप्त रीतीनें दबकून दबकून जाण्यासही मार्ग राहिलेले नव्हते ४. सर्व प्रकारच्या आयुधांनीं युक्त, सर्व शस्त्रांमध्यें निपुण, रथ, गज आणि अश्व ह्यांनीं भरलेलें, पदाति आणि ध्वज ह्यांनीं गजबजलेलें ५, तुष्ट आणि पुष्ट अशा लोकांनीं समृद्ध असलेलें, शौर्यदर्शक लक्षणांनीं संपन्न आणि चित्रविचित्र निशाणें, चिलखतें, रथ व धनुष्यें ह्यांनीं युक्त असें तें सैन्य ६ एकत्र जम-

अभिसारयामास तदा वेगेन पतगेन्द्रवत् ७ तदापतन्तं संदृश्य बलं शाल्वपतेस्तदा । निर्याय योधयामासुः कुमारा वृष्णिनन्दनाः ८ असहन्तोभियानं तच्छाल्वराजस्य कौरव । चारुदेष्णश्च साम्बश्च प्रद्युम्नश्च महारथः ९ ते रथैर्दंशिताः सर्वे विचित्राभरणध्वजाः । संसक्ताः शाल्वराजस्य बहुभिर्योधपुङ्गवैः १० गृहीत्वा कार्मुकं साम्बः शाल्वस्य सचिवं रणे । योधयामास संहृष्टः क्षेमवृद्धिं चमूपतिम् ११ तस्य बाणमयं वर्षं जाम्बवत्याः सुतो महत् । मुमोच भरतश्रेष्ठ यथा वर्षं सहस्रदृक् १२ तद्बाणवर्षं तुमुलं विषेहे स चमूपतिः । क्षेमवृद्धिर्महाराज हिमवानिव निश्चलः १३ ततः साम्बाय राजेन्द्र क्षेमवृद्धिरपि स्वयम् । मुमोच मायाविहितं शरजालं महत्तरम् १४ ततो मायामयं जालं माययैव विदीर्य सः । साम्बः शरसहस्रेण रथमस्याभ्यवर्षत १५ ततः स विद्धः साम्बेन क्षेमवृद्धिश्चमूपतिः । अपायाज्जवनैरश्वैः साम्बबाणप्रपीडितः १६ तस्मिन्विप्रद्रुते क्रूरे शाल्व-

---

वून, हे कुरुकुलोत्पन्ना पुरुषश्रेष्ठा, तो शाल्वराजा पक्षिराज गरुडाप्रमाणें वेगावेगानें सैन्यासहवर्तमान सौभसंज्ञक नगरांत बसून द्वारकेकडे चालला ७. तेव्हां नगरांत बसून येत असलेल्या त्या शाल्वराजाला व त्याचे सैन्याला अवलोकन करून वृष्णिकुलोत्पन्न कुमार आपल्या नगराबाहेर जाऊन त्याच्याशीं युद्ध करूं लागले ८. सारांश, हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, शाल्वराजाचें तशा प्रकारें तें द्वारकेसमीप येणें सहन न झाल्यामुळें चारुदेष्ण, सांब व महारथी प्रद्युम्न हे नगरांतून बाहेर पडून युद्ध करूं लागले ९. अपूर्व भूषणें व ध्वज ह्यांनीं युक्त व कवच वगैरे घालून तयार असलेले ते प्रद्युम्नप्रभृति वीर रथांसहवर्तमान नगराबाहेर जाऊन शाल्वराजाच्या अनेक मुख्य मुख्य योद्ध्यांशीं भिडले १०. धनुष्य घेऊन संग्राममध्यें शाल्वराजाच्या क्षेमवृद्धिनामक सेनाधिपति अमात्याशीं सांब मोठ्या हर्षानें युद्ध करूं लागला ११ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा, त्या जांबवतीच्या पुत्रानें पर्जन्यवृष्टि करणाऱ्या इंद्राप्रमाणे त्याच्यावर बाणांचा प्रचंड वर्षाव केला १२. तथापि, हे महाराजा, हिमालय पर्वताप्रमाणें निश्चल राहून त्या क्षेमवृद्धि सेनानायकानें तो बाणांचा असह्य वर्षाव सहन केला १३. नंतर, हे नृपश्रेष्ठा, स्वतः क्षेमवृद्धीनेंही मायेनें उत्पन्न केलेला व पूर्वीपेक्षां मोठा असा बाणसमुदाय सांबावर टाकिला १४. परंतु, मायेच्याच योगानें त्या मायामय बाणसमुदायाचे सांबानें तुकडे तुकडे केले आणि त्याच्या रथावर पुनरपि हजारों बाणांचा वर्षाव केला १५. तेव्हां सांबानें क्षेमवृद्धि सेनानायकाला वेध केला असतां सांबाच्या बाणांनीं अतिशयच व्यथित झालेला तो सेनानायक वेगवान् अश्वांच्या योगानें संग्रामांतून पळून गेला १६. झाप-

स्याथ चमूपतौ । वेगवान्नाम दैतेयः सुतं मेऽभ्यद्रवद्बली १७ अभिपन्नस्तु राजेन्द्र साम्बो वृष्णिकुलोद्वहः । वेगं वेगवतो राजंस्तस्थौ वीरो विधारयन् १८ स वेगवति कौन्तेय साम्बो वेगवतीं गदाम् । चिक्षेप तरसा वीरो व्याविध्य सत्यविक्रमः १९ तया त्वभिहतो राजन्वेगवान्न्यपतद्भुवि । वातरुग्ण इव क्षुण्णो जीर्णमूलो वनस्पतिः २० तस्मिन्विनिहते वीरे गदानुन्ने महासुरे । प्रविश्य महतीं सेनां योधयामास मे सुतः २१ चारुदेष्णेन संसक्तो विविन्ध्यो नाम दानवः । महारथः समाज्ञातो महाराज महाधनुः २२ ततः सुतुमुलं युद्धं चारुदेष्णविविन्ध्ययोः । वृत्रवासवयो राजन्यथा पूर्वं तथाभवत् २३ अन्योन्यस्याभिसंक्रुद्धावन्योन्यं जघ्नतुः शरैः । विनदन्तौ महारावान्सिंहाविव महाबलौ २४ रौक्मिणेयस्ततो बाणमग्न्यर्कोपमवर्चसम् । अभिमन्त्र्य महास्त्रेण संदधे शत्रुनाशनम् २५ स विविन्ध्याय सक्रोधः समाहूय महारथः । चिक्षेप मे सुतो राजन्स गतासुरथापतत् २६ विविन्ध्यं निहतं दृष्ट्वा तां च विक्षोभितां चमूम् । कामगेन स

---

माणें तो क्रूर सेनानायक पळून गेल्यावर वेगवान् नांवाचा बलाढ्य दैत्य माझ्या पुत्राच्या अंगावर धांवून आला १७ आणि अगदीं समोर येऊन भिडला. परंतु, हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, त्या वेगवान् दैत्याचा वेग सहन करून तो वृष्णिकुलश्रेष्ठ वीर सांब उभा राहिला १८. नंतर, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, त्या अमोघपराक्रमी वीर सांबानें आपली वेगयुक्त गदा गरगर फिरवून जोरानें त्या वेगवान् दैत्याचे अंगावर फेंकिली १९. तेव्हां, हे राजा, मुळें पाळें जीर्ण झाल्याकारणानें जर्जर झालेला आणि ह्मणूनच वाऱ्यानें मोडून पडलेला वृक्षच कीं काय असा तो वेगवान् दैत्य त्या गदेचा तडाख्या बसतांक्षणींच पृथ्वीवर मरून पडला २०. ह्याप्रमाणें गदेचा धक्का बसून तो वीर महादैत्य मृत झाला असतां शत्रूच्या प्रचंड सेनेमध्यें शिरून माझा पुत्र युद्ध करूं लागला २१. हे महाराज युधिष्ठिरा, महाधनुर्धारी आणि महारथी ह्मणून प्रसिद्ध असलेला विविंध्यनामक दैत्य चारुदेष्णाशीं बिलगला २२. तेव्हां, हे राजा, वृत्रासुर आणि इंद्र ह्यांमध्यें पूर्वी झालेल्या युद्धाप्रमाणें चारुदेष्ण आणि विविंध्य ह्यांचें फारच प्रचंड युद्ध सुरू झालें २३ आणि महाबलाढ्य सिंहांप्रमाणें मोठमोठ्या गर्जना करीत करीत ते उभयतां एकमेकांवर अत्यंत क्रुद्ध होऊन एकमेकांना बाणांनीं प्रहार करूं लागले २४. तदनंतर रुक्मिणीपुत्रानें अग्नि आणि सूर्य ह्यांप्रमाणें तेजस्वी असा एक शत्रुनाशक बाण महास्त्राच्या मंत्रानें अभिमंत्रण करून धनुष्याला लाविला २५ आणि, हे राजा, क्रोधयुक्त झालेल्या त्या माझ्या महारथी पुत्रानें आह्वानपूर्वक तो बाण विविंध्यनामक दैत्यावर टाकिला

सौभेन शाल्वः पुनरुपागमत् २७ ततो व्याकुलितं सर्वं द्वारकावासि तद्बलम् ॥
दृष्ट्वा शाल्वं महाबाहो सौभस्थं नृपते तदा २८ ततो निर्याय कौरव्य अव-
स्थाप्य च तद्बलम् । आनर्तानां महाराज प्रद्युम्नो वाक्यमब्रवीत् २९ सर्वे
भवन्तस्तिष्ठन्तु सर्वे पश्यन्तु मां युधि । निवारयन्तं सङ्ग्रामे बलात्सौभं सरा-
जकम् ३० अयं सौभपतेः सेनामायसैर्भुजगैरिव । धनुर्भुजविनिर्मुक्तैर्नाश-
याम्यद्य यादवाः ३१ आश्वसध्वं न भीः कार्या सौभराडद्य नश्यति ॥
मयाभिपन्नो दुष्टात्मा स सौभो विनशिष्यति ३२ एवं ब्रुवति संहृष्टे प्रद्युम्ने
पाण्डुनन्दन । धिष्ठितं तद्बलं वीर युयुधे च यथासुखम् ३३ [ ६९८ ] इति०
मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

वासुदेव उवाच ॥ एवमुक्त्वा रौक्मिणेयो यादवान्भरतर्षभ । दंशि-
तैर्हरिभिर्युक्तं रथमास्थाय काञ्चनम् १ उच्छ्रित्य मकरं केतुं व्यात्तानन-

---

असतां तो दैत्य गतप्राण होऊन पडला २६. तथापि, विविंध्य मरून पडलेला पाहून आणि ती सेना क्षुब्ध झालेली अवलोकन करून तो शाल्व राजा आपल्या यथेष्ट संचार करणाऱ्या ( गगनविहारी ) सौभसंज्ञक नगरासहवर्तमान पुनरपि द्वारकेवर चालून आला २७. तेव्हां, हे महापराक्रमी राजा, सौभनामक आकाशगामी नगरामध्यें बसून आलेल्या शाल्वराजाला अवलोकन करितांक्षणीं तें सर्व द्वारवती नगरीमध्यें वास्तव्य करणारें सैन्य घाबरून गेलें २८. परंतु, हे कुरुकुलोत्पन्ना महाराज युधिष्ठिरा, इतक्यांत प्रद्युम्न पुढें झाला आणि त्या द्वारकावासी लोकांच्या सैन्याला धीर देऊन ह्मणाला २९ " तुह्मी आपले सर्व स्वस्थ उभे रहा आणि युद्धभूमीमध्यें उभे राहून सर्व जण मी आपल्या पराक्रमानें संग्रामामध्यें शाल्वराजासहवर्तमान त्या सौभसंज्ञक नगराचें निवारण करीत आहें तें पहा ३०. हे यादवहो, धनुष्याच्या प्रत्यंचेपासून निघालेले सर्पच कीं काय अशा लोखंडी बाणांनी हा मी या सौभपति शाल्वराजाच्या सेनेचा आज नाश करून टाकितों ३१. तुह्मी धीर धरा; घाबरू नका; आज हा सौभाधिपति नाहींसा होत आहे. अरे, माझ्याशी गांठ पडलेल्या ह्या दुरात्म्या शाल्वराजाचा सौभसंज्ञक नगरासहवर्तमान आज नाश होईल " ३२. हे पांडुपुत्रा वीरा युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें प्रद्युम्न हर्षयुक्त होऊन भाषण करूं लागला असतां तें सैन्य धीर धरून उभें राहिलें आणि यथेष्ट युद्ध करूं लागलें ३३. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं सोळावा अध्याय समाप्त झाला॥ १६॥

श्रीकृष्ण सांगतात:—हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, ह्याप्रमाणें यादवांना सांगून तो रुक्मिणीपुत्र प्रद्युम्न सामान घालून तयार केलेले अश्व ज्याला जोडिले आहेत अशा

मिवान्तकम् । उत्पतद्भिरिवाकाशं तैर्हयैरन्वयात्परान् २ विक्षिपन्नाददर्यं-
श्चापि धनुःश्रेष्ठं महाबलैः । तूणखड्गधरः शूरो बद्धगोधाङ्गुलित्रवान् ३
स विद्युच्छुरितं चापं विहरन्वै तलात्तलम् । मोहयामास दैतेयान्सर्वान्सौ-
भनिवासिनः ४ तस्य विक्षिपतश्चापं संदधानस्य चासकृत् । नान्तरं
ददृशे कश्चिन्निघ्नतः शात्रवान्रणे ५ मुखस्य वर्णो न विकल्पतेस्य चेलुश्च
गात्राणि न चापि तस्य । सिंहोन्नतं चाप्यभिगर्जतोस्य शुश्राव लोकाद्भु-
तवीर्यमग्र्यम् ६ जलेचरः काञ्चनयष्टिसंस्थो व्यात्ताननः सर्वतिमिप्रमाथी ।
वित्रासयन्राजति वाहमुख्ये शाल्वस्य सेनाप्रमुखे ध्वजाग्र्यः ७ ततस्तूर्णं
विनिष्पत्य प्रद्युम्नः शत्रुकर्षणः । शाल्वमेवाभिदुद्राव विधित्सुः कलहं
नृप ८ अभियानं तु वीरेण प्रद्युम्नेन महारणे । नामर्षयत संक्रुद्धः शाल्वः
कुरुकुलोद्वह ९ स रोषमदमत्तो वै कामगादवरुह्य च । प्रद्युम्नं योधया-

---

सुवर्णाच्या रथामध्यें बसून १ आणि आ पसरलेला मृत्युच कीं काय अशा रीतीनें दिसणारा आपला मकरचिन्हांकित ध्वज उभारून आकाशामध्येंच उड्डाण करीत आहेत कीं काय अशा त्या शीघ्रगामी अश्वांच्या योगानें शत्रूंसमीप गेला २. भुजत्राण व अंगुलित्राण घालून सज्ज झालेला आणि भाते व खड्ग धारण केलेला तो शूर प्रद्युम्न आपलें श्रेष्ठ धनुष्य आकृष्ट व नादित करीत करीत महाबलाढ्य अश्वांच्या योगानें शत्रूकडे जाऊं लागला ३. तेव्हां विद्युल्लतेच्या स्फुरणाप्रमाणें अत्यंत शीघ्र रीतीनें ह्या हातांतून त्या हातांत आपलें धनुष्य फिरवीत फिरवीत त्यानें सर्व सौभनिवासी दैत्य मोहित केले ४. संग्रामामध्यें रिपूंचा वध करणारा तो प्रद्युम्न एकसारखा धनुष्य आकर्षण करून त्याला बाण लावूं लागला असतां तो धनुष्य आकर्षण करितो केव्हां आणि त्याला बाण लावितो केव्हां हें कांहींच ( अतित्वरेमुळें ) इतरांना समजेनासें झालें ५. शाल्वराजाशी युद्ध चाललें असतांना त्या प्रद्युम्नाच्या मुखावरील टवटवींत मुळींच फरक पडला नाहीं व त्याच्या अवयवांना यत्किंचित्ही कंप सुटला नाहीं. तो सिंहासारखी मोठमोठ्यानें गर्जना करीत होता व त्यावरून त्याचें पराकाष्ठेचें अद्भुत वीर्य लोकांच्या कानावर येत होतें ६ आणि सुवर्णदंडावर जबडा पसरून स्थित असलेला व इतर सर्व ध्वजांचा नाश करणारा असा जो त्याचा श्रेष्ठ मकरचिन्हांकित ध्वज तोही रिपूंना कंपित करीत करीत शाल्वराजाच्या सेनेसमोर आपल्या श्रेष्ठ रथावर फडकत होता ७. नंतर, हे राजा, सत्वर पुढें होऊन रिपुनाशक प्रद्युम्न कलह करण्याच्या इच्छेनें शाल्वराजावरच चाल करून गेला ८. तेव्हां, मोठ्या रणामध्यें वीर प्रद्युम्नाचें तें चालून येणें शाल्वराजाला सहन न झाल्यामुळें, हे कुरुकुलश्रेष्ठा युधिष्ठिरा, शाल्वराजा क्रुद्ध झाला ९ आणि प्रतिपक्ष्याकडील

मास शाल्वः परपुरञ्जयः १० तयोः सुतुमुलं युद्धं शाल्ववृष्णिप्रवीरयोः। समेता ददृशुर्लोका बलिवासवयोरिव ११ तस्य मायामयो वीर रथो हेमपरिष्कृतः। सपताकः सध्वजश्च सानुकर्षः सतूणवान् १२ स तं रथवरं श्रीमान्समारुह्य किल प्रभो। मुमोच बाणान्कौरव्य प्रद्युम्नाय महाबलः १३ ततो बाणमयं वर्षं व्यसृजत्तरसा रणे। प्रद्युम्नो भुजवेगेन शाल्वं संमोहयन्निव १४ स तैरभिहतः संख्ये नामर्षयत सौभराट्। शरान्दीप्ताग्निसंकाशान्मुमोच तनये मम १५ तानापततो बाणौघान्संचिच्छेद महाबलः। तथाश्चान्यांश्च गन्दीप्तान्प्रचिक्षेप सुते मम १६ स शाल्वबाणै राजेन्द्र विद्धो रुक्मिणिनन्दनः। मुमोच बाणं त्वरितो मर्मभेदिनमाहवे १७ तस्य वर्म विभिद्याशु स बाणो मत्सुतेरितः। विव्याध हृदयं पत्री स मुमोह पपात च १८ तस्मिन्निपतिते वीरे शाल्वराजे विचेतसि। संप्राद्रवन्दानवेन्द्रा दारयन्तो वसुन्धराम् १९ हाहाकृतमभूत्सैन्यं शाल्वस्य पृथिवीपते। नष्टसंज्ञे निपतिते

सेनासमूहाचा पराभव करणारा तो शाल्वराजा क्रोधानें व मदानें बेफाम होऊन आपल्या यथेष्ट संचार करणाऱ्या सौभनगरांतून खालीं उतरला व प्रद्युम्नाशीं युद्ध करूं लागला १०. तेव्हां, बलि आणि इंद्र ह्यांप्रमाणें शाल्व आणि वृष्णिवंशजश्रेष्ठ प्रद्युम्न ह्यांमध्यें सुरू झालेलें तें अत्यंत तुमुल युद्ध लोक एकत्र जुळून अवलोकन करूं लागले ११. हे वीरा युधिष्ठिरा, पताका, ध्वज, अनुकर्ष आणि, भाते ह्यांनीं युक्त असलेला त्या शाल्वराजाचा मायामय रथ सुवर्णानें मढविलेला होता १२ आणि, हे प्रभो कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, असें सांगतात कीं त्या श्रेष्ठ रथावर आरूढ होऊन तो महाबलाढ्य व वैभवशाली शाल्वराजा प्रद्युम्नावर बाण सोडूं लागला १३. तेव्हां आपल्या हस्तवेगानें शाल्वराजाला मोहितच करीत आहे कीं काय अशा रीतीनें प्रद्युम्नानें वेगावेगानें शाल्वराजावर बाणांचा पाऊसच पडला १४. परंतु, त्या प्रद्युम्नाच्या बाणांनीं संग्रामामध्यें सौभाधिपति शाल्वराजा विद्ध झाला असतां त्याला तें सहन झालें नाहीं आणि म्हणूनच तो प्रज्वलित अग्नीसारखे तेजस्वी बाण माझ्या पुत्रावर सोडूं लागला १५. तथापि, आपणांकडे येत असलेल्या त्या बाणसमुदायांना त्या महाबलाढ्य प्रद्युम्नानें मध्येंच तोडून टाकिलें. तेव्हां त्या शाल्वराजानें दुसरे देदीप्यमान बाण माझ्या पुत्रावर सोडिले १६. परंतु, हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, शाल्वराजाच्या बाणांनीं तो रुक्मिणीपुत्र विद्ध झाला असतांही त्यानें त्वरा करून एक मर्मभेदक बाण संग्रामामध्यें शाल्वराजावर टाकिला १७. तेव्हां माझ्या पुत्रानें सोडिलेल्या बाणानें लगेच त्या शाल्वराजाचें कवच भेदून त्याच्या हृदयाला वेध केला व त्या बरोबरच तो शाल्वराजा मूर्छित होऊन पडला १८. ह्याप्रमाणें तो वीर मूर्छित होऊन पडला असतां पृथ्वी विदारण करणारेही

तदा सौभपतौ नृपे २० तत उत्थाय कौरव्य प्रतिलभ्य च चेतनाम् । मुमोच बाणान्सहसा प्रद्युम्नाय महाबलः २१ तैः स विद्धो महाबाहुः प्रद्युम्नः समरे स्थितः। जत्रुदेशे भृशं वीरो व्यवासीदद्रथे तदा २२ तं स विद्धा महाराज शाल्वो रुक्मिणिनन्दनम् । ननाद सिंहनादं वै नादेनापूरयन्महीम् २३ ततो मोहं समापन्ने तनये मम भारत । मुमोच बाणांस्त्वरितः पुनरन्यान्दुरासदान् २४ स तैरभिहतो बाणैर्बहुभिस्तेन मोहितः । निश्चेष्टः कौरवश्रेष्ठ प्रद्युम्नोऽभूद्रणाजिरे २५ [ ७२३ ] इति श्रीमहाभारते०मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने सप्तदशोध्यायः ॥ १७ ॥

वासुदेव उवाच ॥ शाल्वबाणार्दिते तस्मिन्प्रद्युम्ने बलिनांवरे । वृष्णयो भग्नसंकल्पा विव्यथुः पृतनागताः १ हाहाकृतमभूत्सर्वं वृष्ण्यन्धकबलं ततः । प्रद्युम्ने मोहिते राजन्परे च मुदिता भृशम् २ तं तथा मोहितं दृष्ट्वा सारथिर्जवनैर्हयैः। रणादपाहरत्तूर्णं शिक्षितो दारुकिस्तदा ३ नातिदूरापयातं तु रथं रथवर-

---

त्याच्या बाजूचे मोठमोठे दैत्य पलायन करूं लागले १९. इतकेंच नव्हें परंतु, हे पृथ्वीपते, तो सौभनगराधिपति शाल्वराजा त्या वेळीं मूर्छित होऊन पडला असतां त्याच्या सर्व सैन्यामध्यें हाहाकार उडून गेला २०. तदनंतर, हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तो महाबलाढ्य शाल्वराजा ( कांहीं वेळानें ) शुद्धीवर येऊन तेथून उठला आणि एकाएकीं प्रद्युम्नावर बाण टाकूं लागला २१. तेव्हां समरांगणामध्यें स्थित असलेला तो महापराक्रमी वीर प्रद्युम्न त्या बाणांनीं कंठमूलाचे ठिकाणीं विद्ध झाल्यामुळें रथावर मूर्छित झाला २२. हे महाराज युधिष्ठिरा, त्या शाल्वराजानें ह्याप्रमाणें रुक्मिणीपुत्र प्रद्युम्नाला वेध केला आणि ध्वनीनें पृथ्वी दणाणून टाकीत टाकीत तो सिंहनाद करूं लागला २३. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्या शाल्वराजानें मूर्छित झालेल्या माझ्या पुत्रावर त्वरा करून पुनरपि दुसरे दुःसह बाण टाकिले २४. तेव्हां मात्र, हे कुरुवंशजश्रेष्ठा धर्मराजा, शाल्वानें सोडिलेल्या त्या असंख्य बाणांनीं विद्ध झाल्यामुळें मूर्छित झालेला तो प्रद्युम्न रणांगणामध्यें निश्चेष्टच पडला २५. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं सतरावा अध्याय समाप्त झाला ॥ १७ ॥

श्रीकृष्ण सांगतात:—बलवानांमध्यें श्रेष्ठ जो प्रद्युम्न तो शाल्वराजाच्या बाणांनीं व्यथित झाला असतां सैन्यामध्यें असलेल्या वृष्णिकुलोत्पन्न पुरुषांचें मन खट्टू झालें व त्यांना वाईट वाटलें १. हे राजा, प्रद्युम्न मूर्छित झाला असतां वृष्णि व अंधक ह्यांच्या सर्व सैन्यामध्यें हाहाकार उडून राहिला आणि रिपुपक्षाकडील लोकांना पराकाष्ठेचा आनंद झाला २. तेव्हां तो प्रद्युम्न तशाप्रकारें मोहित झालेला अवलोकन करून सारथ्य-

प्रद्युम्नं । धनुर्गृहीत्वा यन्तारं लब्धसंज्ञोऽब्रवीदिदम् ४ सौते किं ते व्यवसितं कस्माद्यासि पराङ्मुखः । नैष वृष्णिप्रवीराणामाहवे धर्म उच्यते ५ कच्चित्सौते न ते मोहः शाल्वं दृष्ट्वा महाहवे । विषादो वा रणं दृष्ट्वा ब्रूहि मे त्वं यथातथम् ६ सौतिरुवाच ॥ जानार्दने न मे मोहो नापि मां भयमाविशत् । अतिभारं तु ते मन्ये शाल्वं केशवनन्दन ७ सोऽपयामि शनैर्वीर बलवानेष पापकृत् । मोहितश्च रणे शूरो रक्ष्यः सारथिना रथी ८ आयुष्मंस्त्वं मया नित्यं रक्षितव्यस्त्वयाप्यहम् । रक्षितव्यो रथी नित्यमिति कृत्वापयाम्यहम् ९ एकश्चापि महाबाहो बहवश्चापि दानवाः । न समं रौक्मिणेयाहं रणे मत्वापयामि वै १० एवं ब्रुवति सूते तु तदा मकरकेतुमान् । उवाच सूतं कौरव्य निवर्तय रथं पुनः ११ दारुकात्मज मैवं त्वं पुनः कार्षीः कथंचन ।

---

कर्मामध्यें सुशिक्षित असलेल्या सारथि दारुकपुत्रानें शीघ्रगामी अश्वांच्या योगानें त्या प्रद्युम्नाला रणभूमींतून सत्वर बाहेर नेलें ३. परंतु, रणभूमीतून रथ फारसा दूर गेला नाहीं तोंच मोठमोठ्या रथ्यांचा नाश करणारा प्रद्युम्न सावध झाला आणि धनुष्य घेऊन सारथ्याला ह्मणाला ४ " हे सूतपुत्रा, अरे, तुझ्या मनांत तरी काय आहे ? तूं पराङ्मुख होऊन रणांतून कां जात आहेस ? अरे, वृष्णिकुलांतील वीरांचा हा युद्धांतील धर्म नव्हे ५. हे सूतपुत्रा, मोठ्या संग्रामामध्यें शाल्वराजाला अवलोकन करून तुला मोह तर उत्पन्न झाला नाहीं ना ? अथवा रणभूमि अवलोकन करून तुला भीति तर प्राप्त झाली नाहीं ना ? अरे, तुला काय वाटलें असेल तें मला खरें खरें सांग"६. सौति ह्मणतोः—हे जनार्दनपुत्रा प्रद्युम्ना, मला मोह उत्पन्न झाला नाहीं अथवा भीतिही प्राप्त झाली नाहीं. परंतु, हे केशवनंदना, शाल्वराजा तुला फारच भारी आहे असें मला वाटतें ७ आणि ह्मणून, हे वीरा, मी हळू हळू रणांतून दूर निघत आहें. हा पापी शाल्वराजा बलाढ्य आहे आणि रणामध्यें शूर रथी मूर्छित झाला असतां सारथ्यानें त्याचें रक्षण करणे योग्य आहे ८. हे दीर्घायु प्रद्युम्ना, सर्वदां मीं तुझें रक्षण केलें पाहिजे आणि तूंही माझें रक्षण केलें पाहिजेस. परंतु, विशेषतः रथी पुरुषाचें रक्षण होणें अवश्य आहे असें समजून मी रणांतून परावृत्त होऊन जात आहें ९. हे महापराक्रमी प्रद्युम्ना, तूं एकटा असून तुझे प्रतिपक्षी दैत्य पुष्कळ आहेत. ह्यास्तव, हे रुक्मिणीपुत्रा, त्या अनेक दैत्यांची बरोबरी संग्रामामध्यें तुझ्यानें होणार नाहीं असें वाटल्यावरून मी रणांतून निघून जात आहें. १०. ह्याप्रमाणें सारथि सांगत असतांना मकरचिन्हांकित ध्वजानें युक्त असलेला तो प्रद्युम्न, हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्याला ह्मणाला " रथ परत फिरीव ११. हे दारुकपुत्रा, तूं असें फिरून कधींही करूं नकोस;

व्यपयानं रणात्सौते जीवतो मम कर्हिचित् १२ न स वृष्णिकुले जातो यो वै त्यजति संगरम् । यो वा निपतितं हन्ति तवास्मीति च वादिनम् १३ तथा स्त्रियं च यो हन्ति बालं वृद्धं तथैव च । विरथं विप्रकीर्णं च भग्नशस्त्रायुधं तथा १४ त्वं च सूतकुले जातो विनीतः सूतकर्मणि । धर्मज्ञश्चासि वृष्णीनामाहवेष्वपि दारुके १५ स जानंश्चरितं कृत्स्नं वृष्णीनां पृतनामुखे । अपयानं पुनः सौते मैवं कार्षीः कथंचन १६ अपयातं हतं पृष्ठे भ्रान्तं रणपलायितम् । गदाग्रजो दुराधर्षः किं मां वक्ष्यति माधवः १७ केशवस्याग्रजो वापि नीलवासा मदोत्कटः । किं वक्ष्यति महाबाहुर्बलदेवः समागतः १८ किं वक्ष्यति शिनेर्नप्ता नरसिंहो महाधनुः । अपयातं रणात्सूत साम्बश्च समितिंजयः १९ चारुदेष्णश्च दुर्धर्षस्तथैव गदसारणौ । अक्रूरश्च महाबाहुः किं मां वक्ष्यति सारथे २० शूरं संभाविनं शान्तं नित्यं पुरुषमानिनम् । स्त्रियश्च वृष्णिवीराणां किं मां वक्ष्यन्ति संहताः २१ प्रद्युम्नोयमुपायाति

---

हे सूतपुत्रा, जिवंत जीव आहे तोंपर्यंत रणांतून माझें परावर्तन होणें कधींही उचित नाहीं १२. अरे, संग्राम सोडून जाणारा, पडलेल्यावर प्रहार करणारा, मी तुझा आहें असें ह्मणणाऱ्यावर शस्त्र धरणारा आणि त्याचप्रमाणें स्त्री, बाल वृद्ध, विरथी, पलायन करणारा आणि शस्त्रास्त्रें भग्न झालेला ह्यांचा घात करणारा असा जो असेल तो वृष्णिकुलामध्यें उत्पन्न झालेलाच नव्हे १३,१४. हे दारुकपुत्रा, तूं सारथ्यांच्या कुलामध्यें उत्पन्न झाला असून सारथ्यकर्मासंबंधानें शिकलेलाही आहेस आणि त्याचप्रमाणें संग्रामामध्यें वृष्णिकुलांतील पुरुषांचा असलेला धर्महीं तुला माहीत आहे १५. करितां, हे सूतपुत्रा, सैन्याचे अग्रभागीं वृष्णिकुलोत्पन्न पुरुषांचें वर्तन काय असतें हे सर्व तूं जाणीत आहेस. तस्मात्, पुनरपि तूं ह्याप्रमाणें कधींही युद्धांतून परावर्तन करीत जाऊं नकोस १६. अरे, मी रणापासून परावृत्त झालों असतां, पाठमोरा होऊन रिपूचा वार घेतला असतां, भ्रांतिग्रस्त झालों असतां, किंवा रणांतून पळून गेलों असतां जिंकण्यास अशक्य असा गदाग्रज श्रीकृष्ण मला काय ह्मणेल ? १७. नील वस्त्र परिधान करणारा आणि सर्वदां मदमत्त असा जो श्रीकृष्णाचा ज्येष्ठ बंधु महापराक्रमी बलराम त्याची गांठ पडली असतां तो तरी मला काय ह्मणेल ? १८. त्याचप्रमाणें, हे सारथे, पुरुषश्रेष्ठ व महाधनुर्धारी सात्यकि, रिपुसेनेचा पराभव करणारा सांब, अजिंक्य चारुदेष्ण, गद व सारण आणि महापराक्रमी अक्रूर हे रणांतून परावृत्त झालेल्या मला काय बरें ह्मणतील ? १९,२०. अरे, शूर, प्रतिष्ठित, शमावलंबी आणि पौरुषाचा नित्य अभिमान बाळगणारा जो मी त्या मला वृष्णिकुलोत्पन्न वीरांच्या स्त्रिया एकत्र जुळल्या असतां काय बरें ह्मणतील ? २१.

भीतस्त्यक्त्वा महाहवम् । धिगेनामिति वक्ष्यन्ति न तु वक्ष्यन्ति साध्विति २२ धिग्वाचा परिहासोपि मम वा मद्विधस्य वा । मृत्युनाभ्यधिकः सौते म त्वं मा व्यपयाः पुनः २३ भारं हि मयि संन्यस्य यातो मधुनिहा हरिः। यज्ञं भारतसिंहस्य न हि शक्योद्य मर्षितुम् २४ कृतवर्मा मया वीरो निर्यास्यन्नेव वारितः । शाल्वं निवारयिष्येहं तिष्ठ त्वमिति सूतज २५ स च संभावयन्मां वै निवृत्तो हृदिकात्मजः । तं समेत्य रणं त्यक्त्वा किं वक्ष्यामि महारथम् २६ उपयान्तं दुराधर्षं शङ्खचक्रगदाधरम् । पुरुषं पुण्डरीकाक्षं किं वक्ष्यामि महाभुजम् २७ सात्यकिं बलदेवं च ये चान्येन्धकवृष्णयः । मया स्पर्धन्ति सततं किं नु वक्ष्यामि तानहम् २८ त्यक्त्वा रणमिमं सौते पृष्ठतोभ्याहतः शरैः । त्वयापनीतो विवशो न जीवेयं कथंचन २९ स निवर्त रथेनाशु पुनर्दारुकनन्दन । न चैतदेवं कर्तव्यमथापत्सु कथंचन ३० न जीवितमहं सौते बहु मन्ये कथंचन । अपयातो रणाद्भीतः

---

" प्रचंड रणाचा त्याग करून हा प्रद्युम्न भयानें इकडे येत आहे; तस्मात्, ह्याला धिक्कार असो " असें ह्मणताल; हें मीं चांगलें केलें असें ह्मणणार नाहींत २२. हे सूतपुत्रा, धिक्कारयुक्त वाणीनें उपहास होणें ह्मणजे मला अथवा मजसारिख्याला मृत्यूपेक्षांही अधिक वाईट आहे. करितां, तूं पुनरपि असा रण सोडून जाऊं नकोस २३. द्वारवतीनगरीचें यश संरक्षण करण्याचा वगैरे सर्व प्रकारचा भार माझ्यावर टाकून मधुदैत्यनाशक श्रीहरि भरतवंशजश्रेष्ठ युधिष्ठिराच्या यज्ञाकडे गेला आहे. तेव्हां त्याला हें माझें वर्तन आज सहन होणें संभवनीय नाहीं २४. हे सूतपुत्रा, शाल्वराजाला जिंकण्याकरितां वीर कृतवर्मा बाहेर पडत असतांनाच " मी शाल्वराजाचें निवारण करितों; तूं स्वस्थ रहा " असें ह्मणून मीं त्याला परत फिरविलें २५ व तें कृत्य करण्यास मी समर्थ आहें असें समजून तोही परत फिरला. तेव्हां रण सोडून त्या महारथ्याची गांठ पडली असतां मी त्याला काय बरें ह्मणूं ? २६. शंख, चक्र व गदा धारण करणारा असा जो महापराक्रमी व अजिंक्य कमलनयन श्रीकृष्ण तो इकडे येऊं लागला ह्मणजे मी त्याला काय सांगूं बरें ? २७. सात्यकि आणि बलराम ह्यांना तरी मी काय सांगूं ? आणि त्याचप्रमाणें अंधक आणि वृष्णि ह्या कुलांतील जे इतर पुरुष माझ्याशीं नित्य स्पर्धा करीत असतात त्यांना तरी मी काय बरें ह्मणूं ? २८. हे सूतपुत्रा, मी पराधीन असल्यामुळें हें रण सोडून तूं जर मला दूर नेलेंस आणि रिपूंनीं माझ्या पाठीवर जर बाण टाकिले तर मी कदापिही प्राण ठेवणार नाहीं २९. ह्यास्तव, हे दारुकपुत्रा, तूं रथासहवर्तमान परत फीर. अरे संकटसमयीं सुद्धां असें कधींही करूं

पृष्ठतोभ्याहतः शरैः ३१ कदापि सूतपुत्र त्वं जानीषे मां भयार्दितम् । अपयातं रणं हित्वा यथा कापुरुषं तथा ३२ न युक्तं भवता त्यक्तुं सङ्ग्रामं दारुकात्मज । मयि युद्धार्थिनि भृशं स त्वं याहि यतो रणम् ३३ [७५६] इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्यानेष्टादशोध्यायः॥ १८ ॥

वासुदेव उवाच ॥ एवमुक्तस्तु कौन्तेय सूतपुत्रस्ततोब्रवीत् । प्रद्युम्नं बलिनां श्रेष्ठं मधुरं श्लक्ष्णमञ्जसा १ न मे भयं रौक्मिणेय सङ्ग्रामे यच्छतो हयान् । युद्धज्ञोस्मि च वृष्णीनां नात्र किंचिदतोन्यथा २ आयुष्मन्नुपदेशस्तु सारथ्ये वर्ततां स्मृतः । सर्वार्थेषु रथी रक्ष्यस्त्वं चापि भृशपीडितः ३ त्वं हि शाल्वप्रयुक्तेन शरेणाभिहतो भृशम् । कश्मलाभिहतो वीर ततोहमपयातवान् ४ स त्वं सात्वतमुख्याद्य लब्धसंज्ञो यदृच्छया। पश्य मे हयसंयाने शिक्षां केशवनन्दन ५ दारुकेणाहमुत्पन्नो यथावच्चैव शिक्षितः । वीतभीः

---

नये ३०. हे सूतपुत्रा, भयभीत होऊन रणापासून परावृत्त होणें आणि पृष्ठभागीं बाणांचा प्रहार सोसणें ह्यांपेक्षां मला जगण्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं ३१. हे सूतपुत्रा, एकाद्या नीच पुरुषाप्रमाणें भयभीत होऊन आणि रण सोडून मी गेल्याचें तुला कधीं माहित आहे काय ? ३२. सारांश, हे दारुकपुत्रा; मला पराकाष्ठेची युद्धाची इच्छा असतांना संग्रामाचा त्याग करणें तुला योग्य नाहीं. करितां, जिकडे रण आहे तिकडे चल ३३. ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं अठरावा अध्याय समाप्त झाला ॥ १८ ॥

श्रीकृष्ण सांगतातः—हे कुंतीपुत्रा धर्मराजा, ह्याप्रमाणें प्रद्युम्न बोलला असतां बलवानांमध्यें श्रेष्ठ अशा त्या प्रद्युम्नाला तो लगेंच स्पष्ट आणि मधुर शब्दांनीं ह्मणाला १ " हे रुक्मिणीपुत्रा, सारथ्य कर्म करीत असतांना संग्रामामध्यें मला भय नाहीं आणि वृष्णिकुलोत्पन्न पुरुषांचें युद्धही मी जाणीत आहें. ह्याविषयीं माझी यत्किंचितही गैरसमज झालेली नाहीं २. परंतु, हे दीर्घायु प्रद्युम्ना, साऱ्या गोष्टी जरी झाल्या तरी त्यांपेक्षां रथी पुरुषाचें रक्षण करणें ही गोष्ट अवश्य आहे असें सारथ्य कर्म करणाऱ्यांना धनुर्वेदाचें सांगणें आहे आणि तूंही पराकाष्ठेचा व्यथित झालेला होतास ३. हे वीरा, शाल्वराजानें सोडिलेल्या बाणाचा तुला अतिशय प्रहार झाल्यामुळें तूं मोहग्रस्त झालास आणि तेव्हां ( तुझें रक्षण करण्याकरितां ) मी रणांतून परावृत्त झालों ४. परंतु, हे यादवश्रेष्ठा, तूं आतां आपोआप सावध झाला आहेस. करितां, हे कृष्णनंदना, सारथ्यकर्माविषयीं आज माझें शिक्षण तूं अवलोकन कर ५. अरे, प्रत्यक्ष दारुकापासून मी उत्पन्न झालों असून सारथ्य कर्म अगदीं यथासांग शिकलों आहें. तेव्हां आतां भय न

प्रविशाम्येतां शाल्वस्य प्रथितां चमूम् ६ वासुदेव उवाच॥एवमुक्त्वा ततो वीर हयान्संचोद्य सङ्करे। रश्मिभिस्तु समुद्यम्य जवेनाभ्यपतत्तदा ७ मण्डलानि विचित्राणि यमकानीतराणि च। सव्यानि च विचित्राणि दक्षिणानि च सर्वशः ८ प्रतोदेनाहता राजन्रश्मिभिश्च समुद्यताः। उत्पतन्त इवाकाशे व्यचरंस्ते हयोत्तमाः ९ ते हस्तलाघवोपेतं विज्ञाय नृप दारुकिम्। दह्यमाना इव तदा नास्पृशंश्चरणैर्महीम् १० सोपसव्यां चमूं तस्य शाल्वस्य भरतर्षभ। चकार नातियत्नेन तदद्भुतमिवाभवत् ११ अमृष्यमाणोपसव्यं प्रद्युम्नेन स सौभराट्। यन्तारमस्य सहसा त्रिभिर्बाणैः समार्दयत् १२ दारुकस्य सुतस्तत्र बाणवेगमचिन्तयन्। भूय एव महाबाहो प्रययावपसव्यतः १३ ततो बाणान्बहुविधान्पुनरेव स सौभराट्। मुमोच तनये वीर मम रुक्मिणिनन्दने १४ तानप्राप्ताञ्छितैर्बाणैश्चिच्छेद परवीरहा। रौक्मिणेयः स्मितं कृत्वा दर्शयन्हस्तलाघवम् १५ छिन्ना-

---

बाळगितां शाल्वराजाच्या ह्या प्रख्यात सेनेमध्यें मी प्रवेश करितों ६. श्रीकृष्ण सांगतातः—हे वीरा धर्मराजा, ह्याप्रमाणें बोलून दारुकपुत्रानें युद्धभूमीकडे जाण्याविषयीं अश्वांना प्रेरणा केली आणि रश्मींच्या योगानें अश्व अगदीं चवड्यावर धरून तो वेगानें शाल्वराजाच्या सैन्यावर तुटून पडला ७. चाबकांचे प्रहार झाल्यामुळें आणि रश्मींच्या योगानें वर उचलून धरले गेल्यामुळें ते श्रेष्ठ अश्व आकाशामध्येंच उड्डाण करीत आहेत कीं काय अशा रीतीनें एक सारखीं, भिन्न भिन्न, डावीं आणि उजवीं अशीं सर्व प्रकारचीं आश्चर्यकारक मंडलें योजून चालूं लागले ८,९. हे धर्मराजा, प्रद्युम्नाचा सारथि दारुकपुत्र हस्तलाघवानें युक्त आहे असें समजून आल्यावर ज्यांच्या शरीराचा जसा कांहीं भडका उडून गेला आहे अशा त्या अश्वांचे पाय भूमीवर ठरेनासे झाले १०. हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, प्रद्युम्नाचा सारथि रथ घेऊन त्या शाल्वराजाच्या सेनेला सहज डावी घालून गेला आणि तें एक रणभूमीमध्यें आश्चर्यासारखेंच झालें ११. परंतु, प्रद्युम्न आपल्याला डावी घालून जात आहे हें सौभनगराधिपति शाल्वराजाला सहन न झाल्यामुळें त्यानें एकाएकीं त्याच्या सारथ्यावर तीन बाण टाकिले १२. तथापि, हे महापराक्रमी धर्मराजा, शाल्वराजाच्या बाणांच्या वेगाकडे लक्ष्य न देतां तो दारुकपुत्र पुनरपि रणांगणामध्यें शाल्वराजाला डावी घालून गेला १३. तेव्हां, हे वीरा, रुक्मिणीला आनंद देणाऱ्या माझ्या पुत्रावर त्या सौभाधिपतीनें पुनरपि अनेक प्रकारचे बाण टाकिले १४. परंतु, रिपुपक्षाकडील वीरांचा निष्पात करणाऱ्या त्या रुक्मिणीपुत्रानें हास्य करून हस्तलाघव दर्शवीत दर्शवीत ते बाण जवळ येऊन ठेपले नाहींत तोंच आपल्या तीक्ष्ण बाणांनीं तोडून टाकिले १५. तेव्हां प्रद्यु-

न्दृष्ट्वा तु तान्बाणान्प्रद्युम्नेन स सौभराट् । आसुरीं दारुणीं मायामास्थाय व्यसृजच्छरान् १६ प्रयुज्यमानमाज्ञाय दैतेयास्त्रं महाबलम् । ब्रह्मास्त्रेणान्तरा छित्वा मुमोचान्यान्पतत्रिणः १७ ते तदस्त्रं विधूयाशु विव्यधू रुधिराशनाः । शिरस्युरसि वक्त्रे च स मुमोह पपात च १८ तस्मिन्निपतिते क्षुद्रे शाल्वे बाणप्रपीडिते । रौक्मिणेयोपरं बाणं संदधे शत्रुनाशनम् १९ तमर्चितं सर्वदशार्हपूगैराशीविषाग्निज्वलनप्रकाशम् । दृष्ट्वा शरं ज्यामभिनीयमानं बभूव हाहाकृतमन्तरिक्षम् २० ततो देवगणाः सर्वे सेन्द्राः सहधनेश्वराः । नारदं प्रेषयामासुः श्वसनं च मनोजवम् २१ तौ रौक्मिणेयमागम्य वचोब्रूतां दिवौकसाम् । नैष वध्यस्त्वया वीर शाल्वराजः कथंचन २२ संहरस्व पुनर्बाणमवध्योयं त्वया रणे । एतस्य हि शरस्याजौ नावध्योस्ति पुमान्कचित् २३ मृत्युरस्य महाबाहो रणे देवकिनन्दनः । कृष्णः संकल्पितो धात्रा तन्न मिथ्या भवेदिति २४ ततः परमसंहृष्टः प्रद्युम्नः शरमु-

---

म्नानें ते बाण तोडून टाकिले असें अवलोकन केल्यावर सौभाधिपति शाल्वराजानें भयंकर राक्षसी मायेचें अवलंबन करून बाण सोडण्यास आरंभ केला १६. परंतु, अतिप्रचंड दैत्यास्त्र आपणांकडे येत आहे असें जाणून प्रद्युम्नानें ब्रह्मास्त्राच्या योगानें तें मध्येंच तोडिलें आणि शाल्वराजावर आणखी बाण सोडिले १७. ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रित झालेल्या त्या प्रद्युम्नाच्या बाणांनीं तें दैत्यास्त्र सत्वर धडकावून लाविलें आणि रक्तप्राशन करणाऱ्या त्या बाणांनीं मस्तक, वक्षःस्थल आणि मुख इतक्या ठिकाणीं शाल्वराजाला वेध केला असतां तो मूर्छित होऊन खालीं पडला १८ व ह्याप्रमाणें प्रद्युम्नाच्या बाणांनीं व्यथित झाल्यामुळें तो क्षुद्र शाल्वराजा मूर्छित होऊन पडला असतां त्या रुक्मिणीपुत्रानें रिपूचा नाश करणारा असा दुसरा एक बाण धनुष्याला लाविला १९. सर्व यादवसमुदायांना मान्य व भुजंग, सूर्य आणि अग्नि ह्यांप्रमाणें तेजस्वी असा तो बाण धनुष्याच्या प्रत्यंचेला लागत असल्याचें अवलोकन करून अंतरिक्षामध्यें हाहाकार उडून गेला २०. तेव्हां इंद्र व कुबेर ह्यांसहवर्तमान सर्व देवगणांनी नारद आणि मनाप्रमाणें वेगवान् वायु ह्यांना प्रद्युम्नाकडे पाठविलें २१ व तेही उभयतां रुक्मिणीपुत्र प्रद्युम्नासमीप येऊन देवांचा निरोप सांगूं लागले कीं " हे वीरा, ह्या शाल्वराजाचा वध करणें तुला कदापि योग्य नाहीं २२. संग्रामामध्यें तूं ह्याचा वध करूं नकोस. अरे, तूं जो हा बाण धनुष्याला लाविला आहेस त्या बाणाला युद्धामध्यें कोणीही पुरुष अवध्य नाहीं. ह्याकरितां, तूं आपला बाण माघारा घे २३. हे महापराक्रमी प्रद्युम्ना, रणामध्यें देवकिनंदन श्रीकृष्ण ह्या शाल्वराजाचा मृत्यु ह्मणून विधात्यानें ठरविलेला आहे; तरी

त्तमम् । संजहार धनुःश्रेष्ठात्तूणे चैव न्यवेशयत् २५ तत उत्थाय राजेन्द्र शाल्वः परमदुर्मनाः । व्यपायात्सबलस्तूर्णं प्रद्युम्नशरपीडितः २६ स द्वारकां परित्यज्य क्रूरो वृष्णिभिरर्दितः । सौभमास्थाय राजेन्द्र दिवमाचक्रमे तदा २७ [ ७८३ ] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां ० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने ऊनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

वासुदेव उवाच । आनर्तनगरं मुक्तं ततोऽहमगमं तदा । महाक्रतौ राजसूये निवृत्ते नृपते तव १ अपश्यं द्वारकां चाहं महाराज हतत्विषम् । निःस्वाध्यायवषट्कारां निर्भूषणवरस्त्रियम् २ अनभिज्ञेयरूपाणि द्वारकोपवनानि च । दृष्ट्वा शङ्कोपपन्नोऽहमपृच्छं हृदिकात्मजम् ३ अस्वस्थनरनारीकमिदं वृष्णिकुलं भृशम् । किमिदं नरशार्दूल श्रोतुमिच्छामि तत्त्वतः ४ एवमुक्तः स तु मया विस्तरेणेदमब्रवीत् । रोधं मोक्षं च शाल्वेन हार्दिक्यो राजसत्तम ५ ततोऽहं भरतश्रेष्ठ श्रुत्वा सर्वमशेषतः । विनाशे

---

तें विधात्याचें ठरविणें मिथ्या होऊं नये " २४. ह्याप्रमाणें त्या उभयतांनीं सांगितलें असतां प्रद्युम्न पराकाष्ठेचा आनंदित झाला आणि आपला उत्कृष्ट बाण श्रेष्ठ धनुष्यापासून परत घेऊन त्यानें भात्यामध्येंच ठेविला २५. असो. हे नृपश्रेष्ठा, प्रद्युम्नाच्या बाणांनीं व्यथित झालेला तो शाल्वराजा नंतर उठला आणि पराकाष्ठेचा खिन्न होऊन सैन्यासहवर्तमान सत्वर परत गेला २६. सारांश, हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, वृष्णिकुलांतील पुरुषांनीं जेरीस आणिलेला तो शाल्वराजा द्वारका सोडून आणि सौभनगरामध्यें बसून आकाशमार्गानें चालता झाला २७. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं एकुणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

श्रीकृष्ण सांगतातः— हे राजा, तुझा राजसूय महाक्रतु समाप्त झाल्यावर शाल्वराजानें सोडिलेल्या आनर्त देशाच्या राजधानीला मी गेलों १. परंतु, हे महाराजा, द्वारकेमध्यें शोभा कसली ती मुळींच नाहीं, वेदाध्ययन आणि यज्ञयाग हीं कोठेही सुरू नाहींत आणि श्रेष्ठ स्त्रियांनीं भूषणें धारण केलेलीं नाहींत असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें २. द्वारकेसमीप असलेलीं उपवनें ओळखनाशीं झालेलीं आहेत असें आढळून आल्यामुळें मला शंका येऊन " हे पुरुषश्रेष्ठा, ह्या वृष्णिकुलांतील पुरुष व स्त्रिया अत्यंत अस्वस्थ आहेत हें काय ? अरे, काय झालें असेल तें खरें खरें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे " असें मीं कृतवर्म्याला विचारिलें ३, ४ आणि ह्याप्रमाणें विचारिलें असतां, हे नृपश्रेष्ठा धर्मराजा, शाल्वराजाचा द्वारकेला पडलेला वेढा आणि त्यापासून झालेली सुटका ह्यांविषयीं सविस्तर हकीकत मला त्यानें कथन केली ५. तेव्हां, हे

शाल्वराजस्य तद्वैवाकरवं मतिम् ६ ततोहं भरतश्रेष्ठ समाश्वास्य पुरे जनम् । राजानमाहुकं चैव तथैवानकदुन्दुभिम् ७ सर्वान्वृष्णिप्रवीरांश्च हर्षयन्नब्रुवं तदा । अप्रमादः सदा कार्यो नगरे यादवर्षभाः ८ शाल्वराजविनाशाय प्रयातं मां निबोधत । नाहत्वा तं निवर्तिष्ये पुरीं द्वारवतीं प्रति ९ सशाल्वं सौभनगरं हत्वा द्रष्टास्मि वः पुनः । त्रिःसामा हन्यतामेषा दुन्दुभिः शत्रुभीषणा १० ते मयाश्वासिता वीरा यथावद्भरतर्षभ । सर्वे मामब्रुवन्हृष्टाः प्रयाहि जहि शात्रवान् ११ तैः प्रहृष्टात्मभिर्वीरैराशीर्भिरभिनन्दितः । वाचयित्वा द्विजश्रेष्ठान्प्रणम्य शिरसा भवम् १२ शैब्यसुग्रीवयुक्तेन रथेनानादयन्दिशः । प्रध्माय शङ्खप्रवरं पाञ्चजन्यमहं नृप १३ प्रयातोस्मि नरव्याघ्र बलेन महता वृतः । क्लृप्तेन चतुरङ्गेण यत्तेन जितकाशिना १४ समतीत्य बहून्देशान्गिरींश्च बहुपादपान् । सरांसि सरितश्चैव मार्तिकावतमासदम् १५ तत्राश्रौषं नरव्याघ्र शाल्वं सागरमन्तिकात् ।

---

भरतवंशजश्रेष्ठा, त्याच्यापासून सर्व वृत्तांत निःशेषपणें श्रवण केल्यावर शाल्वराजाचा नाश करण्याविषयीं मी तत्क्षणींच निश्चय केला ६. नंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, नगरांतील लोक, राजा उग्रसेन आणि त्याचप्रमाणें वसुदेव ह्यांना धीर देऊन ७ वृष्णिकुलोत्पन्न सर्व वीरांना हर्ष उत्पन्न करीत करीत मी ह्मणालों " हे यादवश्रेष्ठहो, नगरामध्यें तुह्मी सर्वदां सावधपणा ठेवीत जा ८. शाल्वराजाचा नाश करण्याकरितां मी निघालों आहें असें तुह्मी समजा. त्याचा वध केल्यावांचून मी द्वारवती नगरीला परत येणार नाहीं ९. शाल्वराजासहवर्तमान सौभनगराचा नाश केल्यावर मी पुनरपि तुमची भेट घेईन. करितां नीच, मंद्र आणि तार ह्या तिन्ही स्वरांमध्यें रिपूंना भय उत्पन्न करणारी ही नौबद वाजवा " १०. हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, ह्याप्रमाणें मी त्या वीरांना आश्वासन दिलें असतां " जा आणि रिपूंचा वध कर " असें सर्व आनंदित होऊन मला ह्मणाले ११. नंतर, ज्यांचीं अंतःकरणें सुप्रसन्न झालेलीं आहेत अशा त्या वीरांनीं आशीर्वादांच्या योगानें माझें अभिनंदन केलें असतां द्विजश्रेष्ठांकडून स्वस्तिवाचन करवून मी शंकराला मस्तकानें प्रणाम केला १२ आणि नंतर, हे पुरुषश्रेष्ठा राजा, पांचजन्यनामक श्रेष्ठ शंख फुंकून विजयी आणि स्वकार्याविषयीं तत्पर असें सज्ज झालेलें मोठें चतुरंग सैन्य बरोबर घेऊन शैब्य आणि सुग्रीव ह्या जातींचे अश्व जोडिलेल्या रथानें दश दिशा नादित करीत करीत मी निघालों १३, १४ तों अनेक देश, असंख्य वृक्षांनीं युक्त असे अनेक पर्वत, सरोवरें आणि नद्या ओलांडून थेट मार्तिकावत देशाला जाऊन धडकलों १५ आणि त्या ठिकाणीं, हे पुरुषश्रेष्ठा,

प्रयान्तं सौभमास्थाय तमहं पृष्ठतोऽन्वयाम् १६ ततः सागरमासाद्य कुक्षौ तस्य महोर्मिणः । समुद्रनाभ्यां शाल्वोऽभूत्सौभमास्थाय शत्रुहन् १७ स समालोक्य दूरान्मां स्मयन्निव युधिष्ठिर । आह्वयामास दुष्टात्मा युद्धायैव मुहुर्मुहुः १८ तस्य शार्ङ्गविनिर्मुक्तैर्बहुभिर्मर्मभेदिभिः । पुरं नासाद्यत शरैस्ततो मां रोष आविशत् १९ स चापि पापप्रकृतिर्दैतेयापसदो नृप । मय्यवर्षत दुर्धर्षः शरधाराः सहस्रशः २० सैनिकान्मम सूतं च हयांश्च समवाकिरत् । अचिन्तयन्तस्तु शरान्वयं युध्याम भारत २१ ततः शतसहस्राणि शराणां नतपर्वणाम् । चिक्षिपुः समरे वीरा मयि शाल्वपदानुगाः २२ ते हयांश्च रथं चैव तदा दारुकमेव च । छादयामासुरसुरास्तैर्बाणैर्मर्मभेदिभिः २३ न हया न रथो वीर न यन्ता मम दारुकः । अदृश्यन्त शरैश्छन्नास्तथाहं सैनिकाश्च मे २४ ततोऽहमपि कौन्तेय शराणामयुतान्बहून् । आमन्त्रितानां धनुषा दिव्येन विधिनाक्षिपम् २५ न तत्र विषयस्त्वासीन्मम सैन्यस्य भारत । खे वि-

सौभनगरांत बसून शाल्वराजा समुद्रासमीप जात आहे असें समजल्यावर मी त्याच्या मागोमाग गेलों १६. हे रिपुनाशका युधिष्ठिरा, तदनंतर आपल्या सौभनगरांत बसून समुद्रासंनिध गेल्यावर शाल्वराजा प्रचंड लाटांनीं युक्त असलेल्या त्या समुद्राच्या उदरामध्यें ह्मणजे समुद्रनाभीमध्यें सुरक्षित होऊन बसला १७ आणि, हे युधिष्ठिरा, दुरूनच मला अवलोकन करून तो दुरात्मा उपहासपूर्वक वारंवार युद्धार्थ आह्वान करूं लागला १८. तेव्हां मीं शार्ङ्ग धनुष्यापासून अनेक मर्मभेदक बाण सोडिले; तथापि, ते त्याच्या त्या सौभसंज्ञक नगराला जाऊन पोंचले नाहींत. तेव्हां मला क्रोध आला १९. शिवाय, हे राजा, दुरात्मा व जिंकण्यास अशक्य अशा त्या अधम दैत्यानें हजारों बाणसमुदायांचा माझ्यावर वर्षाव केला २० व माझे सैनिक, सारथि आणि अश्व ह्यांनाही त्यानें बाणांनीं आच्छादून टाकिलें. तथापि, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, त्याच्या बाणांची पर्वा न करितां आह्मी युद्ध करीतच होतों २१. तदनंतर शाल्वराजाच्या वीर अनुयायांनी समरांगणामध्यें तीक्ष्ण अग्रांनीं युक्त असे लाखों बाण माझ्यावर टाकिले २२. सारांश, मर्मभेदक बाणांच्या योगानें त्या दैत्यांनीं अश्व, रथ आणि दारुक सारथि ह्यांना अगदीं आच्छादून टाकिलें २३. तेव्हां, हे वीरा धर्मराजा, माझे अश्व, रथ, सारथि दारुक, मी आणि माझ्या बाजूचे योद्धे असे सर्वही बाणांनीं आच्छादित झाल्यामुळें दिसेनासे झालों २४. नंतर, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, मीही अलौकिक अस्त्रविद्येनें अभिमंत्रित केलेले असे लाखों बाण धनुष्याच्या योगानें शत्रूंवर टाकिले २५. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, आकाशामध्यें संलग्न झालेलें तें सौभनगर

च्छ्रं हि तत्सौभं क्रोशमात्र इवाभवत् २६ ततस्ते प्रेक्षकाः सर्वे रङ्गवाट इव
स्थिताः । हर्षयामासुरुच्चैर्मां सिंहनादतलस्वनैः २७ मत्कराग्रविनिर्मुक्ता
दानवानां शरास्तथा । अङ्गेषु रुचिरापाङ्गा विविशुः शलभा इव २८ ततो
हलहलाशब्दः सौभमध्ये व्यवर्धत। वध्यतां विशिखैस्तीक्ष्णैः पततां च महार्णवे
२९ ते निकृत्तभुजस्कन्धाः कबन्धाकृतिदर्शनाः । नदन्तो भैरवान्नादान्नि-
पतन्ति स्म दानवाः ३० पतितास्तेपि भक्ष्यन्ते समुद्राम्भोनिवासिभिः ।
ततो गोक्षीरकुन्देन्दुमृणालरजतप्रभम् ३१ जलजं पाञ्चजन्यं वै प्राणेनाह-
मपूरयम् । तान्दृष्ट्वा पतितांस्तत्र शाल्वः सौभपतिस्ततः ३२ मायायुद्धेन
महता योधमामास मां युधि । ततो गदा हलाः प्रासाः शूलशक्तिपर-
श्वधाः ३३ असयः शक्तिकुलिशपाशर्ष्टिकनपाः शराः । पट्टिशाश्च भुशु-
ण्ड्यश्च प्रपतन्त्यनिशं मयि ३४ तामहं माययैवाशु प्रतिगृह्य व्यनाशयम् । तस्यां

---

भूमीपासून सुमारें एक कोसभर उंच असल्यामुळें त्याचे ठिकाणीं माझ्या सैन्याचा कांही एक उपाय चालेनासा झाला ( तात्पर्य, ज्या ठिकाणीं तें सौभसंज्ञक नगर होतें तो अंतरिक्षांतील उच्च प्रदेश माझ्या सैन्यानें टाकिलेल्या शस्त्रास्त्रांच्या अटोक्यांतीलच नव्हता ) २६. असो. अलौकिक अस्त्रविद्येच्या योगानें मी बाण टाकूं लागलों असतां ते सर्व माझे सैनिक रंगसभेंतील प्रेक्षकांप्रमाणें स्वस्थ उभे राहिले आणि सिंहनाद व टाळ्या ह्यांच्या मोठमोठ्या शब्दांनीं त्यांनीं मला उत्तेजन दिलें २७. तदनंतर उत्कृष्ट पिसांनीं युक्त असे माझ्या हातांतून सुटलेले बाण टोळांप्रमाणें दैत्यांच्या अवयवांमध्यें प्रविष्ट झाले २८. तेव्हां माझ्या तीक्ष्ण बाणांनीं वध पावून दैत्य महासागरामध्यें पडूं लागले असतां त्या आकाशगामी सौभनगरामध्यें हाहाकार उडाला २९. बाहु आणि स्कंध छिन्न होऊन दिसण्यांत कबंधाकार झालेले ते दैत्य भयंकर गर्जना करीत करीत महासागरामध्यें पडत होते ३० आणि पडल्यावर समुद्राच्या जलामध्यें वास्तव्य करणारे जलचर प्राणी त्यांना भक्षण करीत होते. ह्याप्रमाणें त्या सौभनगराची अवस्था झाल्यानंतर गोदुग्ध, कुंदपुष्प, चंद्र, श्वेत कमल, रौप्य इत्यादिकांप्रमाणें शुभ्र कांतीनें युक्त असलेला ३१ पांचजन्य शंख मीं जोरानें वाजविला. असो. समुद्रामध्यें पडलेल्या त्या दैत्यांना अवलोकन केल्यावर सौभनगराधिपति शाल्वराजा ३२ मोठ्या मायावी युद्धानें संग्रामामध्यें माझ्याशीं लढूं लागला. तेव्हां गदा, नांगर, भाले, शूल, शक्ति, कुऱ्हाडी ३३, तरवारी आणि कार्तिकस्वामीची शक्ति, इंद्राचें वज्र, वरुणाचा पाश व यमधर्माचा दंड ह्या आयुधांशीं बरोबरी करणारे बाण, पट्टे आणि भुशुंडी हीं एकसारखीं माझ्यावर पडूं लागलीं ३४. परंतु, मीं त्या मायेला मान देऊन मायेच्याच

हतायां मायायां गिरिशृङ्गैरयोधयत् ३५ ततोभवत्तम इव प्रकाश इव चाभवत्। दुर्दिनं सुदिनं चैव शीतमुष्णं च भारत ३६ अङ्गारपांसुवर्षं च शस्त्रवर्षं च भारत। एवं मायां प्रकुर्वाणो योधयामास मां रिपुः ३७ विज्ञाय तदहं सर्वं माययैव व्यनाशयम्। यथाकालं तु युद्धेन व्यधमं सर्वतः शरैः ३८ ततो व्योम महाराज शतसूर्यमिवाभवत्। शतचन्द्रं च कौन्तेय सहस्रायुततारकम् ॥ ततो नाज्ञायत तदा दिवारात्रं तथा दिशः ३९ ततोहं मोहमापन्नः प्रज्ञास्त्रं समयोजयम्। ततस्तदस्त्रं कौन्तेय धूतं तूलमिवानिलैः ४० तथा तदभवद्युद्धं तुमुलं लोमहर्षणम्। लब्धालोकस्तु राजेन्द्र पुनः शत्रुमयोधयम् ४१ [८२४] इति० शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यामारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने विंशोध्यायः ॥ २० ॥

वासुदेव उवाच ॥ एवं स पुरुषव्याघ्रः शाल्वराजो महारिपुः। युध्य-

---

योगानें सत्वर तिचा नाश करून टाकिला. तथापि, त्या मायेचा नाश झाल्यावर तो शाल्वराजा पर्वतशिखरांनीं युद्ध करूं लागला ३५. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, कांहीं वेळ अंधकाराप्रमाणें व कांहीं वेळ प्रकाशाप्रमाणें ह्मणजे अर्थात् कांहीं वेळ आकाश मेघाच्छादित झाल्याप्रमाणें व कांहीं वेळ निरभ्र झाल्याप्रमाणें होऊन कांहीं वेळ शैत्य व कांहीं वेळ उष्ण भासूं लागलें ३६ व त्याचप्रमाणें, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अंगार व धूळ ह्यांची वृष्टि होऊन शस्त्रांचाही वर्षाव होऊं लागला. ह्याप्रमाणें मायेचें अवलंबन करून शत्रु शाल्वराजा माझ्याशीं युद्ध करूं लागला ३७ असतां मीं तें सर्व जाणिलें आणि मायेनेंच त्याचा नाश करून टाकिला व अशाप्रकारें हळूं हळूं युद्ध करितां करितां आलेलें काहूर बाणांच्याच योगानें सर्व बाजूंनीं उडवून दिलें ३८. परंतु, हे महाराजा, तदनंतर आकाश शेंकडों सूर्यांनीं व घटकेंत शेंकडों चंद्र आणि हजारों लाखों नक्षत्रें ह्यांनीं युक्त झाल्यासारखें भासूं लागल्यामुळें हा दिवस आहे किंवा ही रात्र आहे हें मला समजेनासें होऊन दिशांचेंही भान नाहीसें झालें ३९. तेव्हां मी मोहग्रस्त झालों असतां प्रज्ञास्त्राची योजना केली व तत्क्षणींच, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, वायूच्या योगानें उडून जाणाऱ्या कापसाप्रमाणें माझ्या प्रज्ञास्त्राच्या योगानें शाल्वराजाचें तें मायामय अस्त्र उडून गेलें ४०. परंतु, त्यावेळीं त्याच्याशीं जें युद्ध झालें तें तर अंगावर कांटा येण्यासारखें भयंकर होतें. असो. हे राजाधिराज, प्रज्ञास्त्राच्या योगानें भान आल्यानंतर मी पुनरपि शत्रूशीं युद्ध करूं लागलों ४१. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं विसावा अध्याय समाप्त झाला॥२०॥

श्रीकृष्ण सांगतात:—ह्याप्रमाणें तो महाशत्रु पुरुषश्रेष्ठ शाल्वराजा संग्रामामध्यें माझ्याशीं

मानो मया सङ्ख्ये वियदभ्यगमत्पुनः १ ततः शतघ्नीश्च महागदाश्च दीप्तांश्च शूलान्मुसलानसींश्च । चिक्षेप रोषान्मयि मन्दबुद्धिः शाल्वो महाराज जयाभिकाङ्क्षी २ तानाशुगैरापततोऽहमाशु निवार्य हन्तुं खगमान्ख एव । द्विधा त्रिधा चाच्छिनमाशु मुक्तस्ततोऽन्तरिक्षे निनदो बभूव ३ ततः शतसहस्रेण शराणां नतपर्वणाम् । दारुकं वाजिनश्चैव रथं च समवाकिरत् ४ ततो मामब्रवीद्वीर दारुको विह्वलन्निव । स्थातव्यमिति तिष्ठामि शाल्वबाणप्रपीडितः ५ अवस्थातुं न शक्नोमि अङ्गं मे व्यवसीदति ६ इति तस्य निशम्याहं सारथेः करुणं वचः । अवेक्षमाणो यन्तारमपश्यं शरपीडितम् ७ न तस्योरसि नो मूर्ध्नि न काये न भुजद्वये । अन्तरं पाण्डवश्रेष्ठ पश्याम्यनिचितं शरैः ८ स तु बाणवरोत्पीडाद्विस्रवत्यसृगुल्बणम् । अभिवृष्टे यथा मेघे गिरिर्गैरिकधातुमान् ९ अभीषुहस्तं तं दृष्ट्वा सीदन्तं सारथिं रणे । अस्तम्भयं महाबाहो शाल्वबाणप्रपीडितम् १० अथ मां पुरुषः कश्चि-

---

युद्ध करीत असतांना पुनरपि आकाशामध्यें गेला १ आणि तेथून, हे महाराजा, जयाची इच्छा धरून त्या मंदमति शाल्वानें शतघ्नी, मोठमोठ्या गदा, प्रदीप्त शूल, मुसळें व खड्ग ह्यांचा रागारागानें माझ्यावर भडिमार सुरू केला २. परंतु, त्या मजकडे येत असलेल्या खड्गप्रभृतींचें मीं बाणांच्या योगानें सत्वर निवारण केलें आणि आकाशगामी दैत्यांचा आकाशामध्येंच वध करण्याकरितां सत्वर सोडिलेल्या दुसऱ्या बाणांच्या योगानें मी त्यांचे दोन दोन तीन तीन तुकडे करून टाकिले; तेव्हां अंतरिक्षामध्यें गडबड झाली ३. नंतर शाल्वराजानें कुटिल अग्रांनीं युक्त अशा लाखो बाणांच्या योगानें दारुक सारथि, अश्व आणि रथ ह्यांना आच्छादून टाकिलें ४. तेव्हां, हे वीरा, विवळत विवळत दारुक सारथि मला ह्मणाला " शाल्वराजाच्या बाणांनीं पीडित झालों असल्यामुळें माझें आंग मोडून आलें आहे; मला आतां रथावर ठरण्याचें सामर्थ्य नाहीं; केवळ रथावर ठरलेंच पाहिजे ह्मणून मी ठरलों आहें " ५,६. ह्याप्रमाणें त्या सारथ्याचें दीन भाषण श्रवण केल्यावर मी त्याच्याकडे पाहूं लागलों तों तो सारथि बाणांनीं अगदीं पीडित झाल्याचें माझ्या दृष्टीस पडलें ७. हे पांडवश्रेष्ठा धर्मराजा, त्या सारथ्याचें वक्षःस्थल, मस्तक, मध्यशरीर आणि दोन हात ह्यांचे ठिकाणीं बाणांनीं व्याप्त न झालेली अशी यत्किंचितूही जागा नव्हती ८. तीक्ष्ण बाणांनीं शरीराला पडलेल्या क्षतांतून मळमळ रक्त वाहूं लागल्यामुळें तो सारथि मेघवृष्टि झाल्यानंतर गैरिक धातूनें युक्त असलेला पर्वत जसा दिसतो तसा दिसूं लागला ९. असो. हे महापराक्रमी युधिष्ठिरा, ज्यानें आपल्या हातांत अश्वांच्या रश्मि धरिल्या आहेत असा तो सारथि शाल्वराजाच्या

द्वारकानिलयोऽब्रवीत् । त्वरितो रथमारोप्य सौहृदादिव भारत ११ आहुकस्य वचो वीर तस्यैव परिचारकः । विषण्णः सन्नकण्ठेन तन्निबोध युधिष्ठिर १२ द्वारकाधिपतिर्वीर आह त्वामाहुको वचः। केशवेहि विजानीष्व यत्त्वां पितृसखोऽब्रवीत् १३ उपायायाय शाल्वेन द्वारकां वृष्णिनन्दन । विषक्ते त्वयि दुर्धर्ष हतः शूरसुतो बलात् १४ तदलं साधु युद्धेन निवर्तस्व जनार्दन । द्वारकामेव रक्षस्व कार्यमेतन्महत्तव १५ इत्यहं तस्य वचनं श्रुत्वा परमदुर्मनाः । निश्चयं नाधिगच्छामि कर्तव्यस्येतरस्य च १६ सात्यकिं बलदेवं च प्रद्युम्नं च महारथम् । जगर्हे मनसा वीर तच्छ्रुत्वा महदप्रियम् १७ अहं हि द्वारकायाश्च पितुश्च कुरुनन्दन । तेषु रक्षां समाधाय प्रयातः सौभपातने १८ बलदेवो महाबाहुः कच्चिज्जीवति शत्रुहा। सात्यकी रौक्मिणेयश्च चारुदेष्णश्च वीर्यवान् ॥ साम्बप्रभृतयश्चैवेत्यह-

---

बाणांनीं पिडल्यामुळें संग्रामामध्यें धैर्य सोडीत आहे असें अवलोकन केल्याबरोबर मी त्याला धैर्य दिलें १०. इतक्यांत, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, द्वारकेमध्यें वास्तव्य करणारा कोणी एक पुरुष त्वरेत्वरेनें मला रथावर घेऊन मित्रभावानेंच कीं काय मला सांगूं लागला ११. हे वीरा युधिष्ठिरा, उग्रसेनाचा सेवक ह्मणून तो पुरुष आला होता आणि तो अगदीं खिन्न झालेला दिसत होता. तेव्हां सद्गदित कंठानें त्यानें उग्रसेनाचा जो निरोप ह्मणून मला सांगितला तो तूं ऐकून ठेव १२. ( तो ह्मणाला ) " हे केशवा, द्वारकाधिपति वीर उग्रसेनानें तुला निरोप सांगितला आहे. तेव्हां, तुझ्या पित्याच्या मित्रानें जें तुला सांगितलें तें तूं ऐकून घे १३. हे वृष्णिनंदना, हे दुर्धर्षा, शाल्वराजा द्वारकेसमीप आला आणि तूं दुसरीकडे गुंतल्यामुळें त्यानें बलात्कारानें वसुदेवाचा वध केला १४. करितां, हे जनार्दना, शाल्वराजाशीं आतां युद्ध पुरें; तूं आपला बऱ्या विचारानें युद्धांतून निवृत्त होऊन द्वारकेचें रक्षण कर. कारण, हेंच तुझें सांप्रत महत्वाचें कार्य आहे " १५. ह्याप्रमाणें त्याचें भाषण श्रवण करून मी पराकाष्ठेचा खिन्न झालों असतां करावें काय आणि न करावें काय ह्याचा मला कांहींच निश्चय होईना १६. हे वीरा, ती पराकाष्ठेची अप्रिय वार्ता श्रवण करून मी आपल्या मनामध्यें महारथि प्रद्युम्न, सात्यकि व बलराम ह्यांना दोष देऊं लागलों १७. कारण, हे कुरुनंदना युधिष्ठिरा, द्वारका आणि पिता वसुदेव ह्यांच्या रक्षणाचें काम त्यांचेवर सोंपवून मी सौभनगराचा निप्पात करण्याकरितां तेथून निघालों होतों १८. ह्यामुळें महापराक्रमी रिपुनाशक बलराम जिवंत आहे काय ? व त्याचप्रमाणें वीर्यवान् चारुदेष्ण, रुक्मिणीपुत्र प्रद्युम्न, सात्यकि व तसेच सांबप्रभृति जिवंत आहेत काय ? अशी शंका

मासं सुदुर्मनाः १९ एतेषु हि नरव्याघ्र जीवत्सु न कथंचन । शक्यः शूर-
सुतो हन्तुमपि वज्रभृता स्वयम् २० हतः शूरसुतो व्यक्तं व्यक्तं चैते परासवः ।
बलदेवमुखाः सर्व इति मे निश्चिता मतिः २१ सोहं सर्वविनाशं तं चिन्त-
यानो मुहुर्मुहुः । सुविह्वलो महाराज पुनः शाल्वमयोधयम् २२ ततो-
पश्यं महाराज प्रपतन्तमहं तदा । सौभाच्छूरसुतं वीर ततो मां मोह
आविशत् २३ तस्य रूपं प्रपततः पितुर्मम नराधिप । ययातेः क्षीणपु-
ण्यस्य स्वर्गादिव महीतलम् २४ विशीर्णमलिनोष्णीषः प्रकीर्णाम्बरमू-
र्धजः । प्रपतन्दृश्यते ह स्म क्षीणपुण्य इव ग्रहः २५ ततः शार्ङ्गं धनुःश्रेष्ठं
करात्प्रपतितं मम । मोहापन्नश्च कौन्तेय रथोपस्थ उपाविशम् २६ ततो
हाहाकृतं सर्वं सैन्यं मे गतचेतनम् । मां दृष्ट्वा रथनीडस्थं गतासुमिव
भारत २७ प्रसार्य बाहू पततः प्रसार्य चरणावपि । रूपं पितुर्मे विबभौ
शकुनेः पततो यथा २८ तं पतन्तं महाबाहो शूलपट्टिशपाणयः । अभि-

---

येऊन मी पराकाष्ठेचा खिन्न झालों १९. कारण, हे पुरुषश्रेष्ठा, हे बलरामप्रभृति जिवंत असतांना साक्षात् वज्रपाणि इंद्राच्या हातूनही वसुदेवाचा वध होणें शक्य नाहीं २०. तेव्हां ज्याअर्थी धडधडीत वसुदेवाचाच वध झाला त्याअर्थी हे सर्व बलरामप्रभृति गतप्राण झाले हें उघड आहे असा माझा पक्का ग्रह झाला २१. हे महाराजा, ह्याप्रकारें सर्वांचा नाश झाल्याविषयीं मनामध्यें वारंवार चिंतन करीत असल्यामुळें फारच विव्हल होऊन मी पुनरपि शाल्वराजाशीं युद्ध करूं लागलों २२. इतक्यांत, हे महाराजा, सौभनगरापासून वसुदेव खालीं पडत असतांना मीं अवलोकन केला आणि तेव्हां मात्र, हे वीरा, मी मोहग्रस्त झालों २३. हे राजा, पुण्यक्षय झाल्यामुळें स्वर्गांतून भूतलावर पडत असलेल्या ययाति राजाच्या स्वरूपाप्रमाणें सौभनगरांतून पडत असलेल्या त्या माझ्या पित्याचें स्वरूप माझ्या दृष्टीस पडलें २४. फाटकें व मलिन असें शिरस्त्राण आणि अस्ताव्यस्त वस्त्र व केश ह्यांनीं युक्त असलेला तो वसुदेव सौभनगरांतून पडत असतांना पुण्यक्षय झालेला आणि म्हणूनच स्वर्गांतून पतन पावूं लागलेला ग्रहच कीं काय असा दिसूं लागला २५. त्याला अवलोकन केल्यानंतर शार्ङ्गनामक श्रेष्ठ धनुष्य माझ्या हातांतून गळून खालीं पडलें आणि, हे कुंतीपुत्रा, मी मोहग्रस्त होऊन रथावर बसलों २६. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, गतप्राण झाल्याप्रमाणें मी रथनीडावर असल्याचें अवलोकन करून माझ्या सर्व सैन्यामध्यें हाहाकार उडाला व तें सर्व सैन्य मृतवत् झालें २७. हातपाय पसरून खालीं पडत असलेल्या माझ्या पित्याचें रूप आकाशांतून पडणाऱ्या पक्ष्याच्या रूपा-

भ्रान्तो भृशं वीर मम चेतो ह्यकम्पयन् २९ ततो मुहूर्तात्प्रतिलभ्य संज्ञामहं तदा वीर महाविमर्दे । न तत्र सौभं न रिपुं च शाल्वं पश्यामि वृद्धं पितरं न चापि ३० ततो ममासीन्मनसि मायेयमिति निश्चितम् । प्रबुद्धोस्मि ततो भूयः शतशो वाकिरञ्छरान् ३१ [ ८५५ ] इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्यान एकविंशोध्यायः ॥ २१ ॥

वासुदेव उवाच ॥ ततोहं भरतश्रेष्ठ प्रगृह्य रुचिरं धनुः । शरैरपातयं सौभाच्छिरांसि विबुधद्विषाम् १ शरांश्चाशीविषाकारानूर्ध्वगांस्तिग्मतेजसः । प्रैषयं शाल्वराजाय शार्ङ्गमुक्तान्सुवाससः २ ततो नादृश्यत तदा सौभं कुरुकुलोद्वह । अन्तर्हितं मायया भूत्ततोहं विस्मितोभवम् ३ अथ दानवसङ्घास्ते विकृताननमूर्धजाः । उदक्रोशन्महाराज धिष्ठिते मयि भारत ४ ततोस्त्रं शब्दसाहं वै त्वरमाणो महारणे । अयोजयं तद्वधाय ततः शब्द उपारमत् ५ हतास्ते दानवाः सर्वे यैः स शब्द उदीरितः । शरैरादित्यस-

प्रमाणें दिसलें २८. हे महापराक्रमी वीर युधिष्ठिरा, त्या पतन पावणाऱ्या माझ्या पित्याला हातात शूल व पट्ट घेऊन दैत्य एकसारिखे मारीत असल्यामुळें माझ्या अंतःकरणाचा थरकाप झाला २९. परंतु, इतक्यांत, हे वीरा, क्षणभरानें मी चांगला सावध होऊन पाहूं लागलों असतां त्या घोर संग्रामामध्यें सौभनगर, रिपु शाल्व आणि वृद्ध पिता ह्यांपैकी माझ्या कांहींच दृष्टोत्पत्तीस येईना ३०. तेव्हां "ही माया आहे" असा माझ्या मनाचा निश्चय झाला आणि चांगला सावध झाल्यावर मी पुनरपि शेकडो बाण टाकूं लागलों ३१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

श्रीकृष्ण सांगतात:—हे भरतवंशजश्रेष्ठा धर्मराजा, सावध झाल्यानंतर आपलें सुंदर धनुष्य हातांत घेऊन मी सौभनगरापासून दैत्यांचीं मस्तकें बाणांच्या योगानें खालीं पाडिलीं १ आणि उत्कृष्ट पिसें, तीक्ष्ण तेज व सर्पासारिखा आकार ह्यांनीं युक्त असलेले आणि शार्ङ्गधनुष्यापासून सुटलेले बाण शाल्वराजाकडे पाठविले २. तेव्हां, हे कुरुवंशजश्रेष्ठा, तें सौभनगर मायेनें गुप्त झाल्यामुळें एकाएकीं दिसेनासें झालें असतां मी विस्मित झालों ३. हे भरतकुलोत्पन्ना महाराजा, मी धैर्य धरून उभा राहिलों असतां अक्राळविक्राळ मस्तकांनीं व केसांनीं युक्त असलेले ते दैत्यांचे समुदाय ओरडूं लागले ४. नंतर मी शब्दसाह अस्त्र महासंग्रामामध्यें त्या दैत्यांच्या वधाकरितां त्वरा करून योजिलें; तेव्हां तो ओरडा बंद झाला ५. कारण, ज्यांनीं तो ओरडा केला होता त्या सर्व राक्षसांचा सूर्यसमान तेजस्वी आणि प्रज्वलित अशा शब्दवेधी बाणांच्या योगानें वध

ङ्काशैर्ज्वलितैः शब्दसाधनैः ६ तस्मिन्नुपरते शब्दे पुनरेवान्यतोभवत् । शब्दोपरो महाराज तत्रापि प्राहरं शरैः ७ एवं दश दिशः सर्वास्तिर्यगूर्ध्वं च भारत । नादयामासुरसुरास्ते चापि निहता मया ८ ततः प्राग्ज्योतिषं गत्वा पुनरेव व्यदृश्यत । सौभं कामगमं वीरो मोहयन्मम चक्षुषी ९ ततो लोकान्तकरणो दानवो दारुणाकृतिः । शिलावर्षेण महता सहसा मां समावृणोत् १० सोहं पर्वतवर्षेण वध्यमानः पुनः पुनः । वल्मीक इव राजेन्द्र पर्वतोपचितोभवम् ११ ततोहं पर्वतचितः सहयः सहसारथिः । अप्रख्यातिमियां राजन्सर्वतः पर्वतैश्चितः १२ ततो वृष्णिप्रवीरा ये ममासन्सैनिकास्तदा । ते भयार्ता दिशः सर्वे सहसा विप्रदुद्रुवुः १३ ततो हाहाकृतमभूत्सर्वं किल विशांपते । द्यौश्च भूमिश्च खं चैवादृश्यमाने तथा मयि १४ ततो विषण्णमनसो मम राजन्सुहृज्जनाः । रुरुदुश्चुक्रुशुश्चैव दुःखशोकसमन्विताः १५ द्विषतां च प्रहर्षोभूदार्तिश्चाद्विषतामपि । एवं विजितवान्वीर पश्चादश्रौषमच्युत १६ ततोहमिन्द्रदयितं सर्वपाषाणभेदनम् ।

---

झाला ६. तो ओरडा थांबल्यावर पुनरपि दुसरीकडे गलगा झाला; तेव्हां तिकडेही बाणांच्या योगानें मीं त्या गलगा करणाऱ्यांवर प्रहार केले ७. ह्याप्रमाणें, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, आडव्या उभ्या सर्व दाही दिशा त्या दैत्यांनीं नादित करून टाकिल्या आणि ते माझ्या हातून वध पावले ८. नंतर, हे वीरा, तें यथेष्ट संचार करणारें सौभनगर प्राग्ज्योतिषनामक शहराला गेल्यावर पुनरपि दृश्य झालें आणि माझ्या नेत्रांना मोहित करूं लागलें ९. तदनंतर जगताचा नाश करण्यास उद्युक्त व भयकर आकृतीनें युक्त अशा एका दैत्यानें प्रचंड पाषाणवृष्टीच्या योगानें एकाएकीं मला ग्रस्त केलें १०. तेव्हां, हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, पर्वतवर्षावाचे एकसारिखे माझ्यावर प्रहार होऊं लागले असतां पर्वतांनीं भरून गेलेला मी वारुळासारखा दिसूं लागलों ११. सारांश, हे राजा, अश्व आणि सारथि ह्यांसहवर्तमान मी पर्वतानें भरून गेलों असतां दिसेनासा झालों १२. तदनंतर वृष्णिवंशजश्रेष्ठ असे जे माझे सैनिक होते ते सर्व भयानें व्याकुल होऊन एकाएकीं चोहोंकडे पळत सुटले १३. हे प्रजाधिपते, मी दिसेनासा झालों असतां स्वर्ग, अंतरिक्ष आणि पृथ्वी ह्यांमध्यें जिकडेतिकडे हाहाकार उडाला १४. तेव्हां, हे राजा, माझे सुहृद् , दुःख व शोक ह्यांनीं युक्त झाल्यामुळें, मनामध्यें फारच खिन्न झाले आणि रोदन व आक्रोश करूं लागले १५. हे अच्युता वीरा, ह्याप्रमाणें रिपूंना हर्ष आणि मित्रांना दुःख झालें असतां सौभाधिपति शाल्वराजानें मला जिंकि-( त्याविषयीं माझ्या बाजूच्या लोकांची समजूत झा ) त्याचें मीं ऐकिलें. असो १६.

वज्रमुद्यम्य तान्सर्वान्पर्वतान्समशातयम् १७ ततः पर्वतभारार्ता मन्दप्राणविचेष्टिताः । हया मम महाराज वेपमाना इवाभवन् १८ मेघजालमिवाकाशे विदार्याभ्युदितं रविम् । दृष्ट्वा मां बान्धवाः सर्वे हर्षमाहारयन्पुनः १९ ततः पर्वतभारार्तान्मन्दप्राणविचेष्टितान् । हयान्संदृश्य मां सूतः प्राह तात्कालिकं वचः २० साधु संपश्य वार्ष्णेय शाल्वं सौभपतिं स्थितम् । अलं कृष्णावमन्यैनं साधु यत्नं समाचर २१ मार्दवं सखितां चैव शाल्वादद्य व्यपाहर । जहि शाल्वं महाबाहो मैनं जीवय केशव ॥ सर्वैः पराक्रमैर्वीर वध्यः शत्रुरमित्रहन् २२ न शत्रुरवमन्तव्यो दुर्बलोपि बलीयसा । योपि स्यात्पीठगः कश्चित्किं पुनः समरे स्थितः २३ स त्वं पुरुषशार्दूल सर्वयत्नैरिमं प्रभो । जहि वृष्णिकुलश्रेष्ठ मा त्वां कालोत्यगात्पुनः २४ नैष मार्दवसाध्यो वै मतो नापि सखा तव । येन त्वं योधितो वीर द्वारका

---

शाल्वराजानें मला पर्वतांनीं ग्रस्त केल्यानंतर सर्व प्रकारच्या पाषाणांना फोडून टाकणारें व इंद्राला प्रिय असलेलें वज्रास्त्र घेऊन मीं त्या सर्व पर्वतांचे तुकडे तुकडे केले १७. पर्वतांचा वर्षाव सुरू झाला असतां त्यांच्या भारानें पीडित झाल्यामुळें ज्यांची हालचाल व श्वासोच्छ्वास हीं कमी झालीं आहेत असे माझे अश्व, हे महाराजा, कांपूं लागले १८. वज्रास्त्राच्या योगानें पर्वतांचा भेद करून मी दृश्य झालों असतां अभ्रपटलांचें विदारण करून आकाशामध्यें उदय पावलेल्या रवीप्रमाणें मला अवलोकन केल्यावर सर्व बांधवांना पुनरपि हर्ष प्राप्त झाला १९. तदनंतर पर्वतांच्या भारानें व्याकुळ झाल्यामुळें अश्वांचें सामर्थ्य व हालचाल हीं कमी झालीं आहेत असें अवलोकन करून सारथि त्या समयाला अनुरूप असें भाषण माझ्याशीं करूं लागला कीं २० "हे वृष्णिकुलोत्पन्ना, संग्रामामध्यें स्थित असलेल्या सौभनगराधिपति शाल्वराजाला तूं नीट अवलोकन कर. हे कृष्णा, ह्याच्याकडे दुर्लक्ष्य करणें आतां पुरें. आतां तूं ह्याचें पारिपत्य करण्याविषयीं यत्न कर २१. हे महापराक्रमी केशवा, शाल्वराजासंबंधानें मृदुपणा आणि मित्रभाव हीं तूं अगदीं सोडून दे. तात्पर्य, तूं ह्या शाल्वाचा वध करून टाक; ह्याला जिवंत ठेवूं नकोस. हे शत्रुनाशका, सर्वप्रयत्नांनीं शत्रूचा वध करणेंच उचित आहे २२. हे वीरा, बलाढ्य पुरुषानेंही दुर्बलही शत्रूची उपेक्षा करणें योग्य नव्हे. अरे, ( वास्तविक विचार केला असतां ) आपल्या जागीं बसून राहिलेल्याही शत्रूची उपेक्षा करणें अयोग्य आहे. मग समरांगणामध्यें स्थित असलेल्याची तर गोष्ट कशाला पाहिजे ? २३. करितां, हे प्रभो पुरुषोत्तमा, हर प्रयत्नानें तूं याचा वध कर. हे वृष्णिकुलश्रेष्ठा, तूं पुनरपि कालातिक्रमण होऊं देऊं नकोस २४.

चावमर्दिता २५ एवमादि तु कौन्तेय श्रुत्वाहं सारथेर्वचः । तत्त्वमेतदिति ज्ञात्वा युद्धे मतिमधारयम् २६ वधाय शाल्वराजस्य सौभस्य च निपातने । दारुकं चाब्रुवं वीर मुहूर्तं स्थीयतामिति २७ ततोप्रतिहतं दिव्यमभेद्यमतिवीर्यवान् । आग्नेयमस्त्रं दयितं सर्वसाहं महाप्रभम् २८ योजयंस्तत्र धनुषा दानवान्तकरं रणे २९ यक्षाणां राक्षसानां च दानवानां च संयुगे। राज्ञां च प्रतिलोमानां भस्मान्तकरणं महत् ३० क्षुरान्तममलं चक्रं कालान्तकयमोपमम् । अनुमन्त्र्याहमतुलं द्विषतां विनिबर्हणम् ३१ जहि सौभं स्ववीर्येण ये चात्र रिपवो मम । इत्युक्त्वा भुजवीर्येण तस्मै प्राहिणवं रुषा ३२ रूपं सुदर्शनस्यासीदाकाशे पततस्तदा। द्वितीयस्येव सूर्यस्य युगान्ते प्रपतिष्यतः ३३ तत्समासाद्य नगरं सौभं व्यपगतत्विषम् । मध्येन पाटयामास क्रकचो दार्विवोच्छ्रितम् ३४ द्विधा कृतं ततः सौभं सुदर्शनबलाद्धतम् । महेश्वरशरोद्धूतं पपात त्रिपुरं यथा ३५ तस्मिन्निपतिते सौभे

---

अरे, मृदुपणानें हा आपल्या हातांत येणें शक्य नाहीं व हा तुला मित्र ह्मणूनही संमत नाहीं. कारण, हे वीरा, यानें तुझ्याशीं युद्ध करून द्वारकेची धुळदाण केलेली आहे " २५. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, हें व अशाप्रकारचें सारथ्याचें भाषण श्रवण केल्यावर " हें ह्याचें ह्मणणें खरें आहे " असें समजून मीं युद्धामध्यें सौभनगराचा नाश व शाल्वराजाचा वध करण्याचें मनामध्यें आणिलें आणि " क्षणभर धीर धर " ह्मणून दारुक सारथ्याला सांगितलें. २६,२७. नंतर पराकाष्ठेचें वीर्य धारण करून अकुंठित, अलौकिक, अभेद्य, महातेजस्वी व इतर सर्व अस्त्रें सहन करणारें असें २८ दैत्यनाशक आग्नेयनामक प्रिय अस्त्र मीं संग्रामामध्यें धनुष्याला लाविलें. ( ह्मणजे आग्नेय अस्त्रानें अभिमंत्रण करून मी धनुष्याला बाण लाविला ) २९. तें मोठें अस्त्र यक्ष, राक्षस, दानव आणि प्रतिपक्षी राजे ह्यांचें संग्रामामध्यें भस्म करणारें होतें ३०. तथापि तीक्ष्ण अग्रांनीं युक्त व काल, अंतक आणि यम ह्यांचीच उपमा देण्याला योग्य असें रिपुनाशक अतुल निर्मल चक्र मीं अभिमंत्रण केलें ३१ आणि " स्वसामर्थ्यानें सौभाचा व त्यांत इतरही जे माझे रिपु असतील त्यांचा वध कर " असें सांगून आपल्या बाहुबलाच्या योगानें मीं रागारागानें तें त्या सौभनगरावर सोडिलें ३२. ( हे धर्मराजा, प्रलयकालीं जगत् दग्ध करण्याची इच्छा करणारा दुसरा सूर्यच कीं काय असें तें सुदर्शनचक्र आकाशांत जात असतांना दिसूं लागलें ३३. तें सुदर्शनचक्र निस्तेज झालेल्या सौभनगरासमीप गेलें आणि करवत ज्याप्रमाणें मोठें लांकूड कापून काढितो त्याप्रमाणें त्यानें तें सौभनगर मधोमध कापून काढिलें ३४. ह्याप्रमाणें सुदर्श-

चक्रमागात्करं मम। पुनश्चादाय वेगेन शाल्वायेत्यहमब्रुवम् ३६ ततः शाल्वं गदां गुर्वीमाविध्यन्तं महाहवे। द्विधा चकार सहसा प्रजज्वाल च तेजसा ३७ तस्मिन्विनिहते वीरे दानवाः त्रस्तचेतसः। हाहाभूता दिशो जग्मुरर्दिता मम सायकैः ३८ ततोऽहं समवस्थाप्य रथं सौभसमीपतः। शङ्खं प्रध्माय हर्षेण सुहृदः पर्यहर्षयम् ३९ तन्मेरुशिखराकारं विध्वस्ताट्टालगोपुरम्। दह्यमानमभिप्रेक्ष्य स्त्रियस्ताः संप्रदुद्रुवुः ४० एवं निहत्य समरे सौभं शाल्वं निपात्य च। आनर्तान्पुनरागम्य सुहृदां प्रीतिमावहम् ४१ तदेतत्कारणं राजन्यदहं नागसाह्वयम्। नागमं परवीरघ्न न हि जीवेत्सुयोधनः ४२ मय्यागतेऽथ वा वीर द्यूतं न भविता यथा। अद्याहं किं करिष्यामि भिन्नसेतुरिवोदकम् ४३ वैशम्पायन उवाच॥ एवमुक्त्वा महाबाहुः कौरवं पुरुषोत्तमः। आमन्त्र्य प्रययौ श्रीमान्पाण्डवान्मधुसूदनः ४४ अभिवाद्य महाबाहुर्धर्मराजं युधिष्ठिरम्। राज्ञा मूर्ध-

---

नाच्या सामर्थ्यानें नाश पावलेलें आणि दोन तुकडे झालेलें तें सौभनगर महेश्वराच्या बाणानें उध्वस्त झालेल्या त्रिपुराप्रमाणें खालीं पडलें ३५. तें सौभनगर पडल्यावर चक्र माझ्या हातांत आलें; तेव्हां " शाल्वराजाचा नाश करण्याकरितां जा " असें मी बोललों आणि तें चक्र हातांत घेऊन वेगानें शाल्वराजाकडे सोडिलें ३६. तेव्हां महायुद्धामध्यें प्रचंड गदा फिरवीत असलेल्या शाल्वराजाचे स्वतःच्या तेजानें एकदम दोन तुकडे करून तें सुदर्शनचक्र प्रज्वलित झालें ३७. ह्याप्रमाणें त्या वीर शाल्वराजाचा वध झाला असतां आधींच माझ्या बाणांनीं पीडित झालेले दैत्य मनामध्यें गांगरून गेले आणि हाय हाय करीत करीत चोहोंकडे पळत सुटले ३८. तदनंतर मी आपला रथ त्या पतन पावलेल्या सौभनगरासमीप उभा केला आणि हर्षानें शंख फुंकून सुहृदांना आनंद दिला ३९. (हे धर्मराजा) ज्याच्यांतील गच्चांचा व गोपुरांचा विध्वंस झालेला आहे असें तें आकृतीनें मेरुपर्वताच्या शिखरासारिखें असलेलें सौभनगर जळत असल्याचें अवलोकन करून त्यांतील स्त्रिया पळून जाऊं लागल्या ४०. असो. ह्याप्रमाणें समरांगणामध्यें सौभनगराचा नायनाट करून मीं शाल्वराजाचा वध केला आणि आनर्त देशाला पुनरपि जाऊन सुहृदांना आनंद दिला ४१. हे राजा, मी हास्तिनपुरास आलों नाहीं ह्याचें हें कारण होय. हे शत्रुपक्षीयवीरनाशका, मी जर आलों असतों तर दुर्योधन जिवंत राहिला नसता ४२. किंवा, मी आलोंच असतों तर तशा प्रकारें तरी द्यूत झालें नसतें. परंतु, उदकापुढें फुटक्या बांधाचें जसें कांहीं चालत नाहीं त्याप्रमाणें आज माझ्या हातून काय होणार ? ४३. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें कुरुकुलोत्पन्न धर्मराजाला सांगितल्यावर ते महापराक्रमी व वैभवशाली

न्युपाघ्रातो भीमेन च महाभुजः ४५ परिष्वक्तश्चार्जुनेन यमाभ्यां चाभि-
वादितः । संमानितश्च धौम्येन द्रौपद्या चार्चितोऽश्रुभिः ४६ सुभद्राम-
भिमन्युं च रथमारोप्य काञ्चनम् । आरुरोह रथं कृष्णः पाण्डवैरभिपू-
जितः ४७ शैब्यसुग्रीवयुक्तेन रथेनादित्यवर्चसा । द्वारकां प्रययौ कृष्णः
समाश्वास्य युधिष्ठिरम् ४८ ततः प्रयाते दाशार्हे धृष्टद्युम्नोऽपि पार्षतः।
द्रौपदेयानुपादाय प्रययौ स्वपुरं तदा ४९ धृष्टकेतुः स्वसारं च समादायाथ
चेदिराट् । जगाम पाण्डवान्दृष्ट्वा रम्यां शुक्तिमतीं पुरीम् ५० कैकेया-
श्चाप्यनुज्ञाताः कौन्तेयेनामितौजसा । आमन्त्र्य पाण्डवान्सर्वान्प्रय-
युस्तेऽपि भारत ५१ ब्राह्मणाश्च विशश्चैव तथा विषयवासिनः । विसृज्य-
मानाः सुभृशं न त्यजन्ति स्म पाण्डवान् ५२ समवायः स राजेन्द्र
सुमहाद्भुतदर्शनः । आसीन्महात्मनां तेषां काम्यके भरतर्षभ ५३ युधि-
ष्ठिरस्तु विप्रांस्ताननुमान्य महामनाः । शशास पुरुषान्काले रथान्यो-

मधुदैत्यनाशक पुरुषोत्तम पांडवांचा निरोप घेऊन द्वारकेस जाण्याकरितां निघाले ४४. प्रथमतः त्या महापराक्रमी श्रीकृष्णांनी धर्मराज युधिष्ठिराला व भीमसेनाला अभिवदन केलें असतां धर्मराजा आणि भीमसेन ह्यांनीं त्या आजानुबाहु श्रीकृष्णांचे मस्तकी अवघ्राण केलें ४५. अर्जुनानें त्यांना आलिंगन दिलें, नकुलसहदेवांनी अभिवदन केलें. धौम्य मुनींनी त्यांचा संमान केला आणि द्रौपदीनेंही डोळ्यांमध्यें अश्रु आणून त्यांचें पूजन केलें ४६. नंतर पांडवांनी मानमान्यता ठेविलेले ते श्रीकृष्ण सुभद्रा आणि अभिमन्यु ह्यांना आपल्या सुवर्णमय रथांत बसवून आपणही रथावर आरूढ झाले ४७ आणि युधिष्ठिराला धीर देऊन शैब्य व सुग्रीव हे अश्व ज्याला जोडिले आहेत आणि ज्याचें तेज सूर्यासारिखें आहे अशा आपल्या रथाच्या योगानें श्रीकृष्ण द्वारकेकडे चालते झाले ४८. ह्याप्रमाणें दशार्हकुलोत्पन्न श्रीकृष्ण द्वारकेस गेले असतां पार्षत धृष्टद्युम्नही द्रौपदीच्या पुत्रांना घेऊन आपल्या नगराकडे चालता झाला ४९. नंतर शिशुपालपुत्र चेदिदेशाधिपति धृष्टकेतुही आपल्या भगिनीला ) ह्मणजे करेणुमतीनामक नकुलाच्या भार्येला ) घेऊन आणि पांडवांना भेटून शुक्तिमतीनामक रम्य नगरीकडे जाण्याकरितां निघाला ५०. नंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, अपरिमित तेजानें युक्त असलेल्या कुंतीपुत्र युधिष्ठिरानें अनुज्ञा दिल्यावर सहदेवाचे शालक केकयदेशाधिपतिही सर्व पांडवांचा निरोप घेऊन ( स्वदेशीं ) चालते झाले ५१. पुढें तद्देशनिवासी ब्राह्मणांना आणि वैश्यांना निक्षून निरोप मिळूं लागला असतांही त्यांनीं पांडवांना सोडिलें नाहीं ५२. त्यामुळें, हे भरतवंशजश्रेष्ठा राजाधिराज जनमेजया, दिसण्यांतही अत्यंत अद्भुत असलेला

जयतेति वै ५४ [ ९०९ ] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि सौभवधोपाख्याने द्वाविंशोऽध्यायः ॥२२॥

वैशम्पायन उवाच ॥ तस्मिन्दशार्हाधिपतौ प्रयाते युधिष्ठिरो भीमसेनार्जुनौ च । यमौ च कृष्णा च पुरोहितश्च रथान्महार्हान्परमाश्वयुक्तान् १ आस्थाय वीराः सहिता वनाय प्रतस्थिरे भूतपतिप्रकाशाः । हिरण्यनिष्कान्वसनानि गाश्च प्रदाय शिक्षाक्षरमन्त्रविद्भ्यः २ प्रेष्याः पुरो विंशतिरात्तशस्त्रा धनूंषि शस्त्राणि शरांश्च दीप्तान् । मौर्वीश्च यन्त्राणि च सायकांश्च सर्वे समादाय जघन्यमीयुः ३ ततश्च वासांसि च राजपुत्र्या धात्र्यश्च दास्यश्च विभूषणं च । तदिन्द्रसेनस्त्वरितः प्रगृह्य जघन्यमेवोपययौ रथेन ४ ततः कुरुश्रेष्ठमुपेत्य पौराः प्रदक्षिणं चक्रुरदीनसत्त्वाः । तं ब्राह्मणाश्चाभ्यवदन्प्रसन्ना मुख्याश्च सर्वे कुरुजाङ्गलानाम् ५ स चापि तानभ्यवदत्प्रसन्नः सहैव तैर्भ्रातृभिर्धर्मराजः । तस्थौ च

---

तो त्यांचा समुदाय ( कांहीं दिवस काम्यक वनामध्येंच होता ५३. काम्यकवनामध्यें वास्तव्य झाल्यानंतर पुढें उदार युधिष्ठिरानें त्या विप्रांना अनुमोदन दिलें आणि योग्य कालीं " रथ जोडा " ह्मणून आपल्या सेवकांना आज्ञा केली ५४. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं सौभवधोपाख्यानाविषयीं बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥२२॥

वैशंपायन सांगतात:—हे जनमेजया, ते दशार्हाधिपति श्रीकृष्ण द्वारकेला गेले असतां युधिष्ठिर, भीमसेन व अर्जुन, नकुल व सहदेव, द्रुपद कन्या कृष्णा आणि पुरोहित धौम्य हे उत्कृष्ट अश्व जोडिलेल्या मोठ्या मौल्यवान रथांत १ बसले. भूताधिपति शंकराप्रमाणें प्रकाशत असलेले ते युधिष्ठिरप्रभृति वीर शिक्षाप्रभृति षडंगांनीं युक्त असलेला वेद आणि प्रणव ह्यांचें तत्त्व जाणणाऱ्या विप्रांना सुवर्णाच्या मोहोरा, वस्त्रें आणि गाई देऊन एकत्र वनामध्यें निघाले २. ते वनांत निघण्यापूर्वींच त्यांची वीस चाकरमाणसें, धनुष्यें, शस्त्रें, उज्ज्वल बाण, प्रत्यंचा, यंत्रें आणि इतरही कांहीं सामान्य बाण बरोबर घेऊन शस्त्रास्त्रांसहवर्तमान ( पांडवांच्या सांगण्यावरून ) श्रीकृष्णाच्या मागोमाग गेलीं ३ व तीं गेल्यानंतर राजकन्या द्रौपदीचीं वस्त्रें व भूषणें घेऊन तिच्या दाया आणि दासी ह्याही श्रीकृष्णाच्या मागोमागच गेल्या व सत्वर इंद्रसेनही रथांत बसून तिकडेच गेला ४. तदनंतर उदार अंत:करणानें युक्त असलेल्या हास्तिनपुरवासी जनांनीं कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरासमीप येऊन त्याला प्रदक्षिणा केली आणि त्यांच्याबरोबर आलेल्या कुरुजांगलदेशांतील सर्व मुख्य मुख्य ब्राह्मणांनीं प्रसन्न होऊन त्याला आशीर्वाद दिले ५. तेव्हां त्या धर्मराजानेंही प्रसन्न होऊन त्या भीमसेनप्रभृति भ्रात्यां-

तत्राधिपतिर्महात्मा दृष्ट्वा जनौघं कुरुजाङ्गलानाम् ६ पितेव पुत्रेषु स तेषु भावं चक्रे कुरूणामृषभो महात्मा । ते चापि तस्मिन्भरतप्रबर्हे तदा बभूवुः पितरीव पुत्राः ७ ततस्तमासाद्य महाजनौघाः कुरुप्रवीरं परिवार्य तस्थुः। हा नाथ हा धर्म इति ब्रुवाणा ह्रीताश्च सर्वेऽश्रुमुखाश्च राजन् ८ वरः कुरूणामधिपः प्रजानां पितेव पुत्रानपहाय चास्मान् । पौरानिमाञ्जानपदांश्च सर्वान्हित्वा प्रयातः क्व नु धर्मराजः ९ धिग्धार्तराष्ट्रं सुनृशंसबुद्धिं धिक्सौबलं पापमतिं च कर्णम् । अनर्थमिच्छन्ति नरेन्द्र पापा ये धर्मनित्यस्य सतस्तवैवम् १० स्वयं निवेश्याप्रतिमं महात्मा पुरं महादेवपुरप्रकाशम् । शतक्रतुप्रस्थममेयकर्मा हित्वा प्रयातः क्व नु धर्मराजः ११ चकार यामप्रतिमां महात्मा सभां मयो देवसभाप्रकाशाम् । तां देवगुप्तामिव देवमायां हित्वा प्रयातः क्व नु धर्मराजः १२ तान्धर्मकामार्थविदुत्तमौजा बीभत्सुरुच्चैः सहितानुवाच । आदास्यते वासमिमं निरुष्य

---

सहवर्तमान त्यांना अभिवादन केलें आणि कुरुजांगलदेशांतील जनसमुदाय अवलोकन करून तो महात्मा नराधिपति तेथेंच उभा राहिला ६. कारण, पुत्रांवर प्रेम करणाऱ्या पित्याप्रमाणें तो कुरुवंशजश्रेष्ठ महात्मा युधिष्ठिर त्यांच्यावर प्रेम करीत असे व तेही पित्यांशीं वागणाऱ्या पुत्राप्रमाणें त्या भरतवंशजश्रेष्ठ युधिष्ठिराशीं वागत असत ७. तदनंतर, हे जनमेजयराजा, त्या कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराजासमीप जाऊन ते महाजनसमुदाय त्याच्या सभोंवतीं गराडा घालून उभे राहिले आणि " हाय हाय, हे प्रभो, हे धर्मा, " असें ह्मणत ह्मणत डोळ्यांमध्यें अश्रु आणून ते सर्व लज्जित झाले ८ ( आणि ह्मणाले ) " पुत्रांना टाकून जाणाऱ्या पित्याप्रमाणें आह्मांला आणि ह्या सर्व एतद्देशीय व हास्तिनपुरवासी जनांना टाकून कुरुवंशजश्रेष्ठ प्रजाधिपति धर्मराज कोठें निघाला आहे ? ९. अरे, नेहमीं धर्माचें अवलंबन करून असलेल्या तुझ्यावरही असल्या प्रकारचा अनर्थ गुदरण्याची जे पापी इच्छा करितात त्या अत्यंत दुष्ट अंतःकरणानें युक्त असलेल्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाला, दुष्टबुद्धि शकुनीला आणि कर्णाला धिक्कार असो १०. अहो, कैलासनगरीप्रमाणें प्रकाशत असलेलें अप्रतिम नगर स्वतः वसवून आतां हा अचिंत्य कर्म करणारा महात्मा धर्मराज इंद्रप्रस्थ सोडून कोणीकडे जात आहे ? ११. अहो, तेजानें देवसभेप्रमाणें असलेली जी अप्रतिम सभा महात्म्या मयासुरानें निर्माण केली त्या जणु देवगुप्त देवमायेला सोडून धर्मराज कोठें बरें निघाला आहे ? १२. ह्याप्रमाणें त्या लोकांचें भाषण श्रवण करून धर्म, अर्थ व काम ह्यांचें तत्त्व जाणणारा महातेजस्वी अर्जुन त्या एकत्र जमलेल्या लोकांना ह्मणाला " ठरल्याप्रमाणें हा वनवास करून धर्मराजा रिपूंना यशस्कारक

वनेषु राजा द्विषतां यशांसि १३ द्विजातिमुख्याः सहिताः पृथक्च भव-
द्भिरासाद्य तपस्विनश्च। प्रसाद्य धर्मार्थविदश्च वाच्या यथार्थसिद्धिः परमा
भवेन्नः १४ इत्येवमुक्ते वचनेऽर्जुनेन ते ब्राह्मणाः सर्ववर्णाश्च राजन्। मुदा-
भ्यनन्दन्सहिताश्च चक्रुः प्रदक्षिणं धर्मभृतां वरिष्ठम् १५ आमन्त्र्य पार्थं
च वृकोदरं च धनञ्जयं याज्ञसेनीं यमौ च । प्रतस्थिरे राष्ट्रमपेतहर्षा
युधिष्ठिरेणानुमता यथास्वम् १६ [९२५] इति श्रीमहाभारते० वैयासिक्या-
मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्वैतवनप्रवेशे त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्तेषु प्रयातेषु कौन्तेयः सत्यसङ्गरः । अभ्य-
भाषत धर्मात्मा भ्रातॄन्सर्वान्युधिष्ठिरः १ द्वादशेमाः समास्माभिर्वस्तव्यं
निर्जने वने । समीक्षध्वं महारण्ये देशं बहुमृगद्विजम् २ बहुपुष्पफलं
रम्यं शिवं पुण्यजनावृतम् । यत्रेमाः शरदः सर्वाः सुखं प्रतिवसेमहि ३
एवमुक्ते प्रत्युवाच धर्मराजं धनञ्जयः । गुरुवन्मानवगुरुं मानयित्वा मन-
स्विनम् ४ अर्जुन उवाच ॥ भवानेव महर्षीणां वृद्धानां पर्युपासिता ।

होणाऱ्या दिव्य सभा वगैरे हिसकून घेईल १३. करितां, द्विजश्रेष्ठ, तपस्वी आणि धर्मार्थवेत्ते अशांची एकत्र व पृथक् गांठ घेऊन तुह्मी त्यांना प्रसन्न करून घ्या आणि आमचा मनोरथ उत्कृष्ट प्रकारें सिद्धीस जाईल अशा रीतीनें तुह्मी त्यांची प्रार्थना करा" १४. हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें अर्जुनानें भाषण केलें असतां त्या ब्राह्मणांनीं व इतर सर्व वर्णांच्या लोकांनीं आनंदानें त्याचें अभिनंदन केलें; धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या धर्मराजाला त्यांनीं एकत्र जुळून प्रदक्षिणा केली १५ आणि युधिष्ठिरानें अनुज्ञा दिल्यावर हर्षरहित झालेले ते लोक कुंतीपुत्र धर्मराज, भीमसेन, अर्जुन, द्रौपदी आणि नकुलसहदेव ह्यांचा निरोप घेऊन आपआपल्या राष्ट्राकडे चालते झाले १६. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं पांडवांच्या द्वैतवनप्रवेशासंबंधीं तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥

वैशंपायन सांगतातः—पांडवांचा निरोप घेऊन ते चालते झाल्यावर सत्यवचनी व धर्मात्मा कुंतीपुत्र युधिष्ठिर आपल्या सर्व भ्रात्यांना ह्मणाला १ "हीं बारा वर्षें आपणांला निर्जन वनामध्यें वास्तव्य केलें पाहिजे. ह्यास्तव, मोठ्या अरण्यामध्यें विपुल पशुपक्षी व विपुल पुष्पं आणि फलें ह्यांनीं युक्त, पुण्यवान् लोकांनीं परिपूर्ण, रम्य आणि कल्याण-प्रद असा प्रदेश हुडकून काढा ह्मणजे ही सर्व वर्षें आपण सुखानें तेथें राहूं" २, ३. ह्याप्रमाणें धर्मराजाचें बोलणें झाल्यावर सर्व मनुष्यांना गुरुस्थानीं असलेल्या त्या विचारी धर्मराजाला गुरुप्रमाणें मान देऊन अर्जुनानें प्रत्युत्तर दिलें ४. अर्जुन ह्मणतो, "महर्षि आणि वृद्ध ह्यांचें सेवन करणारे आपणच आहांत. ह्याकरितां, मनुष्य लोकांमध्यें आपणांला

अज्ञातं मानुषे लोके भवतो नास्ति किंचन ५ त्वया ह्युपासिता नित्यं ब्राह्मणा भरतर्षभ । द्वैपायनप्रभृतयो नारदश्च महातपाः ६ यः सर्वलोकद्वाराणि नित्यं संचरते वशी । देवलोकाद्ब्रह्मलोकं गन्धर्वाप्सरसामपि ७ अनुभावांश्च जानामि ब्राह्मणानां न संशयः । प्रभावांश्चैव वेत्थ त्वं सर्वेषामेव पार्थिव ८ त्वमेव राजञ्जानासि श्रेयः कारणमेव च । यत्रेच्छसि महाराज निवासं तत्र कुर्महे ९ इदं द्वैतवनं नाम सरः पुण्यजलोचितम् । बहुपुष्पफलं रम्यं नानाद्विजनिषेवितम् १० यत्रेमा द्वादश समा विहरेमेति रोचये । यदि तेनुमतं राजन्किमन्यन्मन्यते भवान् ११ युधिष्ठिर उवाच ॥ ममाप्येतन्मतं पार्थ त्वया यत्समुदाहृतम् । गच्छामः पुण्यविख्यातं महद्द्वैतवनं सरः १२ वैशम्पायन उवाच ॥ ततस्ते प्रययुः सर्वे पाण्डवा धर्मचारिणः । ब्राह्मणैर्बहुभिः सार्धं पुण्यं द्वैतवनं सरः १३ ब्राह्मणाः साग्निहोत्राश्च तथैव च निरग्नयः । स्वाध्यायिनो भिक्षवश्च तथैव वनवासिनः १४ बहवो ब्राह्मणास्तत्र परिवव्रुर्युधिष्ठिरम् । ततः

---

अज्ञात असें कांहींही नाहीं ५. हे भरतवंशजश्रेष्ठा, द्वैपायनप्रभृति ब्राह्मण आणि महातपस्वी नारद ह्यांचा सहवास आपणांला नित्य घडलेला आहे ६ आणि जितेंद्रिय नारदमुनि तर देवलोकांतून ब्रह्मलोकांतच नव्हे परंतु, गंधर्व आणि अप्सरा ह्यांचाही लोक ह्याप्रमाणें सर्व लोकांच्या द्वारांत नित्य संचार करणारे आहेत ७. सारांश, हे राजा, सर्व ब्राह्मणांचे कार्याकार्यविषयक निश्चय आणि प्रभाव तू जाणीतच आहेस ८. तरी हे राजा, कल्याणाला कारणीभूत होणारें काय आहे हेंही तूं अर्थात् जाणीतच आहेस करितां, हे महाराजा, तुझी इच्छा असेल त्या ठिकाणी आपण वास्तव्य करूं ९. हें द्वैतवननामक सरोवर पवित्र जलानें युक्त आहे, पुष्पफलांची ह्यांत समृद्धि आहे, हें दिसण्यातही रम्य आहे आणि नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं ह्याचें सेवन केलेलें आहे १०. ह्यास्तव, आपणांला संमत असेल तर हीं बारा वर्षे आपण ह्या सरोवराचे ठिकाणी विहार करून असावें असें मला वाटतें. याशिवाय आपणाला दुसरें कोणतें स्थळ पसंत आहे" ? ११. युधिष्ठिर ह्मणतो:— हे अर्जुना, तूं जें सांगितलेस हेंच माझेही मत आहे. करितां, पवित्र आणि विख्यात अशा त्या मोठ्या द्वैतवननामक सरोवरावर आपण जाऊं १२. वैशंपायन सांगतात:— तदनंतर धर्मानें वागणारे ते सर्व पांडव पुष्कळ ब्राह्मणांबरोबर द्वैतवननामक पवित्र सरोवरावर गेले १३. अग्निहोत्री आणि अग्निहोत्ररहित असे गृहस्थाश्रमी, वेदाध्ययन करणारे ब्रह्मचारी, भिक्षु आणि वनामध्यें वास्तव्य करणारे असे ब्राह्मण १४ आणि तपश्चर्येनें सिद्ध झालेले व निर्मल आचरणानें युक्त असलेले असे शेंकडों महात्मे

सिद्धा महात्मानः शतशः संशितव्रताः १५ ते यात्वा पाण्डवास्तत्र बहुभिर्ब्राह्मणैः सह । पुण्यं द्वैतवनं रम्यं विविशुर्भरतर्षभाः १६ तमालतालाम्रमधूकनीपकदम्बसर्जार्जुनकर्णिकारैः । तपात्यये पुष्पधरैरुपेतं महावनं राष्ट्रपतिर्ददर्श १७ महाद्रुमाणां शिखरेषु तस्थुर्मनोरमां वाचमुदीरयन्तः । मयूरदात्यूहचकोरसङ्घास्तस्मिन्वने बर्हिणकोकिलाश्च १८ करेणुयूथैः सह यूथपानां मदोत्कटानामचलप्रभाणाम् । महान्ति यूथानि महाद्विपानां तस्मिन्वने राष्ट्रपतिर्ददर्श १९ मनोरमां भोगवतीमुपेत्य पूतात्मनां चीरजटाधराणाम् । तस्मिन्वने धर्मभृतां निवासे ददर्श सिद्धर्षिगणाननेकान् २० ततः स यानादवरुह्य राजा सभ्रातृकः सजनः काननं तत् । विवेश धर्मात्मवतां वरिष्ठस्त्रिविष्टपं शक्र इवामितौजाः २१ तं सत्यसन्धं सहिताभिपेतुर्दिदृक्षवश्चारणसिद्धसङ्घाः । वनौकसश्चापि नरेन्द्रसिंहं मनस्विनं तं परिवार्य तस्थुः २२ स तत्र सिद्धानभिवाद्य सर्वान्प्रत्यर्चितो राजवद्देव-

---

ब्राह्मण त्या द्वैतवननामक सरोवराच्या ठिकाणीं युधिष्ठिराभोंवतीं जमले १५. ते पांडव पुष्कळ ब्राह्मणांबरोबर तिकडे गेले आणि ते भरतवंशजश्रेष्ठ, पवित्र आणि रम्य अशा द्वैतवनाच्या प्रदेशामध्यें प्रवेश करूं लागले १६. तेव्हां साल, ताल, आम्र, मोहा, नीप, कदंब, सर्ज, अर्जुन आणि, पांगारा ह्या प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असें तें महावन राष्ट्राधिपति धर्मराजानें ग्रीष्मऋतु संपल्यावर अवलोकन केलें १७. त्या वनामध्यें मयूर, पाणकोंबडा आणि चकोर ह्यांचे समुदाय व बर्हिण आणि कोकिलपक्षी मोठमोठ्या वृक्षांच्या अग्रांवर मनोहर शब्द करीत बसले होते १८. त्या वनामध्यें आपआपल्या कळपांचे रक्षक आणि शरीरानें पर्वतप्राय अशा मोठमोठ्या मदमत्त गजांचे मोठमोठे समुदाय हत्तिणींच्या कळपांसहवर्तमान राष्ट्राधिपति युधिष्ठिरानें अवलोकन केले १९. पुढें चित्ताला आह्लाददायक अशा सरस्वती नदीचे संनिध आल्यावर शुद्ध चित्तानें युक्त आणि वल्कलें व जटा धारण करणाऱ्या अशा धर्माचरणी लोकांचें वसतिस्थान असलेल्या त्या वनामध्यें सिद्ध आणि ऋषि ह्यांचे अनेक समुदाय त्यानें अवलोकन केले २०. तदनंतर धर्मनिष्ठ आणि जितेंद्रिय ह्यांमध्यें श्रेष्ठ असलेला तो धर्मराजा रथांतून खालीं उतरला व स्वर्गांत प्रविष्ट होणाऱ्या इंद्राप्रमाणें तो अत्यंत तेजस्वी धर्मराजा भ्राते आणि बरोबर आलेले इतर लोक ह्यांसह त्या वनामध्यें प्रविष्ट झाला २१. वनांत प्रविष्ट होतांक्षणीं त्याची भेट घेण्याच्या इच्छेनें सिद्ध व चारण ह्यांचे समुदाय आणि इतरही वनामध्यें वास्तव्य करणारे लोक त्या सत्यवचनी युधिष्ठिराकडे एकदम लोटले आणि त्या विचारी पुरुषश्रेष्ठाच्या भोंवतीं गराडा देऊन उभे राहिले २२. तेव्हां

चच । विवेश सर्वैः सहितो द्विजाग्र्यैः कृताञ्जलिर्धर्मभृतां वरिष्ठः २३ स पुण्यशीलः पितृवन्महात्मा तपस्विभिर्धर्मपरैरुपेत्य । प्रत्यर्चितः पुष्पधरस्य मूले महाद्रुमस्योपविवेश राजा २४ भीमश्च कृष्णा च धनञ्जयश्च यमौ च ते चानुचरा नरेन्द्रम् । विमुच्य वाहानवशाश्च सर्वे तत्रोपतस्थुर्भरतप्रबर्हाः २५ लतावतानावततः स पाण्डवैर्महाद्रुमः पञ्चभिरेव धन्विभिः । बभौ निवासोपगतैर्महात्मभिर्महागिरिर्वारणयूथपैरिव २६ [ ९५१ ] इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्वैतवनप्रवेशे चतुर्विंशोध्यायः ॥ २४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तत्काननं प्राप्य नरेन्द्रपुत्राः सुखोचिता वासमुपेत्य कृच्छ्रम् । विजह्रुरिन्द्रप्रतिमाः शिवेषु सरस्वतीशालवनेषु तेषु १ यतींश्च राजा स मुनींश्च सर्वांस्तस्मिन्वने मूलफलैरुदग्रैः । द्विजातिमुख्यानृषभः कुरूणां संतर्पयामास महानुभावः २ इष्टीश्च पित्र्याणि तथा क्रियाश्च महावने वसतां पाण्डवानाम् । पुरोहितस्तत्र समृद्धतेजाश्चकार

---

त्या ठिकाणीं त्यानें सर्व सिद्धांना अभिवंदन केलें असतां राजाप्रमाणें आणि देवाप्रमाणें त्यांनीं त्याचा उलट सत्कार केला आणि नंतर धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेला तो युधिष्ठिर हात जोडून सर्व द्विजश्रेष्ठांसहवर्तमान खालीं बसला २३. सारांश, आपल्या पित्याप्रमाणेंच मनानें मोठा असलेला तो पुण्यशील राजा धर्मनिष्ठ तपस्व्यांसहवर्तमान वनासमीप आला आणि त्या वनामध्यें वास्तव्य करणाऱ्यांनीं आदरातिथ्य केल्यावर एका मोठ्या प्रफुल्लित कदंब वृक्षाच्या मुळाशीं तो बसला २४. नंतर भीमसेन, द्रौपदी, अर्जुन आणि नकुलसहदेव हे सर्व धर्मराजाच्या अधीन असलेले भरतवंशजश्रेष्ठ त्या ठिकाणीं राजाचे समीप उभे राहिले आणि रथाचे अश्व सोडिल्यावर त्यांचे ते सेवकही तेथें उभे राहिले २५. ( हे जनमेजया, ) गजसमुदायाचें परिपालन करणाऱ्या धिप्पाड गजांच्या योगानें जसा हिमालय पर्वत शोभतो तसा लतांच्या वेलांनीं परिवेष्टित झाल्यामुळें नम्र झालेला तो महावृक्ष निवासाकरितां आलेल्या महात्म्या धनुर्धारी पांच पांडवांच्या योगानें शोभूं लागला २६. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं पांडवांचा द्वैतवनांत प्रवेश झाल्याविषयीं चोविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २४ ॥

वैशंपायन सांगतात:—वनवासाचें संकट प्राप्त झाल्यावर सुखोपभोग घेण्यास योग्य असलेले ते इंद्रसमान राजपुत्र पांडव त्या द्वैतवनामध्यें आल्यानंतर सरस्वतीचे तीरीं असलेल्या त्या शालवनांमध्यें विहार करूं लागले १. त्या वनामध्यें आल्यानंतर कुरुवंशजश्रेष्ठ महाप्रभावी धर्मराजा यति, सर्व मुनि आणि श्रेष्ठ श्रेष्ठ द्विज ह्यांचें उत्कृष्ट फलमूलांच्या योगानें संतर्पण करूं लागला २ आणि त्या महावनामध्यें ते राजकुमार पांडव वास्तव्य

धौम्यः पितृवत्कृपाणाम् ३ अपेत्य राष्ट्राद्वमतां तु तेषामृषिः पुराणोतिथि-
राजगाम । तमाश्रमं तीव्रसमृद्धतेजा मार्कण्डेयः श्रीमतां पाण्डवानाम् ४
तमागतं ज्वलितहुताशनप्रभं महामनाः कुरुवृषभो युधिष्ठिरः । अपूजय-
त्सुरऋषिमानवार्चितं महामुनिं ह्यनुपमसत्त्ववीर्यवान् ५ स सर्वविद्द्रौपदीं
वीक्ष्य कृष्णां युधिष्ठिरं भीमसेनार्जुनौ च । संस्मृत्य रामं मनसा महात्मा
तपस्विमध्येऽस्मयतामितौजाः ६ तं धर्मराजो विमना इवाब्रवीत्सर्वे ह्रिया सन्ति
तपस्विनोऽमी। भवानिदं किं स्मयतीव हृष्टस्तपस्विनां पश्यतां मामुदीक्ष्य ७
मार्कण्डेय उवाच ॥ न तात हृष्यामि न च स्मयामि प्रहर्षजो मां भजते न
दर्पः । तवापदं त्वद्य समीक्ष्य रामं सत्यव्रतं दाशरथिं स्मरामि ८ स चापि
राजा सह लक्ष्मणेन वने निवासं पितुरेव शासनात् । धन्वी चरन्पार्थ
मयैव दृष्टो गिरेः पुरा ऋष्यमूकस्य सानौ ९ सहस्रनेत्रप्रतिमो महात्मा

---

करूं लागले असतां महातेजस्वी पुरोहित धौम्य मुनि इष्टि, पिंडपितृयज्ञप्रभृति पैतृक कर्मे आणि इतरही कृत्यें त्यांच्या करितां तेथें पित्याप्रमाणे करूं लागले ३. असो- ह्याप्रमाणें स्वराष्ट्रांतून निघून ते पांडव वनामध्ये वास्तव्य करूं लागले असतां दुःसह आणि विपुल तेजानें युक्त असे अनादि मार्कंडेय ऋषि अतिथि ह्मणून त्या वैभवशाली पांडवांच्या आश्रयाला आले ४. तेव्हां अनुपम धैर्य आणि वीर्य ह्यांनीं संपन्न असून उदार अंतःकरणानें युक्त असलेल्या कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरानें देव, ऋषि आणि मानव यांना पूज्य आणि प्रदीप्त अग्नीप्रमाणे तेजस्वी अशा त्या तेथें आलेल्या मार्कंडेय मुनींचें पूजन केलें असतां ५ त्या अत्यंत तेजस्वी व त्रिकालज्ञ महात्म्या मार्कंडेय मुनींनीं द्रुपदकन्या कृष्णा, युधिष्ठिर आणि भीमसेन व अर्जुन ह्यांच्याकडे दृष्टि दिली असतां त्यांना मनामध्यें रामाचें स्मरण झालें आणि तें स्मरण झाल्यामुळें त्यांना त्या तपस्वी लोकांच्या समुदायामध्यें हसूं आलें ६. तेव्हां "हे सर्व तपस्वी विनयानें युक्त झाले असतांना आपण मजकडे बघून ह्या तपस्व्यांचे समक्ष आनंदानें हास्य करीत आहांत ह्याचें कारण काय ?" असें धर्मराजानें मनामध्यें खिन्न झाल्यासारिखें करून त्यांना विचारिलें ७. मार्कंडेय ह्मणतातः—बा युधिष्ठिरा, मला हर्षही झाला नाहीं व मी समजून उमजून हास्यही करीत नाहीं. कारण, हर्षापासून उत्पन्न झालेला गर्व माझे ठिकाणीं नाहीं. आज तुझी आपत्ति अवलोकन करून सत्यव्रत दाशरथि रामाचें मला स्मरण झालें ८. कारण, हे कुंतीपुत्रा, पित्याच्या आज्ञेवरून लक्ष्मणासहवर्तमान वनामध्यें वास्तव्य करीत असणाऱ्या त्या धनुर्धारी राजाला ऋष्यमूक पर्वताच्या शिखरावर पूर्वी मींच अवलोकन केलें आहे ९. यमाचाही नियंता आणि नमुचि दैत्याचा वध

यमस्य नेता नमुचेश्च हन्ता । पितुर्निदेशादनघः स्वधर्मं वासं वने दाशरथिश्चकार १० स चापि शक्रस्य समप्रभावो महानुभावः समरेष्वजयः । विहाय भोगानचरद्वनेषु नेशे बलस्येति चरेदधर्मम् ११ नृपाश्च नाभागभगीरथादयो महीमिमां सागरान्तां विजित्य । सत्येन तेऽप्यजयंस्तात लोकान्नेशे बलस्येति चरेदधर्मम् १२ अलर्कमाहुर्नरवर्य सन्तं सत्यव्रतं काशिकरूषराजम् । विहाय राज्यानि वसूनि चैव नेशे बलस्येति चरेदधर्मम् १३ धात्रा विधिर्यो विहितः पुराणैस्तं पूजयन्तो नरवर्य सन्तः । सप्तर्षयः पार्थ दिवि प्रभान्ति नेशे बलस्येति चरेदधर्मम् १४ महाबलान्पर्वतकूटमात्रान्विषाणिनः पश्य गजान्नरेन्द्र । स्थितान्निदेशे नरवर्य धातुर्नेशे बलस्येति चरेदधर्मम् १५ सर्वाणि भूतानि नरेन्द्र पश्य तथा यथावद्विहितं विधात्रा । स्वयोनितः कर्म सदाचरन्ति नेशे बलस्येति चरेदधर्मम् १६ सत्येन धर्मेण यथार्हवृत्त्या ह्रिया तथा सर्वभूतान्यतीत्य । यशश्च

---

करणारा अशा त्या इंद्रसमान महात्म्या निष्पाप दाशरथि रामानें पित्याची आज्ञा झाल्यामुळें स्वधर्म समजून वनामध्यें वास्तव्य केलें १०. सारांश, समरांगणामध्यें अजिंक्य असलेल्या त्या महासामर्थ्यवान् व शक्रतुल्य पराक्रमी रामानें भोग्य वस्तूंचा त्याग करून वनामध्यें संचार केला कारण, " मी समर्थ आहें " असें समजून अधर्माचरण करूं नये ११. नाभाग, भगीरथ इत्यादि भूपतींनी समुद्रापर्यंत ही पृथ्वी जिंकिली आणि सत्याच्याच योगानें त्यांनीं उत्तम लोकही संपादन केले. सारांश, बा युधिष्ठिरा, " मी बलवान् आहें " असें समजून अधर्मानें वागूं नये १२. हे पुरुषश्रेष्ठा, सत्य हेंच ज्याचें व्रत असा अलर्क काशी व करूष ह्या देशांचा राजा असतांनाही राज्य आणि संपत्ति ह्यांचा त्याग करून तो चालता झाला असें ह्मणतात. तेव्हां तात्पर्य काय कीं, " मी बलाढ्य आहें " असें समजून कोणीं धर्मविरुद्ध वर्तन करूं नये १३. हे पुरुषश्रेष्ठा, सनातन वेदवाक्यांच्या योगानें विधात्यानें जें कर्म सांगितलें आहे तें शिरसा मान्य करून स्वर्गामध्यें सप्तर्षि झळकत असतात. तेव्हां, हे कुंतीपुत्रा, " मी समर्थ आहें " असें समजून कोणींही आपला धर्म सोडूं नये १४. हे राजा, शरीरानें पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड असून मोठमोठ्या दांतांनीं युक्त असलेले महाबलाढ्य गजही विधात्याच्या आज्ञेंत राहिले असल्याचें तूं अवलोकन कर. सारांश, हे पुरुषश्रेष्ठा, " माझे ठिकाणीं सामर्थ्य आहे " असें समजून कोणी अधर्माचें अवलंबन करूं नये १५. हे नराधिपते, आपआपल्या जातीला अनुसरून विधात्यानें नेमून दिलेलें कर्म सर्व प्राणी यथायोग्य रीतीनें नेहमीं आचरीत असतात हें तूं पहा. तात्पर्य, " मी

तेजश्च तवापि दीप्तं विभावसोर्भास्करस्येव पार्थ १७ यथाप्रतिज्ञं च महा-
नुभाव कृच्छ्रं वने वासमिमं निरुष्य । ततः श्रियं तेजसा तेन दीप्तामा-
दास्यसे पार्थिव कौरवेभ्यः १८ वैशम्पायन उवाच ॥ तमेवमुक्त्वा वचनं
महर्षिस्तपस्विमध्ये महितं सुहृद्भिः । आमन्त्र्य धौम्यं सहितांश्च पार्थां-
स्ततः प्रतस्थे दिशमुत्तरां सः १९ [९७०] इति श्रीमहाभारते०वैयासिक्या-
मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्वैतवनप्रवेशे पञ्चविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

वैशम्पायन उवाच॥ वसत्सु वै द्वैतवने पाण्डवेषु महात्मसु। अनुकीर्णं महा-
रण्यं ब्राह्मणैः समपद्यत १ ईर्यमाणेन सततं ब्रह्मघोषेण सर्वशः। ब्रह्मलोकसमं
पुण्यमासीद्द्वैतवनं सरः २ यजुषामृचां साम्नां च गद्यानां चैव सर्वशः। आसी-
दुच्चार्यमाणानां निःस्वनो हृदयङ्गमः ३ ज्याघोषश्चैव पार्थानां ब्रह्मघोषश्च धीम-
ताम् । संसृष्टं ब्रह्मणा क्षत्रं भूय एव व्यरोचत ४ अथाब्रवीद्बको दाल्भ्यो धर्म-
राजं युधिष्ठिरम्। सन्ध्यां कौन्तेयमासीनमृषिभिः परिवारितम् ५ पश्य द्वैतवने
पार्थ ब्राह्मणानां तपस्विनाम् । होमवेलां कुरुश्रेष्ठ संप्रज्वलितपावकाम् ६

---

बलिष्ठ आहें " असें समजून कोणी अधर्मानें वागूं नये १६. सत्य, धर्म, यथायोग्य वर्तन आणि विनय ह्यांच्या योगानें सर्व प्राण्यांना तूं मागें टाकिलें आहेस. ह्यामुळें, हे कुंतीपुत्रा, तुझीही कीर्ति व तेज प्रभारूप संपत्तीनें युक्त असलेल्या सूर्याप्रमाणें उज्ज्वल आहे १७. ह्यास्तव, हे महापराक्रमी युधिष्ठिरा, प्रतिज्ञेप्रमाणें हा दुःखकारक वनवास तूं शेवटास ने आणि नंतर, हे राजा, त्या तेजाच्या योगानें कौरवांपासून आपली उज्ज्वल लक्ष्मी हिसकावून घे १८. वैशंपायन सांगतातः—सुहृदांसहवर्तमान असलेल्या धर्मराजाला तपस्व्यांमध्यें ह्याप्रमाणें सांगून आणि धौम्यमुनि व एकत्र असलेले पांडव ह्यांचा निरोप घेऊन ते मार्कंडेय महर्षि उत्तर दिशेस चालते झाले १९. ह्याप्रमाणें ०वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं पांडवांच्या द्वैतवनप्रवेशाविषयीं पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥२५॥

वैशंपायन सांगतातः—द्वैतवनामध्यें महात्मे पांडव राहूं लागले असतां तें महावन ब्राह्मणांनीं भरून गेलें १. इतकेंच नव्हे परंतु, चोंहोकडे सतत होत असलेल्या वेदघोषाच्या योगानें द्वैतवननामक सरोवर ब्रह्मलोकासारिखें पावन झालें २. यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद आणि गद्यें ह्यांचें चोहोंकडे पठण चाललें ह्मणजे चित्ताला आल्हादकारक असा त्यांचा ध्वनि होत असे ३. ह्याप्रमाणें बुद्धिमान् ब्राह्मणांचा वेदघोष आणि पांडवांच्या प्रत्यंचेचा टणत्कार सुरू झाला असतां ब्राह्मणांशीं संलग्न झालेली क्षत्रियजाति अधिकच शोभूं लागली ४. असें होतां होतां एकेदिवशीं कुंतीपुत्र धर्मराज युधिष्ठिर संध्यावंदन आटोपून ऋषींनीं परिवेष्टित असा बसला असतांना बकदाल्भ्य मुनि त्याला ह्मणाले ५. " हे

चरन्ति धर्मं पुण्येस्मिंस्त्वया गुप्ता धृतव्रताः। भृगवोङ्गिरसश्चैव वासिष्ठाः काश्यपैः सह ७ आगस्त्याश्च महाभागा आत्रेयाश्चोत्तमव्रताः । सर्वस्य जगतः श्रेष्ठा ब्राह्मणाः संगतास्त्वया ८ इदं तु वचनं पार्थ शृणुष्व गदतो मम । भ्रातृभिः सह कौन्तेय यत्त्वां वक्ष्यामि कौरव ९ ब्रह्म क्षत्रेण संसृष्टं क्षत्रं च ब्रह्मणा सह । उदीर्णे दहतः शत्रून्वनानीवाग्निमारुतौ १० नाब्राह्मणस्तात चिरं बुभूषेदिच्छन्निमं लोकममुं च जेतुम्। विनीतधर्मार्थमपेतमोहं लब्ध्वा द्विजं नुदति नृपः सपत्नान् ११ चरन्नैःश्रेयसं धर्मं प्रजापालनकारितम् । नाध्यगच्छद्बलिर्लोके तीर्थमन्यत्र वै द्विजात् १२ अन्यूनमासीदसुरस्य कामैर्वैरोचनेः श्रीरपि चाक्षयासीत् । लब्ध्वा महीं ब्राह्मणसंप्रयोगात्तेष्वाचरन्दुष्टमथो व्यनश्यत् १३ नाब्राह्मणं भूमिरियं सभूतिर्वर्णं द्वितीयं भजते चिराय । समुद्रनेमिर्नमते तु तस्मै यं ब्राह्मणः

---

कुंतीपुत्रा कुरुवंशजश्रेष्ठा, जिच्यामध्यें जिकडे तिकडे अग्नि प्रज्वलित झाले आहेत अशी तपस्वी ब्राह्मणांची होमवेला ह्या द्वैतवनांत तूं अवलोकन कर ६. अरे, ह्या पुण्यवनामध्यें तूं संरक्षण करीत असल्यामुळें हे व्रतस्थ ब्राह्मण धर्माचरण करीत आहेत. ( हे युधिष्ठिरा ) भृगु, अंगिरस्, वसिष्ठ, कश्यप व अत्रि या कुलांतील महाभाग्यवान् आणि उत्कृष्ट व्रत आचरण करणारे अशा सर्व जगतांतील श्रेष्ठ ब्राह्मणांनीं तुझा समागम केला आहे ७,८. करितां, हे कुरुकुलोत्पन्ना कुंतीपुत्रा धर्मराजा, हें जें मी तुला सांगत आहें तें भ्रात्यांसहवर्तमान तूं ऐकून ठेव ९. क्षत्रिय कुलाशीं मिळालेलें ब्रह्मकुल आणि ब्रह्मकुलाशीं मिळालेलें क्षत्रियकुल हीं सज्ज झालीं असतां, एकमेकाशीं संयुक्त होऊन वनें दग्ध करणाऱ्या अग्निवायूं प्रमाणें, शत्रूंना दग्ध करितात १०. बा युधिष्ठिरा, इहलोक व परलोक प्राप्त करून घेण्याची इच्छा करणाऱ्या राजानें ब्राह्मणांच्या साहाय्यावांचून फार दिवस ऐश्वर्याचा उपभोग घेण्याचें मनात आणूं नये ( तात्पर्य, इहलोक आणि परलोक संपादन करण्याची इच्छा करणाऱ्या राजाचें ऐश्वर्य ब्राह्मणांच्या साहाय्यावांचून फार दिवस संभवनीय नाहीं ). कारण, धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र यांत निष्णात आणि निर्लोभी असा ब्राह्मण मिळाला असतां राजा आपल्या शत्रूंचा नाश करितो ११. प्रजापालनामुळें घडणारा मोक्षप्रापक धर्म प्राप्त करून घेण्याची बलि इच्छा करूं लागला असतां ब्राह्मणावांचून दुसरें साधन ह्या जगतामध्यें त्याला सांपडलें नाहीं १२. विरोचनपुत्र बलिनामक दैत्याची संपत्ति अक्षय्य असून त्याचे सर्व मनोरथ ब्राह्मणांच्या योगानेंच परिपूर्ण झालेले होते आणि ब्राह्मणांमुळें पृथ्वी प्राप्त झाली असतां उलट त्यांच्याशीं तो जेव्हां वाईट रीतीनें वागूं लागला तेव्हां त्याचा नाश झाला १३.

शाम्ति नयैर्विनितम् १४ कुञ्जरस्येव संग्रामे परिगृह्याङ्कुशग्रहम्। ब्राह्म-णैर्विप्रहीणस्य क्षत्रस्य क्षीयते बलम् १५ ब्रह्मण्यनुपमा दृष्टिः क्षात्रम-प्रतिमं बलम्। तौ यदा चरतः सार्धं तदा लोकः प्रसीदति १६ यथा हि सुमहानग्निः कक्षं दहति सानिलः। तथा दहति राजन्यो ब्राह्मणेन समं रिपुम् १७ ब्राह्मणेष्वेव मेधावी बुद्धिपर्येषणं चरेत्। अलब्धस्य च लाभाय लब्धस्य परिवृद्धये १८ अलब्धलाभाय च लब्धवृद्धये यथार्ह-तीर्थप्रतिपादनाय। यशस्विनं वेदविदं विपश्चितं बहुश्रुतं ब्राह्मणमेव वासय १९ ब्राह्मणेषूत्तमा वृत्तिस्तव नित्यं युधिष्ठिर। तेन ते सर्वलोकेषु दीप्यते प्रथितं यशः २० वैशम्पायन उवाच॥ ततस्ते ब्राह्मणाः सर्वे बकं दाल्भ्यमपूजयत्। युधिष्ठिरे स्तूयमाने भूयः सुमनसोऽभवन् २१ द्वैपायनो नारदश्च जामदग्न्यः पृथुश्रवाः। इन्द्रद्युम्नो भालुकिश्च कृतचेताः सहस्र-

---

ऐश्वर्यासहवर्तमान ही पृथ्वी फार दिवस ब्राह्मणाचे साहाय्य नसलेल्या दुसऱ्या वर्णाला (ह्मणजे क्षत्रियाला) धरून रहात नाही. परंतु, नम्र अशा ज्या राजाला ब्राह्मण नीति शिकवीत असतो त्याला समुद्रवलयांकित पृथ्वी नमून असते १४. अंकुशाच्या योगानें अवरून धारणारा महात नसेल तर संग्रामामध्यें ज्याप्रमाणें हत्तीचें सामर्थ्य नाहीसें होतें त्याचप्रमाणें ब्राह्मणांनीं रहित असलेल्या क्षत्रियाचें सामर्थ्य क्षीण होऊन जातें १५. ब्राह्मणाचे ठिकाणीं अनुपम ज्ञान असून क्षत्रियाचें ठिकाणीं अप्रतिम बल आहे. करितां, ब्राह्मण आणि क्षत्रिय हे उभयतां एक मतानें वागूं लागले असतां सर्व जगत् त्यांना वश होतें १६. ज्याप्रमाणें अग्नि वायूनें युक्त झाला असतां फारच प्रचंड होऊन अरण्य दग्ध करून टाकितो त्याचप्रमाणें क्षत्रिय ब्राह्मणाच्या साहाय्यानें शत्रूला दग्ध करून टाकितो १७. ह्यास्तव, अप्राप्त गोष्ट प्राप्त होण्याकरितां आणि प्राप्त झालेल्याची अभिवृद्धि होण्याकरितां अवश्य असलेलें ज्ञान विचारी राजानें ब्राह्मणाचेच ठिकाणी शोधावें (सारांश, योगक्षेम चालण्याकरितां विचारी राजानें ब्राह्मणाच्याच ज्ञानाचें साहाय्य घ्यावें) १८. ह्याकरितां, अप्राप्त वस्तु प्राप्त व्हावी, प्राप्त झालेली वृद्धिंगत व्हावी आणि दानाला यथायोग्य पात्र मिळावें एतदर्थ यशस्वी, वेदवेत्ता, ज्ञानवान् आणि बहुश्रुत अशा ब्राह्मणालाच तूं आपणांपाशीं राहून घे १९. युधिष्ठिरा, ब्राह्मणांशीं तुझें नित्य उत्कृष्ट रीतीचें वर्तन असतें; ह्यामुळें, सर्व लोकांमध्यें तुझी उज्ज्वल कीर्ति प्रसिद्ध आहे २०. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बकदाल्भ्यमुनींनीं सांगितलें असतां तेथें जमलेल्या त्या सर्व ब्राह्मणांनीं त्या मुनींची प्रशंसा केली आणि युधिष्ठिराची स्तुति होऊं लागली असतां त्या ब्राह्मणांचें मन अधिकच आनंदित

पात् २२ कर्णश्रवाश्च मुञ्जश्च लवणाश्वश्च काश्यपः । हारीतः स्थूलकर्णश्च अग्निवेश्योथ शौनकः २३ कृतवाक्च सुवाक्चैव बृहदश्वो विभावसुः। ऊर्ध्वरेता वृषामित्रः सुहोत्रो होत्रवाहनः २४ एते चान्ये च बहवो ब्रह्मणाः संशितव्रताः । अजातशत्रुमानर्चुः पुरन्दरमिवर्षयः २५ [ ९९५ ] इति० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्वैतवनप्रवेशे षड्विंशोध्यायः ॥ २६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो वनगताः पार्थाः सायाह्ने सह कृष्णया । उपविष्टाः कथाश्चक्रुर्दुःखशोकपरायणाः १ प्रिया च दर्शनीया च पण्डिता च पतिव्रता । अथ कृष्णा धर्मराजमिदं वचनमब्रवीत् २ द्रौपद्युवाच ॥ न नूनं तस्य पापस्य दुःखमस्मासु किंचन । विद्यते धार्तराष्ट्रस्य नृशंसस्य दुरात्मनः ३ यस्त्वां राजन्मया सार्धमजिनैः प्रतिवासितम् । वनं प्रस्थाप्य दुष्टात्मा नान्वतप्यत दुर्मतिः ४ आयसं हृदयं नूनं तस्य दुष्कृतकर्मणः । यस्त्वां धर्मपरं ज्येष्ठं रूक्षाण्यश्रावयत्तदा ५ सुखोचितमदुःखार्हं दुरात्मा ससुहृद्गणः । ईदृशं दुःखमानीय मोदते पापपूरुषः ६ चतुर्णामिव

झालें २१. द्वैपायन, नारद, जामदग्न्य, पृथुश्रवा, इंद्रद्युम्न, भालुकि, कृतचेता, सहस्रपात् २२, कर्णश्रवा, मुंज, लवणाश्व, काश्यप, हारीत, स्थूलकर्ण, अग्निवेश्य, शौनक २३, कृतवाक्, सुवाक्, बृहदश्व, विभावसु, ऊर्ध्वरेता, वृषामित्र, सुहोत्र, होत्रवाहन २४ ह्या आणि इतरही निर्मल आचरणांनीं युक्त असलेल्या पुष्कळ ब्राह्मणांनी इंद्राची स्तुति करणाऱ्या ऋषींप्रमाणें युधिष्ठिराची स्तुति केली २५. ह्याप्रमाणें० वनपर्वातील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं पांडवांच्या द्वैतवनप्रवेशाविषयीं सव्वीसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर वनामध्यें गेलेले ते पांडव सायंकाल झाल्यावर द्रौपदीसहवर्तमान बसले आणि दुःख व शोक ह्यांनीं व्याकुल होऊन आपआपसांत बोलूं लागले १. प्रथमतः पांडवांना प्रिय, सौंदर्यसंपन्न, पतिव्रता आणि संभाषणामध्यें निपुण अशी द्रौपदी धर्मराजाशीं असें बोलूं लागली २. द्रौपदी ह्मणतेः—आह्मी दुःखित झालों असतांना त्या दुष्ट दुरात्म्या धृतराष्ट्रपुत्र पापी दुर्योधनाला यत्किंचितही दुःख होत नाहीं ३. हे राजा, ज्यानें माझ्यासहवर्तमान तुला अजिनें परिधान करावयास लावून वनांत पाठविलें त्या दुर्बुद्धि व दुरात्म्या दुर्योधनाला मुळींच पश्चात्ताप झाला नाहीं ४. तूं कुरुवंशजांमध्यें श्रेष्ठ असून धर्माविषयीं तत्पर असतांनाही ज्यानें तुला उद्देशून कठोर भाषणें केलीं त्या पापकर्म करणाऱ्या दुर्योधनाचें हृदय खरोखर लोखंडाचें आहे ५. अरे, सुखोपभोग घेण्यासच योग्य असून दुःख भोगण्यास अयोग्य असलेल्या तुला अशा प्रकारचें दुःख देऊन तो पापी दुरात्मा आपल्या मित्रमंडळासह

पापानामस्रं न पतितं तदा। त्वयि भारत निष्क्रान्ते वनायाजिनवाससि ७ दुर्योधनस्य कर्णस्य शकुनेश्च दुरात्मनः। दुर्भ्रातुस्तस्य चोग्रस्य राजन्दुःशासनस्य च ८ इतरेषां तु सर्वेषां कुरूणां कुरुसत्तम। दुःखेनाभिपरीतानां नेत्रेभ्यः प्रापतज्जलम् ९ इदं च शयनं दृष्ट्वा यच्चासीत्ते पुरातनम्। शोचामि त्वां महाराज दुःखानर्हं सुखोचितम् १० दान्तं यच्च सभामध्य आसनं रत्नभूषितम्। दृष्ट्वा कुशबृसीं चेमां शोको मां रुन्धयत्ययम् ११ यदपश्यं सभायां त्वां राजभिः परिवारितम्। तच्च राजन्नपश्यन्त्याः का शान्तिर्हृदयस्य मे १२ या त्वाहं चन्दनादिग्धमपश्यं सूर्यवर्चसम्। सा त्वां पङ्कमलादिग्धं दृष्ट्वा मुह्यामि भारत १३ या त्वाहं कौशिकैर्वस्त्रैः शुभ्रैराच्छादितं पुरा। दृष्टवत्यस्मि राजेन्द्र सा त्वां पश्यामि चीरिणम् १४ यच्च तद्रुक्मपात्रीभिर्ब्राह्मणेभ्यः सहस्रशः। ह्रियते ते गृहादन्नं संस्कृतं सार्वकामिकम् १५ यतीनामगृहाणां ते तथैव गृहमेधिनाम्। दीयते भोजनं

खुशाल आनंदानें राहत आहे ६. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, वनांत जाण्याकरितां अजिनें परिधान करून तूं बाहेर पडलास तेव्हां दुर्योधन, कर्ण, दुरात्मा शकुनि आणि त्या दुर्योधनाचा क्रूर व दुष्ट भ्राता दुःशासन ह्या चौघा पाप्यांच्या डोळ्यांतून मात्र अश्रु गळाले नाहींत ७,८. हे कुरुवंशजश्रेष्ठा, ह्या चौघांवांचून दुःखाकुल झालेल्या इतर सर्व कुरुवंशजांच्या नेत्रांतून अश्रु गळाले ९. पूर्वी तुझी जी शय्या होती ती पाहून ही सांप्रतची शय्याही मी अवलोकन करीत आहे.ह्यामुळें दुःख भोगण्यास अपात्र आणि सुखोपभोग घेण्यासच योग्य अशा तुझ्याबद्दल, हे महाराजा, मला वाईट वाटत आहे १०. पूर्वी सभेमध्यें असलेलें तुझें रत्नखचित हस्तिदंती आसन मीं अवलोकन केलें असून सांप्रतचें हें दर्भासनही माझ्या दृष्टोत्पत्तीस येत असल्यामुळें हा शोक मला अगदीं ग्रासून टाकीत आहे ११. हे राजा, राजांनीं परिवेष्टित असा मीं तुला पूर्वी सभेमध्यें अवलोकन केला असतांना तो प्रकार सध्यां दृष्टीं पडत नाहीं. तेव्हां माझ्या चित्ताला स्वस्थता कशी असणार? १२. हे भरतकुलोत्पन्ना, जिनें सूर्यासमान तेजस्वी असलेला तूं पूर्वी चंदनानें चर्चित झालेला अवलोकन केला आहे ती मी आज तूं चिखलानें व मळानें भरलेला अवलोकन करीत असल्यामुळें मोहित होत आहें १३. हे राजाधिराजा, जिनें पूर्वी शुभ्र अशा रेशमी वस्त्रांनीं आच्छादित असलेल्या तुला अवलोकन केलें तीच मी आज तुला वल्कलें परिधान केलेला पाहत आहें १४. हजारों ब्राह्मणांकडे सुवर्णाच्या पात्रांनीं तुझ्या घरांतून जें सर्वांच्या इच्छा परिपूर्ण करणारें अन्न तयार होऊन जात असे १५; हे प्रभो धर्मराजा, यति, ब्रह्मचारी आणि गृहस्थाश्रमी यांना जें अत्यंत

राजन्नतीव गुणवत्प्रभो १६ सत्कृतानि सहस्राणि सर्वकामैः पुरा गृहे। सर्व-
कामैः सुविहितैर्यदपूजयथा द्विजान् १७ तच्च राजन्नपश्यन्त्याः का शान्तिर्हृ-
दयस्य मे १८ यत्ते भ्रातॄन्महाराज युवानो मृष्टकुण्डलाः । अभोजयन्त
मिष्टान्नैः सूदाः परमसंस्कृतैः १९ सर्वांस्तानद्य पश्यामि वने वन्येन जीविनः ।
अदुःखार्हान्मनुष्येन्द्र नोपशाम्यति मे मनः २० भीमसेनमिमं चापि दुःखितं
वनवासिनम् । ध्यायतः किं न मन्युस्ते प्राप्ते काले विवर्धते २१ भीम-
सेनं हि कर्माणि स्वयं कुर्वाणमच्युतम् । सुखार्हं दुःखितं दृष्ट्वा कस्मा-
न्मन्युर्न वर्धते २२ सत्कृतं विविधैर्यानैर्वस्त्रैरुच्चावचैस्तथा । तं ते वनगतं
दृष्ट्वा कस्मान्मन्युर्न वर्धते २३ अयं कुरून्रणे सर्वान्हन्तुमुत्सहते प्रभुः ।
त्वत्प्रतिज्ञां प्रतीक्षंस्तु सहतेयं वृकोदरः २४ योऽर्जुनेनार्जुनस्तुल्यो द्विबाहुर्ब-
हुबाहुना । शरावमर्दे शीघ्रत्वात्कालान्तकयमोपमः २५ यस्य शस्त्रप्रता-

---

उत्कृष्ट भोजन तुझ्या घरीं मिळत असे १६ आणि त्याचप्रमाणें पूर्वी तुझ्या घरामध्यें सर्व इच्छा परिपूर्ण होऊन जो हजारों याचकांचा सत्कार होत असे आणि त्याचप्रमाणें उत्तम रीतीनें सर्व प्रकारच्या इच्छा परिपूर्ण करून जें तुझ्या हातून द्विजांचें पूजन घडत असे १७ तें जर कांहींएक आतां माझ्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं तर, हे राजा, माझ्या अंतःकरणाला शांति कशी असणार ? १८. हे महाराजा, उज्ज्वल कुंडलें धारण केलेले तरुण आचारी ज्या तुझ्या भ्रात्यांना पूर्वी उत्तम प्रकार तयार केलेल्या मिष्टान्नांनीं भोजन घालीत असत १९. त्या दुःख भोगण्यास पात्र नसलेल्या सर्वांना मी आज वनामध्यें वन्य आहारावर उपजीविका करीत असतांना अवलोकन करीत आहें. ह्यामुळें, हे राजा, माझ्या चित्ताला समाधान वाटत नाहीं २०. वनवासी बनल्यामुळें दुःखित झालेल्या या भीमसेनाविषयीं विचार करीत असतांना व क्रोध वृद्धिंगत होण्याची ही वेळ असतांना तुझा क्रोध कां बरें वृद्धिंगत होत नाहीं ? २१. अरे, धैर्यापासून कधींही च्युत न होणारा आणि सुखोपभोग घेण्यास योग्य असूनही दुखित झालेला हा भीमसेन स्वतः कावाडकष्टकरीत असतांना अवलोकन करूनही तुला कां राग येत नाहीं ? २२. नानाप्रकारचीं वाहनें आणि लहानमोठीं वस्त्रें ह्यांच्या योगानें ज्याचा पूर्वी सत्कार होत असे तो भीमसेन वनांत गेलेला पाहून तुझा क्रोध कसा प्रदीप्त होत नाहीं ? २३. ह्या समर्थ भीमसेनाला रणामध्यें सर्व कौरवांचा वध करण्याचें सामर्थ्य आहे. परंतु, तुझ्या प्रतिज्ञेकडे दृष्टि देऊन हा ( सर्व दुःख ) सहन करीत आहे २४. द्विभुज असूनही सहस्र भुजांनीं युक्त असलेल्या कार्तवीर्य अर्जुनाची जो अर्जुन बाण सोडण्यामध्यें हस्तलाघवामुळें बरोबरी करणारा आहे, ( समरांगणामध्यें उभा राहिला असतां ) काल, मृत्यु आणि यम

पेन प्रणताः सर्वपार्थिवाः । यज्ञे तव महाराज ब्राह्मणानुपतस्थिरे २६
तामिमं पुरुषव्याघ्रं पूजितं देवदानवैः । ध्यायन्तमर्जुनं दृष्ट्वा कस्माद्राजन्न
कुप्यसि २७ दृष्ट्वा वनगतं पार्थमदुःखार्हं सुखोचितम् । न च ते वर्धते
मन्युस्तेन मुह्यामि भारत २८ यो देवांश्च मनुष्यांश्च सर्पांश्चैकरथो-
जयत् । तं ते वनगतं दृष्ट्वा कस्मान्मन्युर्न वर्धते २९ यो यानैरद्भुताका-
रैर्हयैर्नागैश्च संवृतः । प्रसह्य वित्तान्यादत्त पार्थिवेभ्यः परन्तपः ३० क्षिप-
त्येकेन वेगेन पञ्च बाणशतानि यः । तं ते वनगतं दृष्ट्वा कस्मान्मन्युर्न
वर्धते ३१ श्यामं बृहन्तं तरुणं चर्मिणामुत्तमं रणे । नकुलं ते वने दृष्ट्वा
कस्मान्मन्युर्न वर्धते ३२ दर्शनीयं च शूरं च माद्रीपुत्रं युधिष्ठिर । सहदेवं
वने दृष्ट्वा कस्मात्क्षमसि पार्थिव ३३ नकुलं सहदेवं च दृष्ट्वा ते दुःखि-
तावुभौ । अदुःखार्हौ मनुष्येन्द्र कस्मान्मन्युर्न वर्धते ३४ द्रुपदस्य कुले
जातां स्नुषां पाण्डोर्महात्मनः । धृष्टद्युम्नस्य भगिनीं वीरपत्नीमनुव्रताम् ॥

---

ह्यांचीच उपमा ज्याला योग्य आहे २५ आणि ज्याच्या शस्त्रप्रतापानें सर्व राजे नम्र होऊन, हे महाराजा, तुझ्या राजसूय यज्ञामध्यें ब्राह्मणांची सेवा करीत होते २६ त्या देव दैत्यांनाही पूज्य असलेल्या ह्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनाला चिंताक्रांत बसलेला अवलोकन करूनही, हे राजा, तुला कोप कां येत नाहीं ? २७. हे भरतकुलोत्पन्ना, दुःखाला अयोग्य आणि सुखालाच योग्य असा हा अर्जुन वनांत गेलेला अवलोकन करूनही तुला क्रोध चढत नाहीं ह्यामुळें मला कांहीं सुचेनासें झालें आहे २८. देव, मनुष्य आणि सर्प ह्यांना ज्या पृथ्वींतील रथ्यानें जिंकिलें त्या अर्जुनाला वनांत गेलेला पाहून तुला कसा रे क्रोध चढत नाहीं ? २९. हे शत्रुतापना युधिष्ठिरा, आश्चर्यकारक आकारानीं युक्त असलेले रथ, अश्व आणि गज यांनीं परिवेष्टित होऊन ज्यानें बलात्कारानें राजांपासून द्रव्य हरण केलें आणि पांचशें बाण सोडिल्यावांचून जो दम सोडीत नाहीं तो अर्जुन वनांत गेलेला पाहून तुझा क्रोध का बरें वृद्धिंगत होत नाहीं ? ३०,३१. रणांत ढालतलवार धरणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, शरीरानें धिप्पाड आणि वर्णानें श्याम अशा तरुण नकुलाला वनामध्यें अवलोकन करून तुझ्या क्रोधाचा भडका कां बरें होत नाहीं ? ३२. हे राजा युधिष्ठिरा, मनोहर आणि शूर अशा माद्रीपुत्र सहदेवाला वनामध्यें पाहूनही तूं कशा करितां ( शत्रूंनी ) क्षमा करीत आहेस? ३३. हे मानवाधिपते, नकुल आणि सहदेव हे उभयतां दुःखाला अयोग्य असतांनाही दुःखित झालेले अवलोकन करून तुझा क्रोध कसा रे प्रज्वलित होत नाहीं ? ३४. हे राजा, ( तेंही असो; परंतु, ) द्रुपदाच्या कुलामध्यें उत्पन्न झालेली, महात्म्या पांडूची स्नुषा, धृष्टद्यु-

मां वै वनगतां दृष्ट्वा कस्मात्क्षमसि पार्थिव ३५ नूनं च तव वै नास्ति मन्युर्भरतसत्तम । यत्ते भ्रातॄंश्च मां चैव दृष्ट्वा न व्यथते मनः ३६ न निर्मन्युः क्षत्रियोऽस्ति लोके निर्वचनं स्मृतम् । तदद्य त्वयि पश्यामि क्षत्रिये विपरीतवत् ३७ यो न दर्शयते तेजः क्षत्रियः काल आगते । सर्वभूतानि तं पार्थ सदा परिभवन्त्युत ३८ तत्त्वया न क्षमा कार्या शत्रून्प्रति कथंचन । तेजसैव हि ते शक्या निहन्तुं नात्र संशयः ३९ तथैव यः क्षमाकाले क्षत्रियो नोपशाम्यति । अप्रियः सर्वभूतानां सोमुत्रेह च नश्यति ४० [१०३५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां०मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्रौपदीपरितापवाक्ये सप्तविंशोऽध्यायः ॥२७॥

द्रौपद्युवाच ॥ अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । प्रह्लादस्य च संवादं बलेर्वैरोचनस्य च १ असुरेन्द्रं महाप्राज्ञं धर्माणामागतागमम् । बलिः पप्रच्छ दैत्येन्द्रं प्रह्लादं पितरं पितुः २ बलिरुवाच ॥ क्षमा स्विच्छ्रेयसी तात उताहो तेज इत्युत । एतन्मे संशयं तात यथावद्ब्रूहि पृच्छते ३

---

ह्याची भगिनी, वीरांची पत्नी आणि पतींच्या इच्छेप्रमाणे वागण्यास तत्पर असलेली मीही वनामध्यें आल्याचें पाहून तूं कशाकरितां सहन करीत आहेस ? ३५. हें भरतवंशजश्रेष्ठा, भ्रात्यांना आणि मला अवलोकन करूनही ज्याअर्थी तुझ्या मनाला दुःख होत नाही त्याअर्थी राग ( हा पदार्थ ) च तुझे ठिकाणीं नाही ३६. क्रोधरहित क्षत्रिय नाहीं अशी लोकांमध्यें ह्मण आहे; परंतु, ती आज तुज क्षत्रियाचेच ठिकाणीं विपरीत झाल्यासारखी मला दिसत आहे ३७. हे कुंतीपुत्रा, समय प्राप्त झाला असतां जो क्षत्रिय आपलें तेज प्रकट करीत नाहीं त्याचा अपमान सर्व प्राणी नेहमीं करीत असतात ३८. करितां, शत्रूंची कधींही क्षमा करणें तुला योग्य नाही. तेजानेच त्यांचा वध होणे शक्य आहे ह्यांत संशय नाहीं ३९. असो. ( ज्याप्रमाणें तेज प्रकट करण्याचा समय आला असतां तें प्रकट न करणाऱ्या क्षत्रियाचा सर्व प्राणी अवमान करूं लागतात ) त्याचप्रमाणें क्षमा करण्याचा समय असतांना जो क्षत्रिय क्षमेचें अवलंबन करीत नाही तो सर्व प्राण्यांना अप्रिय होऊन इहलोकाला व परलोकालाही मुकतो ४०. ह्याप्रमाणें ० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं द्रौपदीच्या शोकयुक्त भाषणाविषयीं सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला॥२७॥

द्रौपदी ह्मणते:— ह्याविषयींही प्रल्हाद आणि विरोचनपुत्र बलि ह्यांचा संवाद ह्मणून हा एक पुरातन इतिहास कथन करीत असतात १. बलीनें, धर्मांचें रहस्य ज्याला प्राप्त झालेलें आहे अशा महाज्ञानवान् असुरश्रेष्ठ दैत्याधिपति प्रल्हादाला ह्मणजे, आपल्या पित्याच्या पित्याला प्रश्न केला २. बलि प्रश्न करितो:—हे तात, क्षमा श्रेष्ठ किंवा

श्रेयो यदत्र धर्मज्ञ ब्रूहि मे तदसंशयम् । करिष्यामि हिं तत्सर्वं यथावद्नुशासनम् ४ तस्मै प्रोवाच तत्सर्वमेवं पृष्टः पितामहः । सर्वनिश्चयवित्प्राज्ञः संशयं परिपृच्छते ५ प्रह्लाद उवाच ॥ न श्रेयः सततं तेजो न नित्यं श्रेयसी क्षमा । इति तात विजानीहि द्वयमेतदसंशयम् ६ यो नित्यं क्षमते तात बहून्दोषान्स विन्दति । भृत्याः परिभवन्त्येनमुदासीनास्तथारयः ७ सर्वभूतानि चाप्यस्य न नमन्ते कदाचन । तस्मान्नित्यं क्षमा तात पण्डितैरपवादिता ८ अवज्ञाय हि तं भृत्या भजन्ते बहुदोषताम् । आदातुं चास्य वित्तानि प्रार्थयन्तेल्पचेतसः ९ यानं वस्त्राण्यलङ्काराञ्छयनान्यासनानि च । भोजनान्यथ पानानि सर्वोपकरणानि च १० आददीरन्नधिकृता यथाकाममचेतसः । प्रदिष्टानि च देयानि न दद्युर्भर्तृशासनात् ११ न चैनं भर्तृपूजाभिः पूजयन्ति कथंचन । अवज्ञानं हि लोकेस्मिन्मरणादपि गर्हितम् १२ क्षमिणं तादृशं तात ब्रुवन्ति कटुकान्यपि । प्रेष्याः

---

क्रोध श्रेष्ठ यांविषयीं मी प्रश्न करीत आहें तरी आपण माझ्या या संशयाचें यथायोग्य रीतीनें निरसन करा ३. सारांश, हे धर्मज्ञ, क्षमा आणि क्रोध ह्यांमध्यें श्रेष्ठ काय तें आपण मला निःसंशय सांगा; ह्मणजे मी आपल्या सांगण्याप्रमाणें तें सर्व कांहीं करीन ४. ह्याप्रमाणें बलीनें प्रश्न केला असतां धर्मसंबंधीं प्रत्येक गोष्टीचा निर्णय जाणणाऱ्या त्याच्या ज्ञानी पितामहानें वरील संशयासंबंधानें प्रश्न करणाऱ्या त्या बलीला तें सर्व सांगितलें ५. प्रल्हाद ह्मणतोः— बा बले, नेहमीं क्रोधही योग्य नाहीं आणि क्षमाही नेहमीं उचित नाहीं असें तूं या दोहोंबद्दल निःसंशय समज ६. कारण, बा बले, जो नेहमीं क्षमेचेंच अवलंबन करितो त्याला बहुत दोष प्राप्त होतात. ( उदाहरणार्थ ) सेवक त्याचा अवमान करितात; रिपु त्याच्याविषयीं बेफिकीर असतात ७ आणि इतरही सर्व प्राणी त्याच्याशीं कधींही नमून वागत नाहींत ( अर्थात्, त्याची आज्ञा शिरसा मान्य करीत नाहींत ) ह्यास्तव, बा विरोचनपुत्रा, नेहेमीं क्षमेचें अवलंबन करणें पंडितांनींही वर्ज्य केलेलें आहे ८. नित्य क्षमेचें अवलंबन करणाऱ्या पुरुषाचे सेवक नुसता त्याचा अवमानच करून राहत नाहींत; परंतु, आणखीही अनेक दुष्कर्माचें ते अवलंबन करूं लागतात. ते मंदमति सेवक त्याच्या संपत्तीचा अपहार करण्याची इच्छा करीत असतात ९. वाहनें, वस्त्रें, अलंकार, शय्या, आसनें, भोज्य व पेय पदार्थ आणि इतरही हरएक प्रकारचीं उपकरणें ह्यांचा १० त्या त्या कामावर नेमिलेले अविचारी पुरुष यथेष्ट अपहार करूं पाहतात आणि ज्या वस्तु यजमानाच्या आज्ञेनें द्यावयाच्या ह्मणून ठरलें असेल त्या ते देण्याचें मनांत आणीत नाहींत ११ आणि यजमानाला उचित अशी मानमान्यता ठेवून ते त्याची प्रतिष्ठा राखीत नाहींत. मान-

पुत्राश्च भृत्याश्च तथोदासीनवृत्तयः १३ अथास्य दारानिच्छन्ति परि-
भूय क्षमावतः। दाराश्चास्य प्रवर्तन्ते यथाकाममचेतसः १४ तथा च
नित्यमुदितो यदि नाल्पमपीश्वरात्। दण्डमर्हन्ति दुष्यन्ति दुष्टाश्चाप्यप-
कुर्वते १५ एते चान्ये च बहवो नित्यं दोषाः क्षमावताम्। अथ वैरो-
चने दोषानिमान्विद्ध्यक्षमावताम् १६ अस्थाने यदि वा स्थाने सततं
रजसा वृतः। क्रुद्धो दण्डान्प्रणयति विविधान्स्वेन तेजसा १७ मित्रैः
सह विरोधं च प्राप्नुते तेजसा वृतः। आप्नोति द्वेष्यतां चैव लोकात्स्व-
जनतस्तथा १८ सोवमानादर्थहानिमुपालम्भमनादरम्। संतापद्वेषमोहांश्च
शत्रूंश्च लभते नरः १९ क्रोधाद्दण्डान्मनुष्येषु विविधान्पुरुषो ददन्। भ्रश्यते
शीघ्रमैश्वर्यात्प्राणेभ्यः स्वजनादपि २० यापकर्तॄंश्च हन्तॄंश्च तेजसैवोपग-
च्छति। तस्मादुद्विजते लोकः सर्पाद्वेश्मगतादिव २१ यस्मादुद्विजते लोकः

---

खंडना होणें हें या जगतामध्यें मरणापेक्षांही वाईट मानिलेलें आहे १२. बा विरोचन-पुत्रा, तशा प्रकारच्या क्षमाशील पुरुषाला दूत, पुत्र आणि सेवक बेपरवा होऊन मर्मभेदक भाषणेंही करितात १३. इतकेंच नव्हे परंतु, क्षमाशील स्वामीचा अवमान करून ते सेवकप्रभृति लोक त्याच्या स्त्रियांचा अभिलाष करितात आणि त्याच्या स्त्रियाही अविचारी बनून स्वैर वर्तन करूं लागतात १४. त्याचप्रमाणें नेहमीं उत्सवांत दंग झालेल्या प्रजाजनांना राजापासून जर अल्प स्वल्पही दंड होईनासा झाला तर त्यांचीं मनें दूषित होतात आणि दूषित मनांनीं युक्त झाले असतां ते अपकार करूं लागतात १५. हे व अशाप्रकारचे पुष्कळ अनर्थ क्षमेचें नित्य अवलंबन करणाऱ्या पुरुषांना प्राप्त होत असतात. आतां, हे विरोचनपुत्रा, नित्य क्षमारहित असणाऱ्या पुरुषांना प्राप्त होणारे हे अनर्थ तूं ऐकून ठेव १६. नेहमीं रजोगुणानें व्याप्त आणि म्हणूनच क्रुद्ध असलेला पुरुष पात्रापात्र विचार न करितां आपल्या क्रोधाच्या योगानें नित्य नानाप्रकारचे दंड करीत सुटतो १७. क्रोधानें व्याप्त असलेल्या पुरुषाचा मित्रांशीं विरोध उत्पन्न होतो आणि लोक व कुटुंबांतील माणसें ह्यांच्या द्वेषास तो पात्र होतो १८. मानखंडनेपासून द्रव्यहानि, धिक्कार, अनादर, संताप, द्वेष, मोह आणि शत्रु त्या पुरुषाला प्राप्त होतात १९. क्रोधामुळें मनुष्यांचे ठिकाणीं यथेष्ट दंड करण्याच्या योगानें आणि नानाप्रकारचे अन्याय करण्याच्या योगानें पुरुष ऐश्वर्य, स्वजन आणि प्राण ह्यांच्या पासून सत्वर भ्रष्ट होतो २०. घरांत शिरलेल्या सर्पापासून ज्याप्रमाणें लोक उद्विग्न होतात त्याचप्रमाणें अपकार आणि उपकार करणाऱ्यांशींही एकसारखे क्रोधानेंच वागणाऱ्या पुरुषापासून लोक उद्विग्न होतात २१. तेव्हां ज्याच्यापासून लोकांना उद्विग्नता प्राप्त होते त्याचा

कथं तस्य भवो भवेत् । अन्तरं तस्य दृष्ट्वैव लोको विकुरुते ध्रुवम् २२
तस्मान्नात्युत्सृजेत्तेजो न च नित्यं मृदुर्भवेत् । काले काले तु संप्राप्ते मृदु-
स्तीक्ष्णोपि वा भवेत् २३ काले मृदुर्यो भवति काले भवति दारुणः । स वै
सुखमवाप्नोति लोकेमुष्मिन्निहैव च २४ क्षमाकालांस्तु वक्ष्यामि शृणु मे
विस्तरेण तान् । ये ते नित्यमसंत्याज्या यथा प्राहुर्मनीषिणः २५ पूर्वोपकारी
यस्ते स्यादपराधे गरीयसि । उपकारेण तत्तस्य क्षन्तव्यमपराधिनः २६
अबुद्धिमाश्रितानां तु क्षन्तव्यमपराधिनाम् । न हि सर्वत्र पाण्डित्यं सुलभं
पुरुषेण वै २७ अथ ये बुद्धिजं कृत्वा ब्रूयुस्ते तदबुद्धिजम् । पापान्स्वल्पेपि
तान्हन्यादपराधे तथानृजून् २८ सर्वस्यैकोपराधस्ते क्षन्तव्यः प्राणिनो
भवेत् । द्वितीये सति वध्यस्तु स्वल्पेप्यपकृते भवेत् २९ अजानता भवेत्क-
श्चिदपराधः कृतो यदि । क्षन्तव्यमेव तस्याहुः सुपरीक्ष्य परीक्षया ३०
मृदुना दारुणं हन्ति मृदुना हन्त्यदारुणम् । नासाध्यं मृदुना किंचित्तस्मा-

---

अभ्युदय कसा होणार ? त्याचे छिद्र दृष्टोत्पत्तीस आल्या बरोबर लोक त्याची परि-स्फुटता करितातच २२. ह्याकरितां, क्रोधाला अति मोकळा सोडूं नये आणि नेहमीं मृदुही राहूं नये. परंतु, ज्याचा त्याचा काल प्राप्त झाला असतां पुरुषानें मृदु अथवा तीक्ष्ण व्हावें २३. योग्य कालीं जो मृदु होतो आणि योग्य कालीं जो क्रुद्ध होतो त्याला इहलोकीं आणि परलोकीं सुख प्राप्त होतें २४. आतां ज्याचे कधींही अतिक्र-मण करणें योग्य नाहीं असे विचारी पुरुषांनीं सांगितलेले क्षमाकाल मी तुला कथन करितें ते तूं सविस्तर श्रवण कर २५. पूर्वी ज्यानें तुझ्यावर उपकार केला असेल त्याच्या हातून जरी मोठा अपराध झाला तरी त्या उपकाराकरितां त्या अपराध्याच्या अपराधाची तूं क्षमा करीत जा २६. मूर्खपणामुळें ज्यांच्या हातून अपराध घडला असेल त्यांची क्षमा करावी; कारण, चोहोंकडे पुरुषाची अक्कल चालणें हें सोपें नाहीं २७. आतां कोणी जाणूनबुजून अपराध करून जर तो नसमजता झाला असें म्हणूं लागतील तर अगदीं अल्प जरी अपराध घडलेला असला तरी त्या दुष्टांचा वध करावा आणि त्याचप्रमाणें जे अपराधी सरळ वागत नसतील त्यांचाही घात करावा २८. कोणत्याही प्राण्यांच्या एका अपराधाची तूं क्षमा करीत जा; परंतु, दुसरा अपराध अगदीं अल्प जरी असला तरी त्याचा समाचार घेण्यास तूं सोडीत जाऊं नकोस २९. एकाद्याच्या हातून न समजतां जर कांहीं अपराध झाला असेल तर चौकशीअंतीं नीट परीक्षा करून त्याच्या त्या अपराधाची क्षमा करावी ३०. वागेमध्यें स्वीकारलेल्या मार्दवाच्या योगानें पुरुषाला क्रूर आणि क्रौर्यरहित या उभयतांचाही घात करिता येतो. सारांश, वागी-

त्तीव्रतरं मृदु ३१ देशकालौ तु संप्रेक्ष्य बलाबलमथात्मनः । नादेशकाले किंचित्स्याद्देशकालौ प्रतीक्षताम् ३२ तथा लोकभयाच्चैव क्षन्तव्यमपराधिनः ३३ एत एवं विधाः कालाः क्षमायाः परिकीर्तिताः। अतोऽन्यथानुवर्तत्सु तेजसः काल उच्यते ३४ द्रौपद्युवाच॥ तदहं तेजसः कालं तव मन्ये नराधिप। धार्तराष्ट्रेषु लुब्धेषु सततं चापकारिषु ३५ न हि कश्चित्क्षमाकालो विद्यतेद्य कुरून्प्रति । तेजसश्चागते काले तेज उत्स्रष्टुमर्हसि ३६ मृदुर्भवत्यवज्ञातस्तीक्ष्णादुद्विजते जनः । काले प्राप्ते द्वयं चैतद्यो वेद स महीपतिः ३७ [ १०७२ ]
इति० मा०ण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्रौपदीवाक्येऽष्टाविंशोऽध्यायः ॥२८॥

युधिष्ठिर उवाच ॥ क्रोधो हन्ता मनुष्याणां क्रोधो भावयिता पुनः । इति विद्धि महाप्राज्ञे क्रोधमूलौ भवाभवौ १ यो हि संहरते क्रोधं भवस्तस्य सुशोभने । यः पुनः पुरुषः क्रोधं नित्यं न सहते शुभे । तस्या-

---

मध्यें मार्दव स्वीकारिलें असतां पुरुषाला कोणतीही गोष्ट असाध्य नाहीं. ह्यास्तव, मार्दव हें वस्तुतः तीक्ष्णापेक्षांही तीक्ष्ण आहे ३१. देश आणि काल लक्ष्यांत आणून व आपलें बलाबल पाहून ( अपराध्याला क्षमा अथवा दंड ह्यांपैकीं ) काय करणें असेल तें करावें. देश आणि काल हे अनुरूप नसतील तर कांहींच होणार नाहीं. ह्याकरितां, देशकालाकडे दृष्टि द्यावीच ३२ आणि त्याचप्रमाणें ( राजानें ) लोकभीति बाळगूनही अपराध्याला क्षमा करावी ३३. क्षमेचे हे याप्रमाणें पुष्कळ काल ( विचारी लोकांनीं)सांगून ठेविले आहेत. वर जे प्रकार निर्दिष्ट केले आहेत त्यांहून भलत्याच रीतीनें जर अपराधी वागूं लागले तर क्रोधाचा उपयोग करण्याचा काल आहे असें समजावें ३४.द्रौपदी ह्मणते:— ( ह्याप्रमाणें प्रल्हादानें बलीची संशय निवृत्ति केलेली आहे ) ह्यास्तव, हे राजा, लोभी आणि नित्य अपकार करणाऱ्या धृतराष्ट्रपुत्रांचे ठिकाणीं तुझा क्रोध होण्याचा समय आला आहे असें मला वाटतें ३५. कौरवांना क्षमा करण्याची आज मुळींच वेळ नव्हे; करितां, क्रोधाचा उपयोग करण्याचा काल प्राप्त झाला असल्यामुळें कौरवांवर क्रोध करणेंच तुला योग्य आहे ३६. मृदु पुरुषाची जेथें तेथें अवज्ञा होते आणि रागीट पुरुषापासून लोकांना उद्वेग प्राप्त होतो. करितां, योग्य समय प्राप्त झाला असतां ह्या दोहोंचाही कसा उपयोग करावा हें जो जाणितो तोच पृथ्वीपति होतो ३७. ह्याप्रमाणें० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं द्रौपदीच्या भाषणाविषयीं अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २८ ॥

युधिष्ठिर ह्मणतो:—हे महाप्राज्ञे, मनुष्यांचा घातक आणि प्रतिपालक क्रोध असल्यामुळें अभ्युदय आणि हानि हीं क्रोधमूलकच आहेत असें समज १. हे कल्याणि, जो क्रोध अवरून धरितो त्याचा अभ्युदय होतो आणि जो पुरुष नेहमीं क्रोधाच्या

नाशाय भवति क्रोधः परमदारुणः ३ क्रोधमूलो विनाशो हि प्रजानामिह दृश्यते । तत्कथं मादृशः क्रोधमुत्सृजेल्लोकनाशनम् ४ क्रुद्धः पापं नरः कुर्यात्क्रुद्धो हन्याद्गुरूनपि । क्रुद्धः परुषया वाचा श्रेयसोऽप्यवमन्यते ५ वाच्यावाच्ये हि कुपितो न प्रजानाति कर्हिचित् । नाकार्यमस्ति क्रुद्धस्य नावाच्यं विद्यते तथा ६ हिंस्यात्क्रोधादवध्यांस्तु वध्यान्संपूजयीत च । आत्मानमपि च क्रुद्धः प्रेषयेद्यमसादनम् ७ एतान्दोषान्प्रपश्यद्भिर्जितः क्रोधो मनीषिभिः । इच्छद्भिः परमं श्रेय इह चामुत्र चोत्तमम् ८ तं क्रोधं वर्जितं धीरैः कथमस्मद्विधश्चरेत् । एतद्द्रौपदि संधाय न मे मन्युः प्रवर्धते ९ आत्मानं च परांश्चैव त्रायते महतो भयात् । क्रुध्यन्तमप्रतिक्रुध्यन्द्वयोरेष चिकित्सकः १० मूढो यदि क्लिश्यमानः क्रुध्यतेऽशक्तिमान्नरः । बलीयसां मनुष्याणां त्यजत्यात्मानमात्मना ११ तस्यात्मानं संत्यजतो लोका नश्यन्त्यनात्मनः । तस्माद्द्रौपद्यशक्तस्य मन्योर्नियमनं स्मृतम् १२

---

अर्धान असतो त्याच्या हानीला तो महाभयकर क्रोध कारणीभूत होतो२,३. सारांश, क्रोधामुळें ह्या जगतामध्यें लोकांचा नाश होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. तस्मात्, माझ्यासारिखा पुरुष आत्मघातकी क्रोधाला कसा बरें मोकळा सोडील ? ४. क्रुद्ध पुरुष पाप करितो, गुरुजनांचाही घात करितो आणि कठोर वाणीच्या योगानें श्रेष्ठांचाही अवमान करितो ५. त्याचप्रमाणें निंद्य आणि प्रशस्त हें तो कधींही जाणीत नाहीं आणि त्यामुळें त्या क्रुद्ध पुरुषाला करण्यास अयोग्य आणि निंद्य असें कांहींही नाहीं ६. क्रुद्ध पुरुष क्रोधाच्या योगानें अवध्यांचा वध करील आणि वध्य पुरुषांचें पूजन करील इतकेंच नव्हे परंतु स्वतःलाही यमसदनीं पाठवून देईल ७. तात्पर्य, हे दोष क्रोधामुळें होतात असें समजून इहलोक आणि परलोक ह्यासंबंधानें उत्कृष्ट प्रकारचें कल्याण होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं क्रोध जिंकिला आहे ८. तेव्हां विचारी पुरुषांनीं वर्ज केलेल्या क्रोधाचें माझ्यासारख्यानें कसें अवलंबन करावें ! हें मनामध्यें आणून हे द्रौपदि, माझा क्रोध वृद्धिंगत होत नाहीं ९. क्रुद्ध झालेल्या पुरुषावर उलट क्रोध न करणारा पुरुष आपलें आणि दुसऱ्यांचें मोठ्या भयापासून रक्षण करितो. सारांश, क्रुद्धावर उलट क्रोध न करणारा पुरुष उभयतांच्याही स्वास्थ्याला कारणीभूत होतो १०. क्लेश होऊं लागले असतां जो अशक्त मूढ पुरुष स्वतःपेक्षां बलाढ्य असलेल्या मनुष्यावर क्रुद्ध होतो तो समजून उमजून आपल्या देहाचा त्याग करितो ११ आणि देहत्याग करणारा तो अविचारी पुरुष उभय लोकांनाही मुकतो. ह्यास्तव, हे द्रौपदि, प्रतीकार करण्यास असमर्थ असलेल्या पुरु-

विद्वांस्तथैव यः शक्तः क्लिश्यमानो न कुप्यति । अनाशयित्वा क्लेष्टारं परलोके च नन्दति १३ तस्माद्बलवता चैव दुर्बलेन च नित्यदा । क्षन्तव्यं पुरुषेणाहुरापत्स्वपि विजानता १४ मन्योर्हि विजयं कृष्णे प्रशंसन्तीह साधवः । क्षमावतो जयं नित्यं साधोरिह सतां मतम् १५ सत्यं चानृततः श्रेयो नृशंसाच्चानृशंसता । तमेवं बहुदोषं तु क्रोधं साधुविवर्जितम् १६ मादृशः प्रसृजेत्कस्मात्सुयोधनवधादपि । तेजस्वीति यमाहुर्वै पण्डिता दीर्घदर्शिनः १७ न क्रोधोऽभ्यन्तरस्तस्य भवतीति विनिश्चितम् । यस्तु क्रोधं समुत्पन्नं प्रज्ञया प्रतिबाधते । तेजस्विनं तं विद्वांसो मन्यन्ते तत्त्वदर्शिनः १८ क्रुद्धो हि कार्यं सुश्रोणि न यथावत्प्रपश्यति । नाकार्यं न च मर्यादां नरः क्रुद्धोऽनुपश्यति १९ हन्त्यवध्यानपि क्रुद्धो गुरून्क्रुद्धस्तुदत्यपि । तस्मात्तेजसि कर्तव्यः क्रोधो दूरे प्रतिष्ठितः २० दाक्ष्यं ह्यमर्षः शौर्यं च शीघ्रत्वमिति तेजसः । गुणाः क्रोधाभिभूतेन न शक्याः प्राप्तुमञ्जसा २१ क्रोधं

---

षाला क्रोधसंयमनच सांगितलेलें आहे १२. समंजस आणि प्रतीकार करण्यास समर्थ असा जो पुरुष दुसरा त्रास देऊं लागला असतांही त्याच्यावर क्रुद्ध होत नाहीं तो त्रास देणाऱ्याचा नाश न केल्यामुळें परलोकीं आनंदांत राहतो १३. तस्मात् , आपत्काल जरी असला तरी प्रतीकार करण्याचें सामर्थ्य असो किंवा नसो समंजस पुरुषानें नेहमीं क्षमेचें अवलंबन करावें असें ह्मणतात १४. हे द्रौपदि, इहलोकीं क्षमाशील सज्जन पुरुषाचाच परिणामीं जय होतो असें सज्जनांचें मत आहे आणि ह्मणूनच सज्जन क्रोधसंयमनाची प्रशंसा करीत असतात १५. अनृतापेक्षां सत्य श्रेष्ठ असून दुष्टपणापेक्षां दुष्टपणा न करणें श्रेष्ठ आहे. करितां, सुयोधनापासून वध पावण्याचा जरी प्रसंग आला तरी वर सांगितल्याप्रमाणें अनेक दोषांनी युक्त आणि ह्मणूनच साधु पुरुषांनीं वर्जित अशा क्रोधाला माझ्यासारिखा पुरुष कसा बरें मोकळा सोडील ? १६ दूरवर दृष्टि देणारे पंडित ज्याला तेजस्वी असें ह्मणतात त्या पुरुषाचे ठिकाणीं क्रोध नसतो हें निश्चित आहे १७. सारांश, उत्पन्न झालेल्या क्रोधाचा विचाराच्या योगानें जो नाश करितो त्याला तत्त्वावर दृष्टि देणारे विद्वान् लोक तेजस्वी समजत असतात १८. हे सुंदरि, क्रुद्ध पुरुषाला कार्याकार्य विचार राहत नाहीं आणि ह्मणूनच वर्तनासंबंधानें तो कांहीं मर्यादाही पाहत नाहीं १९. क्रुद्ध पुरुष अवध्य पुरुषांचाही घात करितो आणि गुरुजनांनाही पीडा देतो. तस्मात्, अंगीं तेज असेल तर क्रोधाला दूर ठेवावा २०. दक्षता, शत्रूचा प्रतीकार कसा करितां येईल ह्याचा विचार, शौर्य आणि चुटचुटीतपणा हे जे तेजाचे गुण ते क्रोधानें पछाडलेल्या पुरुषाला सहज प्राप्त होणें शक्य नाहींत २१. पुरुषानें क्रोधाचा त्याग

त्यक्त्वा तु पुरुषः सम्यक्तेजोभिपद्यते । कालयुक्तं महाप्राज्ञे क्रुद्धैस्तेजः सुदुःसहम् २२ क्रोधस्त्वपण्डितैः शश्वत्तेज इत्यभिनिश्चितम् । रजस्तु लोकनाशाय विहितं मानुषं प्रति २३ तस्माच्छश्वत्त्यजेत्क्रोधं पुरुषः सम्यगाचरन् । श्रेयान्स्वधर्मानपगो न क्रुद्ध इति निश्चितम् २४ यदि सर्वमबुद्धीनामतिक्रान्तमचेतसाम् । अतिक्रमो मद्विधस्य कथं स्वित्स्यादनिन्दिते २५ यदि न स्युर्मानुषेषु क्षमिणः पृथिवीसमाः । न स्यात्संधिर्मनुष्याणां क्रोधमूलो हि विग्रहः २६ अभिषक्तो ह्यभिषजेदाहन्याद्गुरुणा हतः । एवं विनाशो भूतानामधर्मः प्रथितो भवेत् २७ आक्रुष्टः पुरुषः सर्वं प्रत्याक्रोशेदनन्तरम् । प्रतिहन्याद्धतश्चैव तथा हिंस्याच्च हिंसितः २८ हन्युर्हि पितरः पुत्रान्पुत्राश्चापि तथा पितॄन् । हन्युश्च पतयो भार्याः पतीन्भार्यास्तथैव च २९ एवं संकुपिते लोके जन्म कृष्णे न विद्यते । प्रजानां संधिमूलं हि जन्म विद्धि शुभानने ३० ताः क्षिपेरन्प्रजाः सर्वाः

केला असतां त्याला चांगलें तेज प्राप्त होतें. हे महाविचारी द्रौपदि, देशकालानुरूप असलेलें तेज क्रुद्ध पुरुषांना फारच दुःसह होतें २२, कांहीं महापंडित ( अर्थात् मूर्ख लोक ) क्रोधालाच तेज असें ठरवीत असतात; परंतु, रजोगुणाचा परिणाम असलेला हा क्रोध लोकनाशाकरितां मनुष्याचे ठिकाणीं ठेविलेला आहे २३. तस्मात्, चांगल्या रीतीनें वागण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें क्रोधाचा नेहमीं त्याग करावा. कारण, स्वधर्म सोडून जाणाऱ्या ( पतित पुरुषा ) पेक्षांही क्रुद्ध पुरुष कमी हें निश्चित आहे २४. हे गुणसंपन्न द्रौपदि, विचारहीन मूढ पुरुषांनीं जरी कशाचीही पर्वा केली नाहीं तरी माझ्यासारिख्याला बेपर्वाईनें कसें वागतां येईल ? २५. मनुष्यांमध्यें पृथ्वीसारखें क्षमाशील जर नसतील तर त्यांचे एकमेकांशीं कधींही जुळणार नाहीं. कारण, क्रोध हें कलहाचें मूळ आहे २६. क्रुद्ध पुरुष इतरांनाही क्रोध आणील आणि गुरूनें ताडन केलें असतां त्यालाही उलट ताडन करील ( मग दुसऱ्याची गोष्ट कशाला पाहिजे? ). सारांश, ह्याप्रमाणें क्रोधाच्या योगानें प्राण्यांची हानि होऊन त्यांच्या धर्मभ्रष्टतेचाही चोहोंकडे डंका वाजेल २७. क्रुद्ध पुरुषाला कोणीं कांहीं लागून बोललें असतां तो हवें त्याला उलटून बोलेल; कोणी त्याच्या अंगावर चालून आलें असतां तोही उलट त्याचे अंगावर चालून जाईल आणि ( गुरूनें वगैरे ) ताडन केलें असतां त्यालाही उलट ताडन करील २८. एकवार क्रोध मोकळा सोडिला म्हणजे पिते पुत्रांचा घात करतील आणि पुत्रही पित्यांना मारूं लागतील व त्याचप्रमाणें पति भार्यांचा घात करूं लागतील आणि भार्याही पतींचा नाश करूं लागतील २९ आणि याप्रमाणें सर्व जगत् क्रुद्ध झालें असतां, हे द्रौपदि,

क्षिप्रं द्रौपदि तादृशे । तस्मान्मन्युर्विनाशाय प्रजानामभवाय च ३१ यस्मात्तु लोके दृश्यन्ते क्षमिणः पृथिवीसमाः । तस्माज्जन्म च भूतानां भवश्च प्रतिपद्यते ३२ क्षन्तव्यं पुरुषेणेह सर्वापत्सु सुशोभने । क्षमावतो हि भूतानां जन्म चैव प्रकीर्तितम् ३३ आक्रुष्टस्ताडितः क्रुद्धः क्षमते यो बलीयसा । यश्च नित्यं जितक्रोधो विद्वानुत्तमपूरुषः ३४ प्रभाववानपि नरस्तस्य लोकाः सनातनाः । क्रोधनस्त्वल्पविज्ञानः प्रेत्य चेह च नश्यति ३५ अत्राप्युदाहरन्तीमा गाथा नित्यं क्षमावताम् । गीताः क्षमावता कृष्णे काश्यपेन महात्मना ३६ क्षमा धर्मः क्षमा यज्ञः क्षमा वेदाः क्षमा श्रुतम् । य एतदेवं जानाति स सर्वं क्षन्तुमर्हति ३७ क्षमा ब्रह्म क्षमा सत्यं क्षमा भूतं च भावि च । क्षमा तपः क्षमा शौचं क्षमयेदं धृतं जगत् ३८ अतियज्ञवि-

---

पृथ्वीमध्यें प्रजोत्पादन होणार नाहीं. कारण, हे सुमुखी, स्त्रीपुरुषांतील प्रेम हेंच प्रजोत्पादनाचें मूळ आहे असें तूं समज ३०. हे द्रौपदि, राजा जर तशाप्रकारचा ( क्रोधग्रस्त ) असेल तर त्या सर्व प्रजांचा सत्वर नाश होईल. तस्मात्, क्रोध हा प्रजांच्या नाशाला आणि ऐश्वर्यहानीला कारणीभूत होणारा आहे ( हें सिद्ध आहे ) ३१. जगतामध्यें पृथ्वीसारिखे क्षमाशील राजे दृष्टोत्पत्तीस येतात म्हणूनच स्त्री पुरुष ( बाल्यावस्थेंतच राजाच्या क्रोधानें वगैरे नाश न पावतां ) यौवनावस्थेमध्यें येतात आणि त्यामुळें प्राण्यांची उत्पत्ति होऊन अभ्युदय होतो ३२. म्हणून, हे कल्याणि, इहलोकीं कशीही आपत्ति आली तरी पुरुषानें क्षमेचें अवलंबन करावें. कारण, राजा क्षमाशील असेल तरच प्राण्यांची उत्पत्ति व अभ्युदय हीं होतील असें म्हटलें आहे ३३. बलाढ्य पुरुषानें निंदा केली असतां अथवा ताडन केलें असतां अशक्त पुरुष ज्याप्रमाणें क्रुद्ध होत असूनही ( निरुपायास्तव त्या बलाढ्य पुरुषाची ) क्षमा करितो त्याचप्रमाणें प्रतीकार करण्यास समर्थ असूनही जो समंजस पुरुष क्रोधसंयमन करून नित्य क्षमेचें अवलंबन करितो तोच उत्तम पुरुष असून ३४ त्यालाच अक्षय्य लोक प्राप्त होतात आणि ज्याची समजूत कमी आहे असा रागीट पुरुष इहलोकीं आणि परलोकींही कल्याणाला मुकतो ३५. हे द्रौपदि, महात्म्या क्षमाशील काश्यप महर्षींनीं क्षमाशीलांची प्रशंसा म्हणून कांहीं श्लोक सांगितलेले आहेत व त्या ह्या श्लोकांचा लोक नेहमीं ह्या ठिकाणीं उल्लेख करीत असतात ३६. ( ते येणेंप्रमाणें ) धर्म, यज्ञ, वेद आणि बहुश्रुतपणा हीं सर्व क्षमेवरच अवलंबून आहेत. तेव्हां हें ह्याप्रमाणें असल्याचें जो जाणितो त्यानें सर्वांची क्षमा करणेंच योग्य आहे ३७. ब्रह्म, सत्य संचित आणि प्राप्य असें धन, तप आणि शुद्धि हीं क्षमेवरच अवलंबून असून क्षमेवर ह्या जगताचें रक्षण झालेलें आहे ३८. यज्ञ-

दां लोकान्क्षमिणः प्राप्नुवन्ति च । अतिब्रह्मविदां लोकानति चापि तप-
स्विनाम् ३९ अन्ये वै यजुषां लोकाः कर्मिणामपरे तथा । क्षमावतां
ब्रह्मलोके लोकाः परमपूजिताः ४० क्षमा तेजस्विनां तेजः क्षमा ब्रह्म
तपस्विनाम् । क्षमा सत्यं सत्यवतां क्षमा यज्ञः क्षमा शमः ४१ तां क्षमां
तादृशीं कृष्णे कथमस्मद्विधस्त्यजेत् । यस्यां ब्रह्म च सत्यं च यज्ञा
लोकाश्च धिष्ठिताः ४२ क्षन्तव्यमेव सततं पुरुषेण विजानता । यदा हि
क्षमते सर्वं ब्रह्म संपद्यते तदा ४३ क्षमावतामयं लोकः परश्चैव क्षमाव-
ताम् । इह संमानमर्हन्ति परत्र च शुभां गतिम् ४४ येषां मन्युर्मनुष्याणां
क्षमयाभिहतः सदा । तेषां परतरे लोकास्तस्मात्क्षान्तिः परा मता ४५
इति गीताः काश्यपेन गाथा नित्यं क्षमावताम् । श्रुत्वा गाथाः क्षमायास्त्वं
तुष्य द्रौपदि मा क्रुधः ४६ पितामहः शान्तनवः शमं संपूजयिष्यति । कृष्णश्च
देवकीपुत्रः शमं संपूजयिष्यति ४७ आचार्यो विदुरः क्षत्ता शममेव

---

वेत्ते, वेदवेत्ते आणि तपस्वी ह्यांना मागें टाकून त्यांना प्राप्त होणारे लोक पूर्वींच क्षमा-
शीलांना प्राप्त होत असतात ३९. यथाविधि यज्ञानुष्ठान करणाऱ्या पुरुषांना प्राप्त
होणारे लोक वेगळे असून कर्मनिष्ठ पुरुषांना प्राप्त होणारे लोकही भिन्न आहेत. ब्रह्म-
लोकामध्यें क्षमाशील पुरुषांना प्राप्त होणारे लोकच अत्यंत प्रशस्त मानिले जातात ४०.
तेजस्वी पुरुषाचे ठिकाणीं असणारें तेज क्षमेवरच अवलंबून असून तपस्वी पुरुषांना
प्राप्त होणारें ब्रह्महीं क्षमेवरच अवलंबून आहे आणि त्याचप्रमाणें सत्यनिष्ठ पुरुषांचें
सत्यही क्षमेवरच अवलंबून असून यज्ञ आणि शांति हींही क्षमेवरच अवलंबून आहेत ४१.
तस्मात्, ब्रह्म, सत्य, यज्ञ आणि लोक जिच्यावर अवलंबून आहेत त्या क्षमेचा, हे
द्रौपदि, आमच्यासारिख्यानें कसा बरें त्याग करावा ? ४२. सारांश, ( सर्व कांहीं क्षमे-
वर अवलंबून आहे हें ) समजणाऱ्या पुरुषानें नेहमीं क्षमेचें अवलंबन करावें. कारण,
जेव्हां पुरुष सर्व सहन करूं लागतो ( ह्मणजे अर्थात् सर्वांची क्षमा करूं लागतो )
तेव्हां त्याला ब्रह्म प्राप्त होतें ४३. इहलोक आणि परलोक क्षमाशीलांनाच प्राप्त
होतात. सारांश, क्षमाशील पुरुष इहलोकीं मानमान्यता पावून परलोकीं शुभगतीप्रत
प्राप्त होतात ४४. ज्या मनुष्यांचा क्रोध क्षमेच्या योगानें सदां हाणून पाडिला जातो
त्यांना सत्य लोकामध्यें भोग्य पदार्थ प्राप्त होतात. तस्मात्, क्षमा हीच सर्वांमध्यें श्रेष्ठ
आहे ४५. ह्याप्रमाणें काश्यप मुनींनीं नित्य क्षमाशील पुरुषांविषयीं प्रशंसा केली आहे.
तेव्हां ही क्षमेची प्रशंसा श्रवण करून, हे द्रौपदि, तूं संतुष्ट हो ; क्रोध करूं नकोस ४६.
शांतनुपुत्र पितामह भीष्म शांतीलाच मान देतील आणि देवकीनंदन कृष्णही शांती-

वदिष्यतः। कृपश्च संजयश्चैव शममेव वदिष्यतः ४८ सोमदत्तो युयुत्सुश्च द्रोणपुत्रस्तथैव च। पितामहश्च नो व्यासः शमं वदति नित्यशः ४९ एतैर्हि राजा नियतं चोद्यमानः शमं प्रति। राज्यं दातेति मे बुद्धिर्न चेल्लोभान्नशिष्यति ५० कालोऽयं दारुणः प्राप्तो भरतानामभूतये। निश्चितं मे सदैवैतत्पुरस्तादपि भाविनि ५१ सुयोधनो नार्हतीति क्षमामेवं न विन्दति। अर्हस्तत्राहमित्येवं तस्मान्मां विन्दते क्षमा ५२ एतदात्मवतां वृत्तमेष धर्मः सनातनः। क्षमा चैवानृशंस्यं च तत्कर्तास्म्यहमञ्जसा ५३ [ ११२५] इति०मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि युधिष्ठिरद्रौपदीसंवाद एकोनत्रिंशोऽध्यायः॥ २९॥

द्रौपद्युवाच॥ नमो धात्रे विधात्रे च यौ मोहं चक्रतुस्तव। पितृपैतामहे वृत्ते वोढव्ये तेऽन्यथा मतिः १ कर्मभिश्चिन्तितो लोको गत्यां गत्यां पृथग्विधः। तस्मात्कर्माणि नित्यानि लोभान्मोक्षं यियासति २ नेह धर्मा-

---

चीच प्रशंसा करील ४७. त्याचप्रमाणें आचार्य द्रोण, क्षत्ता विदुर, कृप आणि संजय हेही क्षमाच उत्तम असें ह्मणतील ४८ आणि सोमदत्त, युयुत्सु, द्रोणपुत्र व आमचे पितामह व्यास हेही क्षमेच्याच बाजूनें नित्य बोलतील ४९ आणि हे भीष्मप्रभृति नेहमीं क्षमेचें अवलंबन करण्याविषयीं राजा सुयोधनाला सांगूं लागले असतां तो आमचें राज्य परत देईल असें मला वाटतें. जर तो लोभामुळें राज्य न देईल तर नाश पावेल ५०. हे स्त्रिये, हा भयंकर समय प्राप्त झाला असून तो सर्वस्वी भरतवंशजांच्या नाशाला कारणीभूत होईल हें मीं पूर्वींच निश्चित समजून ठेविलेलें आहें ५१. सारांश, सुयोधन राज्याचा उपभोग घेण्यास योग्य नाहीं ह्मणून त्याला ह्याप्रमाणें क्षमा प्राप्त होत नाहीं आणि त्या राज्याविषयीं मी योग्य आहें ह्मणूनच ह्याप्रमाणें क्षमा मला धरून असते ५२. क्षमा आणि दुष्ट बुद्धीचा अभाव हेंच जितेंद्रिय पुरुषांचें वर्तन असून हाच सनातन धर्म आहे. तस्मात्, मी आपल्या इच्छेनें तेंच करणार ५३. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं द्रौपदी आणि युधिष्ठिर ह्यांच्या संवादाविषयीं एकुणतिसावा अध्याय समाप्त झाला॥ २९॥

द्रौपदी ह्मणतेः—वाडवडिलांपासून चालत आलेलें राज्य चालविणें तुझें कर्तव्य असतांना तुला भलतीच बुद्धि ज्याअर्थी उत्पन्न झाली आहे त्याअर्थी तुला मोह पाडणाऱ्या ईश्वराला आणि तुझ्या प्रारब्धाला नमस्कार असो १. कर्मांच्या योगानें वेगवेगळ्या योनींमध्यें वेगवेगळें भोगसाधन प्राप्त होण्याचें ठरून गेलेलें आहे. तस्मात्, कर्मांचें फल टाळतां येणें शक्य नाहीं. पुरुषानें केलेल्या कर्मांच्या फलांपासून सुटका होण्याची इच्छा करणें हें केवळ मोहमूलक आहे २. ( पूर्व कर्मांचा जर अडथळा

नृशंस्याभ्यां न क्षान्त्या नार्जवेन च । पुरुषः श्रियमाप्नोति न घृणित्वेन
कर्हिचित् ३ त्वां चेद्व्यसनमभ्यागादिदं भारत दुःसहम् । यत्त्वं नार्हसि
नापीमे भ्रातरस्ते महौजसः ४ न हि तेऽध्यगमज्जातु तदानीं नाद्य भारत ।
धर्मात्प्रियतरं किंचिदपि चेज्जीवितादिह ५ धर्मार्थमेव ते राज्यं धर्मार्थं
जीवितं च ते । ब्राह्मणा गुरवश्चैव जानन्त्यपि च देवताः ६ भीमसेनार्जुनौ
चेमौ माद्रेयौ च मया सह । त्यजेस्त्वमिति मे बुद्धिर्न तु धर्मं परित्यजेः ७
राजानं धर्मगोप्तारं धर्मो रक्षति रक्षितः । इति मे श्रुतमार्याणां त्वां तु
मन्ये न रक्षति ८ अनन्या हि नरव्याघ्र नित्यदा धर्ममेव ते । बुद्धिः
सततमन्वेति च्छायेव पुरुषं निजा ९ नावमंस्था हि सदृशान्नावरांश्छ्रेयसः
कुतः । अवाप्य पृथिवीं कृत्स्नां न ते शृङ्गमवर्धत १० स्वाहाकारैः स्वधा-
भिश्च पूजाभिरपि च द्विजान् । दैवतानि पितॄंश्चैव सततं पार्थ सेवसे ११

असेल तर ) ह्या जन्मामध्यें धर्म, दया, क्षमा, सरलता आणि लोकापवादभय ह्यांपैकीं कशाच्याही योगानें कधींही पुरुषाला ऐश्वर्य प्राप्त होणार नाहीं ३. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, तूं आणि हे तुझे महातेजस्वी भ्राते यांना संकट भोगण्याचा प्रसंग येणें योग्य नसतांनाही हें अशाप्रकारचें दुःसह संकट तुझ्यावर आलें आहे ( तस्मात्, पूर्वसंचित हेंच याचें कारण होय ) ४. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, त्यावेळीं ( ह्मणजे राज्यवैभवाचा उपभोग घेत असतांना ) ही ते तुझे भ्राते धर्मापेक्षां कोणतीच गोष्ट अधिक प्रिय समजत नव्हते आणि आजही समजत नाहींत. तात्पर्य, जीवितापेक्षांही धर्मच त्यांनीं अधिक प्रिय मानिलेला आहे ५. तुझें राज्य आणि जीवित धर्मार्थच असल्याविषयीं ब्राह्मण, गुरुजन आणि देवताही जाणीत आहेत ६. भीमसेन, अर्जुन, उभयतां माद्रीपुत्र नकुलसहदेव आणि मी ह्यांचाही तूं ( प्रसंग पडल्यास ) त्याग करशील; परंतु, धर्माचा त्याग करणार नाहींस असें मला वाटतें ७. राजानें धर्माचें रक्षण केलें असतां तो धर्म त्या धर्मरक्षक राजाचें रक्षण करितो असें मी सज्जनांच्या मुखांतून ऐकिलेलें आहें. परंतु, तो धर्म तुझें रक्षण करीत नाहीं असें मला वाटतें ८. हे पुरुषश्रेष्ठा, स्वतःची छाया ज्याप्रमाणें नेहमीं पुरुषाच्याच बरोबर जात असते त्याचप्रमाणें तुझी बुद्धि इतर कोणाचेंही अवलंबन न करितां धर्माचेंच अवलंबन करून नेहमीं राहत असते ९. तूं आपल्या बरोबरीच्यांचा अथवा आपणांहून कनिष्ठांचाही अवमान केला नाहींस मग आपल्यापेक्षां श्रेष्ठांचा तर तुझ्या हातून अवमान होण्याची गोष्ट कशाला पाहिजे? तात्पर्य, संपूर्ण पृथ्वी प्राप्त झाली असतां तुला अभिमान झाला नाहीं १०. हे कुंतीपुत्रा, स्वाहाकार, स्वधाकार आणि आदरसत्कार ह्यांच्या योगानें तूं अनुक्रमें देव, पितर आणि

ब्राह्मणाः सर्वकामैस्ते सततं पार्थ तर्पिताः १२ यतयो मोक्षिणश्चैव गृहस्थाश्चैव भारत । भुञ्जते रुक्मपात्रीभिर्यत्राहं परिचारिका १३ आरण्यकेभ्यो लौहानि भोजनानि प्रयच्छसि । नादेयं ब्राह्मणेभ्यस्ते गृहे किंचन विद्यते १४ यदिदं वैश्वदेवं ते शान्तये क्रियते गृहे । तद्दत्वातिथिभूतेभ्यो राजञ्छिष्टेन जीवसि १५ इष्टयः पशुबन्धाश्च काम्यनैमित्तिकाश्च ये । वर्तन्ते पाकयज्ञाश्च यज्ञकर्म च नित्यदा १६ अस्मिन्नपि महारण्ये विजने दस्युसेविते । राष्ट्रादपेत्य वसतो धर्मस्ते नावसीदति १७ अश्वमेधो राजसूयः पुण्डरीकोऽथ गोसवः । एतैरपि महायज्ञैरिष्टं ते भूरिदक्षिणैः १८ राजन्परीतया बुद्ध्या विषमेऽक्षपराजये । राज्यं वसून्यायुधानि भ्रातॄन्मां चापि निर्जितः १९ ऋजोर्मृदोर्वदान्यस्य ह्रीमतः सत्यवादिनः । कथमक्षव्यसनजा बुद्धिरापतिता तव २० अतीव मोहमायाति मनश्च परिभूयते । निशाम्य ते दुःखमिदमिमां चापदमीदृशीम् २१ अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । ईश्वरस्य वशे लोकास्तिष्ठन्ते नात्मनो यथा २२

---

द्विज ह्यांचें नित्य सेवन करीत असतें।स११ व हे कुंतीपुत्रा, हवा तो मनोरथ पूर्ण करून तूं नेहेमीं ब्राह्मणाचें संतर्पण केलें आहेस१२. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, मुमुक्षु यति आणि गृहस्थाश्रमी तुझ्या घरीं सुवर्णपात्रांतून भोजन करीत असत, मी त्या ठिकाणीं दासीचें काम करीत असे १३ आणि वानप्रस्थाश्रम्यांनाही तुझ्या घरीं सुवर्णपात्रांतून अन्न मिळत असे. साराश, ब्राह्मणांना अदेय असें काहींही तुझ्या घरी नसे १४. सर्वांची शांति होण्याकरितां सर्व देवतांना उद्देशून जे अन्न तुझ्या घरीं तयार होत असे तें प्रथम अतिथि आणि इतर प्राणी ह्यांना मिळत असे आणि अवशिष्ट राहिलेल्यावर तुझी उपजीविका होत असे १५. काम्य व नैमित्तिक असे पशुबंध व इष्टि, पाकयज्ञ आणि यज्ञकर्म हीं नित्य तुझ्या घरीं होत असत १६ आणि दस्युजनांनीं सेवित अशा ह्या निर्जन महावनामध्यें राष्ट्रांतून निघून जरी तू सांप्रत वास्तव्य करीत आहेस तथापि, तुझें धर्माचरण कमी होत नाहीं १७. अश्वमेध , राजसूय, पुंडरीक आणि गोसव हे मोठे मोठे यागही विपुल दक्षिणांनीं युक्त असे तूं केलेस १८; परंतु, हे राजा, बुद्धि फिरल्यामुळें दुःसह असा द्यूतपराजय प्राप्त झाला असतां राज्य, संपत्ति, आयुधें, भ्राते आणि मी हीं सर्व तूं हरलास १९. अरे, सरळ, दयाळु, उदार, विनयशील आणि सत्यवादी अशा तुला द्यूतसंकट प्राप्त होण्याची बुद्धि कोठून उत्पन्न झाली ? २०. अरे, तुझें हें दुःख आणि अशा प्रकारची ही आपत्ति अवलोकन करून मला अत्यंत मोह होत आहे व तें दुःखानें अगदीं ग्रस्त होऊन जात आहे २१. लोक

धातैव खलु भूतानां सुखदुःखे प्रियाप्रिये । दधाति सर्वमीशानः पुरस्ता-
च्छुक्रमुच्चरन् २३ यथा दारुमयी योषा नरवीर समाहिता । ईरयत्यङ्गमङ्गानि
तथा राजन्निमाः प्रजाः २४ आकाश इव भूतानि व्याप्य सर्वाणि भारत ।
ईश्वरो विदधातीह कल्याणं यच्च पापकम् २५ शकुनिस्तन्तुबद्धो वा निय-
तोयमनीश्वरः । ईश्वरस्य वशे तिष्ठेन्नान्येषां नात्मनः प्रभुः २६ मणिः सूत्र
इव प्रोतो नस्योत इव गोवृषः । स्रोतसां मध्यमापन्नः कूलाद्वृक्ष इव च्युतः २७
धातुरादेशमन्वेति तन्मयो हि तदर्पणः । नात्माधीनो मनुष्योयं कालं भजति
कंचन २८ अज्ञो जन्तुरनीशोयमात्मनः सुखदुःखयोः । ईश्वरप्रेरितो
गच्छेत्स्वर्गं नरकमेव च २९ यथा वायोस्तृणाग्राणि वशं यान्ति बलीयसः ।
धातुरेव वशं यान्ति सर्वभूतानि भारत ३० आर्ये कर्मणि युञ्जानः पापे वा

---

स्वतःच्या अधीन नसून ईश्वराधीन कसे आहेत याविषयीं हा एक पुरातन इतिहास कथन करीत असतात २२. कर्मबीजाला अनुसरून वागणारा ईश्वर प्राण्यांची उत्पत्ति होण्याचे पूर्वींच त्यांना जन्मानंतर सुख व दुःख आणि प्रिय व अप्रिय कसें काय प्राप्त होणारें असतें तें ठरवून ठेवितो २३. हे वीर पुरुषा, ज्याप्रमाणें लांकडाच्या बाहुलीला ( पडद्याचे आंत असलेल्या सूत्रधारानें सूत्र हालवून) प्रेरणा केली असतां ती आपलें शरीर हालविते त्याचप्रमाणें, हे राजा, ( ईश्वरानें प्रेरणा केली असतां ) ह्या प्रजा आपले हस्तादि अवयव हालवीत असतात २४. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, आकाशाप्रमाणें प्राण्यांना अंतर्बाह्य व्यापून असलेला ईश्वर प्राण्यांचें कल्याण आणि अकल्याण पूर्वींच ठरवून ठेवितो २५. तंतुबद्ध पक्ष्यांप्रमाणें कर्मरूप तंतूनें जखडून गेलेला हा ईश्वराधीन परतंत्र प्राणी दुसऱ्यांचा अथवा स्वतःचाही मालक नाहीं २६. सुतांत ओंविलेल्या मण्याप्रमाणें, नाकामध्यें वेसण घातलेल्या बैलाप्रमाणें अथवा तीरापासून सुटून प्रवाहामध्यें पडलेल्या वृक्षाप्रमाणें २७ पराधीन असलेला हा मनुष्य प्राणी ईश्वराच्या आज्ञेला अनुसरून वागत असतो. कारण, मृत्तिकामय असलेल्या घटाचा लय मृत्तिकेंतच होत असल्यामुळें विद्यमान कालींही ज्याप्रमाणें तो मृत्तिकेच्याच अधीन असतो त्याचप्रमाणें ईश्वराचेंच रूपांतर जीव असल्याकारणानें ईश्वरमय असलेल्या त्याचाही ईश्वराचेच ठिकाणीं लय होणारा असल्यामुळें विद्यमानकालींही तो ईश्वराच्या प्रेरणेवरच अवलंबून असतो. सारांश, हा मनुष्य प्राणी स्वतंत्र नसून अनिर्वचनीयस्वरूप अशा प्रेरक ईश्वराला अनुसरून वागतो २८. तात्पर्य, ज्ञानहीन आणि ह्मणूनच स्वतःच्या सुखदुःखांविषयीं स्वतंत्र नसलेला हा प्राणी ईश्वरानें प्रेरणा केली असतां स्वर्गाप्रत अथवा नरकाप्रत गमन करितो २९. हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, गवताचीं कुसळें ज्याप्रमाणें

पुनरीश्वरः । व्याप्य भूतानि चरते न चायमिति लक्ष्यते ३१ हेतुमात्र- मिदं धातुः शरीरं क्षेत्रसंज्ञितम् । येन कारयते कर्म शुभाशुभफलं विभुः ३२ पश्य मायाप्रभावोयमीश्वरेण यथा कृतः । यो हन्ति भूतैर्भूतानि मोहयित्वात्ममायया ३३ अन्यथा परिदृष्टानि मुनिभिस्तत्त्वदर्शिभिः । अन्यथा परिवर्तन्ते वेगा इव नभस्वतः ३४ अन्यथैव हि मन्यन्ते पुरुषा- स्तानि तानि च । अन्यथैव प्रभुस्तानि करोति विकरोति च ३५ यथा काष्ठेन वा काष्ठमश्मानं चाश्मना पुनः । अयसा चाप्ययश्छिंद्यान्निर्विचे- ष्टमचेतनम् ३६ एवं स भगवान्देवः स्वयंभूः प्रपितामहः । हिनस्ति भूतै- र्भूतानि छद्म कृत्वा युधिष्ठिर ३७ संप्रयोज्य वियोज्यायं कामकारकरः प्रभुः । क्रीडते भगवान्भूतैर्बालः क्रीडनकैरिव ३८ न मातृपितृवद्राज- न्धाता भूतेषु वर्तते । रोषादिव प्रवृत्तोयं यथायमितरो जनः ३९ आर्या-

---

बलाढ्य वायूचे अधीन होतात त्याचप्रमाणें हे सर्व प्राणी ईश्वराचे स्वाधीन होतात ३०. प्राण्यांना अंतर्बाह्य व्याप्त करून त्यांची पुण्यकर्मामध्यें अथवा पापकर्मामध्यें प्रवृत्ति करीत असलेला ईश्वर सर्वत्र संचार करीत असतो; परंतु, हा ईश्वर ह्मणून कोणाचे लक्ष्यांत येत नाहीं ३१. ईश्वराच्या क्षेत्राप्रमाणें असलेलें हें शरीर कर्माला हेतुभूत आहे आणि ह्याच्याच योगानें हा सर्वव्यापी परमात्मा प्राण्यांकडून शुभ अथवा अशुभ फल देणारें कर्म करवीत असतो ३२. पहा बरें, हा ( वर निर्दिष्ट केलेला ) मायेचा प्रभाव. हा आपल्या मायेनें प्रथम मोहित करून प्राण्यांच्याच योगानें प्राण्याचा वध करणारा जो ईश्वर त्यानें केलेला आहे ३३. तत्वज्ञानी मुनींनीं ह्या प्राण्यांचें स्वरूप वेगळ्याच प्रकारांनीं निश्चित केलेलें आहे; वायुवेगाप्रमाणें भलत्याच रीतीनें यांचें परिवर्तन होत असतें ३४; प्राण्यां प्राण्यांविषयीं लोक कांहीं दुसरीच कल्पना करीत असतात आणि प्रभु ईश्वर तर दुसऱ्याच प्रकारानें त्यांची घडामोड करीत असतो ३५. ज्याप्रमाणें एखादा पुरुष काष्ठाच्या योगानें काष्ठ, पाषाणाच्या योगानें पाषाण अथवा लोखंडाच्या योगानें निश्चेष्ट आणि अचेतन असें लोखंड फोडून काढितो ३६ त्याचप्रमाणें, हे युधिष्ठिरा, मायेचें अवलंबन करून तो षड्गुणैश्वर्यसंपन्न आणि सर्वांचा आदिपुरुष असा ईश्वर प्राण्यांच्याच योगानें प्राण्यांचा घात करीत असतो ३७. खेळण्यांच्या योगानें क्रीडा कर- णाऱ्या बालकांप्रमाणें स्वेच्छेनुरूप वर्तन करणारा हा भगवान् ईश्वर संयोग आणि वियोग करून प्राण्यांच्या योगानें क्रीडा करीत असतो ३८. हे राजा, हा ईश्वर माता- पितरांप्रमाणें प्राण्यांचे ठिकाणीं ( दयेनें ) वागत नाहीं. तिऱ्हाईतांप्रमाणें हा प्राण्याशीं असा कांहीं रागारागानेंच वागण्यास प्रवृत्त झालेला असतो ३९. सुशील आणि विन-

श्छीलवतो दृष्ट्वा ह्रीमतो वृत्तिकर्शितान् । अनार्यान्सुखिनश्चैव विह्वला-
निव चिन्तया ४० तवेमामापदं दृष्ट्वा समृद्धिं च सुयोधने । धातारं गर्हये
पार्थ विषमं योनुपश्यति ४१ आर्य शास्त्रातिगे क्रूरे लुब्धे धर्मापचा-
यिनि । धार्तराष्ट्रे श्रियं दत्त्वा धाता किं फलमश्नुते ४२ कर्म चेत्कृतमन्वेति
कर्तारं नान्यमृच्छति । कर्मणा तेन पापेन लिप्यते नूनमीश्वरः ४३ अथ
कर्मकृतं पापं न चेत्कर्तारमृच्छति । कारणं बलमेवेह जनाञ्छोचामि दुर्ब-
लान् ४४ [ ११६९ ] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० मार-
ण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि युधिष्ठिरद्रौपदीसंवादे त्रिंशोध्यायः ॥ ३० ॥

युधिष्ठिर उवाच ॥ वल्गु चित्रपदं श्लक्ष्णं याज्ञसेनि त्वया वचः । उक्तं
तच्छ्रुतमस्माभिर्नास्तिक्यं तु प्रभाषसे १ नाहं कर्मफलान्वेषी राजपुत्रि
चराम्युत । ददामि देयमित्येव यजे यष्टव्यमित्युत २ अस्तु वात्र फलं मा
वा कर्तव्यं पुरुषेण यत् । गृहे वा वसता कृष्णे यथाशक्ति करोमि तत् ३
धर्मं चरामि सुश्रोणि न धर्मफलकारणात् । आगमानतिक्रम्य सतां वृत्त-

---

यशील असे सज्जन अन्नाला महाग झालेले पाहून ( परस्वापहरणादि कृत्यांच्या ) विचारा-
मध्यें गढून गेलेले दुर्जन सुखी असल्याच अवलोकन करून ४० आणि त्याचप्रमाणें तुझ्या
ह्या विपत्तीकडे व सुयोधनाचे ठिकाणीं असलेल्या संपत्तीकडे लक्ष्य देऊन, हे कुंती-
पुत्रा, वैषम्यानें वागत असलेल्या विधात्यालाच मी दोष देतें ४१. हे सज्जना धर्मराजा,
शास्त्राचें उल्लंघन करणारा व ह्मणूनच धर्माचा ऱ्हास करणारा असा जो क्रूर धृतरा-
ष्ट्रपुत्र दुर्योधन त्याला ऐश्वर्य देऊन ईश्वराला काय बरें फलप्राप्ति झाली असेल ? ४२.
केलेल्या कर्माचें फल दुसऱ्याला न मिळतां जर करणाऱ्यालाच मिळत असेल तर
दुर्योधनाच्या त्या पाप कर्मांच्या योगानें खरोखर ईश्वरही ( करविणारा ) ह्या नात्यानें
लिप्त होत आहे ४३. अथवा केलेल्या पाप कर्माचें फल जर कर्त्याला मिळत नसेल
तर बल हेंच त्याला कारण आहे आणि ह्मणूनच ( तुझ्या सारिख्या ) दुर्बलाबद्दल
मला वाईट वाटत आहे ४४. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगम-
नपर्वांपैकी द्रौपदीच्या भाषणाविषयीं तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—हे द्रौपदि, तुझें भाषण मीं श्रवण केलें. हें दिसण्यांत मोठें मनो-
हर व मृदु असून ह्यांतील पदरचनाही चमत्कारिक आहे. परंतु, तूं हें वेदविरुद्ध भाषण
करीत आहेस १. हे राज्यकन्ये, कर्मफलाची इच्छा धरून मी धर्माचरण करीत नाहीं.
दान व यज्ञ विहित असल्यामुळें मी दान देत असून यज्ञ करीत असतों २. कर्माचें फल
प्राप्त होवो अगर न होवो गृहस्थाश्रमी पुरुषानें जें अवश्य कर्तव्य आहे तें, हे द्रौपदि, मी

मवेक्ष्य च ४ धर्म एव मनः कृष्णे स्वभावाच्चैव मे धृतम् । धर्मवाणिज्यको हीनो जघन्यो धर्मवादिनाम् ५ न धर्मफलमाप्नोति यो धर्मं दोग्धुमिच्छति । यश्चैनं शङ्कते कृत्वा नास्तिक्यात्पापचेतनः ६ अतिवादाद्वदाम्येष मा धर्ममभिशङ्किथाः । धर्माभिशङ्की पुरुषस्तिर्यग्गतिपरायणः ७ धर्मो यस्याभिशङ्क्यः स्यादार्षं वा दुर्बलात्मनः । वेदाच्छूद्र इवापेयात्स लोकादजरामरात् ८ वेदाध्यायी धर्मपरः कुले जातो मनस्विनि । स्थविरेषु स योक्तव्यो राजभिर्धर्मचारिभिः ९ पापीयान्स हि शूद्रेभ्यस्तस्करेभ्यो विशिष्यते । शास्त्रातिगो मन्दबुद्धिर्यो धर्ममभिशङ्कते १० प्रत्यक्षं हि त्वया दृष्ट ऋषिर्गच्छन्महातपाः । मार्कण्डेयोऽप्रमेयात्मा धर्मेण चिरजीविता ११ व्यासो

---

यथाशक्ति करीत आहें ३. हे सुंदरि, धर्मशास्त्रांना अनुसरून आणि सज्जनांच्या चरित्रांकडे लक्ष्य देऊन मी धर्माचरण करीत असतों. धर्माचरणाचें फल प्राप्त व्हावें एतदर्थ मी तें करीत नाहीं ४. हे द्रौपदि, ( धर्मापासून स्वर्गादिफलप्राप्तीची इच्छा करणारा ह्मणजे ) धर्म ही उपजीविका चालण्याकरितां व्यापाराची कांहीं वस्तु आहे असें समजून चालणारा पुरुष धर्मवादी पुरुषांमध्यें अधम व निंद्य आहे. तस्मात्, स्वाभाविकच माझ्या मनाची प्रवृत्ति धर्माकडे आहे. ( फलाची इच्छा धरून धर्माकडे माझें मन प्रवृत्त झालेलें नाहीं ) ५. ( उपजीविकेला उपयोगी असें कांहीं ) धर्मापासून फल प्राप्त व्हावें ह्या बुद्धीनें जो धर्माचरण करितो त्याला धर्मफल प्राप्त होत नाहीं आणि नास्तिकपणामुळें जो पापबुद्धि पुरुष धर्मावर अविश्वास करितो त्यालाही धर्मफल मिळत नाहीं ६. ज्याच्या पुढें कोणत्याही प्रमाणाची मातब्बरी नाहीं अशा वेदाला अनुसरून हें मी बोलत आहें. करितां, तूं धर्माविषयीं मनामध्यें शंका आणूं नकोस. कारण, धर्माविषयीं शंका घेणारा पुरुष पशुपक्ष्यादिकांच्या योनींचेंच अवलंबन करणारा आहे ( ह्मणजे पशुपक्ष्यादिकांची निंद्य योनि हेंच त्याला धर्माविषयीं धरिलेल्या अविश्वासाचें फल प्राप्त होणारें आहे ) असें समजावें ७. ज्या विवेकी पुरुषाच्या मनांत धर्माविषयीं अथवा स्मृतिवाक्यांविषयीं शंका असते तो वेदाला मुकणाऱ्या शूद्रांप्रमाणें अजरामर अशा आत्मलोकाला (ह्मणजे अर्थात् मोक्षाला ) मुकतो ८. हे विचारि द्रौपदि, वेदाध्ययन करणारा, धर्मनिष्ठ आणि कुलीन असा जो राजर्षि असेल तो बाल असला तरी धर्माचरण करणाऱ्यांनीं वृद्धांमध्यें गणण्यास योग्य होतो ९ आणि शास्त्राचें अतिक्रमण करून जो मंदमति पुरुष धर्माविषयीं मनामध्यें शंका घेतो तो शूद्रांपेक्षांही नीच असून तस्करांपेक्षांही अधिक ( निंद्य ) ठरतो १०. अगे, महात्मे महातपस्वी मार्कंडेयमुनि धर्माच्याच योगानें चिरजीवी होऊन पृथ्वीमध्यें संचार करीत असतांना तूं प्रत्यक्ष अवलोकन केले.

वसिष्ठो मैत्रेयो नारदो लोमशः शुकः । अन्ये च ऋषयः सर्वे धर्मेणैव
सुचेतसः १२ प्रत्यक्षं पश्यसि ह्येतान्दिव्ययोगसमन्वितान् । शापानुग्रहणे
शक्तान्देवेभ्योपि गरीयसः १३ एते हि धर्ममेवादौ वर्णयन्ति सदानघे ।
कर्तव्यममरप्रख्याः प्रत्यक्षागमबुद्धयः १४ अतो नार्हसि कल्याणि धातारं
धर्ममेव च । राज्ञि मूढेन मनसा क्षेप्तुं शङ्कितुमेव च १५ उन्मत्तान्मन्यते
बालः सर्वानागतनिश्चयान् । धर्माभिशङ्की नान्यस्मात्प्रमाणमधिगच्छति ॥
आत्मप्रमाण उन्नद्धः श्रेयसो ह्यवमन्यकः १६ इन्द्रियप्रीतिसंबद्धं यदिदं
लोकसाक्षिकम् । एतावन्मन्यते बालो मोहमन्यत्र गच्छति १७ प्रायश्चित्तं
न तस्यास्ति यो धर्ममभिशङ्कते । ध्यायन्स कृपणः पापो न लोकान्प्रति-
पद्यते १८ प्रमाणाद्धि निवृत्तो हि वेदशास्त्रार्थनिन्दकः । कामलोभातिगो
मूढो नरकं प्रतिपद्यते १९ यस्तु नित्यं कृतमतिर्धर्ममेवाभिपद्यते । अश-

---

आहेस ११. व्यास वसिष्ठ, मैत्रेय, नारद, लोमश, शुक आणि इतरही उत्कृष्ट बुद्धीनें युक्त असलेले जे सर्व ऋषि ते हे धर्माचरणामुळेंच १२ दिव्य प्रभावानें युक्त, शाप व अनुग्रह ह्यांविषयीं समर्थ आणि ह्मणूनच देवांपेक्षांही श्रेष्ठ असल्याचें तूं प्रत्यक्ष पाहत आहेस १३. हे निष्पापे द्रौपदि, वेदाच्याच योगानें अनुमित होणाऱ्या गोष्टी ज्यांना प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत असतात ते हे देवतुल्य ऋषि कर्तव्य ह्मणून धर्म च प्रथमतः सांगत असतात १४. ह्यास्तव, हे कल्याणि, हे राजपत्नि, मोहग्रस्त झालेल्या मनाच्या योगानें ईश्वराची तूं निंदाही करूं नकोस आणि धर्मफलाविषयीं संशयही घेऊं नकोस १५. धर्मफलाविषयीं संशय घेणारा मूर्ख पुरुष स्वतःला जें प्रत्यक्ष दिसत असेल त्यावांचून इतर प्रमाण मानीत नाहीं आणि त्यामुळें निश्चयेंकरून तत्वज्ञान प्राप्त झालेल्या सर्वांना तो उन्मत्त मानीत असतो आणि स्वतःचेंच प्रमाणावर अवलंबून असलेला तो उद्धट पुरुष श्रेष्ठांचाही अवमान करूं लागतो १६. सारांश, इंद्रियप्रीतीशीं संबद्ध असलेलें आणि लोकांच्या अनुभवास येत असलेलें जें हें विषयसुख तेवढेंच तो धर्मफलाविषयीं संशय घेणारा मूर्ख पुरुष खरें मानीत असतो आणि ह्यावांचून ( इतर कांहींच त्याला खरें वाटत नाहीं . अर्थात् ) इतरांविषयीं त्याचें मन गोंधळूनच जातें १७. जो धर्मफलाविषयीं शंका घेतो तो कोणत्याही प्रायश्चित्तानें शुद्ध होत नाहीं आणि विषयचिंतन करीत असलेल्या त्या पापी कृपण पुरुषाला उत्तम लोकाची प्राप्ति होत नाहीं १८. ( प्रत्यक्ष प्रमाणावांचून कोणतेंही इतर ) प्रमाण न मानणारा, वेद आणि शास्त्र ह्यांमध्यें प्रतिपादित केलेल्या विषयांची निंदा करणारा आणि काम व लोभ ह्यांचे अधीन झालेला मूढ पुरुष नरकाला जातो १९. परंतु, हे कल्याणि, धर्मफलाविषयीं

कुर्वाणः कल्याणि सोमुत्रानन्त्यमश्नुते २० आर्षं प्रमाणमुत्क्रम्य धर्मं न प्रतिपालयन् । सर्वशास्त्रातिगो मूढः शं जन्मसु न विन्दति २१ यस्य नार्षं प्रमाणं स्याच्छिष्टाचारश्च भाविनि । नैव तस्य परो लोको नायमस्तीति निश्चयः २२ शिष्टैराचरितं धर्मं कृष्णे मा स्माभिशङ्किथाः । पुराणमृषिभिः प्रोक्तं सर्वज्ञैः सर्वदर्शिभिः २३ धर्म एव प्लवो नान्यः स्वर्गं द्रौपदि गच्छताम् । सैव नौः सागरस्येव वणिजः पारमिच्छतः २४ अफलो यदि धर्मः स्याच्चरितो धर्मचारिभिः । अप्रतिष्ठे तमस्येतज्जगन्मज्जेदनिन्दिते २५ निर्वाणं नाधिगच्छेयुर्जीवेयुः पशुजीविकाम् । विद्यां ते नैव युज्येयुर्न चार्थं केचिदाप्नुयुः २६ तपश्च ब्रह्मचर्यं च यज्ञः स्वाध्याय एव च । दानमार्जवमेतानि यदि स्युरफलानि वै २७ नाचरिष्यन्परे धर्मं परे परतरे च ये । विप्रलम्भोयमत्यन्तं यदि स्युरफलाः क्रियाः २८ ऋषयश्चैव देवाश्च

संशय न घेतां विश्वास धरून जो नित्य धर्माचेंच अवलंबन करितो त्याला इहलोकानंतर ब्रह्मपदाची प्राप्ति होते २०. स्मृतिप्रमाणाचें उल्लंघन करून व त्याचप्रमाणें इतरही सर्व शास्त्रांचें अतिक्रमण करून धर्माचें परिपालन न करणाऱ्या मूढ पुरुषाचें कोणत्याही जन्मामध्यें कल्याण होत नाहीं २१. हे स्त्रिये, स्मृतिप्रमाण आणि शिष्टाचार ह्यांना जो मानीत नाहीं त्याला परलोक नाहीं आणि इहलोकही नाहीं असा सिद्धांत आहे; ( सारांश, स्मृति आणि सदाचार हीं प्रमाण न मानणाऱ्याला इहलोकीं अथवा परलोकींही सुख प्राप्त होत नाहीं ) २२. सर्व अवलोकन करणारे आणि ह्मणूनच सर्वज्ञ अशा ऋषींनीं कथन केलेल्या शिष्टाचरित सनातन धर्माविषयीं, हे द्रौपदि, तूं शंका घेऊं नकोस २३. हे द्रौपदि, समुद्राचे पैल तीरीं जाण्याची इच्छा करणाऱ्या व्यापाऱ्याला ज्याप्रमाणें नौका हेंच साधन आहे त्याचप्रमाणें स्वर्गास जाण्याची इच्छा करणाऱ्यांना धर्म हीच तारून नेणारी नौका आहे २४. धर्मप्रवर्तकांनीं आचरिलेला धर्म जर निष्फल होईल तर, हे निर्दोष द्रौपदि, निराधार अशा अंधकारामध्यें हें जगत् मग्न होऊन जाईल २५. सारांश, संसारापासून लोकांना मुक्ति कधींच प्राप्त होणार नाहीं. लोक केवळ पशूप्रमाणें उपजीविका करूं लागतील. विद्येचें अवलंबन मुळींच करणार नाहींत आणि अर्थात्च कोणतेंही फल कोणालाही प्राप्त होणार नाहीं २६. तात्पर्य, तप, ब्रह्मचर्य, यज्ञ, दान आणि सरलवर्तन हीं जर निष्फल असतीं तर २७ आमचे पूर्वीं होऊन गेलेल्या लोकांनीं आणि त्यांचेही पूर्वीं होऊन गेलेल्या श्रेष्ठ लोकांनीं धर्माचरण केलेंच नसतें. सारांश. कर्में जर निष्फल असतीं तर कर्मविधानाबद्दल ही सर्व फसवाफसवीच मानिली गेली असती २८. कारण, फलच जर कांहीं नसेल तर

गन्धर्वासुरराक्षसाः । ईश्वराः कस्य हेतोस्ते चरेयुर्धर्ममादृताः २९ फलदं त्विह विज्ञाय धातारं श्रेयसि ध्रुवम् । धर्मं ते व्यचरन्कृष्णे तद्धि धर्म सनातनम् ३० स नायमफलो धर्मो नाधर्मोऽफलवानपि । दृश्यन्तेपि हि विद्यानां फलानि तपसां तथा ३१ त्वमात्मनो विजानीहि जन्म कृष्णे यथा श्रुतम् । वेत्थ चापि यथा जातो धृष्टद्युम्नः प्रतापवान् ३२ एतावदेव पर्याप्त-मुपमानं शुचिस्मिते । कर्मणां फलमाप्नोति धीरोल्पेनापि तुष्यति ३३ बहुनापि ह्यविद्वांसो नैव तुष्यन्त्यबुद्धयः । तेषां न धर्मजं किंचित्प्रेत्य शर्मास्ति वा पुनः ३४ कर्मणां श्रुतपुण्यानां पापानां च फलोदयः । प्रभवश्चात्ययश्चैव देवगुह्यानि भामिनि ३५ एतानि वेद यः कश्चिन्मानवः शुभदर्शने । अपि कल्पसहस्रेण नरः श्रेयोधिगच्छति ३६ रक्ष्याण्येतानि देवानां गूढमाया हि देवताः ३७ कृताशाश्च व्रताशाश्च तपसा दग्धकिल्बिषाः । प्रसादैर्मानसैर्युक्ताः पश्यन्त्येतानि वै द्विजाः ३८ न फलादर्श-

समर्थ ऋषि, देव, गधर्व, असुर आणि राक्षस यांनीं कोणता हेतु मनांत धरून आदरपूर्वक धर्माचरण केलें असतें बरें? २९. हे द्रौपदि, फल देणारा ईश्वर आहे असें निश्चित जाणून त्यांनी धर्माचरण केलेलें आहे आणि ह्मणून धर्म हेंच कल्याणप्राप्तीचें सनातन साधन आहे ३०. सारांश, ( ऋषिप्रभृतीनीं आचरिलेला ) तो हा धर्म निष्फल नाहीं आणि अधर्मही निष्फल होत नाही. कारण, विद्या आणि तपश्चर्या ह्यांचें फल प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत आहे ३१. हे द्रौपदि, ( फार कशाला ) तुझा जन्म झाल्याचा जो वृत्तांत ऐकण्यांत आहे तो तू जाणीतच आहेस आणि प्रतापी धृष्टद्युम्न कसा झाला हेंही तुला विदितच आहे ३२. हे सुहास्यवदने, येवढा दृष्टांत कर्मफलप्राप्तीविषयीं तुला पुरे आहे. कर्माचें फल आहेच असें समजून ज्ञानी पुरुष अल्प लाभानेंच संतुष्ट होतात ३३. मंदमति अविद्वान् लोक विपुल लाभानेही संतुष्ट होत नाहींत आणि ह्मणूनच इहलोक सोडिल्यानंतर त्यांना अधर्माचरणामुळें कांहीच सुख प्राप्त होत नाहीं ३४. ज्यांचें पुण्य वेदांमध्ये श्रुत आहे अशा पुण्य कर्मांची व पाप कर्मांची फलप्राप्ति आणि प्राण्यांची उत्पत्ति व नाश ह्या गोष्टी, हे स्त्रिये, देवांनीं गुप्त ठेविलेल्या आहेत ३५. ह्यांचें एकाद्यालाच ज्ञान होतें व तें ज्ञान झालें असतां हजार कल्प लोटल्यावर तरी, हे सुलोचने, त्याचें कल्याण होतें ३६. सारांश, ह्या गोष्टींचें देवांना आपल्या करितां रक्षण करावें लागतें. खरोखर देवतांची माया मोठी गूढ आहे ३७. कामनेचा नाश करून धर्मरूप व्रताचीच इच्छा धरणारे असे जे तपश्चर्येच्या योगानें पाप दग्ध झालेले द्विज ते मानासिक प्रसादांनीं युक्त झाले असतां ( ह्मणजे त्यांचें चित्त शुद्ध झालें

नाद्धर्मः शङ्कितव्यो न देवताः । यष्टव्यं च प्रयत्नेन दातव्यं चानसूयता ३९ कर्मणां फलमस्तीह तथैतद्धर्मशाश्वतम् । ब्रह्मा प्रोवाच पुत्राणां यदृषिर्वेद कश्यपः ४० तस्मात्ते संशयः कृष्णे नीहार इव नश्यतु । व्यवस्य सर्वमस्तीति नास्तिक्यं भावमुत्सृज ४१ ईश्वरं चापि भूतानां धातारं मा च वै क्षिप । शिक्षस्वैनं नमस्वैनं मा ते भूद्बुद्धिरीदृशी ४२ यस्य प्रसादात्तद्भक्तो मर्त्यो गच्छत्यमर्त्यताम् ॥ उत्तमां देवतां कृष्णे मावमंस्थाः कथंचन ४३ [१२१२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां ० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि युधिष्ठिरद्रौपदीसंवाद एकोनत्रिंशोध्यायः ॥ ३१ ॥

द्रौपद्युवाच ॥ नावमन्ये न गर्हे च धर्मं पार्थ कथंचन । ईश्वरं कुत एवाहमवमंस्ये प्रजापतिम् १ आर्ताहं प्रलपामीदमिति मां विद्धि भारत । भूयश्च विलपिष्यामि सुमनास्त्वं निबोध मे २ कर्म खल्विह कर्तव्यं जानतामित्रकर्शन । अकर्माणो हि जीवन्ति स्थावरा नेतरे जनाः ३ यावद्गोस्तनपा-

---

असतां ) त्यांना ह्या गोष्टी दिसू लागतात ३८. फल दृष्टी पडत नाही ह्मणून धर्माविषयीं आणि देवतांविषयीं संशय घेऊ नये. परंतु, मत्सर सोडून देऊन प्रयत्नपूर्वक यजन व दान करीत असावें ३९. इहलोकीं आचरिलेल्या कर्मांचें फल असणें हा धर्माचा सततचा गुणच आहे व याचप्रमाणें ब्रह्मदेवांनीं आपल्या पुत्रांना सांगितलें असून कश्यप ऋषिही असेंच समजत आहेत ४०. ह्यास्तव, हे द्रौपदि, तुझा संशय धुक्याप्रमाणें नाहीसा होवो. सर्व आहे असा मनाचा निश्चय करून तूं नास्तिकपणा सोडून दे ४१. सारांश, भूताधिपति ईश्वराला आणि कर्माला दोष न देतां तू त्याला गुरु समजून प्रणाम कर. तुझी अशी ( विपरीत ) बुद्धि न होवो ४२. हे द्रौपदि, त्या ईश्वराची सेवा करीत असलेला मर्त्य जन त्याच्या प्रसादामुळें अमर होतो. करितां, त्या श्रेष्ठ देवतेचा तू कोणत्याही प्रकारें अवमान करूं नकोस ४३. ह्याप्रमाणे ० वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वापैकीं युधिष्ठिराच्या भाषणाविषयीं एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१ ॥

द्रौपदी ह्मणते:—हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, मी धर्माचा अवमानही करीत नाहीं आणि त्याची निंदाही करीत नाहीं. त्याचप्रमाणें मी प्रजाधिपति ईश्वराचा अवमान कोठून करीन ?१. मी दुःखित झाल्यामुळें हें कांहीं तरी बरळत आहे असें तूं समज. हे भरतकुलोत्पन्ना, मी आणखीही जें कांहीं बरळणार आहें तें शांत मनानें युक्त असलेला तूं ऐकून घे २. हे शत्रुनाशका, ह्या जगतामध्यें ( तुझ्यासारिख्या ) जाणत्या पुरुषानें कर्म करूनच राहवें. कारण, कर्म न करितां स्थावर प्राणी जिवंत राहतात. इतर प्राणी कर्माशिवाय राहत नाहींत ३. हे युधिष्ठिरा, गाईचें वासरूं ( उपजतांक्षणीं ) स्तनपान करितें

चाद्य यावच्छायोपसेवनात् । जन्तवः कर्मणा वृत्तिमाप्नुवन्ति युधिष्ठिर ४
जङ्गमेषु विशेषेण मनुष्या भरतर्षभ । इच्छन्ति कर्मणा वृत्तिमवाप्तुं प्रेत्य चेह
च ५ उत्थानमभिजानन्ति सर्वभूतानि भारत । प्रत्यक्षं फलमश्नन्ति कर्मणां
लोकसाक्षिकम् ६ सर्वे हि स्वं समुत्थानमुपजीवन्ति जन्तवः । अपि धाता
विधाता च यथायमुदके बकः ७ अकर्मणां वै भूतानां वृत्तिः स्यान्न हि
काचन । तदेवाभिप्रपद्येत न विहन्यात्कदाचन ८ स कर्म कुरु मा ग्लासीः
कर्मणा भव दंशितः । कृतं हि योभिजानाति सहस्रे सोस्ति नास्ति च ९ तस्य
चापि भवेत्कार्यं विवृद्धौ रक्षणे तथा । भक्ष्यमाणो ह्यनादानात्क्षीयेत हिम-
वानपि १० उत्सीदेरन्प्रजाः सर्वा न कुर्युः कर्म चेद्भुवि । तथा ह्येता न
वर्धेरन्कर्म चेदफलं भवेत् ११ अपि चाप्यफलं कर्म पश्यामः कुर्वतो
जनान् । नान्यथा ह्यपि गच्छन्ति वृत्तिं लोकाः कथंचन १२ यश्च दिष्ट-

---

तें स्वप्रयत्नानेंच करीत असून ताप झाला असतां पशु स्वप्रयत्नानेंच छायेचा आश्रय करीत असतात. तात्पर्य, प्राण्यांची उपजीविका त्यांच्या स्वतांच्या प्रयत्नावरच अवलंबून असते ४. हे भरतवंशजश्रेष्ठा, जंगम प्राण्यांमध्यें विशेषें करून मनुष्यें तर इहलोकीं आणि इहलोक सोडिल्यानंतर आपल्या कृतीच्याच योगानें उपजीविकेची इच्छा करीत असतात ५. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, सर्व प्राणी प्रयत्नाचा अंगीकार करीत असतात आणि लोकांच्या अनुभवास येत असलेल्या प्रयत्नांच्या फलाचाही ते प्रत्यक्ष उपभोग घेत असतात ६. केवल सर्व प्राण्यांचीच उपजीविका प्रयत्नावर अवलंबून असते इतकेंच नव्हे तर ह्या उदकांतील बगळ्याप्रमाणें धाता आणि विधाता ह्यांचेंही जीवन पौरुष प्रयत्नावर अवलंबून आहे ७. प्रयत्नरहित प्राण्याची कोणत्याही तऱ्हेची उपजीविका चालणें शक्य नाहीं. करितां, त्या प्रयत्नाचेंच नेहमी अवलंबन करावें; (दैवावर हवाला टाकून) तो प्रयत्न कधीं सोडूं नये ८. करितां, तूं प्रयत्न कर; धीर खचूं देऊं नकोस; प्रयत्नरूप कवचानें तूं युक्त हो. केलेलें कर्म (कसें फलप्रद होतें हें) जाणणारा पुरुष सहस्रामध्यें असतो किंवा नसतो ९. द्रव्य जरी संपादन केलें असलें तरी त्याची वृद्धि करण्याकरितां अथवा त्याचें रक्षण करण्याकरितां कांहीं तरी कर्म करणें अवश्य आहेच. कारण, आंत भर पडल्यावांचून एकसारिखें भक्षण होऊं लागलें असतां हिमालय पर्वतही क्षीण होऊन जाईल १०. या भूतलावरील प्रजा जर कर्म करीनाशा झाल्या तर त्या सर्वांचा उच्छेद होईल आणि कर्म जर निष्फल होईल तर ह्या प्रजांची वाढ होणार नाहीं ११. उपजीविका चालण्याकरितां निष्फलही कर्म (म्हणजे ज्याचा उपजीविकेला उपयोग होणार नाहीं असेंही कर्म उपयोगीं पडेल ह्या समजुतीवर) लोक करीत असल्याचें आम्ही अवलोकन करितों.

षगे लोके यश्चापि हठवादिकः । उभावपि शठावेतौ कर्मबुद्धिः प्रशस्यते १३ यो हि दिष्टमुपासीनो निर्विचेष्टः सुखं शयेत् । अवसीदेत्सदुर्बुद्धिरामो घट इवोदके १४ तथैव हठदुर्बुद्धिः शक्तः कर्मण्यकर्मकृत् । आसीत न चिरं जीवेदनाथ इव दुर्बलः १५ अकस्मादिह यः कश्चिदर्थं प्राप्नोति पूरुषः । तं हठेनेति मन्यन्ते स हि यत्नो न कस्यचित् १६ यच्चापि किंचित्पुरुषो दिष्टं नाम भजत्युत । दैवेन विधिना पार्थ तद्दैवमिति निश्चितम् १७ यत्स्वयं कर्मणा किंचित्फलमाप्नोति पूरुषः । प्रत्यक्षमेतल्लोकेषु तत्पौरुषमिति श्रुतम् १८ स्वभावतः प्रवृत्तो यः प्राप्नोत्यर्थं न कारणात् । तत्स्वभावात्मकं विद्धि फलं पुरुषसत्तम १९ एवं हठाच्च दैवाच्च स्वभावात्कर्मणस्तथा । यानि प्राप्नोति पुरुषस्तत्फलं पूर्वकर्मणाम् २० धातापि हि स्वकर्मैव तैस्तैर्हेतुभिरीश्वरः । विदधाति विभज्येह फलं पूर्वकृतं नृणाम् २१ यद्ध्ययं पुरुषः किंचित्कुरुते वै शुभाशुभम् । तद्धातृ-

---

परंतु, कर्म केल्यावांचून लोकांची उपजीविका होत असल्याचें मात्र कोणत्याही प्रकारें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं १२. दैववादी आणि हठवादी ( ह्मणजे पूर्वजन्माचा अभाव असल्यामुळें जें जें प्राप्त होतें तें तें आपोआपच प्राप्त होतें असें मानणारा चार्वाक ) हे उभयतांही शठ असून कर्मवादीच लोकांमध्यें प्रशस्त मानिला जातो १३. दैवावर अवलंबून राहणारा जो पुरुष कांहीं एक हालचाल न करिता खुशाल झोंप घेत राहतो तो मंदमति उदकांत नाश पावणाऱ्या कच्च्या घटाप्रमाणें नाश पावतो १४. त्याचप्रमाणें कर्म करण्यास समर्थ असूनही जो हठवादी पुरुष कर्म न करितां स्वस्थ बसतो तो दुर्बल अनाथाप्रमाणें फार दिवस वांचत नाहीं १५. ज्या एकाद्या पुरुषाला अकस्मात् कांहीं द्रव्य प्राप्त होतें त्याला तें हठानें प्राप्त झालें असें हठवादी ह्मणतात. कारण, तो हठवादी कोणत्याही ( वेदविहित ) कर्माविषयीं यत्न करीत नाहीं १६. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, दैविक प्रकारानें जें कांहीं ( आपोआप ) पुरुषाला प्राप्त होतें तें दैव ह्मणून निश्चित आहे १७. स्वतः केलेल्या कर्माच्या योगानें जें हें कांहीं पुरुषाला लोकांमध्यें प्रत्यक्ष फल प्राप्त होतें तें पौरुष ह्मणून प्रसिद्ध आहे १८. हे पुरुषश्रेष्ठा, कांहीं एक उद्देश मनामध्यें न आणितां एकाद्या पुरुषाची स्वाभाविकच प्रवृत्ति होऊन जें द्रव्य त्याला मिळतें तेंच स्वभावात्मक फल असें तूं समज १९. ह्याप्रमाणें हट, दैव, कर्म आणि स्वभाव ह्यांच्या योगानें ज्या गोष्टी पुरुषाला प्राप्त होतात तें पूर्वकर्मांचें फल असें समजावें २०. जगत् उत्पन्न करणारा प्रभुही कर्माधीनच असून वेगवेगळ्या कारणांमुळें लोकांना पूर्वकर्मांचें फल इहलोकीं वांटून देत असतो २१. करितां,

विहितं विद्धि पूर्वकर्मफलोदयम २२ कारणं तस्य देहोयं धातुः कर्मणि वर्तते । स यथा प्रेरयत्येनं तथायं कुरुतेवशः २३ तेषु तेषु हि कृत्येषु विनियोक्ता महेश्वरः । सर्वभूतानि कौन्तेय कारयत्यवशान्यपि २४ मनसार्थान्विनिश्चित्य पश्चात्प्राप्नोति कर्मणा । बुद्धिपूर्वं स्वयं वीर पुरुषस्तत्र कारणम २५ संख्यातुं नैव शक्यानि कर्माणि पुरुषर्षभ । अगारनगराणां हि सिद्धिः पुरुषहैतुकी २६ तिले तैलं गवि क्षीरं काष्ठे पावकमन्ततः । धिया धीरो विजानीयादुपायं चास्य सिद्धये २७ ततः प्रवर्तते पश्चात्कारणैस्तस्य सिद्धये । तां सिद्धिमुपजीवन्ति कर्मजामिह जन्तवः २८ कुशलेन कृतं कर्म कर्त्रा साधु स्वनुष्ठितम् । इदं त्वकुशलेनेति विशेषादुपलभ्यते २९ इष्टापूर्तफलं न स्यान्न शिष्यो न गुरुर्भवेत् । पुरुषः कर्म साध्येषु स्याच्चेदयमकारणम् ३० कर्तृत्वादेव पुरुषः कर्मसिद्धौ

---

हा पुरुष जें कांही बरें वाईट कर्म करितो तें ईश्वरानें ठरविलेल्या पूर्व कर्माचीच फलप्राप्ति असें समजावें २२. ईश्वरानें नेमून दिलेलें कर्म करीत असलेला हा देहच त्या पूर्वकर्माचें कारण आहे आणि त्याला जशी त्या ईश्वराची प्रेरणा होईल तसा हा परतंत्र देह करणारा आहे २३. त्या त्या कृत्याचे ठिकाणीं महेश्वरच सर्व प्राण्यांची योजना करणारा आहे आणि ह्मणूनच, हे कुंतीपुत्रा, परतंत्र असलेल्या सर्व प्राण्यांकडून तो कर्में करवीतच असतो २४. मनामध्यें कांहीं गोष्टींचा निश्चय करून नंतर बुद्धिपूर्वक कर्माच्या योगानें पुरुष त्या स्वतः प्राप्त करून घेत असतो. तेव्हां, हे वीरा, प्रयत्न हेंच त्या गोष्टी प्राप्त होण्याचें मुख्य कारण होय २५. हे पुरुषश्रेष्ठा, गृह आणि नगरें तयार होण्यासही पुरुष( प्रयत्न )च कारण आहे. तस्मात्, पुरुषप्रयत्नानें होत असणाऱ्या कृत्यांची गणना करणें अशक्य आहे २६. तिलाचे ठिकाणीं तेल, गाईचे ठिकाणी दूध आणि काष्ठांचे ठिकाणीं अग्नि प्रत्यक्ष असल्याचें विचारी पुरुष जाणीत असून ती प्राप्त होण्याचा उपायही जाणितो २७ आणि नंतर ( पीडन, दोहन व मंथन ह्या ) साधनांच्या योगानें तेल वगैरे काढण्यास पुरुषाची प्रवृत्ति होते आणि ह्याप्रमाणें प्रयत्नानें साध्य झालेली जी तैलादिकांची प्राप्ति तिच्यावर प्राण्यांची उपजीविका अवलंबून असते २८. हें कर्म करणारा पुरुष कुशल होता व हें कर्म करणारा पुरुष कुशल नव्हता आणि त्याचप्रमाणें ह्याचें अनुष्ठान करणाऱ्यानें चांगलें केलें आहे आणि ह्याचें अनुष्ठान बरोबर झालेलें नाही हें प्राप्त होणाऱ्या विशेष फलावरून अनुमित करितां येतें ( सारांश, कांहीं ठिकाणीं कर्ता जरी उपलब्ध होत नसला तरी फलावरून त्याचें अनुमान करितां येतें ) २९. शिवाय, कर्मसाध्य

प्रशस्यते । असिद्धौ निन्द्यते चापि कर्मनाशात्कथं त्विह ३१ सर्वमेव हठेनैके दैवेनैके वदन्त्युत । पुंसः प्रयत्नजं केचित्त्रैधमेतन्निरुच्यते ३२ न चैवैतावता कार्यं मन्यन्त इति चापरे । अस्ति सर्वमदृश्यं तु दिष्टं चैव तथा हठः ३३ दृश्यते हि हठाच्चैव दिष्टाच्चार्थस्य संततिः । किंचिद्दैवाद्धठात्किंचित्किंचिदेव स्वभावतः ३४ पुरुषः फलमाप्नोति चतुर्थं नात्र कारणम् । कुशलाः प्रतिजानन्ति ये वै तत्त्वविदो जनाः ३५ तथैव धाता भूतानामिष्टानिष्टफलप्रदः । यदि न स्यान्न भूतानां कृपणो नाम कश्चन ३६ यं यमर्थमभिप्रेप्सुः कुरुते कर्म पूरुषः । तत्तत्सफलमेव स्याद्यदि न स्यात्पुरा कृतम् ३७ त्रिद्वारामर्थसिद्धिं तु नानुपश्यन्ति ये नराः । तथैवानर्थ-

---

फलांना पुरुषा ( च्या प्रयत्ना ) चीं जर जरूर नसेल तर इष्टापूर्तांचें फल प्राप्त होणार नाहीं आणि त्याचप्रमाणें कोणी कोणाचा शिष्य व कोणी कोणाचा गुरुही होण्याचा प्रसंग येणार नाहीं ३०. कांहीं कार्य शेवटास गेलें असतां पुरुषाची प्रशंसा होते आणि त्याचप्रमाणें आरंभिलेलें कार्य शेवटास न गेलें तर पुरुषाची निंदा होते ह्याचें कारण तरी त्या त्या कर्माविषयीं पुरुषाकडे कर्तृत्व असणें हेंच होय. तेव्हां ह्या ठिकाणीं कर्ता नाहीं असें कसें ह्मणावें ? ३१. कोणी ह्मणतात हठामुळेंच सर्व कांहीं घडतें. कोणी ह्मणतात दैवानेंच होतें आणि कोणी ह्मणतात पुरुषाच्या प्रयत्नापासूनच होतें. अशीं घडणाऱ्या गोष्टींविषयीं तीन प्रकारचीं मतें तीन सांगण्यांत येतात ( सारांश, कारणावांचूनच सर्व कांहीं होतें असें हठवादी चार्वाक ह्मणतात, दैवामुळेंच सर्व कांहीं घडतें ह्मणून दैववादी कालिक आपलें मत देतात आणि पुरुषप्रयत्नानेंच सर्व कांहीं घडून येतें असें प्राकृत लोक सांगतात ) ३२. दुसरे ( वैदिक ) असें समजतात कीं, " कार्यसिद्धीला ह्यांचा कांहींच उपयोग होत नाहीं. कारण, दैव, हठ इत्यादि जें कांहीं आहे तें सर्व अदृश्य असें धर्माधर्मरूप प्राक्तन कर्मच आहे " ३३. " एकादी गोष्ट अकस्मात् होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें व दैवाच्या योगानें एकादी गोष्ट घडून आल्याचें आढळतें. सारांश, कांहीं दैवामुळें, कांहीं अकस्मात् आणि कांहीं यत्न केल्यावांचून आपोआपच ३४ पुरुषाला फल प्राप्त होतें. चवथें जें प्राक्तन कर्म तें फलप्राप्तीचें कारण नाहीं " असें जे कोणी ( आपणांला ) विद्वान् व तत्त्वज्ञ ( ह्मणविणारे ) आहेत ते प्रतिज्ञापूर्वक ह्मणत असतात ( परंतु, हें त्याचें ह्मणणें बरोबर नाहीं ) ३५. कारण, प्राण्यांना इष्ट अथवा अनिष्ट फल देणारें पूर्वकर्म जर नसेल तर प्राण्यांमध्यें कोणीच दुर्दैवी दृष्टोत्पत्तीस येणार नाहीं ३६. पूर्वी केलेलें कर्म जर नसेल तर जो जो हेतु मनांत धरून पुरुष कर्म करूं लागेल तें तें त्याचें सफलच होईल(परंतु,

सिद्धिं च यथैवात्मा तथैव ते ३८ कर्तव्यमेव कर्मेति मनोरेष विनिश्चयः। एकान्तेन ह्यनीहोऽयं पराभवति पूरुषः ३९ कुर्वतो हि भवत्येव प्रायेणेह युधिष्ठिर । एकान्तफलसिद्धिं तु न विन्दत्यलसः क्वचित् ४० असंभवे त्वस्य हेतुः प्रायश्चित्तं तु लक्षयेत् । कृते कर्माणि राजेन्द्र तथानृण्यमवाप्नुते ४१ अलक्ष्मीराविशत्येनं शयानमलसं नरम् । निःसंशयं फलं लब्ध्वा दक्षो भूतिमुपाश्नुते ४२ अनर्थाः संशयावस्थाः सिध्यन्ते मुक्तसंशयाः । धीरा नराः कर्मरता ननु निःसंशयाः क्वचित् ४३ एकान्तेन ह्यनर्थोऽयं वर्ततेऽस्मासु सांप्रतम् । स तु निःसंशयं न स्यात्त्वयि कर्मण्यवस्थिते ४४ अथवा सिद्धिरेव स्यादभिमानं तदेव ते । वृकोदरस्य बीभत्सोर्भ्रात्रोश्च यमयो-

---

असें होत असल्याचें दिसत नाहीं )३७. हठ, दैव आणि स्वभाव ह्या तीन द्वारांच्या योगानें अर्थ अथवा अनर्थ होतात असें\ जे समजत नाहींत ते देहाप्रमाणेंच ( जड ) आहेत ( ह्मणून हठवादी प्रभृतींचें मत आहे ) ३८. ( उद्दिष्ट गोष्ट सिद्धीस जाण्यास ) कर्म केलेंच पाहिजे हा मनूचा निश्चय आहे. कारण, कर्म न करणारा पुरुष निश्चयेंकरून पराभव पावतोच ( करितां प्रयत्नरूप कर्मच अर्थसिद्धि होण्यास अवश्य आहे ) ३९. हे युधिष्ठिरा, प्रयत्न करणाऱ्या पुरुषाला प्रायः फल प्राप्त होतच असतें. ज्याच्या प्राप्तीविषयीं संशय नसतो असेंही फल आळशी पुरुषाला कोठेंही प्राप्त होत नाहीं ४०. आता ( अंगवैकल्यामुळें ) कर्मफलाची जर प्राप्ति झाली नाहीं तर त्या फलाची प्राप्ति ( अंगवैकल्पदोषनाशक ) प्रायश्चित्तानें होईल असें समजावें. कारण, ( कर्मफल प्राप्त होण्यास प्रतिबंधाचा अभाव असणें अवश्य आहे. ह्यास्तव, प्रतिबंधाचा अभाव झाला असतांना )कर्म झालें ह्मणजे, हे राजाधिराजा युधिष्ठिरा, पुरुष निर्देपासून मुक्त होतो ४१. प्रयत्न न करितां पडून राहणाऱ्या अळशी पुरुषाचे ठिकाणीं दारिद्र्याचा प्रवेश होतो आणि प्रयत्न करण्याविषयीं उद्युक्त असलेल्या पुरुषाला निःसंशय प्रयत्नाचें फल येऊन ऐश्वर्य प्राप्त होतें ४२. कर्मफलाविषयीं संशय धरणाऱ्या पुरुषाचे मनोरथ सिद्धीस जात नसून कर्मफल प्राप्त होणार ह्याविषयीं ज्यांचे ठिकाणीं संशय नसतो त्याचे मनोरथ सिद्धीस जातात. परंतु, ( फलाविषयीं संदेह न धरितां प्रयत्न केला असतां सिद्धि होण्याचें जरी प्रायः निश्चित आहे तरी ) कर्मफलाविषयीं संदेहरहित असे विचारी व कर्मनिष्ठ पुरुष खरोखर क्वचितूच आढळतात ४३. ( तूं राज्यप्राप्तीचा उद्योग करीत नसल्यामुळेंच ) आह्मांवर सांप्रत हा अनर्थ गुदरलेला आहे ह्यांत संदेह नाहीं. तूं जर प्रयत्नरूप कर्माचें अवलंबन करून राहिला असतास तर निःसंशय तो अनर्थ आह्मांवर गुदरला नसता ४४. आतां प्रयत्न केला असतां फल नच येईल तर तूं, भीम-

रपि ४५ अन्येषां कर्म सफलमस्माकमपि वा पुनः। विप्रकर्षेण बुध्येत कृतकर्मा यथा फलम् ४६ पृथिवीं लाङ्गलेनेह भित्त्वा बीजं वपत्युत। आस्तेथ कर्षकस्तूष्णीं पर्जन्यस्तत्र कारणम् ४७ वृष्टिश्चेन्नानुगृह्णीयाद्-नेनास्तत्र कर्षकः। यदन्यः पुरुषः कुर्यात्तत्कृतं सकलं मया ४८ तच्चेदं फलमस्माकमपराधो न मे क्वचित्। इति धीरोऽन्ववेक्ष्यैव नात्मानं तत्र गर्हयेत् ४९ कुर्वतो नार्थसिद्धिर्मे भवतीति ह भारत। निर्वेदो नात्र कर्तव्यो द्वावन्यौ ह्यत्र कारणम् ५० सिद्धिर्वाप्यथवासिद्धिरप्रवृत्तिरतो-न्यथा। बहूनां समवाये हि भावानां कर्मसिद्धयः ५१ गुणाभावे फलं

---

सेन, अर्जुन आणि उभयतां सहोदर भ्राते नकुलसहदेव हे सर्व राज्याला अयोग्य आहांत ह्याविषयीं तें एक प्रमाणच होईल ( आणि राज्यप्राप्तीचा उद्योग केला असतांही तें प्राप्त होत नाहीं असें एकदां समजून आलें म्हणजे राज्याची आशाच नाहींशी होणार असल्यामुळें त्याच्याकरितां मला उद्वेगही प्राप्त होणार नाहीं ) ४५. आमचें कर्म सफल होतें किंवा शत्रूंचें सफल होतें हें, कर्म केल्यानंतर, कांहीं कालानें समजणार आहे. तात्पर्य, जो कर्म करील त्याला कसें फल प्राप्त होतें हें समजेल. ( तूं जर प्रयत्नच करीत नाहींस तर प्रयत्नाचें फल येईल किंवा नाही हें तुला समजणार कसें ? ) ४६. नांगरानें जमीन नांगरून शेतकरी त्यांत बी पेरितो आणि ( पावसाची वाट पहात ) स्वस्थ बसतो. कारण, ( जमीनीची नांगरणी होऊन तिच्यामध्यें पेरणी होण्यास जरी शेतकरी कारण आहे तरी ) तो त्याचा नांगरण्याचा वगैरे प्रयत्न सफल होण्यास पर्जन्य कारण आहे ४७. ( जमीन नांगरून पेरणी केल्यावर ) पर्जन्यानें जर कृपा केली नाहीं तर त्या ठिकाणी शेतकरी दोषी होत नाही. " दुसऱ्या पुरुषाच्या हातून जें होणें शक्य आहे तें सर्व मी केलें आहे ४८ ; आतां ते आमचें कर्म जर निष्फल होईल तर त्यांत माझा कांहीं अपराध नाहीं असा विचार करून समंजस पुरुषाला ( प्रयत्न निष्फल झाल्याविषयीं ) स्वतःला तरी दोष देण्याचा प्रसंग येणार नाहीं ४९. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, प्रयत्न करीत असतांनाही माझा हेतु सिद्धीस जात नाहीं ह्मणून पुरुषानें ( हताश होऊन ) वैराग्याचें अवलंबन करूं नये. कारण, फलप्राप्ति होण्यास ( वैराग्यावांचून पुरुषप्रयत्न आणि प्रतिबंधांचा अभाव हीं ) दोन कारणीभूत होत असतात ५०. ( प्रयत्न करूनही प्रतिबंधाचा जर अभाव असेल तर ) फलप्राप्ति होतें अथवा ( प्रयत्न करूनही कांही प्रतिबद्धक असेल तर ) फलप्राप्ति होत नाहीं. ह्या करितां, ( भलतीच कल्पना मनामध्यें आणून प्रयत्न करण्याकडे ) प्रवृत्ति न होणें नीट नाहीं. कारण, कर्मफलप्राप्ति होण्यास पुष्कळ गोष्टींचा संयोग व्हावा लागतो ५१.

न्यूनं भवत्यफलमेव च । अनारम्भे हि न फलं न गुणो दृश्यते क्वचित् ५२
देशकालावुपायांश्च मङ्गलं स्वस्तिवृद्धये । युनक्ति मेधया धीरो यथाशक्ति
यथाबलम् ५३ अप्रमत्तेन तत्कार्यमुपदेष्टा पराक्रमः । भूयिष्ठं कर्मयोगेषु
दृश्यमेव पराक्रमः ५४ यत्र धीमानवेक्षेत श्रेयांसं बहुभिर्गुणैः । साम्नै-
वार्थं ततो लिप्सेत्कर्म चास्मै प्रयोजयेत् ५५ व्यसनं वास्य काङ्क्षेत विवासं
वा युधिष्ठिर । अपि सिन्धोर्गिरेर्वापि किं पुनर्मर्त्यधर्मिणः ५६ उत्थान-
युक्तः सततं परेषामन्तरैषणे । आनृण्यमाप्नोति नरः परस्यात्मन एव
च ५७ न चैवात्मावमन्तव्यः पुरुषेण कदाचन । न ह्यात्मपरिभूतस्य
भूतिर्भवति शोभना ५८ एवं संस्थितिका सिद्धिरियं लोकस्य भारत ।

---

साधन सामग्रीची कमतरता असल्यास फल कमी होतें आणि त्याचप्रमाणें साधनांचा अभाव असल्यास प्रयत्न निष्फल होतो. परंतु, कार्याला आरंभच जर केला नाहीं तर फलप्राप्ति कधींही दृष्टीं पडणार नाहीं आणि त्याचप्रमाणें प्रयत्न केल्यावांचून मनुष्याचे अंगीं कांहीं गुण असल्याचेंही कधींच समजण्यांत येणार नाहीं ५२. प्राज्ञ पुरुष कल्याणाची अभिवृद्धि होण्याकरितां उत्साह आणि बल ह्यांना अनुसरून देश, काल, सामादि उपाय आणि मंगल ह्यांची आपल्या बुद्धीनें योजना करीत असतो ५३. आपणाला जे कांहीं कर्तव्य असेल तें अगदी दक्ष राहून करावें व तें सिद्धीस जाण्याविषयीं प्रयत्नच मुख्य आहे असें समजावें. कारण, कार्य घडून येण्यास प्रयत्नाचाच उपयोग सर्वांत जास्त होत असल्याचें दिसून येतें ( तस्मात् पुरुषानें मुख्यत्वेंकरून प्रयत्नाचेंच अवलंबन करावें ) ५४. ज्या ठिकाणीं स्वतःपेक्षां पुष्कळच गुणांनीं प्रतिपक्षी अधिक आहे असें बुद्धिमान् पुरुषाच्या आढळण्यांत येईल त्या ठिकाणीं सामोपचारानेंच आपला हेतु सिद्धीस नेण्याची इच्छा धरावी आणि नंतर त्या ( प्रतिपक्षाला पादाक्रांत करण्या ) विषयीं प्रयत्न योजावा ५५. सागर अथवा पर्वत असा अजरामर प्रतिपक्षी जरी असला तरी, हे युधिष्ठिरा, त्याचा नाश करण्याचा अथवा त्याला हांकून लावण्याचा हुरूप धरावा; मग ( यः कश्चित् ) मर्त्यधर्मी शत्रूचा नाश वगैरे करण्याविषयींची तर शंका कशाला पाहिजे ? ५६. शत्रूचें छिद्र शोधून काढण्याविषयीं नेहमीं उद्युक्त असलेला पुरुष दुसऱ्याच्या व स्वतःच्याही मतानें निर्दोषी ठरतो ५७. ( मी अशक्त आहें. तेव्हां शत्रूला जिंकण्याविषयीं मीं उद्युक्त कसें व्हावें ? माझ्यानें कांहीं एक होणार नाहीं अशाप्रकारें ) पुरुषानें स्वतःचा अवमान कधींही करूं नये. कारण, स्वतःलाच कमी समजत असलेल्या पुरुषाला चांगलें ऐश्वर्य प्राप्त होत नाहीं ५८. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ही ह्याप्रमाणें लोकांचा प्रयत्न सिद्धीस जाण्याची

तत्र सिद्धिर्गतिः प्रोक्ता कालावस्थाविभागतः ५९ ब्राह्मणं मे पिता पूर्वं वासयामास पण्डितम् । सोपि मर्वामिमां प्राह पित्रे मे भरतर्षभ ६० नीतिं बृहस्पतिप्रोक्तां भ्रातॄन्मेग्राहयत्पुरा । तेषां सकाशादश्रौषमहमेतत्तदा गृहे ६१ स मां राजन्कर्मवतीमागतामाह सान्त्वयन् । शुश्रूषमाणामासीनां पितुरङ्के युधिष्ठिर ६२ [१२७३] इति श्रीमहाभारते० मारण्यपर्वण्यर्जुनाभिगमनपर्वणि द्रौपदीवाक्यं नाम द्वात्रिंशोध्यायः ॥३२॥

वैशम्पायन उवाच ॥ याज्ञसेन्या वचः श्रुत्वा भीमसेनो ह्यमर्षणः । निःश्वसन्नुपसंगम्य क्रुद्धो राजानमब्रवीत् १ राज्यस्य पदवीं धर्म्यां व्रज सत्पुरुषोचिताम् । धर्मकामार्थहीनानां किं नो वस्तुं तपोवने २ नैव धर्मेण तद्राज्यं नार्जवेन न चौजसा । अक्षकूटमधिष्ठाय हृतं दुर्योधनेन वै ३ गोमायुनेव सिंहानां दुर्बलेन बलीयसाम् । आमिषं विघसाशेन तद्वद्राज्यं हि नो हृतम् ४ धर्मलेशप्रतिच्छन्नः प्रभवं धर्मकामयोः । अर्थ-

---

व्यवस्था सांगितलेली आहे आणि काल व स्वतःची स्थिति ह्यांची अनुकूलता पाहून यत्न करणें हेंच त्या सिद्धीचें मूळ आहे ५९. हे भरतवंशजश्रेष्ठा, पूर्वी माझ्या पित्यानें आपल्या घरीं एका पंडित ब्राह्मणाला ( नीतिशास्त्र शिकविण्याकरितां ) राहून घेतलें होतें व त्याप्रमाणें त्यानें ही ही सर्व नीति माझ्या पित्याला सांगितली होती ६०. तदनंतर बृहस्पतींनीं सांगितलेली ती नीति पूर्वी त्यानें माझ्या भ्रात्यांना पढविली; तेव्हां त्यांच्यापासून मी ही घरीं त्या वेळीं ऐकून ठेविली ६१. इतकेंच नव्हे परंतु, श्रवण करण्याच्या इच्छेनें मी पित्याच्या अंकावर जाऊन बसलें असतां त्या ब्राह्मणानेंही, हे युधिष्ठिरराजा, वेदापासून प्राप्त झालेली ही प्रयत्नविषयक नीति चुचकारून चुचकारून मला सांगितली ६२. ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत वनपर्वांतील अर्जुनाभिगमनपर्वांपैकीं द्रौपदीच्या संभाषणाविषयीं बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥

वैशंपायन सांगतातः— द्रौपदीचें भाषण श्रवण करून ( धर्मराजाची कृति ) सहन होत नसलेला भीमसेन क्रुद्ध झाला आणि धर्मराजाचे समीप जाऊन सुस्कारे टाकीत टाकीत त्याला म्हणाला १ "सत्पुरुषांना योग्य आणि धर्माला अनुसरून असलेलें राज्यपद तूं प्राप्त करून घे. धर्म, अर्थ आणि काम ह्यांनीं हीन असलेल्या आपणांला तपोवनामध्यें वास्तव्य करण्याचें काय प्रयोजन आहे ? २. अरे, कपटद्यूताचें अवलंबन करून दुर्योधनानें तें आपलें राज्य हरण केलेलें आहे ; धर्म, सरलपणा आणि सामर्थ्य ह्यांपैकीं कशाच्याही योगानें त्यानें तें घेतलेलें नाहीं ३. अरे, उष्ट्यावर पोट भरणाऱ्या एका दुर्बल कोल्ह्यानें ज्याप्रमाणें बलाढ्य सिंहांचें भक्ष्य हरण करावें त्याप्रमाणें

मुत्सृज्य किं राजन्दुःखेषु परितप्यसे ५ भवतोनवधानेन राज्यं नः पश्यतां
हृतम् । अहार्यमपि शक्रेण गुप्तं गाण्डीवधन्वना ६ कुणीनामिव बिल्वानि
पङ्गूनामिव धेनवः । हृतमैश्वर्यमस्माकं जीवतां भवतः कृते ७ भवतः
प्रियमित्येवं महद्व्यसनमीदृशम् । धर्मकामे प्रतीतस्य प्रतिपन्नाः स्म
भारत ८ कर्षयामः स्व मित्राणि नन्दयामश्च शात्रवान् । आत्मानं भवतां
शास्त्रैर्नियम्य भरतर्षभ ९ यद्वयं न तदैवैतान्धार्तराष्ट्रान्निहन्महि । भवतः शास्त्र-
मादाय तन्नस्तपति दुष्कृतम् १० अथैनामन्ववेक्षस्व मृगचर्यामिवात्मनः ।
दुर्बलाचरितां राजन्नबलस्थैर्निषेविताम् ११ यां न कृष्णो न बीभत्सु-
र्नाभिमन्युर्न सृञ्जयाः । न चाहमभिनन्दामि न च माद्रीसुतावुभौ १२
भवान्धर्मो धर्म इति सततं व्रतकर्शितः । कच्चिद्राजन्न निर्वेदादापन्नः
क्लीबजीविकाम् १३ दुर्मनुष्या हि निर्वेदमफलं स्वार्थघातकम् । अशक्ताः

---

दुर्योधनानें आमचें राज्य हरण केलें आहे ४. हे राजा, प्रतिज्ञापालनरूप धर्मलेशाचें पांघरूण घेऊन धर्म आणि काम ह्यांचें उत्पत्तिस्थान असलेल्या राज्यरूप अर्थाचा त्याग करून तूं कशाकरितां दुःखांची स्वतःला काळजी लावून घेत आहेस ? ५. गांडीव धनुष्य धारण करणाऱ्या अर्जुनानें रक्षित आणि ह्मणूनच इद्रालाही हरण करितां येण्यास अशक्य असें राज्य तुझ्या प्रमादामुळे दुर्योधनानें आमची परवाही न करितां हरण केलें ६. अरे, खुळप्याची बिल्वफलें अथवा पांगळ्याच्या गाई ह्यांचें ज्याप्रमाणें एकाद्यानें हरण करावें त्याप्रमाणें आह्मी जिवंत असतांना तुझ्यामुळें आमचें ऐश्वर्य दुर्योधनानें हरण केलें ७. धर्माच्या इच्छेवर विश्वास ठेऊन असलेल्या तुझें प्रिय करण्याकरितां ह्मणून, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, अशा प्रकारचें महासंकट आह्मांला प्राप्त झालें आहे ८. हे भरतवंशजश्रेष्ठा, तुझ्या उपदेशांच्या योगानें आत्मसंयमन करून आह्मी आज आपल्या मित्रांना दुःख व शत्रूंना आनंद देत आहोंत ९. तुझ्या उपदेशाचा स्वीकार करून आह्मी त्या वेळींच धृतराष्ट्रपुत्रांचा वध केला नाहीं; ह्या दुष्ट कृत्याचा आह्मांला पश्चात्ताप होत आहे १०. हे धर्मराजा, बलवानांनीं जिचा कधींही स्वीकार केलेला नसून दुर्बलांनीं मात्र जिचें सेवन केलेलें आहे अशी ही आपली (वनांत संचार करून दिवस काढण्याची) पशुवृत्ति अवलोकन कर ११. हे धर्मराजा, कृष्ण, अर्जुन, अभिमन्यु, सृंजय, मी आणि उभयतां माद्रीपुत्र नकुलसहदेव ह्यांना जी संमत नाहीं ती क्लीबवृत्ति "धर्म धर्म" ह्मणून नेहमी व्रतांच्या योगानें शरीर कृश करून घेत असलेला तूं ऐश्वर्याचा कंटाळा आल्यामुळें तर स्वीकारून राहिला नाहींस नां ? १२, १३. लक्ष्मी हरण करण्यास असमर्थ असलेले नराधम निष्फल आणि स्वार्थघातक असें वैराग्यच आपणांला

श्रियमाहर्तुमात्मनः कुर्वंत प्रियम् १४ स भवान्दृष्टिमाञ्छक्तः पश्यन्नस्मासु पौरुषम् । आनृशंस्यपरो राजन्नानर्थमवबुध्यसे १५ अस्मानमी धार्तराष्ट्राः क्षममाणानलं सतः । अशक्तानिव मन्यन्ते तद्दुःखं नाहवे वधः १६ तत्र चेद्युध्यमानानामजिह्ममनिवर्तिनाम् । सर्वशो हि वधः श्रेयान्प्रेत्य लोकाँल्लँभमहि १७ अथवा वयमेवैतान्निहत्य भरतर्षभ । आददीमहि गां सर्वां तथापि श्रेय एव नः १८ सर्वथा कार्यमेतन्नः स्वधर्ममनुतिष्ठताम् । काङ्क्षतां विपुलां कीर्तिं वैरं प्रतिचिकीर्षताम् १९ आत्मार्थं युध्यमानानां विदिते कृत्यलक्षणे । अन्यैरपि हृते राज्ये प्रशंसैव न गर्हणा २० कर्षणार्थो हि यो धर्मो मित्राणामात्मनस्तथा । व्यसनं नाम तद्राजन्न धर्मः स कुधर्म तत् २१ सर्वथा धर्मनित्यं तु पुरुषं धर्मदुर्बलम् । त्यजतस्तात धर्मार्थौ प्रेतं दुःखसुखे यथा २२ यस्य धर्मो हि धर्मार्थं क्लेशभाङ्न स

---

प्रिय मानूं लागतात १४.परंतु, हे राजा, तूं स्वतः दूरदर्शी व आपलें ऐश्वर्य हरण करण्यास समर्थ आहेस. तेव्हां असें असूनही आणि आमचे ठिकाणीं असलेला पराक्रम तूं पहात असूनही दयेविषयीं तत्पर राहून हा अनर्थ मनांत आणीत नाहींस हें काय? १५. खरोखर युद्धांमध्यें वध पावण्यांत दुःख नाहीं; परंतु, आह्मी प्रतीकार करण्यास समर्थ असतांनाही (तुझ्या करितां) क्षमेचें अवलंबन करीत असल्यामुळें हे धृतराष्ट्रपुत्र आह्मांला अशक्त समजत आहेत ह्याचें आह्मांला दुःख होत आहे १६. अरे, समरांगणामध्यें परावृत्त न होतां सरळ युद्ध करितां करितां वध पावणें हें ह्या दुःखापेक्षां सर्व प्रकारें श्रेयस्कर आहे. कारण, युद्धामध्यें मरण आलें असतां आह्मांला उत्तम लोक तरी प्राप्त होतील १७. अथवा, हे भरतवंशजश्रेष्ठा, आह्मींच ह्यांचा वध करून जरी सर्व पृथ्वी ह्यांच्या पासून ( परत ) हिसकावून घेतली तरी सुद्धां त्यांत आमचें कल्याणच आहे १८. कारण, वैराचा प्रतीकार करण्याचें मनांत धरून मोठी कीर्ति संपादन करण्याची इच्छा करीत असलेल्या आह्मां स्वधर्मनिष्ठांचें हें सर्वस्वीं कर्तव्यच आहे १९. कर्तव्य काय ह्याचें स्वरूप निश्चित झाल्यावर स्वतःकरितां युद्ध करीत असतांना जरी शत्रूंनीं राज्य हरण केलें तरी त्यांत निंदा न होतां उलट प्रशंसाच होत असते. (कारण, राज्य गेलें तरी चिंता नाहीं; परंतु, स्वस्थ न बसतां आपलें कर्तव्य ओळखून ह्यांनीं शत्रूंशीं दोन हात करण्यास कमी केलें नाहीं असें तरी लोक ह्मणतील ) २०. परंतु, हे राजा, स्वतःला आणि मित्रांना दुःख होणें हेंच ज्याचें फल आहे असा जो धर्म त्याला व्यसन असें ह्मणत असतात. सारांश, हा धर्म नसून कुधर्म आहे २१. बा युधिष्ठिरा, वस्तुतः धर्माचरण करण्यास असमर्थ परंतु, मनामध्यें मात्र सर्वप्रकारें नित्य धर्माला धरून राहणारा जो

पण्डितः । न स धर्मस्य वेदार्थं सूर्यस्यान्धः प्रभामिव २३ यस्य चात्मार्थमेवार्थः स च नार्थस्य कोविदः । रक्षेत भृतकोरण्ये यथा गास्तादृगेव सः २४ अतिवेलं हि योर्थार्थी नेतरावनुतिष्ठति । स वध्यः सर्वभूतानां ब्रह्महेव जुगुप्सितः २५ सततं यश्च कामार्थी नेतरावनुतिष्ठति । मित्राणि तस्य नश्यन्ति धर्मार्थाभ्यां च हीयते २६ तस्य धर्मार्थहीनस्य कामान्ते निधनं ध्रुवम् । कामतो रममाणस्य मीनस्येवाम्भसः क्षये २७ तस्माद्धर्मार्थयोर्नित्यं न प्रमाद्यन्ति पण्डिताः । प्रकृतिः सा हि कामस्य पावकस्यारणिर्यथा २८ सर्वथा धर्ममूलोर्थो धर्मश्चार्थपरिग्रहः । इतरेतरयोर्नीतौ विद्धि मेघोदधी यथा २९ द्रव्यार्थस्पर्शसंयोगे या प्रीतिरुपजायते।

---

पुरुष त्याला प्रेताला सोडून जाणाऱ्या सुखदुःखांप्रमाणें धर्म व अर्थ हे दोघेही सोडून जातात २२. ( अर्थ आणि काम ह्यांची परवा न करितां ) केवल धर्माकरितांच जो धर्माचरण करीत असतो तो शहाणा नसून दुःखाचा मात्र वाटेकरी होणारा असतो. सारांश, अंधाला ज्याप्रमाणें सूर्याची प्रभा समजत नाहीं त्याचप्रमाणें त्याला धर्माचा अर्थ समजत नाहीं २३. ( धर्म आणि काम ह्यांची जरूर न बाळगितां ) जो केवळ स्वतःकरितांच अर्थाचें अवलंबन करितो तो अर्थाचा ज्ञाता नव्हे. परंतु, मजुरी घेऊन वनामध्यें गाईचें रक्षण करणाऱ्यांप्रमाणेंच त्याची अवस्था असते. ( सारांश, वेतन घेऊन रानामध्यें गाई नेणाऱ्या गुराख्याकडून जसें गाईचें रक्षण बरोबर होत नाहीं, तसेंच केवळ स्वार्थाकडे दृष्टि देऊन अर्थरक्षण करणाऱ्या पुरुषाच्या हातून अर्थाचें रक्षण होत नाहीं ) २४. ( इतकेंच नव्हे परंतु ) अर्थाची इच्छा धरून जो इतरांची ( ह्मणजे धर्म व काम ह्यांची ) परवा बाळगीत नाहीं तो ब्रह्मघातक्याप्रमाणें निंद्य आहे आणि ह्मणूनच सर्व प्राण्यांना तो वध्य आहे २५. त्याचप्रमाणें नेहमीं कामाकडेच लक्ष्य देऊन जो धर्म व अर्थ ह्यांच्याकडे पहात नाहीं त्याचे मित्र ( मित्र ह्या नात्यानें ) नाहींसे होत असून धर्म व अर्थ ह्यांनाही तो मुकतो २६ आणि ह्याप्रमाणें धर्म व अर्थ ह्यांना मुकलेला तो पुरुष स्वेच्छेनें रममाण होऊं लागला असतां उदक नाहींसें झाल्यावर मृत्यु पावणाऱ्या मत्स्याप्रमाणें कामाचा अंत झाला असतां त्याला निःसंशय मरण प्राप्त होतें २७. ह्याकरितां, शहाणे लोक धर्म व अर्थ ह्यांकडे कधींही दुर्लक्ष्य करीत नाहींत. कारण, अग्नीचें उत्पत्तिस्थान असलेल्या अरणीप्रमाणें धर्म व अर्थ हें कामाचें उगमस्थान आहे २८. अर्थ हा सर्वस्वीं धर्ममूलक असून धर्म हा अर्थमूलक आहे. सारांश, मेघ आणि समुद्र ह्यांप्रमाणें धर्म व अर्थ हे परस्परांवर अवलंबून आहेत २९. ( द्रव्याची अपेक्षा ज्यांना असते अशीं ) इंद्रियें आणि शब्दादि विषय

स कामश्चित्तसंकल्पःशरीरं नास्य दृश्यते ३० अर्थार्थी पुरुषो राजन्बृहन्तं धर्ममिच्छति । अर्थमिच्छति कामार्थी न कामादन्यमिच्छति ३१ न हि कामेन कामोन्यः साध्यते फलमेव तत् । उपयोगात्फलस्यैव काष्ठाद्भस्मेव पण्डितैः ३२ इमाञ्छकुनकान्राजन्हन्ति वैतंसिको यथा । एतद्रूपमधर्मस्य भूतेषु हि विहिंसता ३३ कामाल्लोभाच्च धर्मस्य प्रकृतिं यो न पश्यति । स वध्यः सर्वभूतानां प्रेत्य चेह च दुर्मतिः ३४ व्यक्तं ते विदितो राजन्नर्थो द्रव्यपरिग्रहः । प्रकृतिं चापि वेत्थास्य विकृतिं चापि भूयसीम् ३५ तस्य नाशे विनाशे वा जरया मरणेन वा । अनर्थ इति मन्यन्ते सोय-

---

ह्यांचा संयोग झाला असतां जो आनंद होतो त्याला काम असें ह्मणतात. हा काम चित्ताच्या योगानें उत्पन्न होत असून याचें शरीर दृष्टोत्पत्तीस येत नाहीं ३०. हे राजा, अर्थार्थी पुरुष श्रेष्ठ धर्माची इच्छा करीत असून कामार्थी पुरुष अर्थाची इच्छा करीत असतो ( सारांश, अर्थप्राप्तीला धर्माची अवश्यकता असून काम संपादन होण्याला अर्थाची अवश्यकता आहे आणि धर्मसंपादनाला अर्थाची अवश्यकता असल्याचें वर सांगितलेंच आहे. तेव्हां धर्म, अर्थ आणि काम ह्यांपैकीं पहिले दोन परस्परांवर अवलंबून असून काम हा अर्थावर अवलंबून आहे. परंतु, कामावर मात्र त्रिवर्गांपैकीं कोणी अवलंबून नाहीं. ह्याकरितां, पुरुष धर्मापासून अर्थप्राप्तीची इच्छा करितो, अर्थापासून कामसंपादन होण्याची इच्छा करितो ) आणि कामापासून मात्र दुसऱ्या कोणाच्याही प्राप्तीची इच्छा करीत नाहीं ३१. अरे, कामाच्या योगानें पंडितांनाही इतर कामना सिद्ध करितां येत नाहीं. कारण, काम हें फलच आहे. तेव्हां फलाचा उपयोग होऊन गेल्यानंतर (ह्मणजे उपभोग घेणाऱ्या पुरुषाचे ठिकाणीं आनंद उत्पन्न करून फल नाहींसे झाल्यानंतर त्यापासून ) दुसरें फल प्राप्त होण्याचा संभव नाहीं. तात्पर्य, काष्ठापासून भस्मरूप फल प्राप्त झाल्यानंतर त्या भस्मापासून ज्याप्रमाणें दुसरें भस्म प्राप्त होत नाहीं त्याचप्रमाणें अर्थापासून काम हें फल प्राप्त झाल्यानंतर त्या कामापासून दुसरी कामनासिद्ध होण्याचा संभव नाहीं ३२. हे राजा, ज्याप्रमाणें हा पक्षिघातक ह्या पक्ष्यांचा घात करीत आहे त्याचप्रमाणें विशेषें करून प्राण्यांची हिंसा करणें हें अधर्माचें रूप आहे ३३. काममुळें आणि लोभामुळें जो धर्माच्या स्वरूपाकडे लक्ष्य देत नाहीं तो दुष्टबुद्धि पुरुष इहजन्मीं व जन्मांतरींही सर्व प्राण्यांना वध्यच होतो ३४. हे राजा, द्रव्यसंपादनरूप अर्थ तुला विदित नसून त्याची उत्पत्ति आणि सर्वस्वीं नाश कशानें होतो हेंही तुला विदित नाहीं असें स्पष्ट दिसत आहे ३५. अरे, त्या ( गवाश्वादिरूप ) द्रव्याचा जरेच्या योगानें वियोग अथवा मृत्यूच्या योगानें नाश झाला असतां त्याला अनर्थ असें ह्मणतात आणि तोच अनर्थ

मस्मासु वर्तते ३६ इंद्रियाणां च पञ्चानां मनसो हृदयस्य च । विषये वर्तमानानां या प्रीतिरुपजायते ३७ स काम इति मे बुद्धिः कर्मणां फल-मुत्तमम् । एवमेव पृथग्दृष्ट्वा धर्मार्थौ काममेव च ३८ न धर्म पर एव स्यान्न चार्थपरमो नरः । न कामपरमो वा स्यात्सर्वान्सेवेत सर्वदा ३९ धर्मं पूर्वे धनं मध्ये जघन्ये काममाचरेत् । अहन्यनुचरेदेवमेष शास्त्रकृतो विधिः ४० कामं पूर्वे धनं मध्ये जघन्ये धर्ममाचरेत् । वयस्यनुचरेदेव-मेष शास्त्रकृतो विधिः ४१ धर्मं चार्थं च कामं च यथावद्वदतां वर । विभज्य काले कालज्ञः सर्वान्सेवेत पण्डितः ४२ मोक्षो वा परमं श्रेय एष राजन्सुखार्थिनाम् । प्राप्तिं वा बुद्धिमास्थाय सोपायां कुरुनन्दन ४३ तद्वाशु क्रियतां राजन्प्राप्तिर्वाप्यधिगम्यताम् । जीवितं ह्यातुरस्येव दुःख-मन्तरवर्तिनः ४४ विदितश्चैव मे धर्मः सततं चरितश्च ते । जानन्तस्त्वयि

---

सांप्रत आह्मांवर ओढवला आहे ३६. पांच ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि हीं शब्दादि विषयांचे ठिकाणीं प्रवृत्त झाली असतांना जी प्रीति उत्पन्न होते ३७ तोच काम आणि तेच कर्मांचें उत्तम फल असें मला वाटतें. तस्मात् , धर्म, अर्थ आणि काम हे ह्याचप्रमाणे भिन्न भिन्न आहेत असें निश्चित समजून ३८ पुरुषानें केवल धर्माचेंच अव-लंबन करूं नये, केवल अर्थाच्याच पाठीमागें लागूं नये आणि त्याचप्रमाणें केवल कामाचीही कास धरून असूं नये. परंतु, धर्म, अर्थ व काम ह्या सर्वांचें नेहमीं सेवन करावें ३९. पूर्व भागांत धर्मानुष्ठान, मध्यभागांत द्रव्यसंपादन आणि शेवटल्या भागांत कामसेवन ह्याप्रमाणें प्रत्यहीं वागावें हा शास्त्रविहित विधि आहे ४० आणि त्याच-प्रमाणें पहिल्या वयोवस्थेमध्यें कामसेवन, दुसऱ्या वयोवस्थेमध्यें धनसंपादन आणि तिसऱ्या वयोवस्थेमध्यें धर्माचरण ह्याप्रमाणें वयामध्यें वागावें असाही शास्त्रसिद्ध विधि आहे ४१. करितां, हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ धर्मराजा, कालवेत्त्या प्राज्ञ पुरुषानें धर्म, अर्थ आणि काम ह्या सर्वांचें कालविभागपूर्वक यथाविधि सेवन करीत असावें ४२. हे राजा, सुखेच्छु पुरुषांनीं मोक्षरूप उत्कृष्ट कल्याण तरी प्राप्त करून घ्यावें किंवा, हे कुरुनंदना, साधनसंपादनपूर्वक निश्चय करून अभ्युदय तरी प्राप्त करून घ्यावा ४३. करितां, हे राजा, तें मोक्षरूप कल्याण तरी सत्वर प्राप्त करून घे किंवा ( राज्यसंपा-दनजन्य ) अभ्युदयाचा तरी लाभ करून घे. कारण, दोहोंपैकीं एकाचाही आधार नसतां मध्येंच लोंबकळत असलेल्या पुरुषाचें जीवित व्याधिग्रस्त पुरुषाच्या जीविताप्रमाणें दुःखावह होतें ४४. आपला धर्म कोणता तो मला विदित असून तूंही त्याचें नेहमीं आचरण केलेलें आहेस आणि तुज क्षत्रियाला कर्माचा अधिकार असल्याचें सुहृद्ही